# तृतीय वर्ष कला
## सत्र -V (CBCS)

## मराठी अभ्यासपत्रिका क्र.६
# साहित्य आणि समाज

## विषय कोड : 97067

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रवींद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **श्री. अनिल आर. बनकर**
कला आणि मानव्य विद्याशाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. बालाजी कांबळे**
साहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. सतीश कामथ**
सहयोगी प्राध्यापक,
कला व वाणिज्य महाव्द्यिालय, फोंडाघाट,
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

**डॉ. ज्ञानेश्वर भोसले**
साहाय्यक प्राध्यापक,
एस.पी.एल.शॉर्फ कला व वाणिज्य महाविद्यालय,
चिंचणी, ता.डहाणु, जि.पालघर

**प्रा. जाई म्हात्रे**
साहाय्यक प्राध्यापक,
महर्षी ज्ञानन्द महाविद्यालय,
२५ रॅप मार्केट गणेश गल्ली, परेल, मुंबई

**डॉ. वैशाली जावळेकर**
सहयोगी प्राध्यापक,
डी.जी.रुपारेल महाविद्यालय, माहीम, मुंबई.

**मे २०२२, मुद्रण - १, ISBN 978-93-91735-62-3**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १अ. | साहित्य समाज संस्कृती या संकल्पना व त्यांच्या परस्परांसंबंधाचे स्वरूप | ०१ |
| १ब. | साहित्य - समाज संबंध - तेन, मार्क्स यांचे सिद्धांत, मानवतावाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद, आंबेडकरवाद यांचे स्वरूप विशेष | १८ |
| २अ. | महानगरीय जाणिवेचे साहित्य : स्वरूप आणि संकल्पना | ४४ |
| २ब. | क्रमश : कादंबरीचे कथानक, आशयसूत्र, पात्रचित्रण आणि समीक्षण | ६५ |
| ३अ. | ग्रामीण साहित्य - संकल्पना व मराठीतील परंपरा | ८६ |
| ३ब. | ग्रामीण साहित्यप्रवाह धग असतेच आसपास कल्पना दुधाळ | १०० |


❖❖❖❖

**अभ्यासपत्रिका ६.**
**साहित्य आणि समाज भाग १**
**सत्र -५ वे तासिका ४५ श्रेयांकने ३**

***उदिष्टे (Objective)***

*१) साहित्य आणि समाज यांचा अनोन्य संबध तपासणे*

*२) महानगरीय साहित्याच्या जाणीव समजावून घेणे*

*३) ग्रामीण साहित्याच्या जाणीव समजावून घेणे*

*४) निवडक कलाकृतीच्या आधारे वाड्मयीन प्रवृत्तीचा शोध घेणे*

**घटक १ साहित्य - समाज अन्योन्य संबंध (तासिका १५) श्रेयांकन १**
अ) साहित्य, समाजसंस्कृती या संकल्पना व त्यांच्या परस्परसंबंधाचे स्वरुप
ब) साहित्य- समाज संबंध - तेन , मार्क्स यांचे सिद्धांत , मानवतावाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद, आंबेडकरवाद यांचे स्वरूप विशेष

**घटक २ महानगरी जाणिवेचे साहित्य (तासिका १५ ) श्रेयांकन १**
अ) महानगरी जाणिवेचे साहित्य संकल्पना व मराठीतील परंपरा
ब) क्रमश: : महेश केळूसकर मनोविकास प्रकाशन, पुणे

**घटक -३ ग्रामीण साहित्य (तासिका १५ ) श्रेयांकने १**
अ) ग्रामीण साहित्य- संकल्पना व मराठीतील परंपरा
ब) धग असतेच आसपास : कल्पना दुधाळ, लोकवाङ्मय गृह, मुंबई

**घटक ४ प्रकल्प अहवाल – सबंधित विषयावर २० गुणांचे प्रकल्प लेखन श्रेयांकन १**

**सत्रान्त परीक्षा ( गुण ८०)**

प्रश्न १. घटक १ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न २. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न ३. घटक ३ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न ४. सर्व घटकांवर आधारित दोन टीपा (पर्यायासह ) गुण २०

***साध्ये (Outcome)***

*१) साहित्य व समाज यांच्या अनोन्य संबंधाचा परिचय होईल*

*२) महानगरीय व ग्रामीण जाणीवेच्या साहित्याचा व समाजाचा अनोन्य संबंध लक्षात येईल*

*३) निवडक कलाकृतीच्या आधारे विविध वाड्मयीन प्रवाहाचा परिचय होईल*

# १अ

## साहित्य – समाज अन्योन्य संबंध

## अ) साहित्य समाज संस्कृती या संकल्पना व त्यांच्या परस्परसंबंधाचे स्वरूप

**घटक रचना**

१अ.0 उद्दिष्ट्ये

१अ.१ प्रास्ताविक

१अ.२ विषय विवेचन

१अ.३ साहित्य : संकल्पना व स्वरूप

१अ.४ समाज : संकल्पना व स्वरूप

१अ.५ संस्कृती : संकल्पना व स्वरूप

१अ.६ साहित्य, समाज आणि संस्कृती अनोन्य संबंध

१अ.७ समारोप

१अ.८ सरावासाठी स्वाध्याय

१अ.९ संदर्भ ग्रंथ

---

### १अ.0 उद्दिष्ट्ये

---

या घटकाच्या अध्ययनानंतर

१. साहित्य म्हणजे काय ? साहित्याचे विशेष कोणते ? साहित्याची अंगे कोणती ? याची ओळख होईल.

२. समाज म्हणजे काय ? समाजाची लक्षणे कोणती ? याची ओळख होईल.

३. मानवी संस्कृतीचे स्वरूप लक्षात येईल.

४. साहित्य, समाज आणि संस्कृती यातील अन्योन्य संबंध समजून घेता येईल.

## १अ.१ प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात आपणास साहित्य, समाज, संस्कृती या संकल्पना व त्यांच्या परस्परसंबंधाचे स्वरूप याचा सविस्तर विचार करावयाचा आहे. त्यादृष्टीने सर्वप्रथम साहित्य, साहित्याचे विशेष, साहित्याची अंगे, समाज, समाजाची लक्षणे, मानवी संस्कृती, साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्परसंबंधांची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

जे जे लिहिले जाते ते ते, म्हणजे सर्व लिखित मजकूर म्हणजे साहित्य, ही एक टोकाची व्याख्या काही तज्ज्ञांनी केलेली आहे. अर्थातच ही भूमिका क्वचितच व अपवादाने घेतली गेल्याचे दिसते. याउलट केवळ अभिजात विश्वसाहित्याचाच निर्देश ‘साहित्य’ या संज्ञेने केला जावा, ही भूमिकाही फारशी स्वीकारार्ह ठरली नाही. या दोन टोकांच्या मध्ये अनेक परस्परभिन्न, विविधांगी भूमिका व दृष्टिकोण घेतले गेल्याचेही दिसून येते. लिटरेचर ही संज्ञा सैलसर व व्यापक अर्थाने अनेक संदर्भांत वापरली जाते. मराठीतील साहित्य व वाङ्मय या संज्ञांबाबतही हेच म्हणता येईल.

दैनंदिन व्यवहारात समाज हा शब्द अतिशय ढोबळ व संकुचित अर्थाने वापरला जातो. देशवाचक, समूहवाचक, धर्मवाचक वगैरे अर्थाने हा शब्द व्यावहारिक भाषेत वापरला जातो. परंतु त्यापेक्षा निराळा असा समाजशास्त्रीय अर्थ या संकल्पनेमागे आहे. एक सामाजिक व्यवस्था या अर्थाने समाज ही संकल्पना समाजशास्त्रात वापरली जाते. समाज म्हणजे परस्पराशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूहाची मिळून तयार झालेली एक व्यापक संघटना होय. लोकसंख्या, प्रदेश, प्रजोत्पादन आणि संस्कृती ही या समाजाची लक्षणे होत.

प्राण्यांना केवळ जैविक परंपरा असते. माणसांना सामाजिक, सांस्कृतिक परंपरा असते. त्यामुळे मानवी वर्तन व्यवहारावर सामाजिक प्रभाव आणि नियंत्रण पाहायला मिळते. सामाजिकरणाची ही प्रक्रिया मानवामध्ये लहानपणापासूनच सुरू झालेली आढळते. सहवासातून संस्कारीत झालेल्या मानवी संस्कृतीचे भौतिक संस्कृती व अध्यात्मिक संस्कृती असे दोन भाग पडलेली दिसतात.

साहित्य हा मानवी समाजाच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक उपक्रम आहे. म्हणून समाज, संस्कृती आणि साहित्य यांचा अन्योन्य असा संबंध असतो. या परस्पर संबंधाला सर्वप्रथम माराम स्ताइल या फ्रेंच महिलेने अधोरेखित केले. त्यानंतर 'साहित्य ही समाजाचे अभिव्यक्ती आहे' असा विचार लुई डी बोनाल्ड यांनी मांडला आणि साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाला वेगळी दिशा प्राप्त झाली.

साहित्यनिर्मिती ही व्यक्तिगत नव्हे तर सामाजिक घटना आहे. व्यक्ती स्वकालाशी, स्वकालीन सामाजिक - सांस्कृतिक जडणघडणीशी कमी जास्त प्रमाणात जोडली गेल्याचे दिसते. साहित्यकृतीचे रसग्रहण, मूल्यमापन, उपयोजन इत्यादी गोष्टीही समाजाशी निगडित असतात. साहित्य व्यवहारावर समाजाचे नियंत्रण येते. साहित्याच्या प्रांतात विभिन्न काळात विविध स्वरूपात आकाराला आलेली अभिरुची, ग्रंथनिर्मिती, प्रकाशन, ग्रंथप्रदर्शन यावर उमटलेल्या प्रतिक्रिया जाणून घेतानाही साहित्याच्या सामाजिक अभ्यासाचा उपयोग

होतो. एकूण साहित्यात येणाऱ्या सर्व घटकांना सामाजिक संदर्भ असतो. त्या दृष्टीने साहित्य व्यवहार हा सामाजिकतेने व्यापून राहिलेला आहे, असे म्हणता येते.

साहित्याचे माध्यम असणारी भाषा आणि समाज यांचे नाते दृढ स्वरूपाचे असते. विशिष्ट भाषेशिवाय विशिष्ट जीवनानुभव व्यक्त होणे शक्य नाही. म्हणूनच समाजनिर्मित भाषा ही साहित्याचा मुख्य आधार आहे असे मानता येते. भाषा ज्या समाजात जन्मते ; त्या समाजात लेखकही जन्माला येतो. एक व्यक्ती म्हणून लेखक जा समाज गटात वाढतो त्या समाजाच्या जीवनपद्धतीचा परिणाम त्याच्या जडणघडणीवर होत असतो. त्या दृष्टीने लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील सामाजिक अंगांचा शोध घेणे शक्य असते. यावरून साहित्य व समाज यांचा परस्परपूरक, परस्पराश्रयी आणि निकटचा संबंध लक्षात येतो.

## १अ.२ विषय विवेचन

विद्यार्थी मित्रांनो प्रस्तुत घटकात आपण 'साहित्य, समाज, संस्कृती या संकल्पना व त्यांच्या परस्परसंबंधाचे स्वरूप' याचा सविस्तरपणे समजून घेणार आहोत. अलीकडच्या काळामध्ये वेगवेगळी शास्त्रे आणि कलांच्या आधारे साहित्याचा अभ्यास होऊ लागला आहे. इतिहास, मनोविज्ञान, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि विविध भारतीय लोककला यांचा यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करता येईल. परिणामी अलीकडे साहित्याचा सामाजिक अंगाने अधिक व्यापक व सखोल अभ्यास केला जात आहे. साहित्याचा समाजशास्त्रीय भूमिकेतून अभ्यास करणारी ही पद्धत लवचिक आणि साहित्यगत आशय सामाजिक अंगाने उलगडणारी अशी आहे. साहित्य आणि समाज या दोन्ही संकल्पना मानव्यसापेक्ष आहेत. त्यामुळे त्यांच्यातील दृढ अशा अन्योन्य संबंधांना नाकारता येत नाही. साधारणपणे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजशास्त्र ही स्वतंत्र ज्ञानशाखा उदयास आली आणि तेव्हापासून साहित्याच्या अभ्यासकांनी समाजशास्त्रीय संकल्पनेचा आधार घेऊन साहित्याचा विचार करायला सुरुवात केली. त्या अनुषंगानेच साहित्य, समाज आणि संस्कृती या संकल्पना आपण समजून घेणार आहोत.

## १अ.३ साहित्य : संकल्पना व स्वरूप

'साहित्य' हा शब्द अनेकदा आपण सर्वत्र वापरतो. तो इतका परिचयाचा झालेला आहे की, त्याचा खरा अर्थ आपण लक्षातच घेत नाही. कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र या शब्दरूप कलाकृतींना आपण 'साहित्य' म्हणतो, तसे इतर वस्तूंनाही सहजपणे साहित्य म्हणतो. उदा. बांधकामाचे साहित्य, स्वयंपाकाचे साहित्य, पूजेचे साहित्य इत्यादी. परंतु येथे मात्र आपण शब्दमाध्यमातून साकार होणाऱ्या कलाकृतीसाठी 'साहित्य' हा शब्द वापरलेला आहे. थोडक्यात मानवी जीवनव्यवहारविषयक चित्रण, विवरण, अर्थनिर्णयन, भाष्य अशा स्वरूपाच्या भाषिक अभिव्यक्तीस स्थूल मानाने 'साहित्य' असे संबोधिले जाते. असे हे साहित्य कल्पनाप्रधान असले तरी त्याची पाळेमुळे वास्तवाच्या जमिनीत खोलवर रुजलेली असतात. वास्तवातील घटना-प्रसंगांची निवड करून त्यांची पुनर्रचना करून आणि त्यात स्वत:ची नवी भर घालून लेखक वास्तवाला समांतर अशी नवनिर्मिती साधतो. जीवनव्यवहाराचे भावनिक, आध्यात्मिक, बौद्धिक अशा विविध अंगांनी सर्वांगीण, सम्यक दर्शन साहित्यातून वाचकांस घडवतो.

इंग्रजीतील 'Literature' या शब्दाला मराठीमध्ये 'साहित्य' किंवा 'वाङमय' हे पर्याय शब्द वापरले जातात. 'Littera' या मूळ लॅटिन शब्दापासून 'Literature' हा शब्द निर्माण झाला. Littera ही संज्ञा प्राचीन असून तिचा अर्थ वर्णमालेतील अक्षर वा अक्षरे, असा होतो. 'Literature' या शब्दाचा कोशगत अर्थ 'कलामूल्य असलेले लेखन, साहित्य विशिष्ट विषयावरचे वाङमय, माहिती देणारे छापील वाङमय' असा आहे. काळाच्या ओघात या संज्ञेचा अर्थविस्तार होऊन ती बहुआयामी व व्यापक बनली. 'संहित' या धातूपासून तयार झालेल्या 'साहित्य' या शब्दाचा अर्थ 'एकत्र ठेवलेले' असा असला तरी मौखिक, लिखित, सर्जनशील 'वाङमय' असा त्याचा अर्थ येथे अभिप्रेत आहे. तर 'वाङमय' म्हणजे वाक (वाणी) मय होय. परंतु जे जे वाणी मय ते सर्व 'वाङमय' होत नाही. म्हणून ही संकल्पना अधिक सुस्पष्ट करण्यासाठी साहित्याचे ललित व ललितेत्तर असे भेद केले जातात. साहित्य व वाङमय या संज्ञा समानार्थी वापरल्या जात असल्या, तरी त्यांच्या अर्थात व उपयोजनात भेद करावा, असे काही समीक्षकांनी सुचविले आहे. वाङमय हा शब्द अधिक व्यापक अर्थाने वापरावा, असे रा. श्री. जोग यांनी सुचविले आहे. तर डॉ. अशोक केळकर यांच्या मते ललित वाङमयालाच 'साहित्य' म्हणावे. साहित्य ही संज्ञा अर्थदृष्ट्या सारस्वत, विदग्ध वाङमय या संज्ञांच्या जवळ जाणारी आहे.

इ. स. ९०० च्या सुमारास संस्कृत मीमांसकांनी 'साहित्य' हा शब्द वापरला. या दरम्यान काव्यमीमांसेचे शास्त्र या अर्थाने साहित्य ही संकल्पना वापरली गेली. प्राचीन काळी वापरलेली 'काव्य' ही संज्ञा व्यापक व सर्वच वाङमयप्रकारांचा निर्देश करणारी होती. प्राचीन ग्रीक व संस्कृत वाङमयात हे विशेषत्वाने दिसून येते. उदा. ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र. शब्द आणि अर्थ यांचे साहित्तत्व म्हणजे काव्य किंवा साहित्य अशी स्थूल मांडणी प्रारंभी झाल्याचे आढळते. साहित्याच्या अभिप्रेत स्वरूपात शब्द आणि अर्थ हे एकमेकांत मिसळून गेलेले असतात किंवा एकजीव झालेले असतात. त्यांचे अभिन्नत्व वा एकजीवित्व हे साहित्याचे प्रधान लक्षण मानले जाते. भामह या संस्कृत मीमांसकानेही 'शब्दार्थौ सहितौ काव्यम' अशी काव्याची अथवा साहित्याची व्याख्या करून, हे शब्द व अर्थाचे एकजीवित्व अधोरेखित केले आहे. शब्द म्हणजे ध्वनी वा अक्षरसमूह किंवा वर्णसमूह असा विस्तार होऊन, अशा अनेक शब्दसमूहांचे बनणारे वाक्य व वाक्यसमूहांतून व्यक्त होणारा आशय असा व्यापक अर्थ शब्द या संज्ञेत सामावलेला आहे. संवेदनांची, विचारांची, कल्पनांची संघटना असाही अर्थ ही संज्ञा वापरताना अभिप्रेत असतो. तद्वतच अर्थ या संज्ञेमध्ये चातुर्य, रमणीयत्व, सहेतुकत्व अशा अनेक छटा सामावलेल्या आहेत. अशा व्यापक अर्थाने शब्द व अर्थ यांचे सहअस्तित्व व एकजीवित्व हे साहित्याचे मुख्य लक्षण ठरते.

पाश्चात्य समीक्षकांनीही साहित्याच्या विविध अंगाची चर्चा करून स्वरूप विशेष मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी Literature आणि Imaginative Literature असे साहित्याचे दोन भाग केलेले आहेत. ॲरिस्टाटलने साहित्याला 'जीवनाची अनुकृती' मानले व साहित्य शब्द व भाषेच्या माध्यमातून जीवनाची अनुकृती करते असे म्हटले. कोलरिजने 'The Best words in Best order' म्हणजेच उत्तम क्रमात विणलेले उत्तम शब्द अशी व्याख्या केली आहे. वर्डस्वर्थने 'Poetry is the spontiuious overflow of powerful feeling. It take, if origion from emotion and recollected in tranquility' अशी व्याख्या करून भावनेच्या सहजस्फूर्त आणि उत्कट – तीव्र आविस्काराला महत्त्व दिलेले दिसते. ए.

सी. ब्रॅडली या इंग्रज टीकाकारानेही ‘व्हेअर साउंड अँड मीनिंग आर वन’ अशी साहित्याची व्याख्या करून शब्द व अर्थाचे एकजीवित्व अधोरेखित केले आहे.

प्रारंभी गेयता व पठणसुलभता ही साहित्याची वैशिष्ट्ये मानली गेली त्यामुळे मौखिक साहित्याची परंपरा विकसित होत गेली. मुद्रणकलेच्या शोधानंतरच स्मरणसुलभतेची व पाठांतराची गरज फारशी उरली नाही. त्यामुळे गद्य साहित्याचा प्रसार  अधिक प्रमाणात होत गेला. साहित्याचे रुळलेले पद्य रूप थोडे बाजूला सारून गद्य रूपाचा अंगीकार मोठ्या प्रमाणावर केला जाऊ लागला. साधारणपणे  १९ व्या शतकापासून साहित्याची विभागणी स्थूलमानाने गद्य व पद्य अशी केली जाऊ लागली. त्यातूनच पुढे दीर्घ कथा, कादंबरी, चरित्र यासारखे लांब व मोठ्या व्याप्तीचे प्रकार रूढ व लोकप्रिय होऊ लागले. वास्तव जीवनचित्रण आणि वैचारिक मांडणी याकरिता गद्य अधिक जवळचे वाटल्याने गद्य साहित्याचा पुढे झपाट्याने विकास होत गेल्याचे दिसून येऊ लागले.

## १.  ललित साहित्याचे काही विशेष

मौखिक भाषा, कथनात्मक्ता, कल्पितता, संघटना, रूपबंध, व्यक्तीनिष्ठा, अभिव्यक्ती, आदी विशेषांच्या ललित साहित्य व ललितेत्तर साहित्य यातील फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न वॉरन आणि क्लेफे या पाश्चात्य समीक्षकांनी केला आहे. “साहित्य म्हणजे अनेकार्थ व वैविध्यपूर्ण संबंध यांच्या गुंफणीतून आकाराला आलेली जटील स्वरुपाची संघटना”  असे त्यांनी म्हटले आहे. ललित साहित्याचे आणखी काही विशेष खालीलप्रमाणे नोंदवता येतील.

१.  ललित साहित्य हे लेखकाच्या प्रतिभेतून, कल्पनाशक्तीतून निर्माण होते.

२.  काव्य, कथा, कादंबरी, नाटक हे ललित साहित्याचे प्रमुख प्रकार होत.

३.  ललित साहित्याचे प्रयोजन व प्रकृती सर्वस्वी भिन्न असते.

४.  साहित्याची प्रवृत्ती विश्वात्मकतेचा आविष्कार करण्याकडे असते.

५.  वास्तवाची अनुकृती म्हणजेच सर्जनशील साहित्य निर्मिती होय.

६.  सौंदर्य हे ललित साहित्याचे प्राणभूत तत्त्व मानले जाते.

७.  ललित साहित्याची भाषा सर्वस्वी निराळी, सूचक व व्यंजनाप्रचुर असते.

८.  साहित्यातून मानवी जीवनाचा शोध घेतला जातो

९.  साहित्यातून अनेकपदरी, बहुआयामी, व्यामिश्र, तरल, सूक्ष्म असे विविध स्वरूपाचे जीवनानुभव गोचर होतात.

१०.  अनेकत्वातून एकत्व प्रकट करणे, ही ललित साहित्याची प्रकृती आहे.

११.  सुसंघटितपणा, एककेंद्रियत्व, बांधेसूदपणा, प्रमाणबद्धता हा ललित साहित्याचा धर्म आहे.

१२. ललित साहित्यामध्ये बौद्धिक, भावनात्मक व कलात्मक अंगे एकत्र एकवटलेली असतात

**२. साहित्याची अंगे**

साहित्य ही अत्यंत व्यामिश्र, गुंतागुंतीची व अनेकांगी घटना आहे. त्यामुळे साहित्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. साहित्याचे जे विविध अंगविशेष सांगितले जातात त्यावरून साहित्याच्या स्वरुपाची कल्पना येऊ शकते. प्रा. गंगाधर पाटील व अन्य काही समीक्षकांनी साहित्याची सांगितलेली अंगे पुढील प्रमाणे आहेत.

१. भाषिक अंग

२. आशयात्मक / अर्थात्मक अंग

३. रूपबंधात्मक / संरचनात्मक अंग

४. कल्पकतेचे अंग

५. प्रकारात्मक अंग

६. सौंदर्यात्मक अंग

७. अस्तित्वात्मक व सत्ता शास्त्रीय अंग

८. चिन्हात्मक अंग

९. दृष्टीकोनात्मक अंग

१०. देशकालात्मक अंग

११. मानसशास्त्रीय अंग

१२. सामाजिक – सांस्कृतिक अंग

१३. संवादात्मक / संज्ञापनात्मक अंग

## १अ.४ समाज : संकल्पना व स्वरूप

**१. समाज : काही व्याख्या**

१. 'socious' या लॅटिन शब्दापासून सोसायटी हा शब्द तयार झाला असून त्याचा अर्थ संगती (association) सहवास (companionship) असा आहे. 'एकमेकाशी सहकार्य करतात त्या व्यक्तींचा मोठा समूह म्हणजे समाज' असा त्याचा अर्थ होतो.

२. "A society is a group of individuals Involved in persistent social interaction or a large social group sharing the same Spatial or social territory, typically subject to the same political authority and dominant cultural expectations."

(https://en.m.wikipedia.org)

३. "A large group of people who live together in an organized way, making decisions about how to do things and sharing the work that needs to be done. All the people in a county, or in several similar countries, can be referred to a society.".

(https:// dictionary.combridge.org)

४. Prof. Right - "It is a system of relationship that exists among the individuals of the groups." (ही एक अशी नातेसंबंधाची प्रणाली आहे जी गटातील व्यक्तींमध्ये अस्तित्वात आहे.)

५. Linton - "Any group of people who have lived and worked together long enough to get themselves organized and to think of themselves as a social unit with well detined limits" (लोकांचे कोणतेही गट ज्यांनी स्वत:पर्यंत संघटित राहण्यासाठी आणि स्वत:ला एक निश्चित परिभाषित मर्यादेसह सामाजिक एकक म्हणून विचार करण्यासाठी पुरेसे कार्य केले आहे.)

६. A. W. Green - "It is the largest group in which individual have relationships" (सर्वात मोठा गट की ज्यात व्यक्तींचे संबंध असतात.)

७. Maciver - "It is a Web of social relationship, which is always changing" ( समाज म्हणजे जे नेहमी बदलत असते असे सामाजिक संबंधांचे जाळे होय.)

८. Adam Smith - "Society is an artificial device of natural economy."

९. जॉन्सन - "विशिष्ट भौगोलिक प्रदेशात स्थायिक झालेल्या लोकांमधील स्थायी, सातत्यपूर्ण व नियमित स्वरूपाच्या परस्परसंबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय."

यावरून असे म्हणता येते की शाळा, ऑफीस, कारखाने, क्रीडांगणे इत्यादी ठिकाणी अचानक निर्माण झालेल्या तात्पुरत्या स्वरूपाच्या संबंधांना समाज म्हणता येत नाही. व्यक्तीव्यक्तींमधील सुनिश्चित, स्थायी व पुन्हा पुन्हा दिसणारे संबंधच समाज या संकल्पनेत अभिप्रेत आहेत.

## २. 'समाज' या संकल्पनेचे स्वरूप

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो समाज करून राहतो. माणसाला जैविक आणि सामाजिक वारसाही लाभलेला असतो. दैनंदिन व्यवहारात मात्र समाज हा शब्द धर्म, जात, वंश, वर्ग, लिंग यासारख्या स्त्री-पुरुषांच्या समुदायासाठी योजना जातो. तो संकुचित व ढोबळ अर्थाचा आहे. रोजच्या बोलण्यातील 'भारतीय समाज', 'हिंदू समाज', 'दलित समाज', 'आर्य समाज' या उदाहरणातील 'समाज' या शब्दापूर्वी लावलेल्या विशेषनामानुसार त्या शब्दाचा अर्थ घेतला जातो. म्हणजे देशवाचक, समूहवाचक, धर्मवाचक वगैरे वेगवेगळ्या अर्थाने 'समाज' हा शब्द वापरला जातो. परंतु इतका मर्यादित अर्थ या शब्दाला नाही. एक 'सामाजिक व्यवस्था' या अर्थाने समाज ही संकल्पना समाजशास्त्रात वापरली जाते. समाज म्हणजे परस्परांशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूह यांची मिळून बनलेली एक

व्यापक संघटना अथवा व्यवस्था होय. सामाजिक आंतरक्रियेमुळेच व्यक्ती आणि समूहात निश्चित स्वरूपाचे सामाजिक संबंध निर्माण झालेले दिसून येतात.

माणसांनी मिळून बनलेला समुदाय म्हणजे समाज असे जरी वाटत असले, तरी केवळ लोकांचा समूह म्हणजे समाज नव्हे. व्यक्ती - व्यक्ती, व्यक्ती - समूह, समूह - समूह यांच्यात स्थिर स्वरूपाचे सामाजिक संबंध आकाराला येऊन त्याची एक स्वतंत्र व्यवस्था अस्तित्वात आल्यावरच त्याला समाज म्हटले जाते. समाजाला स्वतःची संरचना असून तो सातत्यशील असतो. समाजस्थिती व्यक्तींमध्ये सामाजिक संबंध दृढ झालेले असतात. ते सुटे सुटे नसून ते वस्त्राप्रमाणे एकमेकात गुंतलेले असतात. त्यांना परस्परांची जाणीव असते. परस्परांच्या प्रेरणा, भावना, हेतू, विचार, मूल्ये इत्यादी आंतरिक घटकांचा प्रभाव परस्परांच्या वर्तनावर पडतो. कौटुंबिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, संस्कृती इत्यादी क्षेत्रेही त्यामुळे प्रभावित होतात. त्यातून मित्रत्व किंवा शत्रुत्वपूर्ण संबंधाचा जन्म होतो. थोडक्यात अशा विविध प्रकारच्या सामाजिक संबंधांनी 'समाज' आकाराला येतो.

समाजस्थित व्यक्तींच्या आंतरक्रिया या रूढी, परंपरा, चालीरीती, मूल्ये, संकेत यांच्या आधाराने घडत असतात. व्यक्तीच्या या जीवन जगण्याच्या पद्धतीतीला समाजाची संस्कृती म्हटले जाते. समाज आणि संस्कृती एकमेकाला पूरक आहेत म्हणूनच त्यांना एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हटले जाते. थोडक्यात संस्कृतीमुळे समाज टिकतो तर समाजामुळे संस्कृती रुजते असे म्हणता येते.

अनेक लहान मोठ्या समूह, उपसमूहांनी मिळून समाज बनतो. त्यात कुटुंब, अर्थ, धर्म, शिक्षण यासारख्या अनेक सामाजिक संस्थांचा अंतर्भाव असतो. समाजाच्या विविध प्रकारच्या गरजांची पूर्तता करण्याचे काम या यंत्रणांना करावे लागते. समाजात व्यक्ती जन्माला येतात आणि मृत्यू पावतात. परंतु समाज मात्र पिढ्यानपिढ्या टिकून राहतो. प्रत्येक समाजातील लोकांत एकतेची भावना प्रबळ असते. या संघटित भावनेमुळे समाजाचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्यास मदत होते. अशा या व्यापक आणि प्रवाही स्वरूपाच्या समाज या संकल्पनेची सर्वसमावेशक व्याख्या करणे कठीण आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी काही समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा विचार करता येईल.

## ३. समाजाची लक्षणे

हॅरी जॉन्सन या समाजशास्त्रज्ञाने समाजाची जी चार लक्षणे अथवा वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.

**१. विशिष्ट भूप्रदेश -** भारतीय समाज, अमेरिकन समाज म्हंटल्यावर त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक सीमा लक्षात येतात. शिवाय विशिष्ट प्रदेशात स्थायिक झालेल्या मानवी समूहाला तेथील भौगोलिक परिस्थितीला अनुरूप जीवन जगावे लागते. त्या दृष्टीने विशिष्ट भूप्रदेश हे जॉन्सनने सांगितलेले समाजाचे वैशिष्ट्य महत्त्वाचे ठरते.

**२. प्रजोत्पादन -** समाजाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी स्त्री-पुरुष संबंधाद्वारे प्रजोत्पादन होणे आवश्यक ठरते. प्रजोत्पादनाद्वारे लोकसंख्येची वृद्धी होते आणि प्रत्येक मानवी समूहाला या लोकसंख्येची सतत गरज भासते.

**३. संस्कृती -** माणसाची वैशिष्ट्यपूर्ण जीवन जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती होय. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेताना आलेले अनुभव, मिळालेले ज्ञान, साकारलेल्या भौतिक गोष्टी, मूल्ये या सर्वांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. अर्थात या सर्व गोष्टीतील भिन्नतेमुळे प्रत्येक मानव समूहाची संस्कृती देखील भिन्न असू शकते.

**४. स्वतंत्रता -** एक मानवी समूह दुसऱ्यापासून वेगळा असतो, स्वतंत्र असतो. समग्र समाज म्हणजेच व्यापक असा मानवी समूह होय. या मोठ्या मानवी समूहातच लहान लहान उपसमूह सामावलेले असतात. मोठ्या समूहाची जशी संस्कृती असते, तशी प्रत्येक उपसमूहाची देखील स्वतंत्र संस्कृती असते. उदा. आदिवासी आणि भटके-विमुक्त हे दोन उपसमूह असून ते दोन्ही उपसमूह एकमेकापासून स्वतंत्र आहेत.

अशाप्रकारे समाजाचे स्वरूप व संकल्पना समजून घेतल्यानंतर संस्कृती या घटकाचा सविस्तर परिचय करून घेता येईल.

## १अ.५ संस्कृती : संकल्पना व स्वरूप

### १. संस्कृती :काही व्याख्या

१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - "मनुष्य व्यक्तिश: व समुदायश: जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवनसाफल्यार्थ स्वतःवर व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो ती पद्धती वा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय."

२. इरावती कर्वे - "संस्कार पूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकालविशिष्ट रीत (जीवनपद्धती व जीवनमूल्ये) म्हणजे संस्कृती."

३. प्रा. क्रेच - "एखाद्या समाजाने आपल्या लोकांचे जीवनविषयक प्रश्न सोडविण्यासाठी जी एक विशिष्ट वस्तुरूप व वर्तनरूप परंपरा निर्माण केलेली असते तिला संस्कृती म्हणतात. आपला एक घाट असतो. एखाद्या समाजाने निर्माण केलेल्या विविध संस्था व त्यात ध्वनित झालेल्या त्या समाजाच्या समजुती, मूल्ये, मानदंड व जीवनविषयक गृहीतके यांचा संस्कृतीमध्ये अंतर्भाव होतो."

४. Taylor - "Culture or Civilization is that complex whole which includes knowledge belief, art, morals, law, customs and any other capabilities and habits acquired by man as a member of society."

५. एडवर्ड टायलर - "समाजाचा सदस्य या नात्याने समाजात राहून माणसाने हस्तगत केलेले ज्ञान, विज्ञान आणि कला; त्यांच्या जोरावर परिस्थितीशी समायोजन करून मिळवलेले कौशल्य व क्षमता तसेच नीतिमत्ता, कायदा, रूढी यांना अनुसरून केले जाणारे वर्तन यांचा संच म्हणजे संस्कृती."

हॅरी जॉन्सनने समाजाची जी चार लक्षणे सांगितली आहेत त्यातील 'संस्कृती' हे अत्यंत महत्त्वाचे लक्षण आहे हे वरील व्याख्यांवरुन स्पष्ट होते. अशा या संस्कृती शब्दाची नेमकी व्याख्या करणे कठीण आहे. दैनंदिन जीवनात हा शब्द अतिपरिचयाचा झाला असला तरी व्यवहारात मात्र तो एकाच अर्थाने वापरला जात नाही. अतिशय साध्या शब्दात सांगायचे तर

'प्रकृती म्हणजे निसर्ग. विकृती म्हणजे निसर्गात होणारे विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार.'

'संस्कृती' या शब्दाला अतिशय जीवनव्यापी अर्थ आहे. मात्र प्रादेशिक, धार्मिक, वांशिक, जातीय, प्रांतीय इत्यादी दृष्टीने तो मर्यादित केल्याचे आढळते. घराण्याची संस्कृती, पुणेरी संस्कृती, आदिवासी संस्कृती, भारतीय - युरोपीय संस्कृती, हिंदू - इस्लामी संस्कृती या सारख्या उदाहरणांनी 'संस्कृती' या शब्दाला मर्यादित व संकुचित अर्थ प्राप्त झाल्याचे लक्षात येते. याशिवाय संस्कृतीचे प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन असे कालिक भेदही निर्माण झाल्याची निदर्शनाला येते. अशाप्रकारे विविध दृष्टिकोनातून 'संस्कृती' या शब्दाकडे पाहिले जाते. व्यवहारात त्या अर्थाने उपयोग केला जातो. त्यामुळे 'संस्कृती' या शब्दाचा अर्थ निश्चित करणे अशक्य होते.

'संस्कृती' हे मानवाचे खास वैशिष्ट्य आहे. पशुपक्ष्यांचे जीवन चाकोरीबद्ध असते. त्यात बदल अथवा नवनिर्मितीची शक्यता नसते. पशुपक्ष्यांना नैसर्गिक जीवन असते मात्र ते निसर्गाचा उत्पादनसाधन म्हणून उपयोग करू शकत नाहीत. त्यांच्यावर जे अत्यल्प संस्कार झालेले असतात तेही नैसर्गिकच असतात. निसर्गाशी समायोजन साधून त्यांना जगावे लागते. मात्र मनुष्य याच सृष्टीत बदल घडू शकतो. मातापित्यांच्या छत्राखाली मनुष्याचे संरक्षण होते. खाणे-पिणे, बोलणे-वागणे, वस्त्र-अलंकार, आचार-विचार, श्रद्धा-समजुती, सण-उत्सव, व्रत-वैकल्ये, रूढी-परंपरा, पाप-पुण्य तसेच कुटुंब, शिक्षण, भाषा या सामाजिक संस्थांद्वारे माणसावर सातत्याने संस्कार होत असतात. संस्काराच्या या परंपरेला अथवा सामाजिक वारस्यालाच संस्कृती म्हणता येते. निसर्ग, माणसे, समाजसंस्था आणि ईश्वरविषयक कल्पना या चार गोष्टींशी माणसाचा विविध प्रकारे संबंध येतो. त्या सर्व संबंधाचा विचार संस्कृतीमध्ये समाविष्ट असतो.

मनुष्य इंद्रिय सामर्थ्याने ज्ञानाचा संचय करून त्याचे जतन, संवर्धन, संक्रमण करू शकतो. या ज्ञानाच्या आणि शास्त्राच्या जोरावर माणसाने आपले जीवन अधिक सुखी, समृद्ध आणि संपन्न बनविले आहे. सुखी होणे ही संस्कृती निर्माणामागची प्रेरणा असली तरी ती वैयक्तिक नाही, तर सामूहिक आहे. या संस्कृतीचा उपभोग मानवी समाज सामुहिकपणे घेतो. त्यादृष्टीने संस्कृतीही स्थलकालविशिष्ट अशा समाजाची असते. म्हणून तर संस्कृतीला कोणत्याही मानव समाजाने निर्माण केलेली 'देशकालविशिष्ट जीवनपद्धती' म्हणतात. जगभरात अनेक लहान-मोठे समाज अस्तित्वात असल्याने संस्कृती वैचित्र्यही मान्य करावे लागते.

## २. मानवी संस्कृतीची दोन अंगे

समाजाप्रमाणे संस्कृतीसुद्धा विकसनशील आणि विस्तारशील असते. अशा या संस्कृतीचे विल्यम ऑगबर्ग याने दोन भाग सांगितले आहेत.

### अ) भौतिक संस्कृती-

माणसाने निर्माण केलेले पदार्थमय जग हे संस्कृतीचे भौतिक अंग होय. आपले जीवन सुखी व्हावे यासाठी माणसाने अनेक गोष्टी तयार केल्या आहेत. उदा. हत्यारे, अवजारे, यंत्रे, रस्ते, वस्त्रे, वाहने, वीज, घरे, औषधे, शेती, भांडी, दागिने, करमणूक साधने या गोष्टींचा समावेश

भौतिक संस्कृतीत करता येतो. या सुखसोयींनी मानवी जीवन समृद्ध व संपन्न झाले आहे. मानवी समाजाचच्या डोळ्यांना दिसणाऱ्या या वस्तुरूप निर्मितीला भौतिक संस्कृती म्हणता येते. निसर्गात मानवी क्रियेने बदल घडून आल्यामुळे भौतिक संस्कृती आकाराला येते.

**ब) अध्यात्मिक संस्कृती -**

माणसाच्या अंतःकरणातील स्वाभाविक सुखवासना व स्वार्थबुद्धी आणि तजन्य दुर्गुण (मत्सर, द्वेष, आळस, कौर्य इ.) यांना नियंत्रित करण्यासाठी वा त्यावर विजय मिळवण्यासाठी माणसांनी निर्माण केलेल्या पाप-पुण्य, स्वर्ग-नरकदी धर्मकल्पना, नीतिनियम, कायदे-कानून, विद्या - कला - साहित्य - तत्वज्ञान आणि शिष्टाचार इत्यादी मानवनिर्मित कल्पनामय जग हे संस्कृतीचे अध्यात्मिक अंग होय. समाजातील चालीरीती, आचार, परंपरा, सामाजिक संस्था, समजुती, श्रद्धा, मूल्ये, निष्ठा व मानदंड या साऱ्यांचा समावेश संस्कृतीच्या अध्यात्मिक अंगामध्ये होतो. यासंदर्भात समाजशास्त्रीय अंगाने आपली भूमिका मांडताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, " ज्या मानवी क्रियेत मानवी निसर्गावर म्हणजे आत्म्यावर ( वैदिक रूढीप्रमाणे आत्मा या शब्दाने स्थूल शरीर, इंद्रिये, मन व ज्ञानशक्ती यांचा बोध होतो.) संस्कार करून बदल करण्यास प्राधान्य देते त्यास 'अध्यात्मिक संस्कृती' म्हणण्याची प्रथा आहे."

भौतिक अंगाने सुख-समृद्धी येऊन सुधारणा होते, तर आध्यात्मिक संस्कृतीमुळे मानसिक उन्नती होते. थोडक्यात या दोन्हीमुळे मानवी जीवन परिपूर्ण होत असते. विशिष्ट सामाजिक सांस्कृतिक संदर्भांनी युक्त प्रतीके, प्रतिमा, वाक्प्रचार, परंपरासंचित, पुराणकथा इत्यादी त्या त्या समाजाचे आणि समाजस्थिती लेखक - कलावंताच्या भावविश्वाचे भरण-पोषण करतात. त्यांच्या सानिध्यातच साहित्यिकाची वाढ होत असते. भावभावना, कल्पना, विचार आणि संकल्पना यांच्या सहाय्याने जीवनाचा वेध घेणे. त्यातून प्राप्त झालेल्या जीवनार्थाला, अनुभवाला आकार देणे हे लेखक कलावंताचे कार्य असून त्यासाठी संस्कृतिसंचित उपयोगी पडते. कलावंताच्या रसरूपगंधात्मक अनुभूतीला व त्या त्या काळातील सांस्कृतिक परंपरांमुळे विशिष्ट दिशा लाभते. बालगंधर्व आणि बालगंधर्वकालीन मराठी नाट्यसंगीताची परंपरा हे याचे उत्तम उदाहरण आहे.

समाजशास्त्रीय समीक्षा साहित्य निर्मितीमागील सामाजिक-सांस्कृतिक धारणांचा, तत्त्वप्रणालींचा मागोवा घेते. सामाजिक सांस्कृतिक जीवनातील यज्ञकल्पना, भक्तियोग, राष्ट्रप्रेम, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य यासारख्या तत्त्वप्रणालींनी साहित्यनिर्मितीच्या आशयावर आणि अभिव्यक्तीवर कोणते परिणाम केले, त्याचा अभ्यास समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीद्वारे केला जातो.

## १अ.६ साहित्य, समाज आणि संस्कृती अन्योन्य संबंध

साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यातील संबंध हे अन्योन्य स्वरूपाचे असतात, असे हरी लेव्हिन यांनी म्हटले आहे. साहित्य हे केवळ सामाजिक, सांस्कृतिक कारणांचा परिणाम नसते, तर ते सामाजिक, सांस्कृतिक परिणामांचे कारणही असते. अनेकवेळा साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्पराश्रयी आणि परस्परपूरक संबंधांची चर्चा संकुचित आणि वरवरची केली जाते. एखाद्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीचा किंवा विशिष्ट आर्थिक,

सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रणालीचा निर्देश करून साहित्य आणि समाजाच्या संबंधाचे परीक्षण करण्याचा प्रयत्न केला जातो. 'साहित्य म्हणजे समाजाची अभिव्यक्ती' या द बोनाल्डच्या विधानाने या अन्योन्य नात्याची चर्चा सुरू झालेली असली तरी हा विचार सर्वसाधारण वाटतो. 'साहित्य हा समाजाचा आरसा असतो' हा गृहीत विचार तर ठोकळेबाज वाटतो. म्हणूनच या ठिकाणी मोघम विचार मांडण्यापेक्षा साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यातील अन्योन्य संबंधाचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

साहित्य हे केवळ सामाजिक परिस्थितीचे अपत्य असत नाही तर साहित्याचाही सामाजिक परिस्थितीवर परिणाम होत असतो, असाही एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन मांडला जातो. विचारवंतांच्या मते 'साहित्य केवळ सामाजिक परिस्थितीची फलनिष्पत्ती नसते, तर विशिष्ट सामाजिक प्रवाहांना विचारसरणीला जन्म द्यायला ते कारणीभूत ठरू शकते.' उदा. आंग्लकालखंडापासून ते टिळक, आगरकरांपर्यंतच्या समाजसुधारकांनी, लेखकांनी सामाजिक सुधारणेसाठी जे बहुमूल्य वैचारिक लेखन केले त्याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रात घडून आलेले अमुलाग्र सामाजिक परिवर्तन होय. या दृष्टीने 'साहित्य ही सुद्धा एक सामाजिक संस्था आहे' असे म्हणता येईल. ज्याप्रमाणे विविध सामाजिक संस्था लोककल्याणासाठी कार्यरत असतात त्याप्रमाणे साहित्यातूनही समाजाचे प्रश्न, समस्या मांडल्या जातात व व्यापक प्रमाणावर समाजदर्शन घडविले जाते.

भाषा ही समाजाची निर्मिती आहे तर साहित्य हे भाषेचे माध्यम म्हणून वापर करते. या अनुषंगाने विचार करता 'भाषा ही एक सामाजिक वस्तू' असल्याचे स्पष्ट होते. या संदर्भात प्रा शरच्चंद्र मुक्तिबोध म्हणतात, "ध्वनींना प्राप्त होणारा अर्थ समाज देत असतो, तो ध्वनींच्या गुणधर्म नव्हे. ... भाषा ही व्यक्तीच्या नव्हे तर समाजाच्या आयुष्यात तयार होत असते." या विचारावरून असे मत व्यक्त करता येते की, भाषेची निर्मिती सामाजिक असून संदेशाची देवाणघेवाण आणि मानवी विचारप्रक्रिया यासाठी भाषेची आवश्यकता असते. या मानवी विचार प्रक्रियेतूनच धर्म, न्याय, नीती, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, साहित्य, कला आदी समाजप्रणित क्षेत्रे विस्तारली आहेत. शब्द, अर्थ, वाक्यरचना, रूपके, प्रतीके या सर्वांना समाजाच्या संदर्भात सार्वत्रिक समाजमान्यता मिळालेली असते. म्हणूनच समाजाचे माध्यम असणारी भाषा आणि समाज व त्याची जीवनपद्धती यांचे दृढ स्वरूपाचे नातेसंबंध तयार झालेले असतात. विशिष्ठ भाषेशिवाय विशिष्ठ जीवनानुभव व्यक्त होणे शक्य नाही. म्हणूनच साहित्य, कलांचा भाषा हा एक मुख्य आधार आहे असे म्हणता येते. उदा. बहिणाबाईंच्या अनुभवकथनाला खानदेशी - अहिराणी बोलीच सर्वार्थाने योग्य असल्याचे लक्षात येते. तसेच नवनिर्माणक्षम साहित्यिकाने आपल्या अनुभूतीच्या आधारे नवनिर्मिती केली असली तरी त्या सर्व प्रक्रियेला सामाजिक वास्तवाचा आधार असतो. साहित्यिक हा समाजाचा एक घटक असल्याने समाजात घडणाऱ्या सर्व घटनांचा कळत-नकळत पडसाद त्यांच्या साहित्यात उमटणे हे अपरिहार्य ठरते. साहित्यिक आपल्या मनःपटलावर उमटलेल्या घडामोडींना प्रतिभेच्या साहाय्याने स्वभाषेत आविष्कृत करतो. साहित्यिकाची साहित्यनिर्मिती ही समाज जीवनाचा एक भाग असून लेखक त्या अनुषंगानेच 'सामाजिक आशय' प्रकट करीत असतो.

लेखकाच्या सामाजिकतेचा अभ्यास केवळ त्याच्या साहित्यरूपावरूनच करता येतो, असे म्हणता येत नाही. अनेकदा तो साहित्यबाह्य अशा चरित्रात्मक कागदपत्रावरूनही करता

येतो. कारण लेखक हा एक समाजाचा नागरिक, घटक असतो. अनेक सामाजिक, राजकीय समस्यांवर त्यांने विचारप्रकटन, मतप्रदर्शन केलेले असते. तसेच त्याने समकालीन समस्यांमध्ये भाग घेतलेला असतो. मूलतः लेखक हा निर्मितीक्षम कलावंत असला तरी तो नेहमीच एका विशिष्ट समाजाचा घटक असतो. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाबाबतचे सर्व प्रश्न त्याच्याही बाबतीत उपस्थित होत असतात. त्याच्या कृती उक्तीला नेहमीच एक सामाजिक परिमाण असते. म्हणूनच लेखक आणि समाज या दोहोत असलेला संबंध अमान्य करता येत नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत समाजाच्या पारंपारिक संस्कारांचा, मूल्यव्यवस्थेचा, जीवनपद्धतीचा निश्चितच वाटा असतो. म्हणून लेखक ज्या मानवगटाचे, समाजाचे प्रतिनिधित्व करतो, त्याची जीवनपद्धतीच त्याच्या अनुभवाचे संदर्भक्षेत्र असते. लेखकाच्या समाजजीवनातील प्रश्न, समस्या, श्रेय-प्रेय-कल्पना, नीतिमूल्ये इत्यादी विशेषच त्यांच्या लेखनाचे विषय ठरत असतात. लाक्षणिक अर्थाने व्यक्ती म्हणजे लेखक हे निमित्तकारण असते आणि अनुभव हे उपादानकारण असते आणि साहित्यकृती हे रूपात्मककारण असते. आकार किंवा रूप (Form) हा त्या कलाकृतीतच असून साधन आणि माध्यम यांच्याद्वारे तो आकार प्रकट होत असतो. ही प्रक्रिया कुंभाराकडून मातीचा घडा तयार होण्यासारखी आहे. या प्रक्रियेत कुंभार हे निमित्तकारण, मातीचा गोळा हे उपादानकारण, चाक आणि हात ही साधने आणि गती हे माध्यम असते. साहित्यनिर्मितीत सुद्धा हीच प्रक्रिया अंतर्भूत असते हेच या उदाहरणावरून स्पष्ट होते.

साहित्य ही समाजजीवनातून निर्माण झालेली आणि समाजजीवनाला वळण लावू पाहणारी एक सामाजिक संस्था आहे. लेखक, वाचक आणि समाज ही त्रिसूत्री साहित्याच्या निर्मितीला उपकारक ठरते. जेव्हा एखादी सर्जनशील व्यक्ती समाजजीवनातून प्रेरणा घेऊन समाजाशी संवाद साधण्यासाठी किंवा आत्माभिव्यक्तीसाठी लेखन करते तेव्हा त्या व्यक्तीला लेखक म्हणतात येईल. हा लेखक कितीही प्रतिभावंत असला तरी त्याला आपल्या समाजाचे, काळाचे संदर्भ घेऊन जगावे लागते. वर्गरचना, रूढी-परंपरा, मूल्यव्यवस्था, संस्कार आणि आर्थिक स्तर असे विविध संदर्भ घेऊन जगत असतानाच त्याला आपली नवनिर्मिती जास्तीत जास्त प्रभावी व्हावी यासाठी प्रयत्न करावे लागतात. याकरता तो नवनवीन वाटा शोधत असतो. नवनवीन प्रयोग करत असतो. म्हणजेच विशिष्ट काळातील साहित्याचा निर्माता असलेला लेखक व त्याच्या मनावर त्या विशिष्ट काळात झालेले संस्कार, त्याने स्वीकारलेली जीवनदृष्टी, त्याची शारीरिक आणि मानसिक जडणघडण कोणत्या वातावरणात झाली इत्यादी बाबींचा विचार करावा लागतो. असे असले तरी लेखकांनीही सामाजिक भान ठेवून वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये जोपासण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते.

साहित्याची विविध प्रयोजने शास्त्रकारांनी सांगितली आहेत. तसेच केवळ रिकामा वेळ घालविण्यासाठी, करमणुकीसाठी, वाचक गुंतून राहावा या हेतूनेही अनेक लेखक लेखन करीत असतात. अशा प्रकारचे लेखन करणाऱ्या लेखकांच्या आणि समाजाच्या वाट्याला काहीच येत नाही. असे लेखन अथवा लेखक समाजजीवनावर कोणताही प्रभाव टाकू शकत नाहीत. सामाजिक प्रश्न, समस्या याबद्दल या लेखकांना कोणतीच आस्था नसल्याने असे लेखन अथवा लेखक सामाजिक परिणाम साधू शकत नाहीत. समाज जीवन प्रभावित करू शकत नाहीत. सर्वच भाषांमध्ये असे काही लेखक आढळतात. या लेखकांनी वरील प्रवृत्तीचा स्वीकार करून आणि सामाजिक बांधिलकी पासून दूर जाऊन आपला लेखन

व्यवसाय कसा किफायतशीर होईल याकडे लक्ष दिलेले दिसते. लेखकाने केलेली साहित्याची उपासना आणि संस्कृतीची जोपासना यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. म्हणूनच लेखक आणि त्याची वांङ्मयनिर्मिती ही त्या त्या देशाची अभिमानाची गोष्ट असते. "आम्ही एक वेळ लंडन देऊ, पण आम्ही आमचा सेक्सपियर देणार नाही" असे जे इंग्लंडमध्ये म्हटले जाते त्यात सखोल अर्थ दडला आहे. मराठीमध्ये संत, पंत व तंत यांनी साहित्याची साधना केली आणि मराठी भाषा जिवंत केली, समृद्ध केली. आगरकर-चिपळूणकर यांनी समाजप्रबोधनासाठी लेखणी वापरली. म्हणूनच 'लेखकाच्या लेखणीतून समाजाचे कल्याण साधणारी शाई असली पाहिजे' असे जे म्हटले जाते त्याची सत्ता पटल्याशिवाय राहत नाही.

ज्याप्रमाणे लेखक आणि समाज यांच्यातील नात्याचा उलगडा होतो त्याप्रमाणे वाचकाबाबतही विचार करावा लागतो. वाचक हा सुद्धा समाजातीलच एक घटक आहे. वाचक वाचतो ते ज्ञानसंवर्धनासाठी, करमणुकीसाठी किंवा भोवतालच्या जीवनाच्या दगदगीतून पळून जाण्यासाठी. वाचकाच्या अभिरुचीवरून साहित्याचे सामाजिक मूल्यही अजमावता येते. समाजातल्या प्राणवायूवरच वाचक जगत असतो. वाचकाच्या दृष्टीने साहित्याभ्यास करत असताना वाचक कोणत्या सामाजिक परिस्थितीत वाङ्मयाचे वाचन करतो हे समजावून घेतले पाहिजे. साहित्य म्हणजे एक प्रकारची देवघेव असते. लेखक आपल्या भावना विचार देत असतो तर वाचक ते घेत असतो. वाचकाचे वय, लिंग, वर्ग, सामाजिक दर्जा, जात यावरून वाचकाची अभिरुची बनत असते. कुणाला रहस्यकथा आवडतात. कुणाला विनोदी साहित्य तर कुणाला दलित साहित्य. कधी कधी एखादा वाचक याची दखलही घेत नाही. यावरून असे म्हणता येते की, प्रत्येक वाचकाची अभिरुची वेगळी असते. वाचकाची बुद्धी, शिक्षण, वातावरण, आर्थिक परिस्थिती, आलेले अनुभव, साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण यावर त्याची वांग्मयीन अभिरुची अवलंबून असते. त्या अनुषंगाने चिकित्सा करता लेखक-वाचक समाज आणि साहित्य यांचाही सहसंबंध तपासणे आवश्यक आहे.

साहित्य समाजात उगवते समाजात फुलते आणि समाजालाच गंध वाहण्यात धन्यता पावते. साहित्यकृती जेवढी समाजसापेक्ष असेल तेवढी ती अधिक चांगली असते. म्हणजेच समाजाशिवाय साहित्य नाही आणि साहित्याशिवाय समाजाचा विकास नाही असे म्हणता येते. समाजातील बदलामुळे साहित्यात बदल होतात आणि अंशात्मक का होईना समाजात बदल घडविण्याचे सामर्थ्य निश्चितच साहित्यात आहे. महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी प्रबोधनकारांनी समाज जागृती घडवण्यामध्ये जे यश मिळवले ते इथे लक्षात घेण्यासारखे आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, प्रादेशिक साहित्य, आदिवासी साहित्य आणि समाज यांच्या घनिष्ठ संबंधाची येथे कल्पना येते. 'समाजाच्या जाणिवा प्रगल्भ करण्याच्या हेतूने मी लिखाण करतो' असे गंगाधर गाडगीळ म्हणतात, तर समाजाचे प्रबोधन व्हावे या हेतूने आगरकर चिपळूणकरांनी लेखन केल्याचे दिसून येते. समाजातील तळागाळातील व्यक्तींच्या सुख-दुःखाची समाजाला जाणीव करून देणे हे दलित साहित्याचे प्रयोजन मानता येते तर ग्रामीण जीवनातील सुसंगत व विसंगत घटनांचे दर्शन घडविणे हे ग्रामीण साहित्याचे प्रयोजन दिसते. या दृष्टीने साहित्य व समाज यांचा किती अतूट संबंध आहे ते लक्षात येते.अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील आशय, हरिभाऊंच्या कादंबरीतील सामाजिक भावजीवन, वि. स. खांडेकर यांच्या कादंबऱ्यातील

सामाजिक संघर्ष, दलित लेखकांच्या साहित्यातील सामुहिक उद्रेक यावर दृष्टिक्षेप टाकल्यास वरील विधानाची सत्यता पटते.

माणूस हा समाजशील, समूहातील प्राणी आहे. समाज जीवनापासून मानवाची आत्मानुभूती वेगळी असू शकत नाही. माणसाला ज्या कल्पनेने, अनुभूतीने जीवनाचा साक्षात्कार होतो तो भोवतालच्या समाजातूनच निर्माण झालेला असतो. म्हणजे साहित्यात जे आहे, जे येते, ते समाजातूनच येते. या दृष्टीने साहित्य आणि समाज यांचे नाते घनिष्ठ असते. कोणत्याही साहित्याची जाण अधिक सुसंगत बनवायची असेल तर साहित्य व्यवहाराचा समाजाशी असलेला निकटचा आणि महत्त्वपूर्ण संबंध नीट समजावून घेणे गरजेचे आहे. साहित्याची निर्मिती ही स्थळकाळबद्ध अशा सामाजिक सांस्कृतिक वातावरणात होत असते. या दृष्टीने साहित्याचा निर्मितीच्या अंगाने समाज व संस्कृतीशी संबंध येत असतो. उदा. मर्ढेकर स्वकालीन औद्योगिक संस्कृतीने निर्माण केलेल्या विविध सामाजिक-सांस्कृतिक समस्यांना दाहकतेने, अंतर्भेदी दृष्टीने थेटपणे भिडतात. यावरून असे दिसते की, समाजव्यवस्थेची प्रकृती आणि प्रवृत्ती ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे सांस्कृतिक परिवर्तन घडतात. या सांस्कृतिक परिवर्तनाचा साहित्य संवेदनेवर परिणाम होतो. इतकेच नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक बदलांचा परिणाम केवळ साहित्याच्या आशयावरच होतो असे नाही तर साहित्याच्या अभिव्यक्तीवर आणि तदनुषंगाने साहित्याच्या आकृतिबंधावरही होत असतो.

## १अ.७ समारोप

अशा पद्धतीने साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करता येईल. कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात असतात आणि जीवनाच्या जडणघडणीत साहित्याचाही वाटा असतो. एवढेच नव्हे तर समाज आणि संस्कृती यांच्या घडणीमध्येही साहित्याचा वाटा असतो. समाजातील वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीचा, परिवर्तनाचा, बदलाचा किंवा साचलेपणाचाही परिणाम साहित्यावर होत असतो. थोडक्यात, साहित्यनिर्मिती हा लेखकाचा हस्तिदंती मनोरा नसून विशिष्ट भाषिक समाजात घडणारी ती एक सांस्कृतिक घटना ठरते. म्हणूनच एक सामाजिक-सांस्कृतिक घटित या दृष्टीने तिचे मूल्यांकन करावे लागते. एकंदरीत साहित्य ही जीवनसन्मुख अशी सर्जनशील नवनिर्मिती असल्याने साहित्याचे मूल्यमापन केवळ वाङ्मयीन निकषावर करता येत नाही. साहित्याच्या मूल्यांकनासाठी जीवनमूल्यांची आधारशिला असावीच लागते. टी. एस. इलियट या थोर कवीने गुड लिटरेचर आणि ग्रेट लिटरेचर असे दोन प्रकार कल्पिले आहेत. तो सरळच म्हणतो की, ‘एखादी साहित्यकृती ही चांगली साहित्यकृती आहे की नाही हे वाङ्मयीन निकषावर ठरवता येईल. परंतु ती थोर साहित्यकृती आहे की नाही हे त्या साहित्यकृतीतून व्यक्त झालेल्या जीवनमूल्यांच्या अभिव्यक्तीवरून ठरेल.’

## १अ.८ सरावासाठी स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न लिहा.**

१. साहित्य ही संकल्पना स्पष्ट करा.
२. समाज ही संकल्पना स्पष्ट करा.
३. संस्कृती ही संकल्पना स्पष्ट करा.
४. साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**टिपा लिहा**

१. साहित्याची अंगे
२. समाजाची लक्षणे
३. मानवी संस्कृतीची दोन अंगे

**एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. 'Literature' या शब्दाला मराठीमध्ये कोणते पर्याय शब्द वापरले जातात ?
२. मुद्रणकलेच्या शोधानंतरच कशाची गरज उरली नाही ?
३. कोणत्या लॅटिन शब्दापासून 'सोसायटी' हा शब्द तयार झाला आहे ?
४. हॅरी जॉन्सनने समाजाची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?
५. 'आत्मा' या शब्दाने कशाचा बोध होतो ?

## १अ.९ आधारभूत संदर्भ

१. अवलोकन : मराठी समीक्षा आणि साहित्य, दिगंबर पाध्ये, लोकवांगमयगृह, मुंबई, २०१२

२. भारतीय संस्कृती कोश, खंड ९ वा

३. महाराष्ट्र संस्कृती : घडण आणि विकास, ह. श्री. शेणोलीकर, प्र. न. देशपांडे, डायमंड पब्लिकेशन

५. वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश, प्रभा गणोरकर व इतर, भटकळ फाउंडेशन

६. साहित्य आणि समाज, डॉ. सदा क-हाडे, लोकवांगमयगृह, मुंबई, १९९९

७. साहित्यविचार आणि समाजचिंतन, प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध

८. समाज आणि संस्कृती, दिगंबर पाध्ये, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, लोकवांगमयगृह, मुंबई, १९९८

९. साहित्यसिद्धांत, अनु. डॉ. स.ग. मालसे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२

१०. पाश्चात्य साहित्यशास्त्र : सिद्धांत आणि संकल्पना, डॉ. सुरेश धायगुडे, निर्मल प्रकाशन, पुणे, १९९०

११. साहित्याची निर्मितीप्रक्रिया, आनंद यादव

१२. History of English Literature, 1863

**माहिती जालावरील संदर्भ**


1. https://www.aksharnama.com
2. https://mr.m.wikipedia.org
3. https://en.m.wikipedia.org
4. https://dictionary.cambridge.org
5. https://Maharashtratimes.com
6. https://vishwakosh.marathi.gov.in
7. https://archive.mu.ac.in
8. https://www.tmv.edu.in


❖❖❖❖

# १ब

## साहित्य – समाज अन्योन्य संबंध

## ब) साहित्य – समाज संबंध – तेन, मार्क्स यांचे सिद्धांत, मानवतावाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद, आंबेडकरवाद यांचे स्वरूप विशेष

**घटक रचना**


१ब.१. उद्दिष्ट्ये

१ब.२. प्रास्ताविक

१ब.३. विषय विवेचन

१ब.४. हिपोलिट तेनचा 'त्रिमिती सिद्धांत'

१ब.४.१ वंश

१ब.४.२ परिस्थिती

१ब.४.३ युगप्रवृत्ती

१ब.५. मार्क्सचा 'पाया आणि इमला' सिद्धांत

१ब.६. मानवतावाद : स्वरूप आणि विशेष

१ब.६.१ मानवतावाद : काही ठळक मुद्दे

१ब.७. मार्क्सवाद : स्वरूप आणि विशेष

१ब.७.१ मार्क्सवाद आणि मार्क्सवादी साहित्यविचार : काही मुद्दे

१ब.८. स्त्रीवाद : स्वरूप आणि विशेष

१ब.८.१ स्त्रीवाद : काही ठळक बाबी

१ब.९. आंबेडकरवाद : स्वरूप आणि विशेष

१ब.९.१ आंबेडकरवादाची ठळक वैशिष्ट्ये

१ब.१०. सरावासाठी स्वाध्याय

१ब.११. आधारभूत संदर्भ

## १ब.१ . उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अध्ययनानंतर

१. तेनचा 'त्रिमिती सिद्धांत' समजून घेता येईल.

२. मार्क्सचा 'पाया आणि इमला' सिद्धांत समजून घेता येईल.

३. मानवतावादाची ओळख होईल.

४. मार्क्सवाद म्हणजे काय ? मार्क्सवादाचे स्वरूप विशेष लक्षात येतील.

५. स्त्रीवाद म्हणजे काय ? स्त्रीवादाचे स्वरूप विशेष लक्षात येतील.

६. आंबेडकरवाद म्हणजे काय ? आंबेडकरवादाचे स्वरूप विशेष लक्षात येतील.

## १ब.२. प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात आपणास तेन आणि मार्क्स यांच्या सिद्धांताच्या आधारे साहित्य - समाज संबंधाचा विचार करावयाचा आहे. त्यादृष्टीने सर्वप्रथम साहित्य – समाज संबंधाची थोडक्यात माहिती करून घेणे आवश्यक आहे. तसेच तेनचा त्रिमिती सिद्धांत, मार्क्सचा पाया आणि इमला सिद्धांत आणि मानवतावाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद, आंबेडकरवाद इत्यादीचे स्वरूप व विशेष यांचे विश्लेषण करावे लागणार आहे.

दैनंदिन व्यवहारात समाज हा शब्द अतिशय ढोबळ व संकुचित अर्थाने वापरला जातो. देशवाचक, समूहवाचक, धर्मवाचक वगैरे अर्थाने हा शब्द व्यावहारिक भाषेत वापरला जातो. परंतु त्यापेक्षा निराळा असा समाजशास्त्रीय अर्थ या संकल्पनेमागे आहे. एक सामाजिक व्यवस्था या अर्थाने समाज ही संकल्पना समाजशास्त्रात वापरली जाते. समाज म्हणजे परस्पराशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूहाची मिळून तयार झालेली एक व्यापक संघटना होय. लोकसंख्या, प्रदेश, प्रजोत्पादन आणि संस्कृती ही या समाजाची लक्षणे होत. माणसांना सामाजिक, सांस्कृतिक परंपरा असते. त्यामुळे मानवी वर्तन व्यवहारावर सामाजिक प्रभाव आणि नियंत्रण पाहायला मिळते. सामाजिकरणाची ही प्रक्रिया मानवामध्ये लहानपणापासूनच सुरू झालेली आढळते. साहित्य हा मानवी समाजाच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक उपक्रम आहे. म्हणून समाज, संस्कृती आणि साहित्य यांचा अन्योन्य असा संबंध असतो. म्हणून  साहित्यनिर्मिती ही व्यक्तिगत नव्हे तर सामाजिक घटना आहे. यावरून साहित्य व समाज यांचा परस्परपूरक, परस्पराश्रयी आणि निकटचा संबंध लक्षात येतो.

## १ब.३. विषय विवेचन

विद्यार्थी मित्रांनो प्रस्तुत घटकात आपण तेन आणि मार्क्स यांच्या सिद्धांताच्या आधारे साहित्य - समाज संबंधाचा विचार करावयाचा आहे. तसेच तेनचा त्रिमिती सिद्धांत, मार्क्सचा पाया आणि इमला सिद्धांत आणि मानवतावाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद, आंबेडकरवाद सविस्तरपणे समजून घेणार आहोत. व्यक्तिमत्त्वाच्या जडण घडणी प्रमाणे आणि युग तत्वाशी

भिडण्याच्या ताकदीप्रमाणे वेगवेगळे दृष्टीकोन तयार होतात. वेगवेगळ्या भूमिका आणि विचार प्रणाली जन्म घेतात. ही तत्वज्ञाने मानवाच्या सर्वकष उथानासाठी नवनवी द्वारे खुली करतात. त्यातून विचारांच्या वेगवेगळ्या घटना-प्रणाली तयार होतात. साधारणपणे या घटनांना 'वाद' म्हटले जाते. इंग्रजीत त्याला 'इझम' म्हटले जेते. जीवनाचे संकोच करणारे नव्हे, तर जीवनासंबंधी सुसंगत व सुसंघटीत तत्वज्ञान त्यात अंतर्भूत असते. कोणत्याही विचारप्रणाली कालानुरूप आकाराला येत असतात. त्यांना त्या काळातील जीवन वास्तवाचा संदर्भ असतो. असे असले तरी काळाच्या पुढे झेपावण्याचे सामर्थ्यही त्या विचारप्रणालीत असू शकते. कोणताही वाद समाकालातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक. नैतिक क्षेत्रातील बौद्धिक पर्यावरणाच्या संदर्भातच निर्माण होत असतो. त्या काळातील समस्या सोडवण्यासाठी, प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी म्हणून विशिष्ठ विचारप्रणाली उभी राहते. खरा वाद अथवा तत्वज्ञान मानवी कल्याणाकरिता जन्माला येतो. त्यातून मानवतेचा मार्ग व्यापक होतो. वाद हे मानवी जीवनाला उपकारक ठरतात. ते विशिष्ट मूल्ये अथवा दृष्टीकोनाच्या नावाने ओळखले जातात. उदा. स्त्रीवाद, मानवतावाद इ. तर मार्क्सवाद, आंबेडकरवाद हे ते वाद जन्माला घालणाऱ्या महापुरुषांच्या नावाने ओळखले जातात. हे वाद समाजातच आकाराला येतात आणि साहित्यही समाजातच जन्माला येते. साहित्य आणि समाज या दोन्ही संकल्पना मानव्यसापेक्ष असून त्यांचा व समाजात जन्माला येणाऱ्या विचारप्रणालींचा दृढ संबंध नाकारता येत नाही. तर अशा माणसाच्या उन्नायनासाठी प्रयत्न करणाऱ्या वादांचा वा विचारप्रणालींचा थोडक्यात परिचय प्रस्तुत प्रकरणात करून घ्यावयाचा आहे.

## १ब.४. हिपोलिट तेनचा 'त्रिमिती सिद्धांत'

फ्रेंच समीक्षक व विचारवंत हिपोलिट तेन (इ.स. १८२८ ते १८६३) याला समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे जनक मानले जाते. समाजशास्त्रीय दृष्टीने साहित्याचा पद्धतशीर अभ्यास करता येतो हे सांगण्याचा मान तेनकडे जातो. त्याने 'History of English Literature' या ग्रंथाद्वारे साहित्य आणि सामाजिक परिस्थिती यांच्या संबंधाविषयी विवेचन केले आहे. साहित्यकृती ही लेखकाचा वंशवारसा, आजूबाजूची परिस्थिती आणि काळाच्या ओघातील विशिष्ट बिंदू याचा परिपाक होय, असे समीकरण त्याने मांडले. उत्कृष्ट कलाकृती कशामुळे व कधी निर्माण होते याची कारणे सांगताना तेनने वंश (Race), परिस्थिती (Milieu) आणि युगप्रवृत्ती (Moment) या तीन घटकांचा उल्लेख केलेला आहे. साहित्यकृती ही या तीन घटकांचा परिणाम असते, असे सूत्र तो मांडतो. तेनने सांगितलेले हे तिन्ही घटक स्वतंत्र आहेत. म्हणून एखाद्या समाजाच्या साहित्याचा विचार करताना कधी वंश, कधी युगप्रवृत्ती तर कधी परिस्थिती या घटकावर भर देऊन विचार करता येतो. यालाच तेनचा 'त्रिमिती सिद्धांत' म्हणतात. तेनने यासंदर्भात विशिष्ट पद्धतीने शास्त्रीय विवेचन केले असून या संदर्भात त्यांचे योगदान मोठे आहे. आपला सिद्धांत अधिक स्पष्ट करताना तेनने 'Fossil' चा दाखला दिला आहे. Fossil म्हणजे पुरातन काळातील अस्तित्वात असलेल्या एखाद्या प्राण्याचा किंवा वृक्षाचा आज अस्तित्वात असलेला सांगाडा होय. सांगाड्यावरून प्राणी वा वृक्ष्याची कल्पना येते. तसेच साहित्यावरून लेखकाचा शोध घेता येतो, असे तेनने म्हटले आहे. तेनने आपला हा सिद्धांत इंग्रजी साहित्याला लावून दाखवण्याचा प्रयत्नही केला आहे. तेनने सांगितलेले तीन घटक सविस्तरपणे अभ्यासता येतील.

### १ब.४.१ वंश (Race) -

एखाद्या मानवसमूहाला जन्मजात व वारसा म्हणून प्राप्त झालेली वैशिष्ट्ये, स्वभावधर्म, शरीररचना इत्यादीचा तेनप्रणित 'वंश' या संकल्पनेत समावेश होतो. माणसे वेगवेगळ्या परिस्थितीत जीवन जगत असली तरी त्यांच्यावर मूलभूत अशा काही खुणा शिल्लक राहत असतात, असे तेनला वाटते. विशिष्ट प्रदेशातील, वंशातील किंवा युगमानातील व्यक्तींची विचार करण्याची पद्धती, त्यांचे मनोविकार हे विशिष्ट प्रकारचे असतात हे लक्षात घेऊन तेनने अशी कल्पना मांडली आहे. त्या त्या प्रदेशाने, त्या प्रदेशाच्या वैशिष्ट्याने तेथील व्यक्तीची अस्मिता नियत होते असे ते म्हणतो. द.ग.गोडसे यांनी आपल्या 'शक्तीसौष्ठव' ग्रंथात मराठी वृत्ती-प्रवृत्तीचा आणि महाराष्ट्राच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा अन्वयार्थ लावण्याचा जो प्रयत्न केला आहे तो या दृष्टीने लक्षात घेता येईल.

### १ब.४.२ परिस्थिती (Milieu)

परिस्थिती या घटकाकडे तेनने अधिक लक्ष दिले आहे. तेनच्या या संकल्पनेत इतर अनेक गोष्टींबरोबर विशिष्ट प्रदेशाचे हवामान, तेथील भूगोल यांना महत्त्वाचे स्थान आहे असे दिगंबर पाध्ये यांना वाटते. तर गो.म. कुलकर्णी यांना Milieu (परिस्थिती) यामध्ये साहित्यिक ज्या काळात वावरला, त्या काळातील एकूण परिस्थिती, पर्यावरण (Environment) अभिप्रेत आहे. माणूस कधीही एकटा नसतो. निसर्ग व इतर माणसे त्याला नेहमी व्यापून राहिलेली असतात. भोवतालची भौतिक व सामाजिक वस्तुस्थिती माणसाची शारीरिक व मानसिक जडणघडण करण्यास कारणीभूत होते. Race ने अनुवंशिकता नियत होते. Milieu ने त्या विशिष्ट दिशेने त्याची प्रवृत्ती-प्रकृती घडते. 'प्राचीन माणूस', 'आधुनिक माणूस' या संज्ञांचा Milieu शी संबंध आहे.

### १ब.४.३ युगप्रवृत्ती (Moment)

युगप्रवृत्ती या तिसऱ्या घटकांचे स्पष्टीकरण तेनने अतिशय नेमकेपणाने दिले आहे श. तो म्हणतो की, 'प्रत्येक युगामध्ये काही प्रभावशाली कल्पना असतात. इतकेच नव्हे तर शतकानुशतके टिकून राहण्याची क्षमता असणारे काही बौद्धिक बंद असतात' त्यादृष्टीने विचार करता माणसाविषयीची विशिष्ट संकल्पनात्मक भूमिका असणाऱ्या कालखंडाला उद्देशून 'युगप्रवृत्ती' म्हणता येईल. युगप्रवृत्ती या घटकात वांङ्मयीन परंपरांचाही समावेश करणे शक्य आहे, असे तेनने सांगितले आहे. वांङ्मयीन परंपरेचे महत्त्व सांगणारा तेन हा पहिला विचारवंत तत्त्वज्ञ होता. मात्र त्याने वांङ्मयीन परंपरांकडे फारसे लक्ष दिले नाही. थोडक्यात युगप्रवृत्तीचा धर्म हा वंश आणि पर्यावरणाच्या संयोगातून निर्माण होतो. त्यालाच 'Moment' असे म्हणता येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील वांङ्मय आणि १९६० नंतरचे वांङ्मय याचा विचार केला तर प्रवृत्तीशी वांङ्मयाचा संबंध असतो हे लक्षात येते.

थोडक्यात उपरोक्त सर्व घटकांच्या सहाय्याने कोणत्याही साहित्यकृतीचे समग्र मूल्यमापन करणे योग्य ठरते. याबाबत दि. के. बेडेकर म्हणतात की, "सामाजिक परिस्थिती व वांग्मयीन कृतीचा घाट यांचा परस्परसंबंध नसतोच असेही मानता येत नाही. तो संबंध अगदी गणिती पद्धतीने मांडता येईल, असेही नाही. तो संबंध दुरान्वयाचा आहे हेच खरे. असे असूनही तो संबंध माहित करून घेण्याने रसग्रहणाला मदत होते. म्हणून सामाजिक परिस्थितीची

जाणीव रसिकाला हवी." एकंदर समाजशास्त्रीय पद्धतीद्वारे एखाद्या साहित्यकृतीचे खोलवर आकलन करून घेता येते. साहित्य हे व्यक्तिनिष्ठ असते. या भ्रामक कल्पनेला तेनने अशाप्रकारे नाकारले. साहित्य हे विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते मोती आणि शिंपल्या सारखा असं म्हणत असतो त्यांच्या विचाराचा प्रभाव वांड्मयेतिहासलेखनावरही पडलेला दिसतो. परंतु बरेचसे साहित्य प्रचलित साहित्य परंपरा, संकेत रूढी यांच्या प्रभावातून निर्माण होते, याकडे तेनचे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. त्यामुळे तेनच्या सिद्धांतावर अनेकांनी अनेक प्रकारचे आक्षेप घेतल्याचे दिसून येते

## १ब.५. मार्क्सचा 'पाया आणि इमला' सिद्धांत –

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांच्या विचार व्युहातून आकाराला आलेल्या तत्वज्ञानाला मार्क्सवाद म्हटले जाते. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारातून ते उत्पन्न झालेले असून ते जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून टाकणारे तत्वज्ञान आहे. समाज मनुष्यनिर्मित आहे आणि योग्य परिस्थिती निर्माण झाल्यास माणसे तो बदलू शकतात. म्हणून योग्य परिस्थिती निर्माण करून कामगार वर्गाने समाजसत्तावादी समाजाची निर्मिती करावी अशी मार्क्सची भौतिकवादी, कार्यशीलतेवर भर देणारी तात्विक विचारसरणी आहे. समाजव्यवस्था बदलत असते आणि हा बदल उत्पादनसाधने, उत्पादनपद्धती व त्या पद्धतीत निर्माण झालेले सामाजिक संबंध यांच्या बदलामुळे घडून येतो. खरे तर मार्क्स आणि इंगल्स यांनी साहित्यविषयक स्वतंत्र ग्रंथनिर्मिती केलेली नाही. तरीही त्यांच्या लेखनात साहित्यविचार आलेले आहेत. त्या आधारे साहित्यातील सामाजिकतेचा शोध घेता येतो. मार्क्सच्या विचारधारेनुसार समाजातील उत्पादन संबंध (Production Relation) हा कोणत्याही समाजरचनेचा पाया असतो आणि त्याला पूरक अशी नैतिक, धार्मिक, राजकीय, विचारप्रणालीची अतिरचना जन्मते. साहित्य हे त्याचाच भाग आहे. त्यामुळे साहित्यातील सामाजिकतेचा मागोवा घेताना उत्पादनसंबंधाचे स्वरूप आणि लेखकाची वर्गीय जाणीव महत्त्वाची असते असे मार्क्सवाद मानतो.

मार्क्सवाद हा अर्थशास्त्र, इतिहास, समाज आणि क्रांतिविषयक सिद्धांत आहे. सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर वांड्मयाचे मूल्यमापन होऊ शकते. हेच या मार्क्सवादी समीक्षेचे सूत्र आहे. मार्क्सचा पाया (Base) आणि इमला (Super structure) या संकल्पनेचा मार्क्सवादी समीक्षेवर प्रभाव आहे. "Economic production is the base of any society and therefore art, culture they are all superstructure built upon them" म्हणजे आर्थिक उत्पादन हा कोणत्याही समाजाचा पाया असून कला, साहित्य आणि संस्कृती हे त्यावरचे इमले आहेत.

मार्क्सचा हाच वरील सिद्धांत 'पाया-इमला' सिद्धांत म्हणून ओळखला जातो. धर्म, कायदा, तत्त्वज्ञान इ. प्रमाणेच साहित्य (आणि कला) हेही इमल्याचाच एक भाग असते. पाया आणि इमला या संरचनेतील विविध घटक एकमेकांवर आणि पायावर प्रभाव टाकत असतात. पण शेवटी निर्णायक घटक पायास्थानी असलेली अर्थव्यवस्था असते. थोडक्यात उत्पादन हा कोणत्याही समाजाचा पाया असून साहित्य आणि संस्कृती हे त्यावरचे इमले आहेत. मार्क्सवादी समीक्षकांच्या मते, साहित्य हे मूलतः समाजसन्मुख असते. समाजातील संघर्षाचे आणि परिवर्तनाचे पडसाद साहित्यात उमटतात. राजकीय, सामाजिक,

सांस्कृतिक अधिरचनेला (सुपरस्ट्रक्चर) अर्थव्यवस्था ही पायाभूत असते. असे असले तरी साहित्य हे समाजातील अर्थव्यवस्थेचे निखळ प्रतिबिंब असते किंवा ते अर्थव्यवस्थेवर निष्क्रियपणे अवलंबून असते असे म्हणता येणार नाही. आर्थिक प्रेरणा आणि साहित्याचे स्वरूप यांचे एकास एक नाते नसते. ही या विचाराची मर्यादा म्हणता येईल.

मार्क्सवादी समीक्षा पद्धतीचा प्रभाव समाजशास्त्रीय समीक्षेवर असला तरी दोन्ही समीक्षा पद्धती एक नसून वेगवेगळ्या आहेत, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे असे गो.म. कुलकर्णी म्हणतात. मार्क्सवादी समीक्षेचा मूलभूत दृष्टिकोन प्रामुख्याने अर्थशास्त्राधिष्ठित आहे. मार्क्स, एंगल्स, प्लेखानोव्ह, लेनिन, ग्रामची, ट्राटस्की, गोल्डमन, फिशर या विचारवंतांची मार्क्सवादी मीमांसा महत्त्वाची आहे. सार्त्र, बॅख्ट, गॉर्की, नेरुदा अशा मार्क्सवादाने प्रभावित झालेल्या काही साहित्यिकांनी या संदर्भात मोलाची कामगिरी केली आहे. या पद्धतीचा वापर करून विशिष्ट काळातील उत्पादन संबंध व लेखकांचा वर्ग यांच्याद्वारे साहित्यातील जीवनाशयाचा संबंध जोडता येतो. समाजाच्या उत्पादन साधनात बदल झाला की साहित्याच्या स्वरूपात कसा बदल होतो हे या पद्धतीद्वारे स्पष्ट करता येते. १९ व्या शतकातील मराठी समाजात घडलेले स्थित्यंतर आणि आधुनिक मराठी साहित्याचा झालेला उदय हे याचे उदाहरण आहे. त्याचबरोबर एखाद्या वर्गाचे समाजातील स्थान, त्या स्थानात होणारे बदल आणि साहित्यातून अभिव्यक्त होणारा आशय हे नातेसुद्धा या पद्धतीद्वारे जुळवता येते.

उत्पादन संबंधाला आधार म्हणून स्वीकारल्यामुळे मार्क्सवादी पद्धती अधिक वस्तुनिष्ठ ठरली आहे. साहित्यातून व्यक्त होणारा जीवनाशय वर्गीय असतो अशी मार्क्सवादाची धारणा असली तरी माणसाच्या निर्मितीशीलतेकडे मार्क्सवाद दुर्लक्ष करत नाही. शिवाय या पद्धतीद्वारे साहित्यातील सामाजिकतेसंबंधी कारण व परिणाम या स्वरूपाचे अचूक विश्लेषण करता येतेच असे नाही. ही ह्या पद्धतीची मर्यादा ठरू शकते. मराठी समीक्षेत लालजी पेंडसे यांनी मार्क्सवादी समीक्षेला ओळख प्राप्त करून दिली. पुढे बा.र.सुंठणकर, शरच्चंद्र मुक्तिबोध, दिगंबर पाध्ये, संदीप पेंडसे यांनी मार्क्सवादी समीक्षेला पुढे नेण्याचे कार्य केले. तर ग.बा. सरदार, दि.के. बेडेकर यासारख्या समीक्षकांनी मार्क्सवादी समीक्षा पद्धतीचा कल्पक वापर केल्याचे दिसते. असे असले तरी काही अपवाद वगळता मराठीत मार्क्सवादी समीक्षा फारशी लिहिली गेली नाही असे खेदाने म्हणावे लागते.

## १ब.६. मानवतावाद : स्वरूप आणि विशेष

मानवी जीवनमूल्ये ही अंतिम मूल्ये होत हे मानवतावादाचे प्रथम सूत्र आहे. मानव हा शिक्षणाने स्वतःला बदलणारा आणि विकसित होणारा असा प्राणी आहे. स्वहित साधण्याचे अथवा न साधण्याचे त्याला स्वातंत्र्य आहे. थोडक्यात मानवाच्या हातातच त्याचे भवितव्य आहे. मानवी जीवनातील जो काही योग्य आणि अयोग्य याचा निर्णय होत असतो तो मानवीच असतो. मानवच सर्व अस्तित्वाचा मानदंड आहे. अशा प्रकारच्या विचारांनी प्रेरित झालेले आंदोलन मानवतावादी होय आणि अशा विचारसरणीचे मूलगामी समर्थन करणारे तत्वज्ञान मानवतावाद होय. मानवतावाद ही एक माणूस म्हणून जगण्याची व इतरांना माणसासारखे जगता यावे म्हणून मदत करण्याची साधीसोपी जीवनपद्धत आहे. या पद्धतीत कुठलेही कर्मकांड नाही, कडक आज्ञा नाहीत, गूढ भाषाही नाहीत. वंशभेद, वर्णभेद,

लिंगभेदही नाहीत. त्यात मानव ही एकच जात आहे. या सबंध मानवजातीसाठी मानवतावाद हा एकच एक धर्म आहे व त्यामुळे त्याला मानवधर्म असे म्हणता येते.

मानवतावाद हे तत्त्वज्ञान जरी अलीकडच्या काळातील असले तरी 'मानवता' ही फार प्राचीन असून, मानवतावादाचे पहिले मूलतत्त्व 'नीतिमत्ता' हे तर मानवतेहूनही प्राचीन आहे. माणसात नीतिमत्ता स्वाभाविकत:च असते, असे मानवतावाद मानतो. एवढेच नव्हे तर सुसंस्कृत माणसापूर्वीच्या असंस्कृत माणसात आणि तत्पूर्वीच्या उत्क्रांती अवस्थेतील रानटी पूर्वमानवातसुद्धा नीतिमत्ता असली पाहिजे व हळूहळू ती उन्नत होत गेली असली पाहिजे, असे मानवतावाद मानतो. रानटी टोळी अवस्था सोडून सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी जेव्हा मानव स्थिर जीवनाकडे वळून सुसंस्कृत बनू लागला तेव्हाच नीतिमत्ता आणि मानवता निर्माण झाल्या; परंतु नीतिमत्ता व सुसंस्कृतपणा यांच्यापेक्षा मानवतावाद हे तत्त्वज्ञान अधिक व्यापक असून, हा व्यापक विचार पुष्कळ नंतरच्या काळात निर्माण झालेला आहे. आज मानवतावादी विचार कमी-अधिक प्रमाणात का होईना, पण सर्व जगभर मान्यता पावलेले आहेत. मानवतावादात नीतीला पहिले स्थान असून, या तत्त्वज्ञानात सर्वात जास्त भर आहे तो माणसाच्या नैतिक प्रगतीवरच. नैतिकता म्हणजे इतरांची कदर करणे, सहानुभूती, मैत्री, दया व प्रेम यांच्या पायावर ती उभी असून, ती मानवाच्या मूळ स्वभावात आहे, असे मानवतावाद मानतो.

मानवतावादी आंदोलनाचा प्रारंभ यूरोपच्या प्रबोधनकालात झाला. मध्ययुगीन धार्मिक ख्रिश्चन पुरोहितशाहीच्या बंधनातून मुक्त झालेल्या, मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभलेल्या व्यक्ती या प्रबोधन युगामध्ये वावरू लागल्या. या युगात माणसाच्या बुद्धीला, प्रतिभेला आणि वर्तनक्रमाला नवी दिशा प्राप्त झाली. मानवी महिम्याचे, त्याच्या अपरंपार सर्जनशक्तीचे दर्शन होऊ लागले. या युगातील या विशिष्ट व्यक्तींनी यूरोपच्या प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीतील मानवी कर्तृत्वाचे दर्शन घेतले. त्यातूनच नवनिर्मितीची स्फूर्ती झाली. त्या प्राचीन युगाचेच अनुकरण करीत असता त्याची प्रतिकृती निर्माण न होता नवा इतिहास घडू लागला. काव्य, नाटक, कला, तंत्रविज्ञान या सर्वांना नवे रूप येऊ लागले. शिक्षणाला नवी दिशा मिळाली. ख्रिस्ती धर्मगुरूंच्या शिक्षणाच्या चौकटीत न बसणारा मानव्यविद्यांचा शिक्षणक्रम अंमलात येऊ लागला. माणसाच्या ऐहिक जीवनमूल्यांवर भर देणारा असा शिक्षणाचा कार्यक्रम अंमलात आणणे हा या आंदोलनाच्या कार्यक्रमाचा वैशिष्ट्यपूर्ण भाग होता.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या विचारांचे मौलिक अध्ययन सुरू झाले. ग्रीक व लॅटिन या भाषेतील प्रमाणित ग्रंथ मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ लागले. जुन्या विचारांचे अध्ययन होऊ लागले. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या विचारसरणीची मानवतावादाशी सुसंगत आणि विज्ञानविकासास पोषक अशी मांडणी होऊ लागली. पीत्रार्क (१३०४–७४) आणि लोरेंत्सो व्हाल्ला (१४०६–५७) यांनी धार्मिक मानवतावादाचा पुरस्कार केला आणि चर्चचे वैचारिक आधिपत्य नाकारले. चर्चच्या वैराग्यप्रधान विचाराची मध्ययुगीन यूरोपीय समाजावर जी पकड होती ती धार्मिक मानवतावादाने हळूहळू सैल केली. मानवतावादाच्या प्रभावाखाली प्लेटोच्या व ॲरिस्टॉटलच्या विचारांना वेगळी दिशा प्राप्त झाली. पीको आणि फिचीनो यांनी ख्रिस्ती धर्मविद्या, प्लेटोचे तत्त्वज्ञान आणि मानवी ऐहिक मूल्ये यांचा समन्वय साधून ख्रिस्ती धर्माच्या तत्वज्ञानाची नवी मांडणी केली. प्लेटोचे बुद्धिगम्य, शाश्वत व मंगलमय सत्य आणि

मनुष्याच्या मनातील आदर्शाची ओढ यांचा अतूट संबंध त्यांना दिसला. कलापूर्ण जीवनाचे समर्थन या अतूट संबंधातून मिळाले. ख्रिस्ती धर्मातील ऐहिक जीवनाची पापमूलकता आणि पापभयता यामुळे नाकारता आली. या आदर्शाच्या ओढीच्या सिद्धांताचाच उपसिद्धांत म्हणजे मानवी स्वातंत्र्य होय.

इतिहास घडवून मानव आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवतो. प्रकृतीच्या कणाकणात मानवी स्वातंत्र्याचे आविष्कार दिसतात. मानवाला समाज आणि निसर्ग दोन्ही बदलता येतात. जोव्हानी पीको देल्ला मिरांदोला याने तर १५ व्या शतकात मानवी महिम्यावर प्रवचन दिल्याचे आढळते. मानवाच्या ठिकाणी असलेले स्वातंत्र्य ईश्वराची देणगी आहे, असे तो मानतो. मानव हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच निसर्गाशी त्याला प्रतारणा करता येणार नाही. निसर्गात तो नांदत आहे. म्हणून निसर्गापासून आनंद घेणे आणि नैसर्गिक आपत्तींशी झगडत राहणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. वैद्यक, कायदा, कला, साहित्य आणि वक्तृत्व या माणसाच्या गरजा आहेत. या गरजा चांगल्या गुणांच्या उपासनेतच सिद्ध होतात.

ॲरिस्टॉटलच्या नीतिशास्त्र आणि राज्यशास्त्रविषयक ग्रंथांना प्रबोधनकालात अधिक महत्त्व आले. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवन हा मानवी जीवनाचा गाभा आहे, या विचाराला प्रबोधनकालात महत्त्व आल्यामुळे नीक्कोलो मॅकिआवहेली याच्यासारखा नवीन राज्यशास्त्राचा पाया घालणारा विचारवंत या काळात निर्माण झाला. मानव हाच इतिहासाचा निर्माता आहे, हे लक्षात आल्याने ऐतिहासिक साधने शोधणे, तपासणे आणि भाषेच्या सहाय्याने नीट प्रसिद्धीस आणणे या गोष्टीला आधुनिक संस्कृतीमध्ये जे महत्त्व प्राप्त झाले आहे, त्याचा खराखुरा प्रारंभ प्रबोधनकालीन मानवतावादी आंदोलनात झाला आहे. ऐतिहासिक व्यक्तींचे स्वभावविशेष, जीवनपद्धती, गुणदोष यांच्या माहितीची उपेक्षा मध्ययुगात होत होती. पण प्रबोधनकालापासून याचे महत्त्व पटू लागले. मानवी व्यक्तिमत्त्वाला, त्याच्या सर्वांगीण जीवनप्रवृत्तींना, त्याच्या पापपुण्यांना, सत्प्रवृत्ती आणि दुष्ट प्रवृत्ती यांना चित्रित करून वर्तमान आणि भावी जगाला त्याची कायम आठवण राहील असे करणे हा या प्रबोधनकालातील मानवतावादाचा एक कार्यक्रम ठरला.

धर्मचिंतनाला मानवतावादाने नवी दिशा दिली. मानवी स्वातंत्र्याची जोपासना करण्याकरता ईश्वर, ईश्वरी संकेत, परलोकगामी आत्मा, अमरत्व इ. धार्मिक तत्त्वांचा आदर करून या धार्मिक तत्त्वांचे मानवाच्या ऐहिक जीवनात माणसाच्या कर्तृत्वाला, कार्यक्षमतेला आणि स्वातंत्र्याला पोषक अशा स्वरूपात चिंतन सुरू झाले. माणसाच्या सामाजिक जीवनाला पोषक अशा विचाराला महत्त्व आले. त्याबरोबरच धार्मिक असहिष्णुता नष्ट करण्याचाही प्रयत्न झाला. परस्परविरोधी धर्मपंथांना सारखाच जगण्याचा अधिकार आहे, या धर्मसहिष्णुतेच्या तत्त्वाचा पुरस्कार होऊ लागला. लोरेंत्सो व्हाल्ला याने तर सामाजिक, राजकीय जीवनात आपापली कर्तव्ये बजावणे हेच खरे धार्मिक जीवन आहे, असे म्हटले आहे.

प्रबोधनकालात मानवतावादाने हे वैचारिक स्वातंत्र्य त्या वेळच्या उच्च वैचारिक जीवनामध्ये एक श्रेष्ठ मूल्य म्हणून प्रसृत केले. त्यामुळे बायबलप्रमाणेच निसर्ग किंवा नैसर्गिक विश्व हेही देवाचे पवित्र पुस्तक आहे, असा विचार महत्त्वाचा ठरला. पायथॅगोरियन

सूर्यकेंद्रित विश्वाचा सिद्धांत, आर्किमिडीज व हिपॉक्राटीस यांचे विश्व आणि जीवन यांबद्दलचे विचार तपासण्याची प्रवृत्ती उत्पन्न झाली. निसर्ग हा देवाचे पुस्तक, हा विचार लिओनार्दो दा व्हींची, निकोलेअस कोपर्निकस, आणि गॅलिली गॅलिलीओ यांनी महत्त्वाचा सिद्धांत म्हणून स्वीकारला. त्यामुळे निसर्गाचा बोध करून घ्यायचा त्याकरता अवलोकन आणि प्रयोग करीत रहायचे त्यावरून गृहीतकांच्या संकल्पना मांडायच्या, अशा या वैज्ञानिक प्रवृत्तीला मुख्य स्थान शिक्षणाट प्राप्त झाले. वैज्ञानिक पद्धतीचा पाया घातला गेला. आधुनिक विज्ञाननिष्ठ संस्कृती जन्माला येऊन औद्योगिक क्रांती झाली. मानवसमाजाच्या जीवनाचे आर्थिक अधिष्ठान म्हणजे नित्य विकसित होणारे, बदलत जाणारे नवे तंत्रज्ञान हे लक्षात आले. त्यातून मानवसमाजाचे या पृथ्वीवरचे आदर्श जीवनाचे चित्र निर्माण करणाऱ्या विविध प्रकारच्या समाजवादी विचारसरण्या निर्माण झाल्या. त्यापैकी कार्ल मार्क्स यांचा साम्यवाद म्हणजे आधुनिक मानवतावादाचाच आविष्कार मानता येतो. साने गुरुजींच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे ‘खरा तो एकचि धर्म। जगाला प्रेम अर्पावे’ मानतो तो मानवतावादी. त्याला जात, धर्म, देश, लिंगभाव दिसत नाही. तो कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांचे भले करत राहतो, ते केवळ मानवतावादी भूमिकेमुळे. म्हणूनच साने गुरुजी, म. गांधी, विनोबा भावे, मदर तेरेसा, बाबा आमटे, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस व संतमहंत यांना मानवतावादी ओळखले जाते.

### १ब.६.१ मानवतावाद : काही ठळक मुद्दे

१) मानवतावाद हा मानवताकेंद्री असतो.

२) मानवतावादामध्ये निसर्ग, राज्य, कुटुंब, समाज, धर्म यांपेक्षा माणूस मोठा, महत्त्वाचा, श्रेष्ठ मानून त्याचे हित साधण्याला प्राधान्य दिले जाते.

३) मानवतावादात मानवतेला, माणुसकीला, आपुलकीला, जिव्हाळ्याला, सौहार्दतेबरोबरच परोपकाराला, दयेला, करुणेला, सहानुभूतीला, अनुकंपेला, कणवेला, कळवळ्याला सर्वाधिक महत्त्व दिले जाते.

४) मानवतावाद हा व्यक्तीव्यक्तींतीलच नव्हे, तर मानव व मानवेतर सृष्टीतील भेद मिटवून टाकतो.

५) प्रेम, सेवा, त्याग, समर्पण हे मानवतावादातील परवलीचे शब्द आहेत.

६) मानवतावादी हा दुःखी, पीडितांच्या व्यथा-वेदनांवर यथाशक्ती फुंकर घालतो, असह्य दुःखाची बोच कमी करण्यासाठी रात्रंदिवस झटतो.

७) मानवतावाद्याची निष्ठा स्वतःप्रती तर असतेच, पण आर्त, दुःखाने गांजलेल्या, होरपळलेल्या जीवांवर मायेची पाखर घालणे हा त्याचा स्थायीभाव असतो, स्वभाव असतो.

८) ‘मानवी समाजाबद्दल प्रेम’ व ‘सामाजिक जबाबदारीची जाणीव’ ही मानवतावादात अत्यंत आवश्यक आहेत.

९) समाजवादी व लोकशाही मूल्ये मानवतावादाला मान्य आहेत.

१०) मानवतावादाला धर्माप्रमाणे धर्मकल्पना,दृष्टान्त, साक्षात्कार हेही मान्य नाहीत.

११) मानवतावाद आशावादी आहे.

१२) मानवतावादात 'वैज्ञानिक दृष्टिकोन' हे अत्यंत आवश्यक मूल्य आहे.

## १ब.७. मार्क्सवाद : स्वरूप आणि विशेष

मार्क्सवाद म्हणजे प्रख्यात क्रांतीवादी तत्त्ववेत्ता कार्ल मार्क्स (१८१८–१८८३) व त्याचा सहकारी मित्र एंगेल्सने मांडलेली सर्वकष कामगार वर्गाच्या मुक्तीची तत्त्वप्रणाली होय. मार्क्सवाद हा शास्त्रीय समाजसत्तावादाचा मूलाधार आहे. औद्योगिक क्रांती झाली आणि वाढत्या उद्योगाबरोबर कामगारांची व सामान्य जनतेची परिस्थिती अधिकाधिक हलाखीची बनत गेली. तेव्हा १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात व १९ व्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात समाजसत्तावाद उदयाला आला. त्याचे इंग्लंड - फ्रान्समध्ये रॉबर्ट ओएन, चार्ल्स फौरिएर, प्रूदाँ, सेंट सायमन, कार्लाइल, डिकन्स, रस्किन यासारख्या अनेक विद्वानांनी समर्थन केले. या समाजसत्तावादी विचारवंतांनी समाजाचे भव्य चित्र रेखाटले. मात्र तो अस्तित्वात आणण्याचा शास्त्रशुद्ध मार्ग दाखविला नाही. मार्क्सने या पूर्वसुरींच्या विचारापेक्षा आपला विचार वेगळा आहे, हे दर्शवण्यासाठी समाजसत्तावादाला शास्त्रीय वा वैज्ञानिक म्हंटले. मार्क्सचा विचार वेगळा आहे हे खरे, मार्क्सपूर्व समाजसत्तावाद विचारातील नीती व न्याय जर मार्क्सवादात अंतर्भूत झाला असता, तर मार्क्सवाद अधिक कल्याणकारक ठरला असता, यात शंका नाही.

मार्क्सवादाचे स्पष्ट चित्र १८४८ साली प्रसिद्ध झालेल्या साम्यवादी जाहीरनाम्यात म्हणजेच 'द कम्यूनिस्ट मॅनिफेस्टोत' आढळते. या काळात भांडवलशाही यूरोपमधील अनेक देशांत फोफावू लागली होती. तिचा बरा वाईट परिणाम समाजावर दिसू लागला होता. मजूराचे सर्वतोपरी शोषण व आपले पोषण हे भांडवलदारांचे धोरण होते. या व्यवस्थेविरूद्ध कामगारांमध्ये तीव्र असंतोष होता. तो असंतोष फुलवून त्याचे क्रांतिकारक उठावात रूपांतर करता येईल, अशी मार्क्सची धारणा होती. १८४८ मध्ये यूरोपमधील अनेक देशांत जे क्रांतीकारक उठाव झाले. त्यात सामील होण्याचे आवाहन मार्क्सने केले. आपल्या जाहीरनामाच्या शेवटी तो लिहीतो, "जगातील कामगारांनो, एक व्हा शृंखलांखेरीज तुमच्या जवळ गमावण्यासारखे असे दुसरे काही नाही." याच जाहीरनाम्यात मार्क्सवादाची सर्व प्रमूख तत्त्वे दृष्टीस पडतात. पुढील काळात मार्क्सने अनेक पुस्तके लिहिली. त्यांत 'दास कॅपिटल' हा महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथात भांडवलशाहीच्या उत्पत्तीचा व विकासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास असून भांडवलशाही कामगारांचे शोषण कसे करते व त्यामुळे क्रांतीला समाज कसा तयार होतो, ते दाखवले आहे.

मार्क्सवादाचे आर्थिक व राजकिय असे अनेक पैलू आहेत. तत्त्वज्ञान हा त्याच्या अभ्यासाचा मूळ विषय आहे. अर्थकारणाला व राजकारणाला तात्त्वीक बैठक हवी, असा त्याचा आग्रह होता. त्याने जी बैठक सुचविली ती भौतीकवादाची होती. भांडवलदारी व्यवस्था आणि कामगार यांच्यात उत्पन्नाचे समान वाटप व्हावे हे मार्क्सवादाला अपेक्षित होते . मूलतः मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला अनित्यात्मक ( dialectic ) भौतिकवाद म्हणतात . अनित्यतावाद मार्क्सने हेगेल पासून घेतला आहे आणि भौतिकवाद फायरबाख पासून घेतला आहे. केवळ

चैतन्य मूळ नसून भूत वस्तू किंवा जड द्रव्य मूळ आहे, असा त्याचा आग्रह होता. ही भूत वस्तू अस्थिर सतत बदलणारी, सदैव गतिमान असते. या वस्तूंचे व्यापारातून वा विरोध-विकासातून विश्व निर्माण होऊन प्रणी व नंतर मनुष्य निर्माण झाला, मनुष्यांनी समाज निर्माण केला. भौतीक जीवनाची भौतीक साधने निर्माण करीतच मनुष्य जगतो निर्माणपद्धती जशी असते तसे विशिष्ट सामाजिक संबंध निर्माण होतात. उत्पादनपद्धती बदलली कि त्याबरोबर सामाजिक संबंध बदलतात म्हणजे समाजिक वर्ग बदलतात. उत्पादन पद्धती व सामाजिक विशिष्ट संबंध हा भौतिक सामाजिक पाया असतो. हा पाया जसा असेल त्या प्रकारच्या मानसिक संस्कृतीचा इमला उभारला जातो. समाज मनुष्यनिर्मित असल्याकारणाने योग्य ऐतिहासिक परिस्थितीत मनुष्य तो बदलू शकतो. तद्वत योग्य परिस्थिती निर्माण करून कामगारवर्ग भांडवलशाहीतून समाजसत्तावादी समाज निर्माण करू शकतील, असा हा सर्वसाधारणपणे मार्क्सचा भौतिकवादी, कार्यशिलतेवर भर देणारा, तात्त्विक दृष्टिकोन आहे. मार्क्सवादाचे अर्थकारण व राजकारण यांना तो पायाभूत आहे. जग बदलणे ही आपली जबाबदारी आहे ही मार्क्सची तत्त्वज्ञानाबद्दलची भूमीका होती. समाजव्यवस्था बदलत असते आणि हा बदल उत्पादनसाधने, उत्पादनपद्धती व त्या पद्धतींत निर्माण झालेले सामाजिक संबंध यांच्या बदलांमुळे घडून येतो हा मूळ सिद्धांत होय. यालाच ऐतिहासिक भौतिकवाद (हिस्टॉरिकल मटीरिअलिझम) असे म्हणतात. शरद पाटील म्हणतात, "मार्क्सवादाचे शुद्ध ( pure ) तत्त्वज्ञान अनित्यात्मक भौतिकवाद आहे . तर व्यावहारिक ( applied ) तत्त्वज्ञान ऐतिहासिक भौतिकवाद. शोषणशासनाची वर्ग ही एकमेव संस्था असल्याचे ऐतिहासिक भौतिकवाद मानतो . त्यामुळे त्याचे आवरण वर्गवाद आहे . कोणत्याही वर्तमान समाजाचे सम्यक आकलन करण्यासाठी प्रथम त्याच्या आर्थिक पायाचा अभ्यास केला पाहिजे , नंतर त्याच्या वैचारिक वरच्या इमल्याचा आणि मग या दोन्ही अभ्यासाचा संयोग ( sublation , विधायक नकारीकरण ) हा ऐतिहासिक भौतिकवादाचा गाभा आहे. त्यामुळे हे केवळ वर्गीताचे तत्त्वज्ञान आहे." कार्ल मार्क्सने समाजातील उत्पादनसंबंधातून निर्माण होणारी शोषणीय व्यवस्था आणि मानवी दुःख यांना आपल्या विचारांमध्ये महत्त्वाचे मानले होते . समाजातील आर्थिक , सामाजिक परिस्थिती हे मानवी दुःखाचे मूळ कारण असून व्यवस्था परिवर्तन घडून या दुःखाचा शेवट करता येईल अशी त्याच्या तत्त्वज्ञानाची धारणा होती.

भांडवलशाहीचे अंगभूत नियम मार्क्सवादाच्या आर्थिक विचारात आढळतात. त्याने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे खोल तर्कशुद्ध चिंतन केले. भांडवलशाही उत्पादन नफ्यासाठी होते. श्रमाची उत्पादकता वाढवून नफा मिळविणे हेच उद्योजकाचे मुख्य उद्दिष्ट असते. कामगाराला केवळ जगण्यापुरता कामगाराच्याच श्रमातून निर्माण झालेल्या संपत्तीतला छोटासा भाग दिला जातो. उर्वरित मोठा भाग मालक आपल्याकडे ठेवतो. यालाच शोषण वा पिळवणूक म्हणता येईल. स्वतःचा नफा वाढविण्याचे भांडवलदारांचे उद्योग नेहमीच कामगारांच्या शोषणाला कारण ठरतात. यातूनच वर्गकलह सुरू होतो व त्याचे पुढे वर्गयुद्धात रूपांतर होते. वर्गकलहामुळेच मानवसमाजाचा इतिहास घडतो. म्हणूनच त्याने 'आतापर्यंतचा समाजाचा सर्व इतिहास वर्गकलहांचा इतिहास आहे' असे म्हटले आहे. त्यातूनच क्रांती होऊन समाजवाद निर्माण होईल असे मार्क्सला वाटते. भांडवलशाहीची चौकट मोडण्यासाठी क्रांती अटळ आहे , हा मार्क्सवादाचा सिद्धांत आहे. क्रांती करून नाडलेला - पिडलेला कामगार वर्ग भांडवलशाही उलथून टाकण्याचा प्रयत्न करतो.

त्यासाठी रक्तही सांडावे लागते. ही रक्तरंजित क्रांती यशस्वीपणे पार पडण्यासाठी साम्यवादी विचाराच्या पक्षाची गरज असते. असा पक्ष यूरोमधील औद्योगीक क्रांती झालेल्या प्रत्येक देशात उभा राहावा हे मार्क्सवादाचे उद्दिष्ट होते.

भारतातील पहिले प्रसिद्ध मार्क्सवादी  एम्. एन्. रॉय हे वर्गवादांमध्ये गुंतून पडल्यामुळे मार्क्स व्यक्तीला विसरला, असा आक्षेप ते घेतात.  मार्क्सवाद्यांमध्ये जहाल व क्रांतीकारक गटही दिसून येतात. त्यामध्ये हर्बर्ट मार्क्यून, चे गेव्हेरा, झां पॉल सार्त्र, फ्रान्स फनान इत्यादींचा समावेश होतो. त्यांच्या दृष्टीने विकसित देशांतील औद्योगीक कामगार आता क्रांतीकारक राहिला नाही तो क्रांतीकारक वारसा ते तिसऱ्या जगातील शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, विद्यार्थ्यांना व इतरांना देतात. असे असले तरी मार्क्सवादाने समाजवादाला शास्त्रीय बैठक दिली इतकेच नव्हे तर त्याच्या पूर्तीसाठी क्रांतीचा मार्गही दाखवला.

मार्क्सवादी साहित्यविचार हा काळाच्या ओघात वेगवेगळ्या अंगानी पुढे येत गेलेला आहे . मुख्यतः मार्क्सवादी साहित्य विसाव्या शतकात पुढे आलेले दिसते . मार्क्सवादी साहित्यविचाराच्या मांडण्या अनेक दृष्टिने होऊ लागल्या . परंतु मार्क्सवादी साहित्यविचार हा जीवनवादी असलेला दिसतो . साहित्यातील वास्तववावर भर देणारा विचार आहे . सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात ततोतत उमटावे या अनुषंगानेही एक संकोची भूमिका पुढे आली . तर या विरोधी सामाजिक परिवर्तनाच्या भागावर अधिक भर देणे आणि साहित्य विशिष्ट मूल्याना प्रतिबध्द असणे आवश्यक आहे , अशी भूमिकाही घेण्यात आली . वस्तुतः या दोन्हीही भूमिका मार्क्सवादी साहित्याला मान्य नाहीत.

शासन करणारा वर्ग वा वर्ण हा शासित वर्गाच्या संमतीने राज्य करण्यासाठी त्या शासित वर्गाची जाणीव लक्षात घेऊन आपली जीवनसृष्टी अनुकूल करू शकते. यावर मार्क्स म्हणतो, "प्रत्येक युगात अधिशासन करणाऱ्या कल्पना या अधिशासन करणाऱ्या वर्गाच्या कल्पना असतात म्हणजेच जो वर्ग सत्ता गाजवितो तोच वर्ग बौद्धिक सत्ताही गाजवितो . " एकूणच वर्णव्यवस्थेवर उभा राहिलेला समाज हे अशा धुरिणत्वचे उदाहरण आहे . पुरुषांचे स्त्रियावरील वर्चस्व हे सर्व संमतीच्या वर्चस्वाचे उदाहरण आहे . समाजात जेव्हा उत्पादनसंबंध आणि उत्पादनपध्दती यामध्ये बदल होतो तेव्हा सामाजिक परिवर्तनाला सुरुवात होते तेव्हाच खरे प्रतिधुरिणत्व ( counter legemony ) साकारते . नवी मूल्ये , विचारधारा साहित्यातून व्यक्त होतात . उदाहरणर्थ दलित साहित्य , स्त्रीवादी साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य.

लेनिनचा साहित्यविचार वर्गसंघर्ष आणि क्रांतिकारक जाणिवा व्यक्त करणारा आहे. साहित्यकृतीची बांधणी ही सामाजिक संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाची गती या जाणिवेतून करावी अशी भूमिका तो घेताना दिसतो . तर गॉर्की मानवी परिणामाची जोड देत सामान्य माणसाच्या असामान्य कृतीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न वास्तववादाच्या दृष्टीकोनातून करताना दिसतो. गॉर्कीचा साहित्यविचार हा सामाजिक बांधिलकी मानणारा आहे. गॉर्कीची विचारसरणी लेनिनला जवळची आहे . गॉर्कीचा साहित्यविचार मार्क्सवादी साहित्यविचाराला कसा प्रेरक आहे, हे के. रं. शिरवाडकर यांनी मुद्देसूद अधोरेखित केलेले आहे . "साहित्य मानववादी असते . माणूस हाच साहित्याचा केंद्रबिंदू असतो ह्याचा गॉर्कीने प्रखर पुरस्कार करून मार्क्सवादी साहित्यविचाराच्या मानववादी चौकटीवर भर दिला .

त्याचप्रमाणे लोकभावना साहित्याला तेजस्विता आणते आणि लोकजीवनापासून वियुक्त झालेले साहित्य निष्प्राण अथवा अधः पतित होते या मताची मांडणी केली. साहित्यकृती लोकाभिमुख असावयास पाहिजे हा आग्रह त्याच्या वैचारिक दृष्टीतून अपरिहार्यपणे येतो." ट्रॉट्स्की हा सामाजिक प्रेरणेवर भर देतो . मानवी जाणिवा या सामाजिक आवर्त प्रत्यावर्तामधून रूप धारण करतात आणि साहित्यातून त्या व्यक्त होतात, असा त्याचा साहित्यविचार आहे . हा साहित्यविचार वास्तववादाचा पुरस्कार करणारा असल्याचे दिसते. तर ल्युकाच हा विचारवत वास्तवाचे प्रतिदर्शन करण्यासाठी रूप ( form ) हा एक मार्ग मानतो . मार्क्सवादी विचारामध्ये रूपाचा विचारविमर्श करणारा ल्युकाच हा एक महत्वाचा विचारवंत . त्याने मार्क्सवादी साहित्यविचारात घातलेली भर मोलाची आहे. त्याच्या विवेचनात जीवनवादी दृष्टीकोणाला महत्व आहे. लेखक जी साहित्यकृती जन्माला घालतो त्याची मुळे जीवनविषयक दृष्टीत असतात. कलावंताच्या निर्मितीला तो वास्तवाची नवरचना मानतो . माणूस हेच साहित्याचे केंद्र आहे हे त्याच्या विवेचनातून स्पष्ट होते . विसाव्या शतकातील तो प्रभावी मार्क्सवादी समीक्षक आहे. कार्ल मार्क्स आणि हेगेल यांच्या द्वंद्वात्मक तत्त्वज्ञानाच्या आधारे तो वास्तववाद ही संकल्पना मांडतो. त्यातूनच त्याने वास्तववादाची सार्थ मांडणी केली आहे. रशियन क्रांतिनेता लिऑ ट्रॉट्स्की ( Leon Trotsky ) हा एक प्रगल्भ मार्क्सवादी राजकारण आणि साहित्याचा अभ्यासक. त्याने साहित्यस्वरूप याविषयीची चर्चा केली आहे. त्याने रशियन रूपवादाच्या भूमिकेला छेद दिला होता. रूपवादी आशयाला विरोध करतात, तो ट्रॉट्स्कीला मान्य नव्हता. कलेत आशयाला, जीवनानुभूतीला त्याने महत्त्व दिले होते. रूपवादी श्क्लॉव्हस्की याने मार्क्सवाद्याना एका पुस्तिकेद्वारे पाच प्रश्न ठेवून आव्हान दिले होते. त्याला ट्रॉट्स्कीने मार्क्सवादी भूमिकेतून उत्तरे दिली आहेत. यातून मार्क्सवादी भूमिका स्पष्ट झाली आहे . ट्रॉट्स्कीच्या मते साहित्याचे आकलन करून घेण्यासाठी तत्कालीन काळ , समाज , संस्कृती , जीवनधारणा समजून घेणे आवश्यक ठरते. कोणताही समाज संपूर्णपणे स्वतःची नवी कला निर्माण करू शकत नाही. त्यामध्ये एक सांस्कृतिक सातत्य असते. कलेच्या निर्मिती प्रक्रियेपासून त्याच्या सौंदर्यदृष्टिपर्यंतचे विवेचन करताना मार्क्स निसर्ग आणि माणूस यांच्यातील सहसंबंध अधोरेखित करीत मानवी कलात्मक जाणीव मानवीकरण या संकल्पनेतून स्पष्ट करतो. निसर्गावर प्रभुत्व मिळविण्याच्या प्रयत्नातून प्राथमिक कलात्मक जाणीव होत गेली. पुढे प्रगतावस्थेत वस्तूकडे पाहण्याची व्यवहारवादी दृष्टी निर्माण झाली. त्यातून सर्जक कलात्म दृष्टी वाढत गेली. याच सौंदर्य जाणिवेतून कलेचे विविध प्रकार निर्माण होत गेले. त्यातून कलेचे स्वायत्त आणि रूप प्राप्त झाले. मार्क्स आणि एंगल्स यांनी कलेच्या ऐतिहासिक उगमाचे भौतिकवादी स्पष्टीकरण केले आहे. यामध्ये वास्तवाकडे कलात्मक दृष्टीने पाहिले गेले . या सर्वामध्ये श्रम या घटकाला प्राधान्य दिले गेले . वास्तव आणि सौंदर्य यामधून माणसाची कलात्मक दृष्टी विकसित होत गेली. हा एक सामाजिकतेचा भाग आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे .

### १ब.७.१ मार्क्सवाद आणि मार्क्सवादी साहित्यविचार : काही मुद्दे

१) मार्क्सवाद एक गतिमान आणि परिवर्तनशील तत्वज्ञान आहे.

२) मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद आणि मार्क्स - एंगल्स यांनी कला साहित्य या संदर्भात मांडलेले विचार ही दोन तत्वे मार्क्सवादी साहित्याप्रमाणे असलेली दिसतात .

३) मानवी जीवनाचा विकास हा मार्क्सवादी तत्वज्ञानाचा आणि साहित्याविचाराचाही पाया आहे .

४) मार्क्सवादी दृष्टी मानवमानवादी आहे. त्यामुळे मानव आणि मानवी इतिहास हे मार्क्सवादाचे सूत्र असल्याचे दिसते.

५) मार्क्सवाद वास्तववादावर श्रद्धा ठेवून साहित्याचे मूल्यमापन करण्यावर भर देतो.

६) मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. समाज संस्कृतीच्या विकासात आर्थिक रचना अंतर्भूत असते असा मार्क्सवादाचा विश्वास आहे.

७) मार्क्सवादी साहित्यविचार विश्लेषणात्मक आहे. तो कलाकृतीचे विश्लेषण करून प्रत्येक घटकाचा आणि कलाकृतीचा कस कशात आहे ते सांगण्याचा प्रयत्न करतो. मार्क्सवादी साहित्यविचार हा साहित्य आणि जीवन याविषयीचा विचार आहे.

८) वर्ग संघर्षावर आधारित मानवी इतिहास निर्माण होतो. सरंजामशाही, भांडवलशाही, कामगारशाही यामधून समाज प्रगतीकडे वाटचाल करेल आणि अंतिमतः वर्गविरहित असा साम्यवादी समाज, समाजरचना अस्तित्वात येईल हे मार्क्सवादाचे ऐतिहासिक भौतिकवादावर आधारित भविष्यकथन आहे.

९) समाजव्यवस्था ही उत्पादन साधनांवर सामूहिक मालकी असावी; अर्थव्यवस्था समान असावी आणि भौतिक वा वैज्ञानिकीकरणावर भर असावा अशी मार्क्सवादी विचारधारा आहे . तसेच काम आणि पैसा ही वितरणव्यवस्था समानतेच्या तत्त्वानुसार आणि वर्गविहीन असावी अशाप्रकारची समाजव्यवस्था अभिप्रेत आहे .

१०) मार्क्स आणि एंगल्सच्या मते कला आणि साहित्य हे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे, संबंधाचे प्रतिबिंब असते. साहित्याचे वास्तववादी स्वरूप, त्याचा कल, स्वातंत्र्य आदिविषयी त्यांनी आपली मते नोंदविली आहेत. साहित्याचा सामाजिक संदर्भ, विरोध - विकासवादी ऐतिहासिक दृष्टी या अनुषंगाने साहित्याचा विचार विमर्श केला आहे. त्यातून पुढे मार्क्सवादी साहित्य समीक्षा आकारास येत गेलेली आहे

## १ब.८. स्त्रीवाद : स्वरूप आणि विशेष

जगभरातील स्त्री दास्याचा इतिहास हजारो वर्षे जुना आहे. प्राचीन काळापासून स्त्रियाना फक्त चूल आणि मूल या कौटुंबिक व्यवस्थेत अडकवून ठेवले होते. त्यांना सार्वजनिक जीवनात कोणतेही मानाचे स्थान नव्हते. पुरुषांचीच तेथे मक्तेदारी होती. मध्ययुगात स्त्रियांना संपत्तीत वाटा नव्हता. शिक्षणाचाही अधिकार नाकारला गेला होता. स्त्रियांचे सामाजिक स्थान, त्यांचे विविध प्रश्न व समस्या इत्यादींबद्दलचे विचारमंथन १८ व्या शतकात होऊ लागले. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवी हक्काच्या जाहीरनाम्याने स्त्रीमुक्ती चळवळीला प्रेरणा मिळाली. त्यातून स्त्रीवादी विचारधारेचा जन्म झाला. त्यानंतर खऱ्या अर्थाने स्त्रीशिक्षण,स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी अशा अनेक प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. ‘ आम्ही साऱ्या एकत्र येऊन मिळून जाऊ ’, या प्रबोधनकालातील स्त्रीवादी घोषणेची चर्चा झाली; पण तिचे चळवळीत

मात्र रूपांतर झाले नाही. तरीही या काळातील काही सुधारणावादी स्त्रियांनी स्वातंत्र्य, समता आणि नैसर्गिक अधिकार हे स्त्री-पुरुष या दोघांनाही सारखेच लागू करावेत, अशी जोरदार मागणी केली. तेव्हा प्रसिद्ध फ्रेंच नाटककार ऑलँप द गॉजिस हिने 'डिक्लेरेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन अँड ऑफ द फीमेल सिटिझन' हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या हक्कांची जाणीव करून दिली. स्त्री ही पुरुषाची सहकारी-सोबती आहे, असे तिने ठामपणे सांगितले. याच सुमारास मेरी वुलस्टोन क्राफ्टचा 'ए व्हिन्डिकेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन' (१७९२ ) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात मेरीने स्त्री-पुरुषांना शिक्षण, काम आणि राजकारण यांत समान संधी द्यावी; असे म्हटले आहे. स्त्रिया या पुरुषांइतक्याच नैसर्गिकदृष्ट्या बुद्धिमान व हुशार आहेत. त्यांना शैक्षणिक व आर्थिक संधी आणि समान नागरी हक्क दिले, तर त्या पुरुषांएवढ्याच स्त्रिया सक्षम व समर्थ बनतील, असे मत मेरीने ठामपणे मांडले. प्रारंभीच्या या चिंतन-मंथनाचा परिणाम असा झाला की त्यामुळे फ्रान्स, जर्मनी, इटलीत वैचारिक उलथापालथ होऊन उन्मूलनवादाच्या चळवळीस

१९ व्या शतकात स्त्री प्रश्ना संदर्भात यूरोप व उत्तर अमेरिकेत स्थित्यंतरे होऊ लागली. पॅरिसमध्ये 'द व्हाइस ऑफ विमेन'(१८४८) हे दैनिक निघाले. त्यातून स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी, समान वेतन, कुटुंबांतर्गत आणि कुटुंबाबाहेरील हिंसाचार, समविभागणी अशा बहुविध स्त्री प्रश्नांना वाचा फोडली गेली. त्याच सुमारास जर्मन लेखिका लूईस डिटमर हिने 'सोशल रिफॉर्म' हे नियतकालिक काढून स्त्रियांचे प्रश्न चर्चेत आणले. न्यूयॉर्क येथे १८४८ मध्ये स्त्रियांच्या हक्कांसाठी पहिली स्त्री हक्क परिषद भरली. या सभेत अकरा ठराव संमत केले गेले. त्यांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त व्हावा, हा ठराव प्राधान्याने मांडला गेला. ८ मार्च १८५७ रोजी अमेरिकेत कापडाच्या मिलमधील स्त्रियांनी १६ तासाएवजी १९ तास काम करण्याचा अधिकार मिळवला. जॉन स्तुअर्त मिलने १८६७ मध्ये ब्रिटिश पार्लमेंट मध्ये स्त्रियांच्या मतदानाचा हक्क मांडला. तसेच १८६९ मध्ये जॉन स्तुअर्त मिलने 'द सब्जेक्शन ऑफ वुमेन' हा ग्रंथ लिहून विवाहसंस्था स्त्रियांच्या स्वातंत्र्याला कशी बाधा आणते ते दाखवून दिले. पुढे अशा प्रकारच्या स्त्रियांच्या परिषदा अन्य ठिकाणीही भरविल्या गेल्या. त्यांतूनच पुढे एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन, मार्था राइट, सुसान अँथनी इत्यादींनी ' नॅशनल विमेन सफ्रेज असोसिएशन' (१८६९) ही मतदानाच्या संदर्भात जागतिक संघटना स्थापन केली. एमा पॅटरसन यांच्या पुढाकाराने १८७७ मध्ये 'विमेन ट्रेड युनियन' ची स्थापना झाली. तर १८७८ मध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी आंतरराष्ट्रीय परिषद भरली. त्यातून काही ठिकाणी स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. सुरुवातीस उच्चभ्रू व कामगार स्त्रियांत मतभेद झाले. त्याबाबत शार्लट पर्किन्स गिलमन हिने 'विमेन अँड इकॉनॉमिक्स' (१८९८) या ग्रंथात असे म्हटले आहे की, स्त्रियानी घरगुती काम व कुटुंब या जोखडातून मुक्त झाले पाहिजे. पुरुषांवर विसंबून राहणे टाळले पाहिजे. समाजात लिंगभेदाच्या आधारे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते आणि स्त्रियांचे अपरिमित शोषण केले जाते. त्यासाठी पुरुषप्रधान-पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत बदल होणे आवश्यक आहे. असा समाजवादी समतेचा सिद्धांत शार्लट पर्किन्स गिलमन हिने मांडला. पाश्यात्य स्त्रियांना २० व्या शतकाच्या पूर्वार्धात मतदानाचा हक्क प्राप्त झाला. स्त्रीवादाचा हा प्रसार-प्रचार आशिया, आफ्रिका आणि अमेरिकेतही झाला आणि विकसित राष्ट्रांबरोबरच त्याचे लोण अविकसित व विकसनशील देशांत पोहोचले. १९१९ मध्ये व्हर्जिनिया वूल्फ या ब्रिटिश लेखिकेने 'अ रूम ऑफ वन्स ओन' हा ग्रंथ लिहिला. त्यात

स्त्रियांना आपल्या क्षमतांचा विकास करण्यासाठी पुरुषप्रधान व्यवस्थेत वाव नसल्याचा दावा केला आहे. स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने २० व्या शकतील महत्वाचा ग्रंथ म्हणजे फ्रेंच लेखिका सिमोन दि बोव्हाचा 'द सेकंड सेक्स' (१९४८) होय. या ग्रंथात तिने 'जन्मताच कुणी स्त्री नसते तर तिला स्त्री बनवले जाते. लिंग स्वरूपामुळे तिच्यावर बाईपण लादले जाते' असा विचार मांडला आहे. पुढे सन १९६९ मध्ये केट मिलेट हिने " Sexual Politices' हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या शोषणाला पितृसत्ताक समाजव्यवस्था कारणीभूत असल्याचे सांगितले. जागतिक पातळीवरच्या या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर सन १९७५ मध्ये युनोच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष ' साजरे करण्यात आले . तसेच सन १९७५ ते १९८५ हे स्त्रीमुक्तीचे दशक म्हणून साजरे झाले. अमेरिकेत १९७० ते १९८० च्या दरम्यान 'तळीरसे' आणि " Womens Press " यासारख्या स्त्रीवादी प्रकाशन संस्था स्थापन झाल्या . ८ मार्च १९१७ रोजी मास्को येथे भाकरीसाठी मोर्चा, ८ मार्च १९४३ मध्ये व्हिएतनाम येथील स्त्रियांचा संघर्ष आणि ८ मार्च १९७ ९ मध्ये इराणी स्त्रियांचा स्त्रीमुक्तीचा संघर्ष या पार्श्वभूमीवर ८ मार्च हा दिवस स्त्रीमुक्तीच्या चळवळीसाठी प्रेरणादायी ठरल्यामुळे हा दिवस ' आंतरराष्ट्रीय महिला दिन ' म्हणून साजरा होऊ लागला.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्त्रीमुक्तीच्या चळवळींबरोबरच भारतीय पातळीवरील काही महत्त्वपूर्ण अशा घटनांचा मागोवा घ्यावा लागेल. भारतीय पातळीवर स्त्रीला मुक्त करण्याचा पहिला प्रयत्न महात्मा फुले यांनी केला असे म्हणावे लागेल. याही आगोदर सन १८२९ मध्ये राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथा बंद व्हावी यासाठी प्रयत्न करून त्याबद्दल कायदा करून घेतला. पण खऱ्या अर्थाने म. फुले यांनी स्त्रीला गुलाम करणाऱ्या व्यवस्थेवर आसूड ओढले . धर्मग्रंथ, पुराणकथा मधील खुळचट कल्पना, देवभोळेपणा यावर प्रहार केला. स्त्री - पुरूष समतेचा विचार मांडून , स्त्रीमुक्तीच्या चळवळीची सुरूवात केली. मुलींची शाळ सुरू करून त्यांना ज्ञानदान केले. बालहत्या प्रतिबंधगृहाची स्थापना केली, विधवा विवाहाचा पुरस्कार केला. त्यांनी सावित्रीबाई फुलेंना शिक्षण देऊन त्यांना शिक्षिका बनवले . पुढे सन १८८२ पंडिता रमाबाईनी " आर्य महिला समाज की स्थापना करून स्त्री - मुक्तीच्या कामाला संघटनात्मक रूप दिले . ' शारदासदन ' आणि मुक्तीसदन ' (१८९६) ची स्थापना करून महिलांना सुतारकाम, लोहारकाम, छपाई , शिवणकाम , भरतकाम व परिचारिकेचे काम शिकवून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविले. पुढे सन १८९१ मध्ये ' संमतिवयाचा कायदा ' झाला भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या दृष्टीने ताराबाई शिंदे यांनी सन १८८२ मध्ये लिहिलेला ' स्त्री - पुरूष ' तुलना हा ग्रंथ मैलाचा दगड ठरला आहे. यामध्ये त्यांनो धर्म संस्कृती पुरूषी दुटप्पीपणा या अनुशंगाने परखड मत मांडले आहे . पुढील काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्यामध्ये सुधारणा केली. १९४८ मध्ये त्यांनी ' हिंदू कोड बील ' घटना समितीपुढे सादर केले यात मालमत्तेच्या वारसा हक्कामध्ये स्त्रियांचाही वाटा असावा असे मत मांडले . यामध्ये घटस्फोट , एक पत्नीत्व , पोटगी , मालमत्तेत स्त्रीचा समान हक्क यांचा अंतर्भाव करण्यात आला . पुढे १९७३ साली एस . एम . डी . टी . महिला विद्यापीठ मुंबई येथे राष्ट्रीय पातळीवरील पहिले स्त्री अभ्यासकेंद्र सुरू करण्यात आले . केंद्र व राज्य सरकारच्या अधिपत्याखाली महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय व भारतीय पातळीवरील वरील सर्व घटना , चळवळींचा परिणाम म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीमुक्तीच्या चळवळींनी जोर धरलेला दिसतो. या राजकीय आणि सामाजिक घटनांचा चळवळींचा परिणाम साहित्यावर पडू लागला .

स्त्रीमुक्तीच्या चळवळीचा एक भाग म्हणून स्त्रियांनी स्त्री - जाणिवेचे साहित्य लिहावे अशी भूमिकाही पुढे आली . या पार्श्वभूमीवर स्त्री ' जाणिवेचे साहित्य म्हणजे स्त्रीवादी स्वरूपाचे साहित्य १ ९ ६० नंतरच्या काळात आकारास येवू लागले.

स्त्रीवादाच्या जाणिवेमागे विशिष्ट असा प्रवक्ता आपल्याला दाखविता येत नाही . पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी अनेक स्त्रियांनी उभी केलेली ही विचारसरणी म्हणून ' स्त्रीवाद या संकल्पनेचा विचार करावा लागतो. स्त्रीवाद ही भारतीय भूमीतील विचारसरणी नसून ती पाश्चात्य जगतातील घडामोडीपासून उदयास आलेली आहे. जागतिक पातळीप्रमाणे भारतात ही स्त्रीमुक्तीची चळवळ कमीअधिक सुरु होती. पण स्त्रीवा ' म्हणून अस्तित्वात आलेली विचारसरणी २० व्या शतकात पाश्चात्य राष्ट्रातूनच जगभरात प्रचलित झाली आहे. इंग्रजीतील या " Feminism ' शब्दासाठी मराठीत 'स्त्रीवाद' हा शब्द रूढ झाला आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्री हो कोमल, नाजूक, दुर्बल, नम्र, लज्जा बाळगणारी, चूल - मूल सांभाळणारी अशो प्रतिमा म्हणून समाजात रूड झाली. त्यामुळे तिला पुरुषांच्या तुलनेत दुय्यम स्थान मिळत गेले . परिणामी तिच्या कृती, उक्ती व अभिव्यक्तीला मर्यादा आल्या . धर्म - संस्कृती व समाजव्यवस्थेत तिला दुय्यम स्थान मिळाले . तुलनेने पुरुष कर्तृत्ववान , बलवान ठरवला गेला . परिणामी पिढ्यान्पिढ्या अशा पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांचे शोषण होत राहिले . या शोषणाविरूद्ध उठविलेला आवाज आणि माणूस म्हणून जगण्यासाठी स्त्रीला मुक्त करणारी व उभी राहिलेली विचारसरणी म्हणजे स्त्रीवादी विचारसरणी असे म्हणता येईल . यासंदर्भात डॉ. मंगला वरखेडे असे म्हणतात की, "पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेने स्त्रीला कधी देवता बनवून तिचे मनुष्यत्व नाकारले तर कधी तिला शोभेची बाहुली म्हणून किंवा मदनाची पुतळी म्हणून तर कधी एक भोगवस्तू म्हणून पाहिले. कधी तिला दासी , कुलटा, व्यभिचारिणी म्हणून होन लेखले किंवा एक डोळे नसलेली विचारहीन गृहिणी एवढेच तिला मर्यादित स्थान दिले . स्त्रीची ही गतानुगतिक अशी सनातन प्रतिमा पुसून टाकणे हे स्त्रीवादी चळवळीपुढचे एक मोठे आव्हान राहिले आहे . पुरुषाला समाजरचनेत जसे एक अर्थपूर्ण स्थान आहे तसे स्त्रीलाही प्राप्त व्हावे यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रात संघर्षशील राहणारी ' स्त्रीवाद ' ही एक lack of qualities ' ह्या ॲरिस्टॉटल पासून चालत आलेल्या अभावमूलक विचारप्रणाली आहे." स्त्री ही अपूर्ण मानव असल्याची समजूत नष्ट करणे आणि स्त्रीविषयक नवीन मानदंड निर्माण करण्यासाठी व्यूह रचणे ही स्त्रीवादी चळवळीची थोडक्यात भूमिका सांगता येईल. समाजकारण, अर्थकारण , राजकारण , कला व वाङ्मय व्यवहार यासर्व क्षेत्रात स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुय्यमस्थान नाकारून माणूसपणाचा क्षमताधिष्ठित हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली राजकीय चळवळ हे ' स्त्रीवादा'चे सर्वसाधारण स्वरूप आहे.

स्त्रीवादी विचारसरणी ही एक जाणीव आहे. या जाणिवेचा विकास होणे गरजेचे आहे. स्त्रियांच्या शोषणाला दुय्यमपणाला कारणीभूत असणारी सर्वात मोठा घटक म्हणजे' पितृसत्ताक कुटुंब संस्था ' होय . या व्यवस्थेच्या विरुद्ध उठविलेला आवाज म्हणून या स्त्रीवादाकडे पाहता येईल. एकूण या वैचारिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ' स्त्री ' म्हणून आपल्यावर लादलेल्या भूमिकांना नकार देण्याची ताकत स्त्रीमध्ये येऊ लागली . विवाह संबंधाना आलेले अवास्तव महत्त्व आणि त्यातून स्त्रीमध्ये रूजलेली शरणागतीची भावना, तसेच तिच्या आईपणाला मिळणारे नैतिक महत्त्व अथवा मूल्य, 'सेक्स सिंबल' म्हणून स्त्रीकडे पाहण्याची पारंपरिक वृत्ती या सर्वांना स्त्रियांनी आव्हान दिले. पुरूषांप्रमाणेच माणूस

म्हणून जगण्याची आपली आंतरिक ओढ स्त्रियांनी आपल्या भाषिक कृतीतून व्यक्त करायला सुरूवात केली . या माणूसपणाची जाणीव होणे व ते मिळविण्यासाठी लढा देणे ही स्त्रीवादी विचारांची पार्श्वभूमी आहे. स्त्रियांना दुय्यमत्व देणारी पुरुषप्रधान संस्कृती नष्ट करणे हे स्त्रीवादाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पुरुषांइतकीच स्त्रीलाही स्वतःची ओळख आहे. स्व-विकास, स्वतंत्रता यांची जरूरी आहे. स्वत्वाची ओळख, स्वायत्तता, स्वयंनिर्णय, सक्रिय सहभाग या गोष्टी स्त्रीला व्यक्ती म्हणून परिपक्व बनवितात. त्या मिळवून देण्याचा प्रयत्न स्त्रीवादी चळवळीने केला. स्त्रियांना मिळणारे गौणत्व, त्यांचे केले जाणारे दमन आणि शोषण यांचे स्पष्टीकरण, त्यामागील कारणांचे विश्लेषण स्त्रीवाद करतो. त्याचप्रमाणे हे सामाजिक वास्तव बदलण्यासाठी काय करावे, याचे विवेचनही करतो. काळानुसार स्त्रीवादी चळवळीत जहाल, मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, कृष्णवर्णीय वगैरे अनेक छटा असलेल्या विचारसरणींच्या बहुविध संघटना सामील झाल्या आहेत. अलीकडे आधुनिकोत्तर ( पोस्ट मॉडर्न ) स्त्रीवाद, कृष्णवर्णी स्त्रीवाद ( ब्लॅक फेमिनिझम ), बहुसांस्कृतिक आणि वैश्विक स्त्रीवाद असेही विविध प्रकार पुढे आले आहेत. यांपैकी कृष्णवर्णी स्त्रीवादाने स्त्रीवादाच्या मुख्य धारेच्या मर्यादा स्पष्ट करताना वर्णवर्चस्ववादाशी निगडित असे प्रश्न स्त्रीवादाच्या संदर्भात अधोरेखित केले आहेत. स्त्रीवादाच्या कक्षा श्वेतवर्णीय, मध्यमवर्गीय आणि भिन्नलिंगी संबंध असणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांपलीकडे विस्तारण्याची आवश्यकता त्यातून प्रकर्षाने पुढे आली. स्त्रीवादाचा निरनिराळ्या सिद्धांतांमधून आणि त्यांच्या परस्परसंबंधांमधून जो विकास घडला, त्यामध्ये स्त्रीच्या गौणत्वाला कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक,राजकीय, मानसशास्त्रीय घटकांचा सखोल विचार करण्यात आला. स्त्री प्रश्नांचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पातळ्यांवर वर्ण, वर्ग, जात इत्यादींशी जे गुंतागुंतीचे संबंध असतात, त्यांच्यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. स्त्रीमुक्तीचा लढा हा सर्व शोषित, वंचित मानवसमूहांच्या मुक्तीच्या लढ्यांपासून वेगळा काढता येत नाही, याचे एक सुजाण भान या सर्व चर्चेमधून निर्माण झाले आहे. अंतिमतः स्त्रीवादाचा साकल्याने विचार केल्यास, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समता व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्रीउद्धारासाठी अपरिहार्य ठरतात.

### १ब.८.१ स्त्रीवाद : काही ठळक बाबी

१) स्त्रीवादाचे असे आग्रहपूर्वक सांगणे आहे की, सर्व स्त्रिया या बाई असल्या तरी बायकी असतातच असे नाही, किंबहुना सिमॉन द बोव्हा म्हणते त्याप्रमाणे कोणतीही स्त्री बाई म्हणून जन्माला येत नाही तर ती बाई बनविली जाते .

२) पितृप्रधान अध्यात्मवादाचे विघटन करणे ही स्त्रीवादीची आणखी एक बाजू आहे .

३) समान संधी, समान हक्क आणि दर्जा, तसेच स्वातंत्र्य हा स्त्रीवादी विचारसरणीचा गाभा आहे.

४) स्त्रीवाद हा स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव करून देतो. आपल्या न्याय हक्काचा अधिकार प्राप्त करून देतो.

५) स्त्री ही माणूस आहे म्हणून व्यक्ती या स्वरूपात तिचा विचार व्हावा, अशी मागणी स्त्रीवादी चळवळीतून पुढे आली.

६) पुरुषप्रधान व्यवस्थेत लिंग भेदभाव मुद्दाम घडविला गेला. पितृसत्ताक पद्धतीची विचारसरणी ही श्रेणीबद्ध, द्वंद्ववादी आणि वर्चस्ववादी आहे. म्हणून पितृसत्ताक पद्धती उलथवून टाकण्याचा विचार स्त्रीवाद मांडतो.

७) स्त्रीवाद ही कृतीशीलतेची अपेक्षा असणारी विचारसरणी आहे.

८) व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या ध्यासातून उदयाला आलेल्या या विचारसरणीला मानवतेचे, समानतेचे अधिष्ठान आहे.

९) स्त्रीवादाने ज्ञान परंपरा, साहित्य परंपरा, शिक्षण, भाषा, धर्म, कला, कायदा, अध्यात्म, नितीमत्ता या घटकांचे स्त्रीवादाच्या दृष्टीकोनातून पुनर्वाचन केले.

१०) स्त्रीवादाने पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुषी राजकारण उघड केले.

## १ब.९. आंबेडकरवाद : स्वरूप आणि विशेष

२० व्या शतकाने जगाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव दिले. ज्यांच्या कृती-उक्तीचा सुगंध वर्तमान व्यवस्थांच्या धुरीनापर्यंत तर गेलाच पण भविष्यकाळातही तो दरवळत राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं आयुष्य, त्यांची कृती उक्ती या सर्वांचा विचार आंबेडकरवाद सूत्र रुपात धारण करतो. आंबेडकरी विचाराने विसावे शतक ढवळून निघाले. आंबेडकरी विचारांची प्रेरणा घेऊन इथे मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती सुरू झाली. हे साहित्य समाजव्यवस्थेची चिरफाड करते. शस्त्रक्रिया करते. वांझोट्या कल्पनांना कवटाळणाऱ्या वांङ्मयीन परंपरांना जबरदस्त धक्का देते. मुक्या प्राण्यांच्या दुःखाचे पोवाडे गाणाऱ्यांना, वांङ्मय निर्मितीबाबत कर्मकांड मानणाऱ्यांना जबरदस्त धक्का देत वांङ्मयाची नवीन रूपात मांडणी करते. हे आंबेडकरवादाचे बलस्थान आहे. त्यामुळेच साठोत्तरी मराठी साहित्यावर आंबेडकरवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर पडला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्षानुवर्ष जर्जर झालेल्या समाजव्यवस्थेचे निदान केले. अंधारात खितपत पडलेल्याना प्रकाशवाट दाखवली. त्यांच्यात आत्मविश्वास जागा केला. विभूतीपूजेचा धोका सांगितला. सतत जागरूक राहण्याचा संदेश दिला. यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्षाचा पवित्रा घेतला. अन्यायाची व विषम समाजव्यवस्थेचे तपासणी करून त्यांनी १९१९ मध्ये बंडाचे निशाण फडकवले. आंबेडकर वादाचे स्वरूप सांगताना डॉ. आंबेडकर यांनी राजकरण, अर्थ, समज, विधी, संविधान, धर्म, तत्वज्ञान, यासंबंधी जे विपुल लेखन केले आणि जे प्रचंड लढे उभारले त्यांचा विचार करावा लागेल. 'एक महार' या टोपण नावाने त्यांनी १६ जाने. १९१९ ला 'A Mahar on home Rule' हे पत्र लिहिले. तेथून त्यांच्या सार्वजनिक जीवनाला सुरवात झाली. १९२० मध्ये मूकनायक सुरु केले, माणगाव (कोल्हापूर) येथे अस्पृशांची परिषद घेतली. १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. १९२७ ला महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. पुढे बहिष्कृत भारत, जनता, समता ही पत्रे सुरु केली. १९३६ मध्ये ' स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. १९४६ ला सिद्धार्थ कोलेज सुरु केले. १९५० मध्ये ' भारतीय संविधान' लिहिले. १९५१ मध्ये 'हिंदू कोड बिल' आणले. तर १९५६ ला हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्माचा स्वीकार केला. थोडक्यात १९५६ पर्यंत एखाद्या निष्णात योध्याप्रमाणे झुंजारवृत्तीने ते लढत राहिले. त्याचे फलित म्हणजे येथील उपेक्षित समाज प्रकाशमय होण्यास सिद्ध झाला.

शिक्षणरुपी विजेरीच्या साह्याने कृत्रिम अंधाराची छाननी करायला लागला. यात बरीच थोतांड त्यांच्या हाती लागली. या थोतांडांच्याविरुद्ध तो विद्रोह करायला सिद्ध झाला. अशा या आंबेडकरवादाचा अभ्यास आपणास करता येतो.

आंबेडकरवाद म्हणजे आंबेडकर प्रणित तत्त्वज्ञान होय. " आंबेडकर वाद हे मानवी प्रतिष्ठेचे गौरवशाली राज्य, समाजवादी समाज आणि बधुत्वाची निर्मिती करण्याची प्रतिज्ञा उरत वागवणारे क्रांतिविज्ञान आहे" असे डॉ मनोहर यांनी म्हटले आहे. आंबेडकरवादाचे तत्वज्ञान मानवी महत्तेचे गोडवे गाते. देव, देश यापेक्षाही माणूसपणाला महान म्हणते. आंबेडकरवाद एका सर्वस्पर्शी तत्वज्ञानाचे नाव आहे. विज्ञाननिष्ठा व बुद्धिप्रामाण्याचे दुसरे नाव आंबेडकरवाद होय. आंबेडकरवाद सतत परिवर्तनाशी बांधला गेलेला आहे. इहवाद आणि समाजवाद त्याचे ध्येय आहे, असे डॉ. यशवंत मनोहर यांनी म्हटले आहे. स्थितिशीलतेपेक्षा गतिशीलतेला प्राधान्य देणारा हा विचार आहे. गतानुगतिक थांबलेपणाला क्रियाशील करण्याची ऊर्जा आंबेडकरवादात आहे. परिवर्तन आंबेडकरवादाचा पाया आहे. बदल हा निसर्गाचा नियम आहे. चांगलं घडवण्यासाठी व वाईट घालवण्यासाठी ही विचारसरणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आंदोलने, संघर्ष, भाषणे यातून आंबेडकरवाद आकारास येतो. सत्य, शिव, सुंदराची नव्या रूपात मांडणी करू पाहतो. डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, "आंबेडकरवाद ही ईश्वरातीत आणि धर्मातीत जीवन प्रणाली आहे. बुद्धीप्रामाण्यवाद हा या तत्वज्ञानाचा पाया आहे. अपरिवर्तनाला, स्थितीवाद व स्थितीवादाचे जनक व पालक असलेल्या धर्मांना आणि ईश्वरांना नकार आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय हे इहवादाधिष्टीत समाजवादाचे एक पर्यायी प्रारुप आंबेडकरवाद देते." अशाप्रकारे डॉ. मनोहर यांनी आबेडकर वादाचे यथार्थ वर्णन केले आहे.

मानवाला कमीपणा आणणारे तत्व नाकारणे, रूढी परंपरा झुगारून देणे, त्याविरुद्ध संघर्ष करणे हा विचार आंबेडकरांच्या कृती उक्तीतून प्रकटला आहे. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समानता यावर उभा असलेला समाज आंबेडकरवादाला अपेक्षित आहे. बदल हा निसर्गनियमाचा भाग असल्याने स्थितिशील असलेले जग बदलून ते अधिक चांगले करण्यासाठी आंबेडकरवाद सत्व पुरवते. याबाबत स्वत: डॉ. आंबेडकर 'रायटिंग्ज अँड स्पीचेस, खंड १' मध्ये म्हणतात, " Everything is changing, that change is the law of life for individuals as well as for society" हा बदल घडवून आणण्यासाठीच धर्मांतर केल्याचेही त्यांनी ' बुद्धा अँड हिज धम्मा' मध्ये सांगितलेले आहे. जुन्या विषमतावादी व्यवस्थेला बदलण्यासाठी, न्यायपूर्ण समानतेसाठी आंबेडकरांना या बदलाची गरज वाटली. त्यासाठी त्यांनी धर्मांतर केले. चांगल्या जगण्याचा मार्ग त्यांनी दाखविला. मानवी प्रतिष्ठेला त्यात महत्त्व होते. थोडक्यात डॉ. यशवंत मनोहर यांनी म्हटल्याप्रमाणे मानवी प्रतिष्ठेचे सर्वार्थाने संवर्धन करणाऱ्या आदर्श समाज संस्थेची प्रारूप आंबेडकरवादाचे ध्येय आहे. त्यासाठी सत्यम, शिवम, सुंदरम् या संकल्पनांची नव्याने छाननी आंबेडकरवाद करतो. ही मांडणी डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केली आहे. ते म्हणतात, माणूस हा सर्वप्रथम माणूस आहे हे सत्य आहे. माणसाचे स्वातंत्र्य हे शिव आहे आणि माणसातील माणुसकी हे सौंदर्य आहे. तर ताराचंद्र खांडेकर म्हणतात, "एक व्यक्ती एक मूल्य हे त्त्व मान्य करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता म्हणजेच सामाजिक नितीमत्ता स्वीकारून व्यक्तीचे सर्वांगीण कल्याण साधण्याचा सांसदीय लोकशाही युक्त जीवनमार्ग म्हणजे आंबेडकरवाद होय." तर "आंबेडकरवाद म्हणजे

समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीसाठी या जगाची जि पुनर्रचना करावी लागेल, त्यासाठी धम्माच्या साहायाने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यावर उभ्या असणाऱ्या लोकशाहीची निर्मिती करण्याची प्रेरणा देणारे समाजविज्ञान आहे" असे डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात. अशा या आंबेडकरी विचारांची प्रेरणा घेऊन साठोत्तरी साहित्यात दलित साहित्य निर्माण झाले आहे. या साहित्याने वांङमय विश्वाचे लक्ष वेधून घेतले. या दलित साहित्याच्या संज्ञा आणि स्वरूपावरून आंबेडकरवादाची ठळक वैशिष्ट्ये मांडता येतात.

### १ब.९.१ आंबेडकरवादाची ठळक वैशिष्ट्ये

### १) 'माणूस' हा आंबेडकरवादाचा केंद्रबिंदू

दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानते. त्याचे हर्ष, विमर्श, मान, सन्मान याचा विचार या साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. म. ना. वानखेडे म्हणतात त्याप्रमाणे 'दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानते, माणसाच्या सुखदुःखाशी समरस होते, माणसाला महान मानते. माणसाला सम्यक क्रांतीकडे घेऊन जाते. बाबुराव बागुल तर आपल्या साहित्यातून माणसाच्या महानतेचे पोवाडे गातात. वेदाआधी असलेल्या माणसाने ही पृथ्वी सुंदर केल्याचे सांगतात. त्यांनी केलेल्या दलित साहित्याच्या व्याख्येतून माणसाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. जे की आंबेडकरवादाचे महत्त्वाचे तत्व आहे. बागुलांच्या मते दलित साहित्य माणसाला केंद्र मानते. माणसाच्या स्वातंत्र्याचा प्राणपणाने उच्चार करते. माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करते. माणसाला महान मानणारे वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करते. तर प्र. श्री. नेरुरकर म्हणतात, "या इहलोकात माणसापेक्षा आणखीन कोणती काल्पनिक वस्तू महान नाही. जी संस्कृती, जो समाज, जे साहित्य माणसाला लहान करते. त्याला गुलामीत जगायला भाग पडते. त्या विरुद्ध दलित साहित्याचा उठाव आहे." यावरून माणसाचे मोठेपण सांगणारे आंबेडकरवादाचे तत्वज्ञान समानतेचा पुरस्कार करते. माणसाला कमी लेखणाऱ्या आणि माणसामाणसात भेद करणाऱ्या प्रतिगामी विचाराची होळी करते, असे म्हणता येईल.

### २) स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

आंबेडकरवादाने महत्त्वाची मानली आहे. स्वातंत्र्य व समता यांचे संरक्षण बंधू भावामुळे होते अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धारणा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "माझ्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य आणि समता यांना जागा आहे. परंतु अपरिमित स्वातंत्र्याने समतेचा नाश होतो आणि निर्भेळ समानता स्वातंत्र्याला वाव ठेवत नाही. माझ्या तत्वज्ञानात बंधुतेला फार उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य आणि समता यांचे रक्षण बंधुभाव यामुळेच होईल. बंधुता म्हणजे मानवता आणि मानवता हेच धर्माचे दुसरे नाव आहे." यावरून मानवता हे मूल्य आंबेडकरवादात किती महत्वपूर्ण आहे याची प्रचिती येते. हिंदू धर्मातील मानवता जागी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत प्रयत्न केले पण त्यांना अपेक्षित यश आले नाही. म्हणूनच त्यांनी 'हिंदू म्हणून मरणार नाही' प्रतिज्ञा खरी करून दाखवली. त्यासाठी भारतीय राज्यघटनेत या मूलत्रयींचा समावेश केला. राज्यसभेतील एका भाषणात त्यांनी घटनेने स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये शिरोधार्य मानले आहेत. नव्हे या त्रयीवरच घटना अधिष्ठित आहे, असे सांगितले होते. विभूतिपूजेपेक्षा मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी आंबेडकरवाद हाक देतो व त्यासाठी सतत

जागरूक राहण्याचा संदेश देतो. विभूतीपूजेमुळे मानसिक गुलामगिरीचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने डॉ. आंबेडकरांनी विभूतीपुजेला ठाम नकार दिलेला आहे.

## ३) जातीअंताचा विचार

भारतीय समाजरचनेत शूद्र, अस्पृश, आदिवासी, भटके-विमुक्त यांना सर्व प्रकारचे मानवी हक्क नाकारले गेले होते. सनातनी व्यवस्थेने त्यांना दास्य, गुलाम केले होते. जाती अंताच्या या लढाईत डॉ. बाबासाहेब आंबेडकर निरंतर संघर्षरत राहिले. जात व्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेसच्या खाईत हजारो वर्ष लोटलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी हा जातीअंताचा लढा होता. हा लढा मूलभूत हक्कांचा होता पर्यायाने मानवतेचा हा लढा होता. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी म्हटल्याप्रमाणे आंबेडकरवाद म्हणजे जातिअंताचा आधुनिक विचार आहे. यातूनच दलितांचे कांत विज्ञान साकारले. जातीव्यवस्था व वर्णव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृतीचे दहन आंबेडकरांनी केले. आंबेडकरवादाचा विशेष म्हणजे प्रत्येक विचार कृतीतून तावून-सुलाखून आला आहे. जातीव्यवस्था ही विषमतेची उतरंड असल्याने पिढ्यानपिढ्या काही जाती उच्च तर काही जाती नीच मानल्या गेल्या. नीच मानल्या गेलेल्या जातीतील माणसांच्या आयुष्यात हजारो वर्षाची काळी रात्र आली. या हजारो वर्षाच्या काळोख्या रात्रीचा सूर्योदय आंबेडकरांच्या रुपाने झाला. या प्रज्ञा सूर्याचीकिरणे म्हणजे आंबेडकरवादाचे एक एक तत्त्व होय.

## ४) मानवता

आंबेडकरवादाचे दुसरे नाव मानवतावाद आहे. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या मतानुसार आंबेडकरी विचार हा माणसाच्या अवमूल्यनाविरुद्ध संघर्ष करणारा कृतिशील विचार आहे. हाच मानवतावाद परिवर्तनाचा पुरस्कार करणारा आहे. समानतेसाठी व न्यायपूर्ण हक्क या मानवतावादात अपेक्षित आहेत. तळागळातील माणसाचे आयुष्य त्याची प्रतिष्ठा उंचावण्याचे कार्य हा मानवतावाद करतो. हा मानवतावाद काही लोकांसाठी नसून सर्वांसाठी आहे. संत साहित्यातही मानवतावाद दिसतो. पण त्यामुळे दलितांच्या पीडितांच्या स्थितीत फार बदल झाला नाही. मानवाच्या उन्नतीसाठी व नीतिमत्तेस पोषक असा मानवतावाद आंबेडकरवादात अपेक्षित आहे. अशा मानवतावादी आदर्श समाजात जाणीवपूर्वक एकमेकाशी संबंध ठेवून सुखदुःखाची वाटणी केली पाहिजे सामाजिक अभिसरण असले पाहिजे हे डॉ आंबेडकरांना अपेक्षित आहे.

## ५) वेदना, विद्रोह, नकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे छाननी करून अस्पृश्यांच्या दुःखाला कारणीभूत असणाऱ्या वर्णव्यवस्थेचे, जाती व्यवस्थेचे परखडपणे विश्लेषण केले. शूद्रातिशूद्रांच्या प्रचंड अशा यातनांना त्यांनी शब्दरूप दिले. जे पाणी पशूंना पिण्यासाठी उपलब्ध आहे, पण माणसांना नाही. हे दुःख त्यांना जाचत होते. त्यासाठी त्यांनी महाड येथील चवदार तळे सत्याग्रह करून क्रांतिकारक कार्य केले. यातच आंबेडकरी विचारातील वेदना, विद्रोह, नकार हे घटक दिसून येतात. त्या घटकांबाबत शरणकुमार लिंबाळे म्हणतात, “दलित वेदनेचे स्वरूप हे सामाजिक आहे... आंबेडकरी विचारातील नकार हा विधायक दृष्टी असलेला प्रतिकार आहे... मी माणूस आहे. मला माणसाचे सर्व हक्क मिळाले

पाहिजेत या जाणिवेतून ह्या विद्रोहाचा जन्म झालेला आहे.” सवर्णीयांचे श्रेष्ठत्व, समाजजीवनातील आचार-विचार विसंगती, स्त्री शूद्रांच्या प्रतिष्ठेचे अवमूल्यन, पवित्र व अपवित्रतेच्या भ्रामक कल्पना आदींना आंबेडकरवाद नकार देते. त्याऐवजी स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूल्यांचे प्रारूप देते.

## ६) आत्मसन्मान, आत्मशोध

आत्मसन्मानासाठी हक्काची भाषा आवश्यक असते. आपले हक्क प्राप्त करण्यासाठी किंबहुना मूलभूत हक्कांच्या प्राप्तीसाठी आंबेडकरी लढा होता. भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे “आम्हाला तुमचे उपकार नकोत, आम्हाला आमचे जन्मजात हक्क हवेत. अशी खंबीर भूमिका डॉ. आंबेडकर यांनी घेतली होती” या आत्मसन्मानासाठी ते विभूतिपूजा नाकारतात. “आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाधारे स्वतःला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य” या दत्ता भगत याच्या व्याख्येतून आत्मसन्मान व आत्मशोध आंबेडकरवादात किती महत्वपूर्ण आहे याची प्रचिती येते. दत्ता भगत म्हणतात त्याप्रमाणे आत्मसन्मानाच्या जाणिवेतून आत्मशोध घेतला जातो. आत्मसन्मानाच्या आड येणाऱ्या परंपरेला, धर्माला नकार दिला जातो. या आत्मसन्मानासाठी स्वाबलंबन महत्त्वाचे असल्याचे डॉ. आंबेडकर आवर्जून सांगतात. ज्याचे कल्याण तोच करील दुसरा कोणी करणार नाही. खरा शहाणपणा कोणावरही विश्वास न ठेवता स्वतःवर विश्वास ठेवणे यातच आहे. म्हणून स्वावलंबन हेच अस्पृश्यांचे ध्येय असले पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘बहिष्कृत भारत’मध्ये म्हटलेले होते. गौतम बुद्ध आपल्या अनुयायांना म्हणाले होते, ‘तुमचे दिवे तुम्हीच व्हा’ आपल्या आत्मसन्मानासाठी सतत जागरूक राहा, त्यासाठी आत्मशोध घ्या.

## ७) बुद्धिप्रामाण्य

आंबेडकरवादाने ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, परलोक आदी गोष्टीना नाकारून बुधीप्रामाण्यवाद स्वीकारला. आंबेडकरवादाला आत्मा मान्य नाही. आंबेडकरवाद बुद्धिप्रामाण्यवादावर आधारलेला आहे. ग्रंथप्रामाण्य, व्यक्तीप्रमाण, शब्दप्रामाण्य याला नकार देत विवेकवादाचा पुरस्कार आंबेडकरी विचारात आहे. बुद्धीप्रामाण्यवाद हा या तत्वज्ञानाचा पाया आहे. प्रत्येक गोष्टीची कठोर चिकित्सा आंबेडकरवादात अध्याहृत आहे. या बुद्धिप्रामाण्यवादातूनच आंबेडकरी विचार तावून सुलाखून निघाले आहेत. ग्रंथप्रामाण्य, व्यक्तीप्रमाण, शब्दप्रमाण्याने येथील शूद्रातिशूद्रांना गुलामगिरीच्या खाईत लोटले. त्यामुळे हजारो पिढ्यांना पशुवत लेखण्यात आले. माणसाचा एवढा घोर अपमान केल्याचे उदाहरण जगात इतरत्र नसेल. म्हणून आंबेडकरवाद बुद्धिप्रामाण्यची जिवापाड जोपासना करते. व्यक्तीप्रामाण्यचा धोका ओळखून अमेरिकेचे पहिले अध्यक्ष वॉशिंग्टन म्हणाले होते. ‘लोकहो आपण घटना निर्माण केली ती कशाकरता? या देशात वंशपरंपरा राजसत्ता राहू नये तसेच वंशपरंपरा एकाच व्यक्तीच्या कुटुंबात सत्ता राहू नये’ हा धोका वॉशिंग्टनने सांगितला होता. थोडक्यात बुद्धिप्रामाण्यवादी – इहवादी आदर्श समाज निर्माण करणे हेच आंबेडकरवादचे ध्येय आहे.

### ८) मूल्यविषयक जाणीव

या सर्व आंबेडकरी तत्वाची रुजवणूक होण्यासाठी मूल्यविषयक जाणीव जोपासणे गरजेचे असल्याचे दिसते. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूल्यांची जोपासना जिवापड करणे महत्त्वाचे आहे. लोकशाही सदन करण्यासाठी मूल्य संवर्धन महत्त्वाचे असल्याचे डॉ. आंबेडकर निवेदित करतात. संसदीय लोकशाही या विषयावर पुणे बार असोसिएशनने आयोजित केलेल्या भाषणात डॉ आंबेडकर सांगतात की 'घटना मिळाली, स्वातंत्र्य मिळाले म्हणजे सर्व काही संपले नव्हे. लोकशाहीचा वृक्ष कोणत्या एक मातीत वाढत नाही त्यासाठी आवश्यक ती मूल्यविशेष जाणीव जोपासली पाहिजे.' मूल्यविषयक जाणिवा बाबतची सजगता आंबेडकरवादात आहे. स्वसामर्थ्याचे महत्त्व, चारित्र्य, व्यक्तीपूजेला विरोध, लोकशाही आदी घटकांचा समावेश आंबेडकरवादात होतो. आंबेडकर हे एक जितेजागते तत्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानामुळे हजारो मुके बोलायला लागले, हजारो वर्षाचा अंधार दूर झाला. आत्मसन्मानाच्या लढाईची प्रेरणा मिळाली. एक नवा दृष्टिकोन भारतीय समाजाला आंबेडकरवादामुळे मिळाला असे म्हणता येईल.

## १ब.१०. सरावासाठी स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न लिहा.**

१. मानवतावादाचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा.

२. मार्क्सवादाचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा.

३. स्त्रीवादाचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा.

४. आंबेडकरवादाचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा.

**टिपा लिहा**

१. हिपोलिट तेनप्रणित सिद्धांत

२. मार्क्सचा ' पाया व इमला' सिद्धांत

३. पाश्चात्य स्त्रीवादी चळवळ

**एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. ..... व्यवस्थेमुळे स्त्रियांचे शोषण होते.

अ) पुरुषप्रधान ब) हुकुमशाही क) राजेशाही

२. ''ए व्हिन्डिकेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन' हा स्त्रीवादाचे समर्थन करणारा ग्रंथ .... यांनी लिहिला.

अ) वेटी फ्रेदन ब) मेरी वूल स्टोन क्राफ्ट क) आंद्रिया डॉक

३. स्वभावधर्म, शरीररचना इत्यादीचा तेनप्रणित...... या संकल्पनेत समावेश होतो.

अ) वंश ब) परिस्थिती क) युगप्रवृत्ती

४. मार्क्सच्या विचारधारेनुसार समाजातील ....... हा कोणत्याही समाजरचनेचा पाया असतो.

अ) उत्पादनसंबंध ब) नातेसंबंध क) राजनैतिक संबंध

५. मानवतावादी आंदोलनाचा प्रारंभ यूरोपच्या ..... झाला.

अ) मध्य काळात ब) प्रबोधनकालात क) क्रांती काळात

६. 'द कम्यूनिस्ट मॅनिफेस्टोत'.....साली प्रसिद्ध झाला.

अ) १९४८ ब) १८४८ क) १९४७

७) ..... यांनी हिंदू कोड बिलासाठी आग्रही भूमिका घेतली.

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) राजाराम मोहन रॉय क) महात्मा गांधी

८) दलित वेदनेचे स्वरूप हे ....... आहे.

अ) आर्थिक ब) राजकीय ब) सामाजिक

## १ब.११. आधारभूत संदर्भ


१. अवलोकन : मराठी समीक्षा आणि साहित्य, दिगंबर पाध्ये, लोकवांगमयगृह, मुंबई, २०१२

२. स्त्रीवाद, सुमती लांडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

३. स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, वंदना महाजन, विजय प्रकाशन

४. मार्क्सवादी साहित्यविचार, के. र. शिरवाडकर

५. वाड्मयीन संज्ञा - संकल्पना कोश, प्रभा गणोरकर व इतर, भटकळ फाउंडेशन

६. साहित्य आणि समाज, डॉ. सदा क-हाडे, लोकवांगमयगृह, मुंबई, १९९९

७. साहित्यविचार आणि समाजचिंतन, प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध

८. समाज आणि संस्कृती, दिगंबर पाध्ये, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, लोकवांगमयगृह, मुंबई, १९९८

९. साहित्यसिद्धांत, अनु. डॉ. स.ग. मालसे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२

१०. मराठी साहित्यातील मानवतावाद, के. के. अहिरे, अथर्व प्रकाशन

११. साहित्यवेध, के . रं . शिरवाडकर

१२. नवे साहित्यशास्त्र, डॉ. यशवंत मनोहर

१३. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, शरणकुमार लिंबाळे

१४. फुले आंबेडकर शोध आणि बोध, भालचंद्र फडके

१५. दलित साहित्य दिशा आणि देशांतर, दत्ता भगत

१६. आंबेडकर वाडी मराठी साहित्य, डॉ. यशवंत मनोहर, भीम रत्न प्रकाशन, नागपूर

१७. कॉ. शरद पाटील यांचे वैचारिक योगदान आणि आंबेडकर वाद, डॉ. प्रदीप गोखले

१८. आंबेडकर वाद तत्व आणि व्यवहार, डॉ. रावसाहेब कसबे, सुगावा प्रकाशन, पुणे

१९. आंबेडकर तत्वज्ञान : प्रचीती आणि आविष्कार, ताराचंद्र खांडेकर, संकेत प्रकाशन, नागपूर

२०. मार्क्स काय म्हणाला, उदय नारकर, लोक वामय , मुंबई

२१. मार्क्सवाद परिचय माला , शिव वर्मा, जनशक्ती प्रकाशन

२२. मार्क्सवादाची तोंडओळख, गोविंद पानसरे, श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर

**माहिती जालावरील संदर्भ**

1. https://www.aksharnama.com

2. https://mr.m.wikipedia.org

3. https://en.m.wikipedia.org

4. https://www.unishivaji.ac.in

5. https://vishwakosh.marathi.gov.in

❖❖❖❖

# २अ

# महानगरीय जाणिवेचे साहित्य : स्वरूप आणि संकल्पना

**घटक रचना**

२अ.0  उद्दिष्ट्ये

२अ.१ प्रास्ताविक

२अ.२ महानगरीय साहित्याची पार्श्वभूमी

२अ.३ महानगरीय साहित्याची व्याप्ती

२अ.४ महानगरीय साहित्याची मराठीतील परंपरा

२अ.५   समारोप

२अ.६  सरावासाठी स्वाध्याय

२अ.७  संदर्भ ग्रंथ

## २अ .0  उद्दिष्ट्ये

महानगरातील जीवन आणि खेडे यांच्यातील फरक समजण्यास मदत होईल .

“ खेडे “ हे भारतीय संस्कृतीचा अविभाज्य अंग आहे याची शहरी विद्यार्थाना ओळख होईल

महानगरातील विविध समस्येचा वेध घेता येईल .

महानगरीय साहित्याचे वैशिष्टे समजण्यास मदत होईल .

## २अ.१ प्रास्ताविक :

महानगर आणि खेडे ही भारतीय संस्कृतीची अविभाज्य अंगे राहिलेली आहेत. प्राचीन ग्रंथांमध्ये, महापुराणांमध्येही त्यांच्या अस्तित्वाचे संदर्भ सापडतात. शहर आणि खेडे यांच्यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय अशा अनेक दृष्टीने फरक असतो. शहरांचे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ खेड्यांपेक्षा बरेच वेगळे असतात. त्याचबरोबर शहरातील राजकारण आणि खेड्यातील राजकारण यांचेही स्वरूप निरनिराळे असते. आर्थिकदृष्ट्या शहरे खेड्यांपेक्षा अधिक विकसित असतात. असे असले, तरी देशाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक विकासात दोन्हींचे योगदान महत्त्वपूर्ण असते. महानगर आणि खेडे यांच्यामधील अंतर कमी करण्याच्या दृष्टीने म. गांधीजींनी इ. स. 1920 नंतर ‘खेड्याकडे चला’ असा संदेश सर्वांना दिला. त्या प्रभावातून साहित्यविश्वाचीही वाटचाल खेड्याकडे सुरू झाली होती. परंतु स्वातंत्र्यानंतर आलेल्या जागतिकीकरण,

आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण यामुळे शहरांना वेगळे महत्त्व प्राप्त झाले. शहरामध्ये आधुनिकतेचे केंद्रिकरण सुरू झाले. शहरांमध्ये नवनवीन वस्तूंचे उत्पादन सुरू झाले. आधुनिक सुख-सुविधा शहरामध्ये सहजपणे उपलब्ध होऊ लागल्या. यातून खेड्यातील सुशिक्षित वर्ग शहरामध्ये स्थिर होऊ लागला. त्याचबरोबर शहरामध्ये रोजगाराचे केंद्रिकरण झाल्यामुळे, महानगर म्हणजे शिक्षणाचे, रोजगाराचे हमखास ठिकाण बनल्यामुळे ग्रामीण भागातील गरीब वर्ग आणि शहरातील भौतिक साधनांच्या उपलब्धतेमुळे श्रीमंत वर्ग शहरामध्ये स्थलांतरित होऊ लागला. शिक्षण घेण्याच्या इच्छेने, त्याचबरोबर रोजगार मिळवण्याच्या इच्छेने खेड्यापाड्यातील लोक शहरामध्ये स्थलांतरित झाले. त्यांचे सांस्कृतिक, धार्मिक रीतिरिवाज वेगवेगळे होते. आपला पारंपरिक व्यवसाय टाकून उपजिविकेसाठी हा खेड्यापाड्यातील समूदाय वेगवेगळ्या प्रदेशांतील, वेगवेगळ्या जातीधर्मातील आणि वेगवेगळ्या सांस्कृतिक वातावरणातील होता. यातून एक नवा लोकसमूह महानगरात स्थलांतरित झाला. अशा भिन्नभिन्न लोकांच्या भिन्न भिन्न जीवनशैलीच्या परस्पर संबंधांतून, त्यातून घडलेल्या संकरातून महानगरीय जीवनाचे स्वतःचे असे वेगळे अस्तित्व निर्माण झाले. यातून मूळ महानगरीय संस्कृतीमध्ये आमूलाग्र बदल झाले आणि महानगरीय संस्कृती संमिश्र, गुंतागुंतीची आणि व्यापक बनली. महानगरातील लोकसमूह अनेक रूपी आणि अनेकस्तरीय बनला. अशाप्रकारे औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक प्रगतीच्या झपाट्यात विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच महानगरांची निर्मिती झाली. ही प्रक्रिया जगभर घडलेली दिसते. भारत देशही याला अपवाद नव्हता. भारतामध्येही महानगरांच्या निर्मितीला सुरुवात झाली.

## २अ.२ महानगरीय साहित्याची पार्श्वभूमी :

इ. स. 1960 नंतर दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य या साहित्य चळवळी सुरू झाल्या. या चळवळींचे प्रमुख केंद्रे शहरेच राहिलेली दिसतात. या प्रवाहामधील साहित्यात नंतर महानगरीय चित्रण अधिक प्रमाणात आलेले दिसते. परंतु महानगरीय साहित्याचा उगम 1960 नंतर इतर प्रवाहांसोबतच झालेला दिसतो. नंतरच्या काळात महानगर ही संकल्पना साहित्याच्या केंद्रस्थानी आलेली दिसते. महानगर ही संज्ञा बहुकेंद्री, संमिश्र आणि व्यापक स्वरूपाची आहे. त्रिस्तरीय समाजरचना, मध्यमवर्गीय प्रभाव हे महानगराचे समाजशास्त्रीय वैशिष्ट्य ठरते. 1980 पर्यंत साहित्याच्या क्षेत्रात हे महानगर मुंबई या महानगरापुरते मर्यादित होते. नंतरच्या काळात पुणे, नाशिक, नागपूर अशा शहरांचेही चित्रण महानगरीय साहित्यामध्ये आलेले दिसते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य या साहित्यप्रवाहांमधूनही 1960 नंतरच्या काळात महानगराचे संदर्भ मोठ्या प्रमाणात आलेले दिसतात. यातूनच पुढे महानगरीय साहित्य ही संकल्पना विकसित झालेली दिसते. महानगरीय जीवनाचे चित्रण करणारे साहित्य ते महानगरीय साहित्य असे सामान्यपणे म्हणता येते. बेफिकीरपणा, चंगळवाद, आत्मनिष्ठा, पराभुतता, संवेदनशून्यता, कल्पनारम्यता, एकाकीपण, वैफल्यग्रस्तता, यांत्रिकता, हरवलेपण, विसंवाद, हिंसा, बंडखोरी अशी वैशिष्ट्ये महानगरीय साहित्यातून व्यक्त झालेली आहेत. यामध्ये आर्थिक हितसंबंध महत्त्वाचे असून त्यातून मानवी मूल्यांना गौणता प्राप्त झालेली दिसते.

महानगरीय जीवनाची विदारकता, तेथील मानवी जीवनाची क्षूद्रता, यंत्रयुगीन समाज आणि मध्यमवर्गीयांचे करंटे जीवन यांचे चित्रण बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेत पहिल्यांदा आलेले

दिसते. मर्ढेकरांच्या पहिल्या 'शिशिरागम' या कवितासंग्रहामधील कविता रविकिरण मंडळाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या दिसतात. त्यानंतरच्या त्यांच्या 'काही कविता' आणि 'आणखी काही कविता' या कवितासंग्रहांमधील कवितांवर शहरी जीवनाचा प्रभाव अधिक दिसून येतो. उद्योगप्रधान, अर्थकेंद्रित अशा शहरी संस्कृतीशी संबंध आल्यानंतर मूळच्या ग्रामीण जीवनाशी आणि पर्यावरणाशी नाळ जोडलेली असलेला लेखक जेव्हा लिहितो, तेव्हा आपले पारंपरिक संस्कार आणि आधुनिक जीवनपद्धती यांच्यातील मोठे अंतर त्याच्या निदर्शनास येते. या नव्या व्यवस्थेशी नीट जुळवून घेता न आल्यामुळे त्याच्या मनात स्वतःविषयी न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. अशा न्युनगंडामुळे आणि कुंचबनेमुळे या लेखकापुढे एक प्रकारचा स्वअस्तित्वाबद्दलचा संघर्ष उभा राहतो. त्याची जाणीव मर्ढेकरांच्या कवितांमध्ये येते. मर्ढेकरांनंतरच्या कालखंडातील महानगरीय साहित्य हे अशा स्वअस्तित्वाबद्दलचा संघर्षामधून पुढे आलेले दिसते. महानगरीय साहित्यात अशा प्रकारची अस्तित्व संघर्षाची भावना दिसून येते.

इ. स. 1947 साली भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर सर्व प्रश्न सुटतील अशी आशा प्रत्येक भारतीयाला होती. परंतु ही आशा निरर्थक असल्याची जाणीव 1960 च्या आसपासच्या काळात सर्वांना होऊ लागली. कारण याच काळात दलित वर्गाला स्वातंत्र्याचा कोणताही फायदा होत नसल्याचे जाणवले. जातिव्यवस्थेमुळे स्वातंत्र्य मिळूनही सर्व महत्त्वाचे अधिकार उच्चवर्णीय वर्गापुरतेच मर्यादित राहिले. सर्व वरिष्ठ पदांवर याच वर्गातील लोक असल्याने सामान्यांना पूर्वीच्याच स्तरात जीवन व्यतित करावे लागत होते. याची जाणीव स्वातंत्र्यानंतर उच्च शिक्षण घेतलेल्या वर्गाला होऊ लागली. यातून त्यांच्यातील असंतोष वाढत गेला. साहित्याच्या क्षेत्रावरही उच्चवर्णीयांचा कब्जा होता. या साहित्यामध्ये उपेक्षित वर्गाला, खेड्यापाड्यातील सर्वसामान्यांना कोणतेही स्थान नव्हते. त्यांच्या जगण्याचे वास्तव चित्रण राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्तरांवर प्रतिबिंबित होत नव्हते. महत्त्वाच्या पदांवर असलेल्या काही मोजक्या व्यक्तींचा वर्ग सोडला, तर बहुसंख्येने असलेल्या लोकांना असहाय्य, परात्म, निराशाजनक आणि वैफल्यग्रस्त आयुष्य जगावे लागत होते. समाज सर्व बाबतीत असंतुष्ट आणि असमाधानी बनला.

याचवेळी शहरीकरण अमर्याद वाढत गेले आणि खेडी बकाल होत गेली. शहरातील वाढती स्पर्धा, झोपडपट्ट्यांचे वाढते प्रमाण, व्यसनांचे वाढते प्रमाण, गरीब-श्रीमंत यांच्यातील वाढती दरी, प्रदूषणाची वाढती समस्या, गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, नैतिक मूल्यांची होत गेलेली घसरण, नातेसंबंधातील वाढत गेलेला तणाव, नोकरशाहीमुळे मानवी जीवनात आलेली यांत्रिकता या सर्वांमुळे सामान्य माणसाचे समाजातील व्यक्ती म्हणून असलेले मूल्य हरवले. याची जाणीव शहरातील सर्वसामान्य अशा बहुजन वर्गाला होऊ लागली. हे जीवन साहित्यामध्ये येत नव्हते. या अनुभवांनाही साहित्यामध्ये स्थान मिळावे, ही अपेक्षा यातूनच दलित आणि ग्रामीण वर्गातील सुशिक्षितांमध्ये निर्माण झाली. ग्रामीण जीवनावर शहरी जीवनाने केलेले आक्रमण ग्रामीण साहित्यातून व्यक्त झाले. ग्रामीण जीवनावर हे शहरी जीवनाचे, यांत्रिकतेचे झालेले आक्रमण लेखक व्यक्त करू लागले. 'विषवृक्षाच्या मुळा' ही वासुदेव मुलाटे यांची किंवा 'गोतावळा' ही आनंद यादव यांची कादंबरी याचे उत्तम उदाहरण ठरते. सर्वच बाबतीत असंतुष्ट आणि असमाधानी असणाऱ्या या पिढीला सर्वच क्षेत्रातील प्रस्थापितता खुपत होती. या असंतोषातून साहित्यक्षेत्रातील लघुनियतकालिकांची चळवळ इ. स. 1950-55 नंतर जोमाने पुढे आली. त्यातून महानगरातील विविध स्वरूपातील

अनुभव आणि आशय घेऊन महानगरीय साहित्य आकाराला आलेले दिसते. महानगरीय जीवन धकाधकीचे, धावपळीचे आहे. भाऊ पाध्ये यांचा उल्लेख महानगरीय साहित्याचे सम्राट म्हणून केला जातो. कारण त्यांनीच खऱ्या अर्थाने महानगरीय साहित्याच्या विकासात मोलाची भर घातली आहे.

## २अ.३ महानगरीय साहित्याची व्याप्ती :

महानगरीय साहित्य हे महानगरीय जीवनापुरते मर्यादित असले, तरी या साहित्यात अनेकदा ग्रामीण संदर्भही आलेले दिसतात. महानगरीय जीवनाचा ग्रामीण जीवनाशी तसा जवळचा संबंध आहे. मराठी साहित्यापुरता विचार करता मुंबई या शहराचे जीवन मराठी महानगरीय साहित्यामध्ये अधिक प्रमाणात चित्रित झालेले दिसते. मुंबईमध्ये स्थित झालेला मोठा वर्ग शहरातील आहे. विशेषत: मजूर, कामगार वर्ग हा खेड्यातून रोजगार मिळवण्यासाठी शहरामध्ये स्थिर झालेला आहे. एक वर्ग ग्रामीण भागातून येऊन शहरामध्ये स्थिर झालेला दिसतो. काही वर्गाच्या काही पिढ्या ग्रामीण भागातून शहरात येऊन स्थिरावलेल्या दिसतात. या वर्गाच्या जाणिवा महानगरीय साहित्यातून व्यक्त होताना खेड्याचे संदर्भ या साहित्यात आलेले दिसतात. ग्रामीण जीवन आणि शहरी जीवन यांची तुलना अनेकदा या साहित्यातून होताना दिसते. पर्यावरणाच्या समस्या, मानवी मूल्यांची होत असलेली घसरण, नातेसंबंधांमधील दिखाऊपणा या सर्वांच्या दृष्टीने ग्रामीण जीवन अधिक चांगले असल्याची जाणीव महानगरीय साहित्यातून व्यक्त झालेली दिसते. त्यामुळे शहरातील उच्च मध्यमवर्गीय पात्रे सुट्या घालवण्यासाठी निसर्गरम्य परिसरात, खेड्यामध्ये, विरळ वस्तीच्या ठिकाणी जाताना दिसतात. त्याचबरोबर महानगरांचे लोण खेड्यापाड्यामध्ये पसरत चालले आहे, याचेही चित्रण महानगरीय साहित्य करताना दिसते.

कारखाने, उद्योगधंदे यासाठी खेड्यालगतची जमीन शहरातले उद्योजक, कारखानदार विकत घेतात. त्यासाठी तेथील लोकांच्या जमिनी लाटतात. तुटपुंज्या पैशांचे लालूच दाखवून ते त्यांची जमीन काबीज करतात. तेथे काही लोकांना रोजगार दिला जातो. परंतु त्याचा मुख्य उद्देश तेथील लोकांनी बंड करू नये, इतकाच असतो. यातून महानगरीय जीवनाचा संपर्क खेड्यातील लोकांशी येतो. कारखान्याच्या, उद्योगधंद्याच्या वाढीमुळे जागेच्या किमती वाढतात. यातून शेती उद्ध्वस्त होते. ग्रामीण भागातील शेतीवर आधारीत उद्योग, पारंपरिक उद्योग, छोटे कामगार यांच्यावर उपासमारीची वेळ येते. याचेही चित्रण सुरुवातीच्या काळातील महानगरीय साहित्यामध्ये येताना दिसते. त्यामुळे महानगरीय साहित्याची व्याप्ती केवळ शहरांपुरती मर्यादित न राहता ती खेड्यांशीही संबंध साधताना दिसते. महानगरीय साहित्यातून चित्रित झालेली अनेक पात्रे ही ग्रामीण आहेत. अनेक पात्रे नुकतीच खेड्यापाड्यातून शहरात आलेली आहेत, तर काही कायमस्वरूपी शहरामध्ये स्थिर झालेली आहेत. काही पात्रे शहरामध्ये स्थिर झाली असली, तरी त्यांना ग्रामीण जीवनाचे वेध लागल्याचे लक्षात येते.

महानगरीय साहित्यावर पाश्चात्त्य संस्कृतीचा बराच प्रभाव जाणवतो. पाश्चात्त्य संस्कृती आणि भारतीय संस्कृती यांचा संघर्ष यातून अनेकदा चित्रित झालेला दिसून येतो. महानगरांचा उल्लेख वसंत आबाजी डहाके 'पाश्चात्त्य संस्कृतीची उपरी बेटे' असा करताना दिसतात. अभावग्रस्त आणि जातिव्यवस्थेने ग्रस्त झालेल्या ग्रामीण भागातील लोकांनी शहराकडे धाव

घेतली. खेड्यातील अशा नवशिक्षितांचा एक मोठा वर्ग यातून शहरात निर्माण झाला. त्यांचा साहित्य, कला, विज्ञान, तत्त्वज्ञान, पाश्चात्त्य विचारप्रणाली यांच्याशी परिचय झाला. त्यांनी आपल्या लेखनातून वर्गभेद, वर्णभेद, अर्थभेद, लिंगभेद यांच्यासंदर्भातील आपले अनुभव मांडले. महानगरीय साहित्यातील आशय यातून विकसित झाला. या प्रक्रियेतून ग्रामीण व निमशहरी जीवनापेक्षा वेगळे समाजजीवन, वेगळी संस्कृती उदयास आली. 1990 नंतर महानगरीय साहित्यामध्ये बॉम्बस्फोट, दंगली, भ्रष्टाचार यांचेही चित्रण आलेले दिसते. त्यामध्ये संगणक, दूरदर्शन, मोबाईल, प्रसारमाध्यमे, नोकरशाही यांमुळे मध्यमवर्गीय लोकांचे जीवन अधिक कृत्रिम, यांत्रिक बनले. परप्रांतीयांचेही लोंढे शहरांमध्ये आल्यामुळे महानगरांची भाषा व्यामिश्र आणि गुंतागुंतीची बनली. या सर्वांचे प्रतिबिंब महानगरीय साहित्यामध्ये पडलेले दिसते.

**महानगरीय साहित्याची वैशिष्ट्ये :**

**वास्तववादी चित्रण :**

महानगरीय साहित्य वास्तववादाचा आविष्कार करणारे साहित्य आहे. यामध्ये काल्पनिकता, स्वच्छंदता किंवा अभिजातवाद यांना स्थान नाही. मानवी जीवनाचे बकालपण, दारिद्र्य यांचे वास्तववादी चित्रण महानगरीय साहित्यामध्ये आलेले आहे. यातील पात्रे काल्पनिकतेमध्ये रममाण झालेली असली, तरी प्रत्यक्षामध्ये मात्र त्यांचे जीवन भयान वास्तवाचा सामना करणारेच आहे. महानगरातील श्रीमंत, भांडवलदार, व्यापारी, प्रस्थापित यांचा अपवाद वगळता अन्य सर्वांचे महानगरीय साहित्यातील जीवन हे समस्या, संघर्ष, शोषण, भय, चिंता, दारिद्र्य यांनीच व्यापलेले दिसते. याचे अगदी उघडेनागडे चित्र महानगरीय साहित्यातून समोर येताना दिसते.

**वाढत्या स्पर्धेचे चित्रण :**

शहरांमध्ये ग्रामीण भागातून आलेले सुशिक्षित, अशिक्षित, कामगार, विस्थापित, अनाथ अशा अनेकांचे लोंढे आले. या सर्वांमुळे रोजगाराची समस्या निर्माण झाली. काम मिळविण्यासाठी स्पर्धा, मिळालेले काम टिवण्यासाठी स्पर्धा, कामामध्ये बढती मिळवण्यासाठी स्पर्धा सर्वसामान्याला करावी लागली. या स्पर्धेच्या वास्तवाचे चित्रण महानगरीय साहित्यामध्ये आलेले आहे. जीवन जगण्यासाठीही हा वर्ग मोठ्या प्रमाणात स्पर्धा करताना दिसतो. त्याचबरोबर शहरामधील सामान्य कष्टकरी वर्गाला जीवन जगण्यासाठी देखील मोठा संघर्ष करावा लागतो. महानगरामध्ये जगण्यासाठीही स्पर्धा सुरू आहे, याचे भयान वास्तव महानगरीय साहित्य मांडताना दिसते.

**झोपडपट्ट्यांतील जीवनाचे चित्रण :**

एकीकडे झगमगते बंगले, रोषणाई, पार्ट्या, व्यसनांमध्ये डुंबलेले श्रीमंत लोक यांचे चित्रण महानगरीय साहित्यामध्ये येते. त्याचबरोबर त्यापेक्षा अधिक प्रमाणात झोपडपट्यांमध्ये राहणाऱ्या वर्गाचेही चित्रण यामध्ये दिसते. झोपडपट्ट्यांमध्ये राहणारा हा वर्ग खेड्यापाड्यातून पोट भरण्यासाठी, रोजगार कमविण्यासाठी, कुटुंबाला सांभाळण्यासाठी आलेला आहे. या वर्गाच्या गरजा मोजक्या असल्या, तरी त्या पूर्ण करण्यासाठी त्यांना अनेक वेळा संघर्ष करावा लागतो. महानगरामध्ये राहण्याची समस्या ही सर्वांत मोठी

समस्या आहे. त्यामुळे तेथे झोपडपट्ट्यांचे प्रमाण वाढलेले आहे. तेथे गुन्हेगारी, जुगार-दारुसारखे व्यसन, वेश्यालय यांचेही चित्रण येते. नामदेव ढसाळांच्या गोलपिठा या कवितासंग्रहामध्ये मुंबईतील वेश्यांवस्तीचे चित्रण आलेले आहे. अशा प्रकारे झोपडपट्ट्यांमधील भयान, बकाल जीवन महानगरीय साहित्यातून रेखाटण्यात आलेले दिसते.

**व्यसनांचे चित्रण :**

महानगरातील श्रीमंत आणि गरीब या दोन्ही वर्गामध्ये व्यसनाचे प्रमाण आहे. परंतु या दोघांच्या व्यसनांमध्ये फरक आहे. श्रीमंत लोक चैन म्हणून व्यसन करतात. त्यामध्ये ड्रग्स, महागड्या किमतीची दारू, वाईन यांचा समावेश असतो. या उलट झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या वर्गाचे व्यसन हे खालच्या दर्जाच्या दारू, गांज्या या स्वरूपाचे आहे. या दोन्ही वर्गाच्या या व्यसनांचे वर्णन महानगरीय साहित्यातून आलेले दिसते. व्यसन हे महानगरीय जीवनाचे एक अपरिहार्य अंग बनल्याचे यातून जाणवत राहते.

**गरीब-श्रीमंत यांच्यातील विषमतेचे संदर्भ :**

महानगराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गरीब-श्रीमंत यांच्यामधील विषमता. एकिकडे ऐशोआरामात, बंगल्यात, लक्झरी कारमध्ये राहणारा श्रीमंत वर्ग आणि एकिकडे झोपडपट्टीमध्ये राहणारा गरीब वर्ग यांच्यातील विषमतेचे संदर्भ महानगरीय साहित्यामध्ये आलेले दिसतात. श्रीमंतांच्या झगमगाटाकडे पाहून तसे जीवन जगण्याच्या प्रेरणेतून झोपडपट्टीतील लोक गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. यातूनच ते दहशतवादी कारवाया, दंगली अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी होतात. याचे चित्रण महानगरीय साहित्य करते. श्रीमंतांकडून गरिबांचे होणारे शोषण, त्यांना मिळणारी गुलामासारखी क्षूद्र वागणूक यांचे चित्रण महानगरीय साहित्यामध्ये येते.

**प्रदूषणाचे चित्रण :**

शहरामध्ये लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्याने तेथे ध्वनिप्रदूषण, जलप्रदूषण, वायूप्रदूषण यांचे प्रमाण अधिक असते. विविध संस्कृती, धर्माच्या लोकांचे आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी आपले सण-उत्सव थाटामाटात साजरे करावेसे वाटतात. यातून ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. पाण्याची समस्या शहरामध्ये मोठी आहे. पिण्याचे पाणीही शुद्ध स्वरूपात उपलब्ध होत नाही. नद्यांची गटारे झालेली दिसतात. त्यामुळे जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. राहण्यासाठी जागा मिळत नसल्याने लोक अशा गटारांच्या आजूबाजूलाही राहतात. घाणीच्या साम्राज्यात राहणारी पात्रे महानगरीय साहित्यात येतात. या सर्वांचे भयान वास्तव महानगरीय साहित्याने रेखाटलेले आहे. कारखान्यांपासून निघणारे विषारी वायू, विषारी केमिकल बनवणाऱ्या फॅक्ट्रीस, त्यापासून निघणाऱ्या विषारी वायूपासून होणारी वायुप्रदूषणाची समस्या यांचेही चित्रण महानगरीय साहित्यातून आलेले आहे.

**गुन्हेगारी, भ्रष्टाचार यांचे चित्रण :**

गरिबी, दारिद्र्य, झटपट श्रीमंत होण्याची लालसा, व्यसनांचे वाढते प्रमाण यामुळे शहरामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. यातून दंगली, दहशतवादी कारवाया, चोरी, खून, दरोडे, बलात्कार यांचे प्रमाण महानगरामध्ये वाढलेले आहे. यांचेही चित्रण वास्तववादी स्वरूपात महानगरीय साहित्य करते. गुन्हेगारीच्या वाढत्या प्रमाणाची कारणे, पार्श्वभूमी, त्याचे परिणाम या सर्वांचे चित्रण महानगरीय साहित्यामध्ये येते. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली अनेक पात्रे महानगरीय साहित्यात येतात. शिव्या, गलिच्छ भाषा, अश्लिल संवाद यामुळेच महानगरीय साहित्याचा एक भाग बनलेले दिसतात. गुऱ्हेगारीसोबतच राजकारणी लोकांचा भ्रष्टाचार, दुराचारी वागणे, त्यांच्याकडून होणारे गरिबांचे शोषण याचेही चित्रण या साहित्यामध्ये आलेले आहे.

**नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण :**

गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, नातेसंबंधांमध्ये आलेले तुटलेपण, आपल्या माणसांचा कायमचा दुरावा, परक्यांच्या सहवासात नाईलाजाने राहावे लागणे, स्पर्धा, सत्तासंघर्ष यांमुळे महानगरीय जीवनात नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाल्याचे जाणवते. या नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचे वर्णन महानगरीय साहित्यात येते. स्वार्थ, स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी दुसऱ्यावर करावयाची कुरघोडी याचे अनेक संदर्भ महानगरीय साहित्यामध्ये येतात. कुटुंबव्यवस्थेचा ऱ्हास नात्यांमध्ये आलेली कृत्रिमता, पैशांचे वाढलेले अवास्तव महत्त्व, त्यातून घडणारा नैतिक मूल्यांचा ऱ्हास यांचे चित्रण यामुळेच महानगरीय साहित्यातून येते.

**नातेसंबंधातील तणावाचे चित्रण :**

खेड्यापाड्यातील लोक रोजगाराच्या निमित्ताने शहरामध्ये आले. त्यामुळे ते आपल्या नातेवाईकांपासून दूर गेले. त्यामुळे महानगरातील अन्य लोकांशी जवळीक साधणे त्यांना अवघड जाऊ लागले. वय, लिंग यांच्यातील वाढत्या गुंतागुंतीचे अनेक संदर्भ महानगरीय साहित्यामधून आलेले दिसतात. तृतीय पंथी, बाल-जरठांचे संबंध यांचेही चित्रण अनेकदा महानगरीय साहित्यातून प्रकटते. धकाधकीच्या जीवनामुळे एकमेकांना वेळ न देता येणे, यातून येणारी हतबलता, जीवनात येणारे एकाकीपण, एकारलेपण याचेही चित्रण महानगरीय साहित्यामध्ये येते. घटस्फोटांचे वाढते प्रमाण, तणावातून येणारे मानसिक आजार, यांत्रिकीकरणातून येणारे नात्यांमधील शुष्कता यातून नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होतात. या ताणतणावाचे चित्रणही महानगरीय साहित्य करते.

**मानवी यांत्रिकतेचे चित्रण :**

यंत्रांच्या आधीन गेलेल्या माणसांचे प्रमाण महानगरांमध्ये अधिक आहे. भौतिक सुखसुविधांच्या आधीन गेल्यामुळे शहरी जीवन पूर्णपणे यांत्रिक झालेले आहे. त्याचबरोबर नोकरशाहीच्या वाढत्या प्रमाणामुळे, त्याचबरोबर कमीत कमी खर्चात आणि वेळेत अधिकाधिक उत्पन्न मिळवण्याच्या उद्योजकांच्या महत्त्वाकांक्षेमुळे कामगार वर्गावर कामाचा ताण आलेला आहे. या ताणामुळे त्यांना यंत्रासारखे काम करावे लागते. ठरलेल्या वेळी उठणे, दैनंदिन कामे उरकून कामावर हजर होणे, ठरलेल्या वेळी घरी येणे, झोपणे या सर्व

क्रियांमध्ये महानगरीय लोकांच्या जीवनामध्ये यांत्रिकता आल्याचे दिसून येते. या यांत्रिकतेचे चित्रण हे महानगरीय साहित्याचे एक अपरिहार्य अंग बनलेले आहे.

**बहुभाषिकता :**

महानरामध्ये विविध प्रांतातील लोक एकत्र राहू लागले. एकत्र काम करणाऱ्या , एकत्र राहणाऱ्या  अनेक लोकाच्या भाषा, धर्म, संस्कृती, रीतिरिवाज यांमध्ये फरक आहे. अशा विविध लोकांच्या एकत्र राहण्यातून निर्माण होणारी भाषिक विविधता महानगरीय साहित्यात जाणवते. हिंदी आणि इंग्रजी या भाषांचा मुख्य प्रभाव महानगरीय भाषेवर आहे. मुंबईमध्ये मराठी भाषेसोबत हिंदी, इंग्रजी, गुजराती, तेलूगू, तमिळ, कन्नड अशी अनेक भाषा बोलणारी माणसे एकत्र राहतात. त्यांच्या चित्रणातून महानगरीय साहित्यातील भाषेमध्ये बहुविविधता आल्याचे जाणवते. इंग्रजी, हिंदीबरोबरच प्रादेशिक भाषांच्या प्रभावातून बोलली जाणारी मराठी महानगरीय साहित्यामध्ये आलेली दिसते. त्या त्या पात्रानुरूप भाषा यामध्ये येते.

## २अ.४ महानगरीय साहित्याची मराठीतील परंपरा :

**प्रास्ताविक :**

इ. स. 1960 नंतर सुरू झालेल्या वाङ्मयीन प्रवाहांमधील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजेच महानगरीय साहित्य होय. या प्रवाहातील साहित्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये आपण पाहिली आहेत. आता आपण मराठीतील महानगरीय साहित्याची परंपरा पाहणार आहोत. त्यामध्ये प्रामुख्याने महानगरीय कविता, महानगरीय कथा, महानगरीय कादंबरी आणि महानगरीय नाटक यांची माहिती आपल्याला करून घ्यायची आहे. इ. स. 1945 नंतर आपल्याकडे नवकवितेला सुरुवात झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या झळा याच काळात पोहोचत होत्या. यंत्रयुगामुळे होणारा भीषण संहार माणूस जवळून पाहत होता. संवेदनशील लेखकाला यातून मानवी जीवनाची क्षूद्रता, हतबलता, परिस्थितीशरणता यांची जाणीव झाली. यांचा आविष्कार हे लेखक करू लागले. जुन्या मूल्यांकडे परत वळण्याची मानसिकता, पर्यावरणाकडे सकारात्मकपणे पाहण्याची दृष्टी यातून पुढे येऊ लागली. त्याचबरोबर बदललेले शहरी जीवन, त्यातून उदयाला आलेली नवीन संमिश्र संस्कृती, नवीन वर्गभेद-वर्णभेद, नवीन विषमव्यवस्था, नवी मूल्ये यांचेही चित्रण यामध्ये येऊ लागले. हे साहित्य नवे होते. यातून नव्या जाणिवा आणि नव्या प्रेरणा व्यक्त झालेल्या दिसतात. या प्रवाहाने साहित्यव्यवहारात मूलभूत व मूल्ययुक्त परिवर्तन घडवून आणलेले दिसते. या साहित्याचा परिचय पुढील वाङ्मयप्रकारांच्या अनुषंगाने करून घेता येईल.

**महानगरीय कविता :**

साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांचा आशय सवप्रथम कवितेतूनच व्यक्त झालेला दिसतो. महानगरीय साहित्याचा आशयही सुरुवातीला कवितेतूनच व्यक्त झालेला दिसतो. इ. स. 1945 नंतर शहरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आलेला होता. दुसऱ्या महायुद्धाने माणसाच्या क्षूद्रत्वाची जाणीव प्रकर्षाने करून दिली. अमानुषता, वैफल्य, एकाकीपण, क्षणभंगुरता यांची जाणीव माणसाला होऊ लागली. ही महानगरीय जाणीव सर्वप्रथम बा. सी. मर्ढेकरांच्या 'काही कविता' आणि 'आणखी काही कविता' या संग्रहामधून पहिल्यांदा व्यक्त झालेली

दिसते. खेड्यामध्ये बालपण गेले असून शहरामध्ये नोकरीसाठी आलेल्या लोकांच्या भावना यातून व्यक्त झालेल्या दिसतात. शहरातील यांत्रिकता, भावनाशून्यता, बकालपणा यांचे चित्रण त्यांची कविता करताना दिसते. गर्दीने गजबजलेल्या शहरातील चेहरा हरवलेला माणूस, त्याची अगतिकता, हतबलता, मानवी जीवनाची क्षूद्रता, जुन्याची ओढ त्यांची कविता व्यक्त करते.

मुंबईतील गिरणी कामगारांचे भावविश्व नारायण सुर्वे यांची कविता मांडते. त्यांच्या कवितेवर मार्क्सवादाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. गिरणी कामगारांचा लढा, त्यांच्या समस्या, प्रश्न त्यांनी आपल्या माझे विद्यापीठ, ऐसा गा मी ब्रह्म, जाहीरनामा, नव्या माणसाचे आगमन, सनद अशा कवितांमधून मांडले. त्यांनी वर्गीय जाणीव, विषमतेची चीड, भांडवलदारांच्या विरोधातील आंदोलन, कामगारांचा आत्मविश्वास मांडला. समाजपरिवर्तनाचा आणि नव्या समाजाचा ध्यास त्यांची कविता घेताना दिसते. महानगरीय कवितेने प्रस्थापित संकेतांना झुगारून देऊन नवे साहित्यसंकेत मांडलेले दिसतात. सत्यकथा, अभिरुची यासारख्या नियतकालिकांना शह देण्याच्या भूमिकेतून लघुनियतकालिकांची चळवळ इ. स. 1945 नंतर सुरू झाली. या चळवळीच्या माध्यमातून महानगरीय कविता आकाराला येत गेली. या लघुनियतकालिकांमध्ये ‘शब्द’, ‘दिशा’, ‘लेखन’, ‘रूपगंध’, ‘रूप’, ‘रंग’, ‘अथर्व’, ‘असो’, ‘आता’, ‘भारूड’, ‘हेमा’, ‘अक्षरे’, ‘फक्त’, ‘टिंब’, ‘तापसी’, ‘येरू’, ‘वाचा’, ‘कावळा’, ‘दैनिक चक्रवर्ती’, ‘शब्द’, ‘स. न. वि. वि.’, ‘अबकडई’, ‘ब्र’, ‘शब्दशिल्प’, ‘सौष्ठव’, ‘अभिधा’, ‘प्रमेय’ इ. नियतकालिके महत्त्वाची आहेत. नवशिक्षित लेखकांनी या लघुनियतकालिकांच्या माध्यमातून आपले जीवन आविष्कृत करायला सुरुवात केली.

लघुनियतकालिकांनी पारंपरिक जीवनदृष्टीला आणि वाङ्मयीन संकेतांना झुगारून दिले. आपल्या नावातून, साहित्यकृतीच्या आकृतिबंधातून, साहित्यकृतीच्या मांडणीतून आणि आशयातून प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात चळवळ उभी करण्याचा प्रयत्न लघुनियतकालिकांच्या चळवळीच्या माध्यमातून झाला. अरूण कोल्हटकर, दि. पु. चित्रे, भालचंद्र नेमाडे, चंद्रकांत पाटील, मनोहर ओक, तुलशी परब, गुरुनाथ धुरी, वसंत दत्तात्रेय गुर्जर, नामदेव ढसाळ, सतीश काळसेकर, वसंत आबाजी डहाके, वसंत सावंत, पुरुषोत्तम पाटील, शंकर वैद्य, सुरेश मथुरे असे अनेक कवी लघुनियतकालिकांच्या चळवळीतून पुढे आलेले आहेत. या कवींच्या कवितेत महानगरीय समाजव्यवस्थेचे भयावह रूप उघड्यानागड्या स्वरूपात पुढे आले. त्यांच्या लेखनातून अस्सल महानगरीय संवेदन प्रकट झालेले दिसते. या लेखनामध्ये प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आणि विचारांविरुद्धची चीड व्यक्त झालेली दिसते. ‘स्वातंत्र्य हे कुण्या गाढवीचे नाव आहे?’, असा प्रश्न याच उद्वेगातून नामदेव ढसाळ विचारताना दिसतात. नामदेव ढसाळांचे आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी (1976), खेळ (1983), गोलपिठा (1972), तुझे बोट धरून चाललो आहे मी, तुही इयत्ता कंची (1981), मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे, मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले (1975), या सत्तेत जीवन रमत नाही (1995), गांडू बगीचा, निर्वाणाअगोदरची पीडा हे महत्त्वाचे कवितासंग्रह आहेत. त्यांच्या कवितेची भाषा तीव्र विद्रोहाची, अतिवास्तववादाचा आविष्कार करणारी, क्रांतीची भाषा वापरणारी, बंडखारी प्रवृत्तीची आहे. महानगरातील वेश्या, मजूर, कामगार यांचे बकाल जीवनवास्तव त्यांची कविता मांडते. त्यांनी मध्यमवर्गीय शहरी मानसिकतेला धक्के देणारी, नवप्रतिमांतून महानगरीय संवेदना मांडणारी कविता लिहिली. वसंत आबाजी डहाके यांच्या शुभवर्तमान (1987), योगभ्रष्ट

(1972), शुन:शेप (1996) आणि चित्रलिपी या कवितासंग्रहांमधून महानगराचे वास्तव प्रकट होताना दिसते.

1980 नंतरच्या महानगरीय कवितेने वेगळे रूप धारण केलेले दिसते. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, संगणकीकरण, मॉल संस्कृती यांचे शहरातील प्रमाण वाढल्याने शहरी संस्कृती आणखी गुंतागुंतीची आणि व्यामिश्र झाली. यातून माणुसकीचे झालेले विकृतीकरण या काळातील कविता या नव्या प्रतिमांच्या माध्यमातून मांडू लागली. विवेक मोहन राजापुरे, प्रशांत धांडे, अरुणचंद्र गवळी, सलील वाघ, वर्जेश सोलंकी, श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, सचिन केतकर, नितीन कुलकर्णी, मन्या जोशी, नितीन रिंढे, मोहन बोरसे, आल्हाद भावसार, संजीव खांडेकर या कवींनी महानगरीय कवितेची परंपरा या काळात सशक्त रूपात मांडली. श्रीधर तिळवेंनी महानगरीय स्त्री आजच्या चंगळवादी संस्कृतीची कशी बळी ठरते, याची पुरुषी जाणीव व्यक्त करतात. अरुणचंद्र गवळी, प्रशांत धांडे यांची कविता महानगरातून आलेल्या एकाकीपणाच्या पाशातून स्वत:ला मुक्त करण्यासाठी धडपडताना दिसते. श्रीधर तिळवे यांनी या महानगरीय कवितेचा उल्लेख चौथी कविता असे करून या कवितेचे वेगळेपण अधोरेखित केलेले दिसते. अमानवीकरण, वस्तूकरण, व्यक्तित्त्वलोप, परात्मता, संवादशून्यता, माणसाचे निराधारपण, नगण्यता, मानवी जीवनाची अर्थशून्यता, आधुनिक जीवनाची विरुपता, भयावहता ही आशयसूत्रे या कवितेतून व्यक्त झालेली दिसतात.

कवयित्रींनीही आपली महानगरीय जाणीव कवितेतून व्यक्त केलेली दिसते. मलिका अमरशेख हे यातील महत्त्वपूर्ण नाव आहे. कार्यकर्ता आणि प्रसिद्धीच्या झोतात असलेला नवरा आणि त्याच्यासोबत जीवन जगताना येणारे अनुभव आपल्या लेखनातून मांडले आहेत. वासंती मुजुमदार यांनी मध्यमवर्गीय मानसिकता आपल्या कवितेतून व्यक्त केलेली दिसते. निरन्वय, वेणा, स्त्रीगणेशा हे त्यांचे महत्त्वाचे कवितासंग्रह आहेत. बोथट झालेल्या, थंड पडलेल्या अवाढव्य, राक्षसी महानगरीय संवेदना त्यांची कविता व्यक्त करते.

**महानगरीय कथात्म साहित्य (कथा-कादंबरी) :**

1945 नंतर मराठी नवकथेचा उदय झाला. बा. सी. मर्ढेकरांच्या नवकाव्याच्या समांतर काळातच नवकथा उदयाला आली. मर्ढेकरांच्या कवितेच्या आशयाशी नवकथेचा आशयही संवादी असल्याचे लक्षात येते. म्हणजेच नवकाव्याच्या आशयाची जी वैशिष्ट्ये ठरतात, तीच नवकथेच्या आशयाचीही वैशिष्ट्ये ठरतात. नवकथेने पारंपरिक कथेला अधिक खुले आणि लवचिक बनवलेले दिसते. प्रस्थापित संकेतांना झुकारून नवी मूल्ये या कथेने प्रस्थापित केली. कथेची रचना, कथेतील पात्रांचे आंतरिक भावविश्व, पात्रचित्रणाची पद्धती, वातावरणनिर्मिती, निवेदनशैली, भाषाशैली, घटनाप्रसंगांचे चित्रण, कथानक या कथेच्या सर्वच घटकांच्या बाबतीत महानगरीय कथा वेगळी आणि नवी होती. मराठी कथेमध्ये घडून आलेले हे परिवर्तन त्या काळातील ऐतिहासिक परिस्थितीचाच परिणाम होता, असे लक्षात येते. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, शांताराम यांचे नाव महानगरीय कथात्म साहित्यामध्ये महत्त्वपूर्ण आहे. गंगाधर गाडगीळ यांचे मानसचित्र, कडू आणि गोड, कबुतरे, तलावातील चांदणे, नव्या वाटा, उद्‌ध्वस्त विश्व, ओले ऊन, पाळणा, खरं सांगायचं म्हणजे, वर्षा, स्वप्नभूमी असे कथासंग्रह या काळात प्रकाशित

झालेले दिसतात. गंगाधर गाडगीळ यांच्या बहुतेक कथांमध्ये महानगरीय जीवनाचे चित्रण आलेले दिसते. त्यांच्या कथांमधील अनेक पात्रे मुंबईसारख्या महानगरामध्ये राहणारी आहेत. पांढरपेशा, मध्यमवर्गीय जीवनातील कोणत्या तरी कचेरीत काम करणारी, चाळीत राहणारी, तुटपुंज्या पगारावर काम करणारी, नोकरीतील कामांचा तोचतोचपणा यामुळे कंटाळलेली, भविष्याकडे आशेने पाहणारी, दीनवाणे जीवन जगणारी, परिस्थितीने गांजलेली, त्यामुळे स्वभावाने निबर झालेली, शारीरिक आणि मानसिक दडपणामुळे भावनाहीन झालेली पात्रे या कथांमध्ये भेटतात. गाडगीळांच्या कथेचे निवेदन कधी मिश्किल, कधी हळूवार, तर कधी उपहासगर्भ झालेले दिसते. किडलेली माणसे या कथेमध्ये आलेले निवेदन हे उपहासगर्भ असल्याचे जाणवते. मनोविश्लेषण हे गाडगीळांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पूर्वीच्या कथांमध्ये पात्रांच्या संदर्भात घडणाऱ्या घटनांना अधिक महत्त्व होते. गाडगीळांनी आपल्या कथांमधून त्या पात्रांच्या मनोविश्लेषणावर भर दिलेला दिसतो. मनोविश्लेषण हे नवकथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. महायुद्ध, स्वातंत्र्योत्तर शहरी माणसांच्या मानसिक किडलेल्यापणाला त्यांनी आपल्या लेखनातून हात घातला.

अरविंद गोखले यांचे नजराणा, जन्मखुणा, तनुजा, उन्मेष, माहेर, जागरण, शोभा, मंजुळा, मीलन, कमळण, विघ्नहर्ती, कथाई, शकून, मिथून, मंत्रमुग्ध असे विपुल कथासंग्रह प्रकाशित झालेले दिसतात. यांनी जीवनाचे संदर्भ अतिशय काळजीपूर्वक अभ्यासून ते आपल्या कथांमधून मांडलेले दिसतात. त्यांच्या कथांमधील मंजुळा हे असेच महत्त्वपूर्ण आणि लोकप्रिय ठरलेले पात्र आहे. व्यक्तीचे मन उलगडून दाखवण्याचा प्रयत्न हे गोखल्यांच्या कथेचे लेखनकेंद्र असल्याचे जाणवते. व्यक्तीच्या मनातील कलह, संघर्ष, घालमेल यांना ते आपल्या कथेतून स्पष्ट करतात. महानगरांमधील महायुद्धांचे संदर्भ, बेकारी, फाळणी, महागाई, जातीय दंगली यांचे वर्णन त्यांच्या कथांमध्ये पार्श्वभूमी म्हणून येते. गोखले हे मनोव्यापाराच्या गुंतागुंतीवर आणि त्यातून येणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया यावर भर देताना दिसतात. महानगरीकरणाची प्रक्रिया सुरू झालेल्या मुंबई शहरातील यांत्रिक जीवनाच्या चक्रात अडकलेल्या, तणावात जगणाऱ्या , निराश झालेल्या, स्वप्न हरवलेल्या, नैतिकदृष्ट्या संभ्रमित झालेल्या निराश व्यक्तीचे चित्रण त्यांच्या कथांमध्ये दिसते.

पु. भा. भावे यांनीही या काळात विपुल कथालेखन केलेले आहे. पहिला पाऊस, स्वप्न, फुलवा, सतरावे वर्ष, ध्यास, देव्हारा, मुक्ती, तपस्वी, प्रेम, आवर्त यांसारखे अनेक कथासंग्रह त्यांनी लिहिलेले आहेत. त्यांच्या कथांमधील चित्रणात पात्रांचा बेडरपणा, ओजस्विता, कथानकाची गतिमानता, काव्यात्मता ही वैशिष्ट्ये दिसून येतात. व्यक्तीच्या स्वतंत्र व मुक्त जीवनाचा आग्रह त्यांच्या कथा धरताना दिसतात. जुन्या-नव्या पिढ्यांमधील संघर्ष त्यांच्या कथा मांडतात. त्यांच्या कथांमधील पात्रे संतप्त आणि व्याकूळ अशी चित्रित झालेली दिसतात. क्षूद्रतेचा तिटकारा आणि भव्य-दिव्यतेचे, उदात्ततेचे आकर्षण हेही त्यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

शांताराम यांचे छळ, जमिनीवरची माणसे, लाटा, धर्म, चंद्र माझा सखा, चेटूक, अंधारवाट हे कथासंग्रह प्रकाशित झालेले दिसतात. त्यांच्या कथांमधून मध्यमवर्गीय जीवनाचे मुख्य चित्रण आलेले दिसते. झोपडपट्टीतील लोक, मजूर, आदिवासी, श्रीमंत जहागीर, विदेशी व्यक्ती ही पात्रे त्यांच्या कथांमधून भेटतात. छोट्या महानगरांमधील मध्यमवर्गीय लोकांचे जीवन आणि त्यांचे सामाजिक-सांस्कृतिक जीवन, आचारविचार या कथांमध्ये चित्रित

झालेले दिसतात. घटिते आणि मनोव्यापार यांना त्यांच्या कथेमध्ये सारखे स्थान असलेले दिसते.

जी. ए. कुलकर्णी यांचा प्रारंभीचा कालखंड हा नवकथेच्या बहराचा कालखंड होता. त्यांच्या कथेची वाट ही नवकथेच्या विकासाशी समांतर होती. परंतु नंतर त्यांनी स्वत:ची वाट शोधलेली दिसते. निळासावळा, रक्तचंदण, सांजशकून, काजळमाया, रमणखुणा, पारवा, हिरवे रावे यांसारखे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या कथेने पारंपरिक कथेपेक्षा वेगळी आणि नवकथेपेक्षाही निराळी वाट चोखाळून आपले वेगळेपण सिद्ध केलेले दिसते. त्यांची कथा संज्ञाप्रवाही बनली असली, तरी तांत्रिक अवडंबरातून ही कथा पूर्णपणे बाहेर पडलेली दिसते. स्वतंत्र प्रज्ञेचा एक अग्रगण्य कथाकार म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागतो. मानवी दु:खाची जाणीव त्यांची कथा अधोरेखित करते. परिस्थितीसमोर हतबल असलेली, दु:खाने वाकलेली, अगतिक, पोरकी पात्रे त्यांच्या कथेमध्ये भेटतात. मानवाचे अथांग दु:ख, मरणाचे विक्राळ रूप, क्षणभंगूर जीवनातील माणसाची जगण्याची कमालीची लाजिरवाणी आसक्ती ते आपल्या कथेतून मांडतात.

श्री. दा. पानवलकर हे महानगरीय कथांमधील महत्त्वपूर्ण कथाकार होते. त्यांनी मुंबईमध्ये कस्टम खात्यात 30 वर्षे नोकरी केली. त्यांच्या कथा या घटनाप्रधान असल्याचे लक्षात येते. त्यांनी क्रियाशील माणसांचा जीवनसंघर्ष आपल्या कथांमधून रेखाटलेला आहे. पोलीस, कस्टमवाले, मवाली, दरोडेखोर, गावगुंड अशी कठोर आणि हतबल पात्रे त्यांच्या कथांमधून भेटतात. त्यांच्या जीवनसंघर्षाचा उलगडा करण्याचा ते प्रयत्न करताना दिसतात. विद्याधर पुंडलिक यांचे पोपटी चौकट, टेकडीवरचे पीस, देवचाफा, माळ आणि फॅन्टेसिया हे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. जुनी आणि नवी कथा यांच्या खुणा त्यांच्या कथांमध्ये दिसतात. त्यांच्या कथेतील पात्रे ध्येयवादी, पापभिरू, विशिष्ट चौकटीत जगणारी, तरीही त्यातून संयमाने, निष्ठेने बाहेर पडण्यासाठी धडपडणारी अशी आहेत.

कमल देसाई यांचे रंग आणि रंग 2 असे मोजकेच कथासंग्रह प्रकाशित झालेले दिसतात. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमधून नवअनुभववाद डोकावताना दिसतात. कालतत्त्वाचा वापर त्यांनी आपल्या कथांमधून केलेला आहे. त्यांच्या कथेचा आकृतिबंध संज्ञाप्रवाहातून तयार झाल्याचे जाणवते. त्यांची कथा-कादंबरी एकाच वेळी अनेक पातळ्यांवरून आणि तीनही काळांमधून सरकत जाणारी आहे. त्यांच्या कथेतील अनुभव हे व्यक्तिकेंद्री आहेत. त्यांच्या कथांमधील नायिका स्वतंत्र वृत्तीच्या असल्या, तरी तर्‍हेवाईक स्वभावाच्या आहेत. अविवाहित स्त्रियांचा कोंडमारा आणि त्यांना करावा लागणारा त्याग यांचे चित्रण त्यांची कथा करताना दिसते.

वसुंधरा पटवर्धन यांच्या कथा नव्या-जुन्यांचा संगम आपल्या कथांमधून साधताना दिसतात. त्यांची कथा बांधेसूद, रेखीव आहे. दमदार, कसदार अनुभवांवर या कथा उभ्या आहेत. स्त्रीकेंद्री कथा हे त्यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. चेहरा, संसारशोभा, आंतरपाट, पैठणी, शोध, आदिपुरुष हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत.

चि. त्र्यं. खानोलकर यांनी कथा आणि कादंबरीच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. सनई (1964), राखी पाखरू (1971), चाफा आणि देवाची आई (1975) हे कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या कथांमधून पात्रे, घटना, प्रसंग यातून गजबजलेली सृष्टी

उभी राहते. त्यांच्या अजगर, गणूराय आणि चानी, त्रिशंकू, पाषाणपालवी, पिशाच्च, रात्र काळी घागर काळी अशा कादंबऱ्यांमधून आणि कथांमधून त्यांनी माणसाचा स्वभाव, वासना, विकार, दारिद्र्य, मूल्य संघर्ष, नियती यांच्या ताणातून निर्माण होणाऱ्या शोकात्मिका रेखाटल्या आहेत.

दि. पु. चित्रे यांची कथा अनुभव, आविष्कार, भाषाशैली, अस्तित्वबोध या वैशिष्ट्यांमुळे वेगळी ठरते. त्यांच्या कथांचे नायक ननैतिक आणि व्यक्तिकेंद्री असल्याचे जाणवते. लैंगिक भावना, समस्या यांचे चित्रण त्यांच्या कथेमध्ये येते. टवटवीत आणि आशयप्रधान भाषा हे त्यांच्या कथेचे महत्त्वाचे भाषिक वैशिष्ट्य ठरते. ऑर्फियस (1968) हा त्यांचा महत्त्वपूर्ण कथासंग्रह आहे. कसाळ काळेभोर पिल्लू, तिडिक, तिरडी, अनंतकाळ या त्यांच्या कथा त्यांच्या स्वयंभू आणि वेगळ्या प्रतिभेची साक्ष देणाऱ्या आहेत.

विलास सारंग यांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये आधुनिक माणसाच्या जीवनातील असुरक्षिततेची, निरर्थकतेची जाणीव, स्वातंत्र्यावर होणारे अतिक्रमण, व्यवस्थेची दहशत, माणसाचे एकाकीपण, तुटलेपण, माणसा-माणसातील विसंवाद यांचे संदर्भ आलेले दिसतात. परिचित वास्तवाचे विरूपीकरण करून त्यातून चमत्कृती साधणे हे त्यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. गर्भवती, गिधाडे, आतंक या कथांमधून त्यांनी आधुनिक आणि वैश्विकतेचे प्रश्न अधोरेखित केले आहेत. एन्कीच्या राज्यात ही त्यांची कादंबरी आणि आतंक हा कथासंग्रह महत्त्वपूर्ण आहे. श्याम मनोहर यांचे बिन मौजेच्या गोष्टी, आणि बाकीचे सगळे हे दोन महत्त्वाचे कथासंग्रह आहेत. त्यांच्या कथेवर नवकथेचा प्रभाव अधिक जाणवतो, तरी त्यांच्या कथेमध्ये काही बाबतीत वेगळेपण जाणवते. त्यांच्या कथानिवेदनाची पद्धत वेगळी आणि वास्तववादी आहे.

भाऊ पाध्ये यांच्या कथा आणि कादंबऱ्या मराठी कथात्म साहित्यामध्ये आपली वेगळी वाट चोखाळणारे आहे. एक सुनहरा ख्वाब, थालीपीट, थोडी सी जो पिली, दावेदार हे त्यांचे महत्त्वाचे कथासंग्रह आहेत. महानगराच्या झगमगटापासून दूर असलेल्या झोपडपट्यातील अभावग्रस्त, दरिद्री वर्गाचे चित्रण त्यांच्या कथात्म साहित्यामधून येते. मुंबईतील विविध जाती, धर्म, संस्कृती यांच्या संमिश्र, संकरित भाषेचा आविष्कार त्यांमध्ये आल्यामुळे त्यांच्या निवेदनाची भाषा नवीन आणि वेगळी आहे. त्यांच्या वणवा, राडा, अग्रेसर, होमसिक ब्रिगेड या कादंबऱ्या महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांमधून महानगरीय भोगलोलुपता, लैंगिकता यांचे चित्रण अधिक येते. वैतागवाडी, बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर, वॉर्ड नं. 7 या त्यांच्या कादंबऱ्यांमधून पांढरपेशा मध्यमवर्गीयांच्या मानसिकतेचे चित्रण आलेले आहे. राडा, वासुनाका, जेलबर्डस, करंटा, डोंबाऱ्याचा खेळ या कादंबऱ्यांमधून त्यांनी कनिष्ठ स्तरातील लोकांचे जीवन चित्रित केलेले दिसते. त्यांच्या कथा-कादंबऱ्या महानगरातील उच्च-नीच अशा सर्व स्तरांना आपल्या कवेत घेताना दिसतात.

ह. मो. मराठे, अरुण साधू, रंगनाथ पठारे, राजन गवस, अरुणा ढेरे, केशव मेश्राम, एस. डी. इनामदार, अनिल कुलकर्णी, बाळकृष्ण प्रभुदेसाई, मिलिंद बोकील हे 1980 नंतरच्या काळातील महत्त्वाचे कथाकार आहेत. ह. मो. मराठे यांच्या सॉफ्टवेअर, कलियुग, मार्केट या कादंबऱ्यांमधून बहुराष्ट्रीय कंपन्या, कारखानदारी यांचे चित्रण आले आहे. त्यांची निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी ही कादंबरी पांढरपेशा मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करते. या

कादंबरीतील नायक भाषिक फटकारे ओढीत मध्यमवर्गीय मानसिकतेवर नेमके बोट ठेवताना दिसतो. औद्योगिकीकरण, व्यापारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण यांच्यामुळे महानगरांमध्ये निर्माण झालेल्या समस्या या कथाकारांनी मांडलेल्या आहेत. अरुण साधू यांच्या झिपऱ्या, तडजोड, त्रिशंकू, बहिष्कृत, मुखवटा, मुंबई दिनांक, विप्लवा, शापित, शुभमंगल, शोधयात्रा, सिंहासन, स्फोट अशा कादबऱ्यांमध्ये आणि एक माणूस उडतो त्याची गोष्ट, ग्लानिर्भवती भारत, बिनपावसाचा दिवस, मंत्रजागर, मुक्ती, बेचका आणि आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या  इमारती या कथासंग्रहांमध्ये ग्रामीण आणि महानगरीय परिसर यांचे चित्रण येते. जयंत नारळीकरांनी मराठी विज्ञानकथेचा पाया रचलेला दिसतो. अंतराळातील भस्मासूर, अंतराळातील स्फोट, अभयारण्य, चला जाऊ अवकाश सफरीला, प्रेषित, यक्षांची देणगी, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, व्हायरस हे त्यांचे महत्त्वाचे कथासंग्रह आहेत.

महानगरीय कथात्म साहित्यामध्ये दलित कथाकारांचाही महत्त्वाचा सहभाग आहे. त्यामध्ये बाबुराव बागूल हे अतिशय महत्त्वाचे कथाकार ठरतात. त्यांचे 'जेव्हा मी जात चोरली होती, 'मरण स्वस्त होत आहे' हे दोन महत्त्वाचे कथासंग्रह आहेत. दलित कथाकारांमधील ते महत्त्वाचे कथाकार ठरतात. त्यांच्या कथांमध्ये जातीयता, वर्णसंघर्ष यांचे चित्रण आलेले दिसते. उपेक्षित, बहिष्कृत, पीडित व्यक्तींच्या भावभावना अतिशय प्रखरतेने त्यांची कथा व्यक्त करते. दांभिकता आणि नैतिकता यांचे नाट्यमय चित्रण त्यांची कथा करते. मानवी मनातील विसंगती ते अधोरेखित करतात. मरण स्वस्त होत आहे या कथासंग्रहामध्ये महानगरातील उपेक्षित, बहिष्कृत, पीडित व्यक्तींचे जीवनचित्रण येते. त्यांचे दैन्य, दारिद्र्य, वासना, विकार यांचे ज्वलंत चित्रण त्यांची कथा करते. स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता, सवर्ण-शूद्र यांच्यातील विषमता, गरीब-श्रीमंत यांच्यातील भेदभाव यातून निर्माण होणाऱ्या वेदनांचे चित्रण त्यांच्या कथा करतात. सूड ही त्यांची लघू कादंबरीही या दृष्टीने महत्त्वाची आहे.

महानगरीय साहित्यामध्ये स्त्रीवादी लेखिकांचाही समावेश होतो. त्यातील गौरी देशपांडे यांच्या कथा स्त्रीवादी आहेत. कौटुंबिक जीवनाचे बदलते स्वरूप, त्यातून निर्माण होणारा संघर्ष त्यांच्या कथा चित्रित करतात. स्त्रीचा स्वत:कडे, समाजाकडे, स्त्री-पुरुष संबंधाकडे, कुटुंबाकडे बघण्याचा बदलता दृष्टिकोण त्यांच्या कथा अधोरेखित करतात. त्यांच्या मुक्काम, या कादंबरीमध्ये परदेशी महानगरातील व्यक्तिकेंद्रितता मांडलेली आहे. थांग, दुस्तर हा घाट या त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. विजया राजाध्यक्ष यांचे कमान, हुंकार, जास्वंद, विदेही, अनोळखी, उत्तरार्ध इ. कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. स्त्री, स्त्रीत्त्व, तिची सृजनशीलता, तिचे वेगळेपण, तिचे भावविश्व यांबद्दलचे कुतूहल आणि त्याचा शोध त्यांची कथा घेताना दिसते. त्यांच्या सुरुवातीच्या कथांवर नवकथेचा प्रभाव जाणवतो. प्रयोगशीलता हे त्यांच्या कथेचे वेगळे वैशिष्ट्य ठरते. सानिया, आशा बघे, मेघना पेठे, शांता गोखले यांच्याही कथा-कादंबऱ्यांमध्ये महानगरीय जीवनाचे चित्रण आलेले आहे. स्त्रियांचे भावविश्व, बदलते विचारविश्व, समाजाकडे बघण्याचा तिचा बदलता दृष्टिकोण यातून सूचित होते. मेघना पेठे यांच्या नातिचरामि, आंधळ्यांच्या गायी, हंस अकेला या कलाकृतींमधून महानगरीय सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकलेला दिसतो. शांता गोखले यांच्या रिटा वेलनकर या कादंबरीतून महानगरातील बहुस्तरीय स्त्री-पुरुष संबंध अधोरेखित झालेले दिसतात. महेश केळुसकर हे महानगरीय जाणिवेची कादंबरी लिहिणारे महत्त्वाचे

कादंबरीकार आहेत. त्यांच्या क्रमश: आणि यू कॅन आल्सो विन या दोन महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. त्यांचा जोर की लगी है यार हा कथासंग्रह महत्त्वाचा आहे. यातून महानगरीय जीवनाचे वास्तव नव्या आकृतिबंधातून व्यक्त झालेले दिसते.

थोडक्यात, महानगरीय साहित्यातील कथा हा एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार असून या कथांनी कथेच्या पारंपरिक आशय, आविष्कार, भाषा यांच्या बाबतीत अनेक नवे प्रयोग केले असून कथेला व्यापक रूप यातून प्राप्त झाल्याचे लक्षात येते. महानगरीय कथांनी मानवी अस्तित्वाचे महत्त्वपूर्ण प्रश्न अधोरेखित केलेले दिसतात. दलित, स्त्रीवादी, विज्ञानवादी कथांनी महानगरीय कथेमध्ये वेगळे आशयविश्व मांडलेले दिसते. महानगरीय जीवनातील यांत्रिकतेचे आक्रमण आणि ग्रामीण संस्कृतीवरील महानगरीय संस्कृतीचे आक्रमण या कथांनी अधोरेखित केले. मानवी जीवनाचा बकालपणा, एकाकीपणा, स्वार्थ, नैसर्गिक विकार-वासना यांचे वास्तववादी चित्रण या कथांनी केलेले दिसते. महानगरीय कथेपेक्षा महानगरीय कादंबरीचे क्षेत्र अधिक समृद्ध आणि ठसठशीतपणे लक्षात येते.

सुभाष भेंडे यांच्या अंधारवाटा, किनाराय, बोनसॉय, अदेशी या कादंबऱ्यांमधूनही महानगरीय भोगलोलुपता, लैंगिकता यांचे चित्रण आलेले दिसते. संजय जोशी यांची नचिकेतचे उपाख्यान, संजीव खांडेकरांची अशांत पर्व, वसंत आबाजी डहाके यांची अधोलोक, अरविंद रे यांची सात पावलं उलटी या महत्त्वाच्या महानगरीय कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यांमधून उच्चभूंचे चित्रण प्रामुख्याने आलेले दिसते. प्रभाकर पेंढारकर यांच्या अरे संसार संसार, श्री. ना पेंडसे यांच्या आकांत, हत्या, ऑक्टोपस, लव्हाळी, मधु मंगेश कर्णिक यांची वारूळ, जयवंत दळवी यांच्या आल्बम, कहाणी, दिवाकर कांबळी यांच्या डोकेफुट, परळ हट, मनोहर शहाणे यांच्या झाकोळ, देवाचा शब्द, धाकटे आकाश, लोक असावा, एखाद्याचा मृत्यू या कादंबऱ्यांमधून पांढरपेशा मध्यमवर्गीय जीवनाचे आणि त्यांच्या मानसिकतेचे चित्रण आलेले आहे.

महानगरीय कादंबऱ्यांमध्ये कनिष्ठ वर्गातील, सामान्य वर्गातील, झोपडपट्टीमध्ये राहणारा वर्ग, फुटपाथवरील वेश्या, भिकारी यांचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्याचेही प्रमाण बरेच आहे. त्यामध्ये जयंवत चळवी यांची चक्र, मधु मंगेश कर्णिक यांची माहिमची खाडी, मनोहर ओक यांची चरसी, शंकरराव खरातांच्या हातभट्टी, झोपडपट्टी, फुटपाथ नं. 1, अनंत कदम यांची दिवसाच्या अंधारात, भा. ल. पाटील यांची उगवतीचे रंग, वस्ती वाढे आहे, चंद्रकांत खोत यांची उभयान्वयी अव्यय, विषयांतर, भानू काळे यांची कॉम्रेड, अरुण साधू यांची झिपऱ्या, ल. ना. केरकर यांच्या तो आणि त्याचा मुलगा, पांढरा सिंह, काळी चौकट या कादंबऱ्यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागतो. या सर्व कादंबऱ्या महानगरातील निम्न आणि खालच्या वर्गातील जीवनाचे सामाजिक आणि मानसिक चित्रण करताना दिसतात. महानगरीय कादंबरीने शहरातील गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, भांडवलदार-नोकर अशा सर्व स्तरांना आपल्या कवेत घेतलेले दिसते.

**महानगरीय नाटक :**

महानगरीय नाटकांमधून कथा-कादंबऱ्यांसारखे महानगरीय जीवन अधोरेखित झालेले दिसत नाही. तरीही पार्श्वभूमी म्हणून महानगरीय जीवन यामध्ये आलेले दिसते. मुळात आधुनिक मराठी नाटकांची परंपरा शहरातूनच निर्माण झालेली दिसते. पाश्चात्त्य

नाट्यसृष्टीचा परिचय सुरुवातीला महानगरातील लेखकांनाच झाला आणि त्याचे अनुकरणही महानगरातील नाटककारांनीच केले. गो. ब. देवल, अण्णासाहेब किर्लोस्कर, मामा वरेरकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, प्र. के. अत्रे, वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे या सर्व नाटककारांची नाटके महानगरांमधूनच रंगभूमीवर आली. मामा वरेरकर, प्र. के. अत्रे आणि मो. ग. रांगणेकर यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडात लेखन केले. त्यांच्या लेखनाचा प्रभाव नंतरच्या नाटककारांवर पडलेला दिसतो.

मामा वरेरकरांनी सोन्याचा कळस, सत्तेचे गुलाम या नाटकांमधून मुंबईतील श्रमिक-शोषित लोकांच्या वेदना, समस्या मांडल्या. प्रल्हाद केशव अत्रे यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात 'साष्टांग नमस्कार', 'भ्रमाचा भोपळा', 'मी उभा आहे', 'लग्नाची बेडी', 'मोरुची मावशी' अशी विनोदी आणि 'उद्याचा संसार', 'घराबाहेर', 'जग काय म्हणेल?' अशी गंभीर स्वरूपाची नाटके लिहिली. त्यांच्या नाटकांवर नोवेल कॉवर्ड आणि मोलिएर या पाश्चात्त्य नाटककारांचा प्रभाव असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी लिहिलेले 'सम्राटसिंह' हे नाटक महत्त्वपूर्ण आहे. हे नाटक त्यांना शेक्सपिअरच्या 'किंग लिअर' या नाटकावरून सुचल्याचे त्यांनी मान्य केले असले, तरी या नाटकाचे स्वरूप स्वतंत्र आहे. हे नाटक त्यांच्या मृत्यूनंतर इ. स. 1973 मध्ये रंगभूमीवर आले. त्यांच्या 'तो मी नव्हेच' या नाटकाने फिरत्या रंगमंचाची संकल्पना रूढ केली. एकाच पात्राच्या किंवा नटाच्या पाच वेगवेगळ्या भूमिका यात आहेत. माधव काझी या व्यक्तीवर दाखल केलेल्या स्त्रियांच्या फसवणुकीच्या खटल्यावर हे नाटक आधारलेले आहे. त्यामुळे वास्तव घटनेला कल्पना आणि विनोदाचा रंग देऊन उत्तम नाटक कसे साकार करता येऊ शकते, याचा दाखला हे नाटक देते. त्यांच्या अशाच डॉ. अ. चिं. लागू यांच्यावरील खटल्यावर आधारीत 'डॉक्टर लागू' (सध्याचे नाव 'डॉक्टर') या नाटकाने लेखनदृष्ट्या नवेपण जपले. या नाटकाचे स्वरूप इतिवृत्तात्मक आहे. प्र. के. अत्रे यांचे नाटक विनोदी वळणाचे होते. त्यांची स्वातंत्र्यानंतरच्या काळात पाणीग्रहण, कवडीचुंबक, बुवा तेथे बाया, तो मी नव्हेच ही नाटके प्रकाशित झाली. मनोरंजनाचा मुख्य दृष्टिकोण त्यांच्या नाटकामागे असला, तरी समाजाच्या व्यंगांवर ते विडंबनात्मक भाष्य करताना दिसतात. त्यांच्या नाटकांनी नाट्यक्षेत्राच्या पडत्या काळात नाट्यलेखनाला भक्कम आधार दिला, नवीन दिशा दाखवली, आश्वासकता निर्माण केली. त्यांची ही नाटके महानगरीय पार्श्वभूमी लाभलेली आहेत. 1945 ते 1958 या काळात त्यांनी संन्याशाचे लग्न, जीवा-शिवाची भेट, द्वारकेचा राजा, अपूर्व बंगाल, लंकेची पार्वती, भूमिकन्या सीता ही नाटके रंगभूमीवर आणली. त्यांची बहुतांश नाटके सामाजिक भाष्य करणारी आहेत. तंत्राच्या बाबतीत त्यांनी अनेक प्रयोग केले.

नाट्यलेखक, नाट्यसंस्थाचालक, नाट्यदिग्दर्शक, नाट्यनिर्मिते असलेल्या मो. ग. रांगणेकरांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही काळात नाट्यलेखन केले. 1941 साली स्थापलेल्या 'नाट्यनिकेतन' या नाट्यसंस्थेद्वारे त्यांनी नाट्यक्षेत्रात नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. इब्सेनच्या नाट्यतंत्राचा प्रभाव त्यांच्यावर स्पष्टपणे जाणवतो. त्यांचीही नाटके महानगरीय रंगमंचावरच सादर झालेली होती. वरेरकर, अत्रे आणि रांगणेकर यांनी प्रेक्षकांची अभिरुची विचारात घेऊन नाटकातील संगीत कमी केले. शेक्सपिअरपेक्षा इब्सेनच्या नाट्यतंत्राचा अधिक वापर केला. आशय, विषय, मांडणी या बाबतीत नाटकांची वास्तववादी वाटचाल त्यांच्या काळातच झाली. एक होता म्हातारा, कोणे एके काळी, माहेर,

रंभा, जयजयकार, भटाला दिली ओसरी, धाकटी आई, भाग्योदय ही नाटके त्यांनी रंगमंचावर आणली. बोलपटाच्या आक्रमणाच्या काळातही त्यांनी नाट्यवाङ्मय टिकवून ठेवले. अनंत कानेकरांनी बहुतेक नाटके अधिक प्रमाणात अनुवादित, रूपांतरित अशी आहेत. इब्सेनच्या डॉल्स हाऊस या इंग्रजी नाटकाचा त्यांनी घरकूल या नावाने अनुवादित केलेले नाटक महत्त्वपूर्ण आहे.

शिरवाडकर हे बहुआयामी, विविधांगी नाट्यलेखन करणारे नाटककार आहेत. त्यांची दूरचे दिवे, दुसरा पेशवा, वैजयंती, कौन्तेय, राजमुकुट, ऑथेल्लो, आमचं नाव बाबुराव, ययाती आणि देवयानी, वीज म्हणाली धरतीला, बेकेट, नटसम्राट, विदूषक, एक होती वाघीण, आनंद, मुख्यमंत्री, चंद्र जिथे उगवत नाही, महंत, कैकयी ही महत्त्वाची नाटके आहेत. नाट्यमांडणीमध्ये त्यांनी विशेष प्रयोग केलेले दिसत नाहीत. देशप्रेम, इतिहासप्रेम, पराक्रमाचे आकर्षण त्यांच्या लेखनातून जाणवते. शिरवाडकर हे बहुआयामी, विविधांगी नाट्यलेखन करणारे नाटककार आहेत. त्यांची दूरचे दिवे, दुसरा पेशवा, वैजयंती, कौन्तेय, राजमुकुट, ऑथेल्लो, आमचं नाव बाबुराव, ययाती आणि देवयानी, वीज म्हणाली धरतीला, बेकेट, नटसम्राट, विदूषक, एक होती वाघीण, आनंद, मुख्यमंत्री, चंद्र जिथे उगवत नाही, महंत, कैकयी ही महत्त्वाची नाटके आहेत. नाट्यमांडणीमध्ये त्यांनी विशेष प्रयोग केलेले दिसत नाहीत. देशप्रेम, इतिहासप्रेम, पराक्रमाचे आकर्षण त्यांच्या लेखनातून जाणवते. त्यामुळे त्यांच्या नाटकांमध्ये महानगरीय संदर्भ तसे जास्त सापडत नाहीत. 1946 ते 2000 या प्रदीर्घ कालखंडावर त्यांचा नाट्यवाङ्मयावर प्रभाव होता.

पु. ल. देशपांडे यांनी विनोदी आणि गंभीर अशा दोन्ही स्वरूपाची नाटके लिहिली. त्यांच्या नाटकांमध्ये आलेली पात्रे शहरी आहेत, ग्रामीण नाहीत. परंतु महानगरीय जाणिवा त्यांच्या नाटकांमध्ये अधिक प्रमाणात येताना दिसत नाही. भव्यता, उदात्तता यांचेच अधिक वेड त्यांना दिसते. बटाट्याची चाळ हे त्यांचे नाटक महानगरातील चाळीचे चित्रण करणारे आहे. अश्रूंची झाली फुले या नाटकामध्ये त्यांनी महानगरातील शिक्षणाची पार्श्वभूमी आधाराला घेतलेली दिसते. मला काही सांगायचंय या नाटकामध्ये त्यांनी न्यायालयीन वातावरण चित्रित केलेले दिसते. विवाहापूर्वी गर्भवती होणारी जान्हवी आणि त्यामुळे गोंधळलेले तिचे कुटुंब या नाटकात येते. त्यांचे सूर्याची पिल्ले हे नाटक राजकीय स्वरूपाचे असून यामध्ये शहरी जीवनाची पार्श्वभूमी दिसते. पंखांना ओढ पावलांची हे त्यांचे नाटक स्त्रीजीवनाची शोकांतिका मांडणारे आहे. याही नाटकाला महानगरीय पार्श्वभूमी लाभलेली दिसते. त्यांचे फक्त एकच कारण हे नाटक परदेशाच्या प्रभावात असलेल्या तरुणाचे चित्रण करणारे आहे. तुका म्हणे आता हे त्यांचे नाटक 1948 साली रंगभूमीवर आले. तुझे आहे तुजपासी या त्यांच्या नाटकाची विशेष चर्चा झाली. निवृत्तीवाद आणि प्रवृत्तीवादाचा संघर्ष यातून त्यांनी चित्रित केलेला दिसतो. आध्यात्मिक भावनेपेक्षा भौतिक भावना महत्त्वाची असा त्यांच्या भूमिकेचा कल यातून जाणवतो. अंमलदार, सुंदर मी होणारा, भाग्यवान ही त्यांची नाटके महत्त्वपूर्ण आहेत. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या पिग्मेलिअन या नाटकाचे त्यांनी फुलराणी या नावाने केलेले रूपांतर प्रेक्षकांना विशेष भावलेले दिसते.

विजय तेंडुलकरांच्या श्रीमंत, गृहस्थ, मधल्या भिंती, चिमणीचं घर होतं मेणाचं, सरी गं सरी, मी जिंकलो मी हरलो, कावळ्यांची शाळा, एक हट्टी मुलगी, घरटे आमुचे छान, कन्यादान, पाहिजे जातीचे, विठ्ठला, माणूस नावाचे बेट, घाशीराम कोतवाल, अशी पाखरे येती या

नाटकांमधून मध्यमवर्गीय जाणिवांचे चित्रण आलेले आहे. यातून त्यांनी कौटुंबिक नातेसंबंधांचा वेध घेतलेला आहे. शांतता! कोर्ट चालू आहे या नाटकातून त्यांनी मध्यमवर्गीय स्त्री-पुरुष संबंधविषयक नैतिक प्रश्नांची मांडणी केलेली दिसते. सखाराम बाईंटर या नाटकामध्ये त्यांनी पारंपरिक आणि आधुनिक स्त्री रेखाटली आहे. कमला या नाटकातून त्यांनी स्त्रीविक्रीचा प्रश्न मांडला आहे. कन्यादान या त्यांच्या नाटकात दलित आणि सवर्ण यांच्या लग्नाचा संदर्भ आहे. मित्राची गोष्ट या नाटकामध्ये त्यांनी स्त्रियांची समलैंगिकता या विषयाला हात घातलेला दिसतो. विजय तेंडुलकरांची गिधाडे, पुरुष या नाटकांमधून लैंगिक विकृती, हिंसा मांडण्यात आलेली दिसते. बिभत्सता, हिंसाचार, उच्चभूरंच्या नीतिमूल्यांचा ऱ्हास त्यांच्या नाटकांनी रंगभूमीवर आणला. सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण त्यांनी आपल्या नाटकातून केलेले दिसते.

चि. त्र्यं. खानोलकर यांच्या एक शून्य बाजीराव या नाटकाने नाटकाचे प्रचलित संकेत मांडित काढून नाट्यवाङ्मयाला वेगळे वळण दिले. हे नाटक म्हणजे मराठी नाटकातील नवनाट्याचा आरंभ ठरतो. कालाय तस्मै नम:, अवध्य, अभोगी, आपुले मरण, रखेली, श्रीमंत पतीची राणी, सगेसोयरे ही त्यांची नाटके महत्त्वपूर्ण आहेत. गिरीश कार्नाड या नाटककारांच्या हयवदन या नाटकाचे त्यांनी याच नावाने मराठीत भाषांतर केले. या नाटकातून आशयाच्या बाबतीत नवा प्रयोग करण्यात आलेला दिसतो.

रत्नाकर मतकरी यांनी महाविद्यालयीन जीवनातील नाट्यस्पर्धेसाठी म्हणून सुरुवातीच्या काळात नाट्यलेखन केले. त्यांच्या अनेक नाटकांना महानगरांची पार्श्वभूमी लाभलेली दिसते. तथापि, महानगरीय चित्रणापेक्षा भावविश्वाच्या चित्रणावर ते अधिक भर देताना दिसतात. माझं काय चुकलं? या नाटकामध्ये त्यांनी कौटुंबिक कलह आणि त्यातून आत्महत्येला प्रवृत्त होणारे पती-पत्नी चित्रित केले आहेत. त्यातून जिवंत राहणाऱ्या स्त्रीला कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते, ते या नाटकात मतकरींनी दाखवून दिले आहे. जोडीदान या त्यांच्या नाटकामध्ये परदेशामध्ये जाऊन तेथील स्त्रीशी संबंध ठेवणारा पुरुष चित्रित झाला आहे. यातून जन्माला आलेले मूल आपल्या बापाचा शोध घेत घेत मुंबईमध्ये येते. यातून निर्माण झालेल्या कौटुंबिक समस्या या नाटकात मांडल्या आहेत.

बॅरिस्टर या जयवंत दळवी यांच्या नाटकामध्ये पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाने प्रभावीत झालेली भौतिक, शारीरिक सुखाचा आस्वाद सौंदर्यपूर्ण रीतीने घेणारी व्यक्तिरेखा भेटते. सूर्यास्त या नाटकामध्ये त्यांनी बदलत्या राजकीय मूल्यांचे आणि त्यातून घडणाऱ्या शोकांतिकेचे चित्रण केले आहे. सावित्री या नाटकातून त्यांनी नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या मांडलेल्या आहेत. नातीगोती या नाटकातून त्यांनी मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण केले आहे. पर्याय या नाटकातून त्यांनी आधुनिक संदर्भातील सासू-सून यांच्यातील संघर्ष दाखवला आहे. अनील बर्वे हे साम्यवादाने प्रभावीत असलेले नाटककार आहेत. हमीदाबाईची कोठी हे त्यांचे नाटक महानगरातील कोठीचे बदललेले स्वरूप मांडते. पुत्रकामेष्टी या नाटकामध्ये त्यांनी गर्भाशय भाड्याने घेण्याची (टेस्ट ट्युब बेबी) महानगरातील नवी पद्धत मांडली आहे. महानगरातील नवी नैतिकता यातून अधोरेखित करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो.

महेश एलकुंचवार यांच्या एका नटाचा मृत्यू, गार्बो, पार्टी, प्रतिबिंब, यातनाघर, युगान्त, वाडा चिरेबंदी, रक्तपुष्प, वासनाकांड, वासांसि जीर्णानि, वास्तुपुरुष, सोनाटा ही महत्त्वपूर्ण नाटके

आहेत. सोनाटा या नाटकातून त्यांनी मुंबई महानगरात राहणाऱ्या तीन वेगवेगळ्या सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेल्या स्त्रियांच्या भावजीवनाचे चित्रण केलेले आहे. मूलभूत मानवी समस्यांचा विचार त्यांनी मांडलेला आहे. सतीश आळेकर यांचे अतिरेकी, एक दिवस मठाकडे, दुसरा सामना, पिढीजात, बेगम बर्वे, महानिर्वाण, महापूर, मिकी आणि मेमसाहेब, शनिवार-रविवार ही महत्त्वाची नाटके आहेत. यातील महानिर्वाण हे मराठी रंगभूमीच्या दृष्टीने महत्त्वाचे नाटक ठरते. गो. पु. देशपांडे यांचे 1974 साली रंगभूमीवर आलेले उद्ध्वस्त धर्मशाळा हे महत्त्वाचे नाटक आहे. या नाटकाने रंगमंच, अंक, दृश्य, चौकटी यापासून स्वत:ची सुटका करून घेतलेली दिसते. कधी रंगमंच, तर कधी न्यायालयाचा खेळ, तर कधी कादंबरीतील पात्रांचे प्रत्यक्ष अवतरणे, कधी मृत माणसाने स्वत:च्याच निवार्णाचे कथन करणे असे या नाटकाचे कथानक अनेक बाबतीत वेगळे, नवे आणि धक्कादायक होते.

प्रशांत दळवी, राजीव नाईक, चेतन दातार, मकरंद साठे, शफाअत खान, फणसळकर या नाटककारांनी प्रयोगशील नाटके लिहिली. शफाअत खान यांनी मुंबईमधील 1992-93 च्या दंगलींचा विषय थेटपणे आपल्या नाटकातून मांडला. राहिले दूर घर माझे हे त्यांचे नाटक पाकिस्तानातील लाहोरमधील हिंदूंच्या घरी राहणाऱ्या मुस्लीम कुटुंबातील क्रूरता आणि मानवता यांचे चित्रण करणारे आहे. हिंदू-मुस्लीम संघर्षाच्या पार्श्वभूमीवर वावरणारे हे नाटक शेवटी मानवतेचा संदेश देऊन जाते. मकरंद साठे यांनी महानगरीय जीवनातील अंतर्गत ताणेबाणे प्रतिकात्मक स्वरूपात आपल्या नाटकातून मांडलेले आहेत. 1945 ते 1960 या कालखंडात ऐतिहासिक, पौराणिक आणि सामाजिक विश्लेषात्मक नाटके रंगमंचावर आली. प्रायोगिक, प्रहसनवजा, काव्यात्म प्रकृतीची नाटके या काळात आली. नाटकाच्या मांडणीत बदल होत गेले. प्रेक्षकांच्या गतिमान जीवनाचा विचार करून अंक व प्रवेश नेमके व आटोपशीर झाले. लांबलचक संवादांचे आणि स्वगतांचे प्रमाण कमी झाले. नेपथ्य वास्तववादी बनले. पात्रांच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न नाटककार करू लागले. 1955 नंतर व्यावसायिक आणि प्रायोगिक नाटक असे वेगवेगळे प्रकार अधोरेखित होत गेले. नाटक हे मनोरंजन आणि जीवनदर्शनासाठी आहे, याची जाणीव नाटककारांना होऊ लागली.1970 च्या आसपास काही नव्या नाटककारांची फळी उदयास आलेली दिसते. त्यामध्ये सतीश आळेकर, महेश एलकुंचवार, अच्युत वझे, गो. पु. देशपांडे हे महत्त्वाचे नाटककार आहेत. 1960 नंतर एकांकिका लेखनाची सुरुवात झालेली दिसते. अनेक नाटककार एकांकिकालेखनाकडे वळलेले दिसतात. पुढे पथनाट्य या नाट्यप्रकाराचाही समावेश महानगरीय नाटकामध्ये झालेला दिसतो.

## २अ.५ समारोप :

महानगरीय साहित्य हा एक वास्तववादी साहित्याचा एक महत्त्वपूर्ण प्रकार आहे. साठोत्तरी कालखंडामध्ये या साहित्यप्रवाहाला सुरुवात झालेली असली, तरी 1990 नंतरच्या काळामध्ये या प्रवाहाचे वेगळेपण अधिक उमटून दिसते. शहरीकरणाची वाढती प्रक्रिया आणि त्यातून बदललेले सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक, कौटुंबिक, शैक्षणिक जीवन यांचे चित्रण महानगरीय साहित्य करते. महानगरीय जीवनाच्या सर्व अंगांना या साहित्याने आपल्या कवेत घेतलेले आहे. महानगरीय जाणीव सर्वप्रथम कवितेतून आणि त्यानंतर कादंबरी या वाङ्मयप्रकारातून सशक्तपणे व्यक्त झालेली दिसते. रंजनमूल्यांचा प्रभाव काही प्रमाणात महानगरीय साहित्यावर दिसतो. महानगरीय जीवनाचे वास्तवरूप मांडताना

या साहित्याची भाषा बंडखोर झालेली दिसते. 1990 नंतरच्या महानगरीय साहित्यातून संगणकीय संज्ञा, मोबाईची संदेशप्रणाली, मॉल्स यांनी प्रभावीत झालेले शब्द व प्रतिमा सर्रासपणे वापरल्या गेलेल्या दिसतात. त्यातून चेहरा हरवलेल्या समूहाचा, पर्यावरणाच्या ऱ्हासाचा, रोगग्रस्ततेचा, एकाकीपणाचा आविष्कार झालेला दिसतो.

**आपली प्रगती तपासा**

१. महानगरीय साहित्याची ओळख करून द्या ?

## २अ .६ सरावासाठी स्वाध्याय

१) महनगरीय साहित्याचा उगम केव्हा झाला ?

२) महानगरीय जीवनाचे चित्रण प्रथम कोणाच्या कवितेतून आले आहे ?

३) 'विष वृक्षांच्या मुळा ' ही कादंबरी कोणी लिहिली .?

४) "गोतावळा ' ही कादंबरी कोणी लिहिली ?

५) महानगरीय साहित्य हे कशाचा स्वीकार करणारे साहित्य आहे .?

- **टिपा**

1. महानगरीय संस्कृती

2. महानगरीय कविता

3. महानगरीय नाटक

- **खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तरे द्या .**

1. महानगरीय साहित्याच्या स्वरूप वैशिष्ट्याची चर्चा करा .?

2. महानगरीय साहित्य आणि ग्रामीण साहित्यातील फरक स्पष्ट करा ?

3. महानगरीय साहित्यावर कोणाचा प्रभाव पडलेला होता ?

4. महानगरीय कादंबरीचा आढावा घ्या ?

## २अ.७ संदर्भ ग्रंथ

१. साहित्य आणि समाज, संपादक प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य - अविनाश सप्रे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७.

२. मराठी कवितेतील महानगरीय संवेदनशीलता : एक टिपण, वसंत पाटणकर, सर्वधारा, वर्ष ३ रे अंक ३ रा, जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २००९, संपादक डॉ. सुखदेव ढाणके, अमरावती.

३. अरुण कोलटकरांची कविता: काही दृष्टिक्षेप, संपादक वसंत पाटणकर, मराठी विभाग मुंबई विद्यापीठ आणि लोकवाडमय गृह, मुंबई दुसरी आवृत्ती १७ जुलै २००४.

४. *'महानगरीयवास्तव: भारतीय कादंबऱ्यांसंदर्भात'* संपा.सुर्यकांत आजगावकर, ललित पब्लिकेशन, मुंबई.

५. *'कथा मुंबईच्या गिरणगावची',* नीराआडारकर व मीना मेनन, मौज प्रकाशन, मुंबई.

६. '*जागतिकीकरण आणि मराठी साहित्य*', 'जागतिकीकरण आणि मराठी भाषा व साहित्य' (लेख),प्रा.वसंत अबाजी डहाके, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

७. महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य(लेख)- सप्रे अविनाश, (संपा.) नागनाथकोतापल्ले,'*साहित्य आणि समाज*', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

८. *'मुंबई: काल आणि आज'* - संपादन मंजिरी कामत,अनुवाद - गिरीश जोशी.

❖❖❖❖

# २ब

## क्रमश: कादंबरीचे कथानक, आशयसूत्र, पात्रचित्रण आणि समीक्षण

**घटक रचना**

२ब.0 उद्दिष्ट्ये

२ब.१ प्रास्ताविक

२ब.२ पत्रांमधून समोर येणारे कथानक

२ब.३ चर्चेतून समोर येणारे कथानक

२ब.४ कादंबरीतील पात्रचित्रण

२ब.५ क्रमश: कादंबरीचे आशयसूत्र :

२ब.६ समारोप

२ब.७ सरावासाठी स्वाध्याय

२ब.८ संदर्भ ग्रंथ

## २ब.0 उद्दिष्ट्ये

१. क्रमशः या कादंबरीचे स्वरूप अभ्यासणे.
२. क्रमशः या कादंबरीतील महानगरीय जाणिवांचा अभ्यास करणे.
३. क्रमशः या कादंबरीचे कथानक अभ्यासणे.
४. क्रमशः या कादंबरीचे आशयसूत्र अभ्यासणे
५. क्रमशः या कादंबरीचे वाङ्मयीन महत्त्व अधोरेखित करणे.

## २ब.१ प्रास्ताविक

महानगरीय साहित्य ही नव्वदोत्तरी कालखंडातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. यामध्ये शहरी जीवनाशी केंद्रित चित्रण करणारे लेखक आणि आशय यांचा प्रामुख्याने विचार होतो. शहरी जीवन, शहरातील सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती, शहरातील अर्थव्यवहार, शहरातील कौटुंबिक परिस्थिती, शहरातील नोकरीचे संदर्भ, आर्थिक संदर्भ, राजकारण या सर्वांचा विचार महानगरीय साहित्यातील आशियामध्ये केला जातो. खेडे आणि शहर यांचे संदर्भ, त्याचबरोबर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण याचेही संदर्भ महानगरीय साहित्यामध्ये येताना दिसतात. मराठीमध्ये महानगरीय जाणिवा व्यक्त करणारी एक मोठी परंपरा कादंबरी वाङ्म्यात असल्याचे दिसून येते. महानगरीय साहित्यामध्ये महेश

केळुसकर हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांच्या क्रमशः या कादंबरीमध्ये महानगरीय साहित्याच्या खुणा आपल्याला दिसतात. त्यामुळे महानगरीय जाणिवा व्यक्त करणारी एक प्रातिनिधिक कादंबरी म्हणून क्रमशः या कादंबरीकडे पाहता येते. या कादंबरीचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

## २ब.२ पत्रांमधून समोर येणारे कथानक :

क्रमश: ही महेश केळुसकर यांची महानगरीय जीवनाचे चित्रण करणारी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. या कादंबरीला तसे ठरावित, प्रचलित कथानक नाही. निवेदन, वाचकांची पत्रे आणि चर्चा यातून या कादंबरीचे कथानक समोर येते. त्यातही सलगता नाही. पत्रे सुरू असताना मध्येच निवेदन मध्येच चर्चा असे या कादंबरीचे रचनातंत्र आहे. यातूनच या कादंबरीचा आकृतिबंध आकाराला आलेला आहे. भाषेचा थेटपणा, सामाजिक-राजकीय भाष्य, तटस्थ निवेदन, डोळस वृत्ती या सर्वांमुळे ही कादंबरी लक्षणीय ठरते. उत्तरार्धात कादंबरीतील पात्रे पाक्षिकाच्या संपादकाला पत्र लिहू लागताता आणि पत्र लिहिणारे पूर्वीचे वाचक पात्रांच्या भूमिकेत जाऊन चर्चा करतात. अशा प्रकारचा प्रयोग यापूर्वी मराठी कादंबरीमध्ये झालेला दिसत नाही. रचना आणि आशयाच्या दृष्टीने ही कादंबरी वेगळी ठरते. नैतिक-अनैतिकतेच्या पलीकडे जाऊन समकालीन वास्तवाचा शोध यातून लेखक घेताना दिसतो. कादंबरीच्या सुरुवातीला लेखक स्वत:ला लेखक म्हणून संबोधतो. परंतु आपण आतापर्यंत कोणताही लेख , कथा, कादंबरी, समीक्षा, कविता असे काही छापले नाही, असेही तो कबूल करतो. त्याची मुलं आणि बायको गावाकडे असतात. परंतु त्यांनाही पत्र लिहिणे त्याला जीवावर येते. परंतु तो मनातल्या मनात बरेच काही लिहीत असतो, असे तो सांगतो. मनातल्या मनात लिहिण्याचे फायदे-तोटेही लेखक सांगतो . लेखकाचा खानावळ चालवणारा एक मित्र आहे. तो त्याच्याकडे जेवायला जातो. तो दीनवार्ता नावाचे पाक्षिक हौस म्हणून चालवतो. त्यातून त्याला काही नफा मिळत नाही. लेखकाचे त्याच्याकडे चार महिन्यांचे मित्राच्या खानावळीचे बिल थकलेले असते. त्या मित्राला समोरच्याच्या मनात काय चालते, हे जाणून घेण्याची विद्या अवगत असल्याने तेव्हा तो लेखकाला त्याच्या पाक्षिकासाठी एक कादंबरी लिहिण्याचे आवाहन करतो. लेखकाचीही बऱ्याच  दिवसापासून लिहिण्याची इच्छा असते. कादंबरीचे पहिले प्रकरण पाक्षिकात प्रसिद्ध होते आणि सगळीकडे या कादंबरीची चर्चा सुरू होते. अनेक पत्रे पाक्षिकाच्या संपादकाला येतात. एकूण 36 प्रकरणांमध्ये विभागलेली ही कादंबरी दीड वर्ष या पाक्षिकामध्ये क्रमश: प्रकाशित होत राहिली. कादंबरीचा शेवट होण्यासाठी अजून 9 प्रकरणे आवश्यक होती. परंतु बिल चुकते झाल्यामुळे पुढे लिहिण्याचे लेखक टाळतो. एके दिवशी खानावळवाला मित्र लेखकाला त्याच्या बायकोबद्दल तो मनात काय विचार करतो, हे सांगतो. हे ऐकून लेखक विचारात पडतो. खानावळवाल्या मित्राच्या बायकोचे शरीर त्याने लपून पाहिलेले असते. हे मित्राला कळले, हे जाणून त्याला अवघडल्यासारखे होते. खानावळ सोडून, कादंबरीलेखन सोडून दूर निघून जाण्याचा विचारही लेखकाच्या मनात येतो. पण तो तसे करत नाही. हे निवेदन कादंबरीच्या सुरुवातीला येते. त्यानंतर पुढील कथानक पत्रांच्या रूपाने समोर येते.

पत्र क्रमांक एक मध्ये रा. प. साठ्ये आणि अण्णा पनसे यांनी लिहिलेले आहे. ही कादंबरी वाचून ती आशावादी आहे की, निराशावादी , जीवनवादी आहे की कलावादी हे त्यांना कळेनासे झाल्याचे ते यात सांगतात. शिवाय वाचनीय वाटेल तोपर्यंत कादंबरी वाचत राहू

असेही ते यात सांगतात. पत्र क्रमांक दोनमध्ये माधवी प्रधान-चिटणीस यांनी आपल्या पत्रातून कादंबरी निराशाजनक वाटल्याचे म्हटले आहे. यात 6 वर्षाच्या मुलीच्या आत्महत्येचे चित्रण करून लोकप्रिय होण्याचा लेखक विचार करत असून यातून प्रसिद्धी मिळेल, हा लेखकाचा भ्रम असल्याचे त्यांनी यात म्हटले आहे. पत्र क्रमांक तीनमध्ये प्रा. चंद्रहास किंबहुने यांनी लेखकाला भाषेची अडचण असल्याचे सांगतात. कादंबरीच्या वाचनापेक्षा लेखकाच्या मानसिक अवस्थेचा अनुभव घेऊ शकतो का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा वाटतो.

पत्र क्रमांक चारमध्ये रामराव गंडगीर यांनी पाठवलेले पत्र येते. यात ते स्वत:ची ओळख करून देतात. ते काळाचौकी येथे राहतात. त्यांनी कादंबरीतील प्रकरण तीन वाचलेले आहे. कादंबरीतील बेकार आणि गुंड मुलगा हा आपलाच दुसऱ्या नंबरचा मुलगा असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आपल्या बापानेच आपल्याबद्दल कादंबरीत असे लिहायला लावल्याने त्याने आपल्याला कमरेच्या पट्ट्याने मारल्याचे ते या पत्रात सांगतात. त्यांचा मुलगा पुष्कळ दारू पितो, पप्पू पांडेच्या गँगमध्ये काम करतो. या मुलाला खाणावळीमध्ये वेटरचे काम मिळावे, अशी शिफारसही ते या पत्रामध्ये करतात. त्याचबरोबर पुढील प्रकरणात लेखकाने खुलासा करावा की, यातील गुंड मूलाचे पात्र त्याचां मुलगा सुधीर याचे नाही, अशी मागणीही ते यात करतात. नंतर ते आपण कोहिनूर मिलमध्ये कामाला असल्याचे सांगतात. सध्या मिल बंद असल्याचे घरीच असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. त्यांची बायको रामचंद्र कॉलनीत सात घरी धुणी-भांडी करते आणि मुली डान्सबारमध्ये काम करतात. यावरील उपाय लेखकाने कादंबरीतून सांगावा, असेही रामराव आपल्या पत्रामध्ये नमूद करतात.

पत्र क्रमांक 5 मध्ये मो. रं. लोटलीकर आपली भावना मांडतात. ते पेंशन घेणारे म्हातारे आहेत. त्यांची पत्नी वयाच्या 65 व्या वर्षी मरण पावली आहे. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा अहे. त्यांच्या मुलीने इस्टेटीसाठी त्यांच्यासोबत वाद घातला असून मुलगा सांभाळत नसल्याची खंत ते व्यक्त करतात. कादंबरीचे सहावे प्रकरण संपूनही बाळू कासारचे मेंटल हॉस्पिटलमध्ये पुढे काय झाले, हे कळले नाही, हे ते यात सांगतात. बाळू कासाराचा घोडा मुंबईमध्ये मोकाट फिरत असून त्याचा बंदाबस्त मुख्यमंत्र्यांनी किंवा बिननावी लेखकाने करावा, असे या पत्रात ते नमूद करतात.

पत्र क्रमांक सहामध्ये सौ. मनोरमा व आत्माराम ढेरे यांनी पाक्षिकात छापून आलेले मटक्याचे आकडे आणि गुप्तरोगांवरील औषधांची जाहिरात आवडली नसल्याचे सांगितले आहे. त्याचबरोबर क्रमश: कादंबरीतील भाषा ही आक्षेपार्ह असल्याचेही ते सांगतात. त्यामुळे आपण हे पाक्षिक बंद करणार असून आपण तीन वर्षाची भरलेली वर्गणी परत पाठवावी, अशी मागणीही ते या पत्रात करतात.

पत्र क्रमांक सातमध्ये रा. प. साठे आणि अण्णा पानसे यांनी मागील पत्राची आठवण करून दिली आहे. पुढे दहावे प्रकरण मागील अंकात छापलेले नाही, याची ते आठवण करून देतात. अपरिहार्य कारणाने ते प्रकरण छापले नसल्यास तशी टीप देण्यात यावी, अशी सूचनाही ते करतात. कादंबरीच्या वैचारिक दिशेचा अंदाज येत नसून लेखकाला साम्यवादाचा पुरस्कार करायचा आहे किंवा अतिवास्तववादाच्या आहारी लेखक जातो, हेही ते सांगतात. बाळे कासाराचा घोडा त्यांना फँटसी वाटतो. तर बेकर गिरणी कामगाराचा

बेकार तरुण मुलगा गँगस्टर होतो आणि मुलगी बारवाली होते , हे त्यांना वास्तव वाटते. शेवटी कादंबरी उत्सुकता जागी ठेवणारी आहे, असे ते कबुल करतात. पत्र क्र आठमध्ये मो. रा. लोटलीकर यांनी मागील सात ते नऊ ही कादंबरीची प्रकरणे वाचली नसल्याचे म्हटले आहे. ते पाक्षिकाचे वर्गणीदार नसून ते स्टॉलवरून हे पाक्षिक विकत घेतात. त्यामुळे त्यांना मध्यंतरीचे अंक कुठे वाचायला मिळाले नाहीत, याबद्दल ते नाराजी व्यक्त करतात. त्याचबरोबर मिळालेल्या अंकात दहावे प्रकरण नसून कादंबरी 9 प्रकरणात संपली का ? याबद्दल कळवावे, अशी विनंतीही ते करतात. बाबू कासारावर लेखकाने अन्याय केला असून, त्याच्यावरील अन्यायाचे निवारण झाले नाही, तर आपण उपोषणाला बसू असेही ते शेवटी सांगतात.

पत्र क्रमांक नऊमध्ये रामराव गंडभीर यांनी गेल्या पत्रात मुलाच्या नोकरीबद्दल विचारना केल्याची आठवण करून देतात आणि आता त्याची आवश्यकता नसल्याचे सांगतात. कारण त्यांचा मुलगा आता पॉलिटिक्समध्ये गेला असून त्याला आता भरपूर पैसा मिळत असल्याचे ते सांगतात. परंतु तो आपल्याला विचारत नाही, हेही ते सांगतात. बिननावी लेखकाने कादंबरी अर्धवट ठेवल्याने चुटपूट लागल्याचे ते सांगतात.

पत्र क्रमांक दहामध्ये माधवी प्रधान यांनी आगील पत्रात नॉन्सेंस, स्टंटबाज असा लेखकाचा केलेला उल्लेख अधोरेखित करतात. बाळू कासाराचे घोडा घेऊन मंत्रालयात जाणे, सहा वर्षांच्या मुलीने आत्महत्या करणे, सुधीर गँगस्टर बनतो ही सगळी मानसिक विकृतीची लक्षणे असल्याचे ते या पत्रात सांगतात. त्याचबरोबर लेखकाने पुढे लिहू नये, अशीही त्या लेखकाला विनंती करताना दिसतात.

पत्र क्र. 11 मध्ये प्रा. चंद्रहास किंबहुने आपला भूतकाळ संपादकाला कळवतात. ते दीनवार्ता पाक्षिक वाचत असल्यामुळे त्यांचे सहकारी प्राध्यापक त्यांची चेष्टा करीत असल्याचेही ते सांगतात. लहानपणी खेडेगावात गेल्याने तेथे वृत्तपत्र येत नसल्याने मिळेल ते वाचायची त्यांना लहानपणापासून सवय असल्याचे सांगून हरवलेल्या व्यक्तींची माहिती फोटोसह विनामूल्य छापत असल्याने मोठी समाजसेवा करत असल्याचे ते पाक्षिकाच्या संपादकांना कळवतात. शेवटी क्रमश: ही कादंबरी विचार करायला लावणारी असून ती लेखकाकडून पूर्ण करून घेण्याचेही ते सुचवतात.

पत्र क्रमांक 12 मध्ये माधवी प्रधान क्रमश: कादंबरीवर टीका करताना दिसतात. तर्कशास्त्र आणि लेखकाचा कोणताही संबंध नसल्याचे त्या लिहितात. तेलगीवरील चित्रपट प्रदर्शित होऊ नये यासाठी सर्वपक्षीय निदर्शने घडतात हे कादंबरीतील वर्णन त्यांना तर्काला धरून नाही, असे वाटते. त्याचबरोबर सुधीर गंडभीर या आमदाराला गृहमंत्र्याने संरक्षण दिले नाही, म्हणून तो बाळू कासारचा घोडा घेऊन विधानभवनात अधिवेशनाला हजर राहण्यासाठी येणे हे माधवी प्रधान यांना फॅन्टास्टिक सिच्युएशन आहे असे वाटते. शेवटी लॉजिक असणे महत्त्वाचे असे त्या सांगतात.

पत्र क्रमांक 13 मध्ये रामराव गंडभीर यांनी पाक्षिकाच्या संपादकाचे कौतुक केलेले आहे. सुधीरवर कोणीतरी हल्ला करणार हे मागील प्रकरणात छापून आल्यामुळे त्यांना चिंता वाटत असल्याचे यामध्ये ते लिहितात. त्याला गृहमंत्र्याने संरक्षण नाकारल्याचे सांगून

त्याच्यावर होणाऱ्या हल्ल्याबद्दल लेखकाला माहीत असल्यास त्यांनी आधी कळवावे, अशी इच्छाही ते या पत्राच्या शेवटी व्यक्त करतात.

पत्र क्रमांक 14 हे रा. प. साठे आणि अण्णा पानसे यांनी लिहिलेले आहे. पाक्षिक पुन्हा सुरू केल्याबद्दल ते आभार व्यक्त करतात. बाळे कासार मेंटल हॉस्पिटलमधून पळून नेमका कोठे गेला, हे जाणून घेण्याची उत्सुकता असल्याचे ते नमूद करतात. बाळू कासार हॉस्पिटलमध्ये असताना त्याचा घोडा कोठे होता, या बद्दल लेखकाने काही लिहिले नाही, याची ते आठवण करून देतात. संजय दत्तला अटक झाली आणि नंतर त्याला जामीन देऊन सोडले ही घटना भविष्यात घडू शकते, असेही ते नोंदवतात. लेखकाला दूरदृष्टी असल्याचे ते सांगतात. त्याचबरोबर शेवटी क्रमश: बद्दलचा वाचकांचा संभ्रम वाढत चालला असल्याचेही ते नमूद करतात.

पत्र क्रमांक 15 हे मो. रा. लोहलीकर यांनी लिहिलेले आहे. बाळू कासार हॉस्पिटलमधून पळून गेल्याने आपले उपोषण मागे घेत असल्याचे ते नमूद करतात. त्यांच्या मुलीचा अपघात झाल्याने तिला बघायला गेले असतानाही मुलीने इस्टेटीचा वाद काढल्याने वाईट वाटल्याचे ते पत्रात नमूद करतात. पेंशन पुरत नसल्याने डाळ-भात खाऊन दिवस काढत असल्याचे सांगून मुलगा-मुलगी आपल्याकडे लक्ष देत नसले, तरी आपण कुणाकडे भिक मागणार नाही, असे ते ठामपणे सांगतात.

पत्र क्रमांक 16 मध्ये सौ. मनोरमा आत्माराम ढेरे यांनी वर्गणी परत मागितल्याची आठवण करून देत पाक्षिकच बंद करायची सूचना देतात. वर्गणी परत नाही पाठवली तरी चालेल, पण पाक्षिक पुन्हा पाठवू नये कारण त्यातील क्रमश: कादंबरीने वैताग आणला आहे, असे त्या सांगतात. ही कादंबरी फालतू असून ती कादंबरी जबरदस्तीने वाचावी लागते आणि बाराव्या प्रकरणातही लेखकाची भाषा सुधारली नसल्याचे त्या सांगतात. लेखक खालच्या जातीतून आलेला असल्यामुळे त्याला भाषेचे संस्कार दिसत नाहीत, असेही त्या लिहितात. शेवटी कादंबरी कधी संपणार आहे, असाही प्रश्न त्या विचारतात.

पत्र क्रमांक 17 हे प्रा. चंद्रहास किंबहुने यांनी लिहिलेले आहे. यामध्ये ते समीक्षक रोलॉ नार्थ या फ्रान्सच्या प्रतिभावंताचे मत सांगितले आहे. वाचकाला अस्तित्वाच्या अंतिम सीमेपर्यंत हलवून ठेवायची क्षमता बिननावी कादंबरीकाराजवळ आहे, असे त्यांना वाटते. एखादा लेखक वाचकाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक व मानसशास्त्रीय आधारांना हादरे देतो, तेव्हा समाजाच्या निष्प्राण अभिवृत्तीमध्ये निदान थोडी तरी हालचाल निर्माण होते, असे ते लिहितात. बाराव्या प्रकरणात लेखकीय ऊर्जा विलक्षण गतीने प्रकट झाल्याचे ते शेवटी लिहितात.

पत्र क्रमांक 18 मध्ये रामराम गंडभीर सहा वर्षांच्या मुलीने गॅलरीतून उडी मारून आत्महत्या केल्याचा कादंबरीतील प्रसंग वाचून दु:ख झाल्याचे सांगतात. असे त्यांच्या दोन्ही मुलींनी केले तर आनंद झाला असता, असेही मनात आल्याचे ते मांडतात. मुली बारमध्ये काम करत असल्याने शेजारचे, पाहुणे टाचून बोलतात, ही बाबही ते नमूद करतात. या मुलींनी लग्न करावे, अशी इच्छा ते व्यक्त करतात. ते ज्या मिलमध्ये काम करत होते, ती मिल बंद झाली आणि तेथे मॉल्स, थेटर, दुकाने झाली हे वास्तव ते सांगतात. त्यांना कोणतेही काम येत नसल्याने मुलींच्याच पैशावर कसेबसे घर चालते, हे ते पत्रात लिहितात. मुलासोबत

त्यांनी आता पूर्णपणे संबंध तोडले आहेत. तो बारही बंद करणार असल्याची बातमी पेपरमध्ये छापलेली आहे. ते लेखकाला सरकारला आणि पैशेवाल्या लोकांना उपदेश करायला सांगतात.

पत्र क्रमांक 19 मध्ये रा. प. साठ्ये आणि अण्णा पानसे यांनी प्रकरण पंधरावे नुकतेच वाचून संपवल्याचे सांगतात. प्रसारमाध्यमे बाळू कासारच्या घोड्याची टिंगळटवाळी करतात आणि गँगस्टर आमदाराला हिरो बनवतात. प्रसारमाध्यमांनी लोकजागृतीचे काम केल्याची काही उदाहरणेही ते देतात. लोकच जागरूक नाहीत, असे ते नमूद करतात. टीआरपी वाढवण्यासाठी चॅनल्सवाले जे चाळे करतात यावर मात्र ते आक्षेप घेतात. शेवटी प्रसाधमाध्यमांच्या अशा भूमिकेमुळे आपला संभ्रम वाढत असल्याचे ते लिहितात.

पत्र क्रमांक 20 मध्ये माधवी प्रधान सतरावे प्रकरण वाचल्याचे सांगतात. यातून कांदबरीचा लेखक पुरुष आहे की महिला हा प्रश्न त्यांना पडल्याचे त्या सांगतात. या प्रकरणात लग्नाच्या वयाची मुलगी असताना तिची आई एखाद्या स्त्रीशी लेस्बियन संबंध सुरू करते, हा काय प्रकार आहे, असा त्या प्रश्न विचारतात. अशा प्रकारचे लिखाण करून लेखक समाजात विकृती फैलावत असल्याचे त्या लिहितात.

पत्र क्रमांक 21 मध्ये मो. रा. लोटलीकर यांनी प्रकरण सतरावे वाचून डोळ्यात पाणी आल्याचे म्हटले आहे. एकत्र काम करणाऱ्या दोन स्त्रिया एकत्र येऊन शरीरसंबंध ठेवतात, यात त्यांची काहीच चूक नसल्याचे ते सांगतात. त्या दोन्ही स्त्रिया प्रेमळ असून त्यांच्यात माणूसकी आहे. आपल्या मुलांमध्ये ती नाही, असेही ते नमूद करतात. आपल्या पत्नीने मुलांसाठी खाल्लेल्या खस्ता, त्यांनी स्वत: अवघड परिस्थितीत केलेली नोकरी याबद्दल सांगून मुलांचा याची जाण नसल्याबद्दलची खंत ते व्यक्त करतात. शेवटी आपण इस्टेट मुलांच्या नावे केल्यानंतर आपली परिस्थिती कुत्र्यापेक्षा वाईट होईल, असे ते लिहितात.

पत्र क्रमांक 22 मध्ये मो. रा. लोटलीकर अधिक आठवण आल्याने धाकट्या मुलीच्या घरी गेल्याचे सांगतात. त्यांचा नातू गोड आणि निरागस असून तो पहिलीत आहे. ते त्याच्यासाठी माकडाची खेळणी घेऊन गेले, पण मुलीने ते त्यांना देऊ दिले नाहीत. ते माकडच मरेपर्यंत त्यांच्या सोबत राहील, असे त्यांना वाटते. प्रकरण आठराव्यामधील अहोरात्र गायनाचा रियाझ करणारी पूर्वा आता खळखळून हसायला लागली आहे, हे जाणून त्यांना आनंद वाटल्याचे ते पुढे लिहितात.

पत्र क्रमांक 23 मध्ये प्रो. सी. एस. बेजकर या पाक्षिकाकडे कसे वळले याचे ते कारण सांगतात. त्यांना क्रमश: कादंबरीच्या लेखकाशी संवाद साधायला आवडला असता, असेही ते लिहितात. देशातीन भीषण परिस्थिती, राजकारणाचा कमी होत जाणारा दर्जा याबद्दल ते लिहितात. त्यानंतर क्रमश: कादंबरीतील छोट्या-छोट्या प्रसंगातून लेखक जे सांगू इच्छितो, ते त्यांना अधिक महत्त्वाचे वाटते. या कादंबरीतील बाळू कासार, खानावळवाल्या मित्राची बायको यांच्याबद्दलही चर्चा करतात.ही कादंबरीतील वास्तव त्यांना उजाड माळरानासारखे वाटते.

पत्र क्रमांक 24 मामू आणि थोटे यांनी लिहिलेले आहे. हे पत्र ते संदीप नावाच्या मुलाकडून लिहून घेतात. सफाई कामगारांचे जीवन क्रमश: कादंबरीतून लिहिल्यामुळे त्यांना आनंद

झाल्याचे ते यातून सांगतात. बाळू कासारचे पुढे काय झाले, हे जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता आहे. शेवटी संदीपसाठी नोकरी बघण्याचे ते संपादकाला सांगतात.

पत्र क्रमांक 25 मध्ये प्रा. चंद्रहास किंबहुने पत्राच्या सुरुवातीला हेऱ्याक्लीटस या सहाव्या शतकातील तत्त्वज्ञाच्या लेखनाचा संदर्भ देऊन तसेच क्रमश: कादंबरीचे आहे, असे सांगतात. कादंबरीतील पात्रेच आता वाचक म्हणून आपल्या प्रतिक्रिया, इच्छा-आकांक्षा कळवू लागल्याचे ते लिहितात. या कादंबरीत आलेली पात्रे प्रत्यक्ष कुठेतरी जगत आहेत, ती जिवंत आहेत, असे ते यात कळवतात. ही जाणीव लेखकाला प्रचंड मानसिक त्रास देणारी आहे, यातून लेखक कसा मार्ग काढतो, हे जाणून घेणे कुतूहलजनक असल्याचे ते शेवटी लिहितात.

पत्र क्रमांक 26 मध्ये रामराव गंडभीर हे आपल्या मुलाच्या क्रमश: कादंबरीतील लोकांच्या कामाच्या लिखाणामुळे मुलाचा अभिमान वाटत असल्याचे सांगतात. परंतु त्याने आपल्या घराकडे दुर्लक्ष केले, हे त्यांना आवडले नसल्याचे ते लिहितात. दळवी बिल्डिंगमध्ये गिरणी कामगारांच्या युनियनचे ऑफिस पाडून तेथे मॉल वगैरे मोठ्या इमारत बांधणार असल्याचेही ते सांगतात. सरकार आणि युनियन लीडर यांना हजारो मिल कामगारांच्या पोराबाळांचे शिव्याशाप लागल्याशिवाय राहणार नाहीत, असेही ते पत्राच्या शेवटी लिहितात.

पत्र क्रमांक 27 हे सलीम सलूनवाला याने हिंदी-मराठी अशा संमिश्र भाषेमध्ये लिहिलेले आहे. कादंबरीचा लेखक त्याला अवडला आहे. तो लेखकाला सलुनवर येण्यासाठी सांगतो. आमदार भाईला धमकी देतो हे त्याने बरोबर लिहिलेले नाही, असे तो पाक्षिकाच्या संपादकाला कळवतो. कारण त्यातील नेमका संवाद कोणालाही माहीत नसल्याचे तो सांगतो. असे काहीपण लिहिल्यास पोलिसांचा उगाच त्रास होईल, असे सांगून शेवटी बाकी सर्व ठीक, असे तो लिहितो.

पत्र क्रमांक 28 मध्ये रामराव गंडभीर आपल्या हेमा आणि लता नावाच्या दोन्ही मुली आमी तुमच्या सोबत नावाच्या युनियनमध्ये सहभागी झाल्याबद्दल एकीकडे आनंद आणि एकीकडे मनात भीती वाटत असल्याचे लिहितात. युनियनवाले कामगारांच्या आयुष्याचा सत्यानाश करतात, त्यामुळे ही काळजी वाटत असल्याचे ते सांगतात. आपल्या बापाबद्दल अपशब्द वापरल्यामुळे खवळून त्यांनी दुकानदाराला तुडवून मारल्याचेही ते शेवटी लिहितात.

पत्र क्रमांक 29 मध्ये प्रो. सी. एस. बेजकर लिहितात की, कोणतीही हिंसा ही अंतिमत: विनाशकारीच असते. तात्त्विकदृष्ट्या अशा नकारात्मक तत्त्वाचे कोणताही सूज्ञ समर्थन करूनच शकत नाही. परंतु तार्किक आणि व्यावहारिकदृष्ट्या अशी हिंसा सामान्य लोकांमध्ये वाढत गेली पाहिजे, असे आपल्याला वाटत असल्याचेही ते पत्राच्या शेवटी लिहितात.

पत्र क्रमांक 30 मध्ये माधवी प्रधान लिहितात, अठ्ठाविसाव्या प्रकरणातही लेखक सुधारला नसल्याचे सांगतात. आमदार गंडभीर विधानसभेत बॉम्ब ठेवणार या कादंबरीतील घटनेबद्दल त्या चीड व्यक्त करतात. विधानसभेत बॉम्ब ठेवणे ही सोपी गोष्ट नाही, हेही त्या लिहितात. शेवटी आमदारांना लेखकाने इतके मोकाट सोडायला नको, त्याने तो अडचणीत येईल, असे त्या पत्रामध्ये लिहितात.

पत्र क्रमांक 31 मध्ये सलीम सलूनवाला संपादकाला लिहितो की, तू आपल्याला एक दिवस मारणार. कारण आमदार भाई आपल्या सलूनवर आले होते आणि म्हणाले की, त्यांनी मनातल्या गोष्टी विश्वासाचा माणूस, आपला माणूस म्हणून मला सांगितल्या त्या बाहेर कशा आल्या? तूच या गोष्टी कादंबरीच्या लेखकाला सांगतोस. आता मी आजवर संपादकाचे तोंड पाहिले नाही, त्याला कसे ओळखणार? असे तो शेवटी लिहितो.

पत्र क्रमांक 32 मध्ये मामू आणि थोटे लिहितात की संदीपच्या नोकरीचे बघावे, तो चांगला मुलगा आहे. आपण दारू सोडल्याचे ते यात लिहितात. कारण त्यांच्या गल्लीतील माधुरी नावाच्या मुलीचे विहिरीत पडून जीव दिल्याचे ते लिहितात. तिच्या डेडबॉडीला कुणीच हात लावत नव्हते, तेव्हा त्यांनीच तिला पोस्टमॉर्टमला नेल्याचेही ते सांगतात. बावीस वर्षांचीच होती ती. संसार सुरू करून एक वर्ष झाला होता. तिचा नवरा खूप दारू पिऊन तिला छळायचा. त्यालाही पोहायला येत होते, पण तो विहिरीत उतरला नव्हता. तिच्या अंगाला किडे लागले होते. शेवटी मरून त्याचे तरी तिने भले केले, असे ते पत्राच्या शेवटी लिहितात.

पत्र क्रमांक 33 मध्ये प्रा. चंद्रहास किंबहुने मध्यंतरी कलकत्त्याला रिफ्रेशन कोर्ससाठी गेल्याचे सांगतात. परत आल्यानंतर त्यांनी बत्तिसावे आणि तेहतिसावे प्रकरण वाचले. सहकाऱ्यांशी या कादंबरीबद्दल त्यांनी चर्चा केली आणि एक महत्त्वाची कादंबरी किरकोळ अशा पाक्षिकात छापून येत असून त्याचे नाव लेखकाने लिहिलेले नाही, असे सांगितले तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटल्याचे ते लिहितात. काही बंगाली प्राध्यापकांनी या कादंबरीच्या लेखकाचे नाव आणि पत्ता कळवण्यास सांगितल्याचेही ते या पत्रात लिहितात. त्या लेखकाचे शांतिनिकेतनमध्ये ते व्याख्यान आयोजित करू इच्छितात. लेखक हिंदी किंवा इंग्लिशमध्ये बोलला तरी चालेल, असे त्यांनी कळवले आहे. तथापि, असे होणे अशक्य असल्याचे सांगितल्यानंतर ते फार निराश झाले, असेही ते कळवतात. ते नाव संपादक आपल्याला कळवणार नाहीत, याची जाणीवही ते पत्राच्या शेवटी संपादकाला लिहितात.

पत्र क्रमांक 34 मध्ये प्रो. सी. एस. बेजकर लिहितात की, लेखकाला परिस्थिती केव्हा तरी बदलेल असे वाटू लागले आहे, ही चांगली गोष्ट आहे. परंतु सुप्रीम कोर्टाचे न्यायाधिशच सांगतात की, या देशाला आता देवही वाचवू शकणार नाही, तर तिथे या बिननावी लेखकाचा काय पाड लागणार? कठीण दिवसांचे जागतिकीकरण होत चालले आहे. फाटलेल्या आभाळाला एक वेळ ठिगळ लावता येईल पण तुम्ही ओझोनच फाडून ठेवलाय, आता होरपळून मरा. असे ते पत्रात लिहितात.

अशा प्रकारे पत्रांमधून कादंबरीची, कादंबरीतील पात्रांची, कादंबरीच्या वाचकांची, प्रतिक्रियांची माहिती क्रमश: कादंबरीमध्ये आलेली आहे. यातून कादंबरीचे कथानक बरेच समोर येते.

## २ब.३ चर्चेतून समोर येणारे कथानक :

क्रमश: कादंबरीत मुंबईच्या विविध भागात, विविध ठिकाणी घडलेल्या चर्चाही संवादाच्या रूपाने आलेल्या आहेत. यातूनही कादंबरीचे कथानक समोर येते. ते कथानक पुढीलप्रमाणे आहे :

**चर्चा क्रमांक 1**

ही चर्चा दुपारी 3.30 वाजता संयमनगर झोपडपट्टी, घाटकोपर येथील आहे. यात मामू आणि थोट्या चर्चा करतात. मामू बाळू कासार घोड्यावरून मंत्रालयात का गेला असेल असा प्रश्न मामू थोट्याला विचारतो. थोट्या बाळू कमरेला तलवार घेऊन मंत्रालयात गेल्याचे सांगतो. त्याच्या झोपडपट्टीवर बुलडोझर फिरवणार असल्याचे सांगतो. आता आपले काही खरे नाही. नगरसेवक गायब झाला आहे. आपण आपले बिराड घेऊन निघून जाऊ, असे शेवटी मामू सांगतो.

चर्चा क्रमाक दोन ही दुपारी एक वाजता ग्लोबल इन्फोकॉमच्या वरळी ऑफिससमोरील आहे. यातील पहिली आणि दुसरी पीआरओविषयी चर्चा करतात. ह्यात पहिलीचा हात गरम लागतो, तेव्हा दुसरी तिला घरी जायला सांगते. त्याऐवजी त्या तिथेच बसतात. तेव्हा दुसरी तिला नीट खात-पीत जा असे सांगते.

चर्चा क्रमांक तीन ही सायंकाळी 4 वाजता न्यू स्टाईल हेअर कटींग सलून, अॅन्टाप हिल इथे घडते. समीलच्या सलूनवर भाई आलेला आहे. तो भाईला खूप दिवसांनी आल्याचे सांगतो, तेव्हा भाई त्याला आपण तडीपार होतो, असे सांगतात. भाई सुधीरला मारण्यास 20 हजार रुपये देईन असे सलीमला सांगतात. सलीम ते टाळतो. नंतर ते दाऊन, गोध्रा हत्यांकांडावर चर्चा करतात. शेवटी अशात गरीबच मरतो, असे सलीम सांगतो. सलीम मुसलमानांचीच बाजू घेणार, असे भाई बालेतो तेव्हा सलीम सांगतो की, आपल्या मुलीने हिंदू भंडारी बरोबर लग्न केले आहे. तेव्हा त्याच्या समाजाने गोंधळ घातला, तेव्हा आपणच त्याला जावई म्हणून स्वीकारल्याचे सलीम सांगतो. त्यांचे आता ठीक चालले आहे. शेवटी भाईच्या हजामतचे पैसे घ्यायला सलीम नकार देतो. परंतु भाई त्याच्या हातावर शंभर रुपये देतो आणि त्यातील पन्नास फकीराला द्यायला सांगतो.

चर्चा क्रमांक 4 ही आनंद स्टुडिओ मध्ये रात्रीच्या 8.30 वाजता घडते. पूर्वी ऑडिशनसाठी आलेली आहे. ती सरांना ऑडिशन कधी आहे, असे विचारते, तेव्हा ते तिला वाट बघायला सांगतात. घरी जायला उशीर होणार असल्याने ती उद्या यायची विचारणा करते, तेव्हा सर तिला जायला आणि उद्या येण्याची गरज नाही असे सांगतात. ऑडिशन 12.00 पर्यंत चालते. ज्या मुलींना हे शक्य नाही, त्यांनी ऑडिशन देऊ नये, असेही ते बोलतात. नंतर पूर्वा त्यांना बोलण्याचा प्रयत्न करते, तेव्हा ते तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतात.

चर्चा क्रमांक 5 ही 9.00 वाजता अंधेरी स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक 1 वरची आहे. ही चर्चा पूर्वा आणि हर्षा यांच्यातील आहे. पूर्वा हर्षाला ऑडिशनच्या वेळी आलेला अनुभव सांगते, तेव्हा हर्षा या क्षेत्रातील स्त्रीलंपट पुरुषांबद्दल चीड व्यक्त करते. शेवटी पूर्वाच्या टॅलेन्टमुळे तिला नक्की यश मिळेल, असे ती सांगते. बाळू कासार वेड्याच्या इस्पितळातून बाहेर आला, तर या ऑडिशनवाल्यांच्या छाताडावरच घोडे नाचवायला लावणार, असे शेवटी हर्षा सांगते.

चर्चा क्रमांक 6 ही चर्चगेट भाईंदर येथे सायंकाळी 6.35 वाजता ट्रेनच्या लेडिज कंपार्टमेंटमध्ये घडते. पहिली आणि दुसरी यांच्यामध्ये ही चर्चा घडते. पहिलीच्या डोळ्यांभोवती काळे डाग आले आहेत. त्याचे कारण दुसरी विचारते, तेव्हा हल्ली झोप नीट

होत नसल्याचे ती सांगते. पहिलीने नवऱ्या तिच्या कमाईवर नवरा इतर बायकांबरोबर संबंध ठेवत असल्याचे कारण सांगून घटस्फोट घेतल्याचे सांगते. याचा आपल्या 12 वर्षांच्या मुलीवर काय परिणाम झाला असेल, याची चिंता वाटत असल्याचे पहिली सांगते. आपल्या नवऱ्याने दुसरे लग्न केले असून आपल्यालाही एखादा संभोगासाठी पुरुष असल्यास कळव, असे ती दुसरीला सांगते. या गोष्टीमुळे दुसरीला तिचे हे बोलणे आश्चर्यकारक आणि कमाल वाटते.

चर्चा क्रमांक 7 ही लोकमान्य सेवा ग्रंथालय येथील ग्रंथपाल, टक्कलवाले आणि एक यांच्यातील सायंकाळी 5.00 वाजताची आहे. यामध्ये एक ग्रंथपालाला दिनवार्ताचा अंक आहे का, असे विचारतो, तेव्हा ते टक्कटलवाल्याकडे असल्याचे सांगतात. एक टक्कलवाल्याकडे जातो. त्यांच्यामध्ये पुढील संवाद होतो. ते दोघेही क्रमश: कादंबरीबद्दल बोलतात. कादंबरीला कथानक नाही, असे एक कळवतो. या कादंबरीतील आशयाशी तुमचा काय संबंध असे एकला विचारले जाते, तेव्हा तो सांगतो की त्यांच्या कॉलेजात पूर्वा नावाची मुलगी गॅदरींगमध्ये गाणे म्हणायची. या कादंबरीतील पूर्वाचे ऑडिशन झाली की नाही हे जाणून घ्यायची उत्सुकता असल्याचे ते सांगतात. तुम्ही वकील होता का, असे विचारल्यानंतर टक्कलवाले होतो, परंतु त्यांच्या कोर्टाच्या न्यायाधिशाला लाच घेताना पकडल्याने त्यांनी वकिली सोडून इंग्रजीचे क्लासेस चालू केल्याचे सांगतात. पूर्वाही बेजकर क्लासेसमध्ये जायची, असे सांगतात, तेव्हा आमच्या क्लासेसमध्ये गायनाला परवानगी नसल्याचे ते सांगतात. त्यानंतर त्यांच्यामध्ये कादंबरीबद्दल चर्चा होते. कादंबरीचे मागील दोन अंक गावी गेल्यामुळे वाचता आले नसल्याचे एक सांगतो. दहावे प्रकरण छापले गेले नसल्याचे ते टक्कलवाल्याला कळवतात, तेव्हा ते सांगतात काही कारणांनी नसेल छापले. याच्या कारणांबद्दल दोघेही विविध तर्क देतात.

चर्चा क्रमांक आठ ही न्यू स्टाईल हेअर कटिंग सलून येथे रात्रीच्या 10.00 वाजता घडते. ही चर्चा सलीम आणि आमदार सुधीर यांच्यातील आहे. सुधीर त्याच्याकडे मालिश करायला आलेला आहे. तो त्याला भाईबद्दल विचारतो. तो येऊन गेल्याचे सुधीरला सांगतो. गँगस्टरही आता आमदार होतात, असे भाई बोलल्याचे सलीम सुधीरला सांगतो. नंतर सुधीर त्याला आपण घर सोडल्याचे सांगतो.

चर्चा क्रमांक नऊ ही रात्री 11.00 वाजता उल्हासनगर स्टेशनजवळच्या झोपडपट्टीमध्ये घडते. ही चर्चा मामा आणि थोट्या यांच्यातील आहे. बाबासाहेबांचा पुतळा जाळल्यामुळे डेक्कन क्वीन जाळल्याच्या घटनेबद्दल ते चर्चा करतात. त्यामध्ये बाळू कासार होता का, असे मामू विचारतो, तेव्हा थोट्या माहीत नाही, असे सांगतो. बाळूकडे घोडा असल्यामुळे त्याला लोकलच्या खस्ता खाव्या लागत नाही, असे मामू सांगतो, तेव्हा थोट्या त्याला आपणही घोडा घ्यायचा सल्ला देतो. तेव्हा मामू त्याला सांगतो, इथे सायकल चालवायीच बोंबाबोंब आहे, तर घोडा कुठला चालवणार?

चर्चा क्रमांक 10 ही गिरगाव चौपाटी येथे सायंकाळी 6.30 वाजता पहिली आणि दुसरीमध्ये घडते. पहिली दुसरीला तिची मुलगी 17 वर्षांच्या मुलाच्या प्रेमात पडल्याचे सांगते. त्यानंतर पहिली प्रेमाबद्दल चांगले बोलायला लागते, तेव्हा दुसरीला याचे आश्चर्य वाटते. त्यावेळी

पहिली सांगते की, मी पुरुषांबद्दल वाईट बोलते. प्रेम हे चांगलेच असते. माझ्या मुलीने निवडलेला मुलगा चांगला की, वाईट देव जाणे! असे ती शेवटी बोलते.

चर्चा क्रमांक 11 ही संध्याकाळी 5.00 वाजता गुरुजीच्या घरी घडते. गुरुजी पूर्वाला रफीसाहेबांनी गायिलेल्या गझलेबद्दल सांगतात. तिने गायनाचा चांगला सराव करावा. झटपट प्रसिद्ध होण्यापेक्षा गायनाची चांगली तयारी करावी, असा सल्ला ते पूर्वाला देताना दिसतात.

चर्चा क्रमांक 12 ही ग्लोबल इन्फोकॉम, वरळी येथील ऑफिसमध्ये लंच टाईममध्ये घडते. ही चर्चा पहिली आणि दुसरीमध्ये घडते. क्रमशः कादंबरीतील खानावळवाल्याच्या बायकोला फिट्स येत असल्याबद्दल दुसरीला तिची काळजी वाटत असल्याचे ती पहिलीला सांगते. नंतर ते पीआरओविषयी चर्चा करतात. त्याने पाठवलेला अश्लिल संदेश पहिली दुसरीला वाचून दाखवते.

चर्चा क्रमांक 13 ही सायंकाळी 5.00 वाजता लोकमान्य सेवा ग्रंथालयात टक्कलवाले आणि एक यांच्यामध्ये घडते. एक गावी कोकणात गेला होता, याबद्दल सांगतो. नंतर ते कोकणाची आणि दिनवार्ताबद्दल चर्चा करतात. कादंबरीत चौदाव्या प्रकरणात त्या मुलीने पहिलीमध्ये नापास झाल्यामुळे आत्महत्या केल्याचे टक्कलवाले सांगतात. एक कादबंरीतील पूर्वाबद्दल विचारतो, तेव्हा तिचे स्ट्रगल संपले असावे. म्हणून लेखकाने तिला कादंबरीतून गायब केले असेल, असे टक्कलवाले सांगतात.

चर्चा क्रमांक 14 ही सलीमच्या सलूनमध्ये दुपारी 12.00 वाजता घडते. सलीम आणि भाई यांच्यामध्ये ही चर्चा घडते. सलीम चहा मागवतो, तेव्हा भाई चहाऐवजी थंड मागवायला सांगतो. नंतर ते सुधीरने बारवर बंदी आणल्याची चर्चा करतात. सलीम भाईला राजकारणात जायचा सल्ला देतो, तेव्हा भाई त्याला होकार देतो. पुढे फोनवर बोलत भाई आमदाराला शिव्या देतात.

चर्चा क्रमांक 15 ही रात्री 10.00 वाजता उल्हासनगर स्टेशनजवळच्या झोपडपट्टीमध्ये मामू आणि थोट्या यांच्यात घडते. ते दारू प्यायला गेले आहेत. मामूच्या मुलाला नोकरी लागल्याने तो खुश आहे. त्यानंतर ते गटारामध्ये काम करायचे दुष्परिणाम सांगतात. शेवटी थोट्या मामूला बाळू कासाराचे काय झाले, असे विचारतो, तेव्हा मामू म्हणतो गटारात पडला असेल कुठल्या तरी?

पुढील चर्चा क्रमांक 16 मध्ये लेडिज हॉस्टेलमध्ये रविवारी सकाळी पहिली आणि दुसरी यांच्यामध्ये घडते. त्यांच्यामधील प्रेमसंबंधांमुळे कंपनीमध्ये सुरू असलेल्या चर्चेबद्दल त्या बोलतात. त्यानंतर पहिलीच्या मुलीचे 17 वर्षाच्या मुलाबरोबर लग्न करण्याचे निश्चित केले असून तिला नकार दिल्यास ती रेल्वे ट्रॅकवर जीव देणारे अशी धमकी दिल्याचे पहिली सांगते. त्यानंतर त्या दोघींमध्ये शारीरिक संबंध येतो.

चर्चा क्रमांक 17 ही पूर्वा आणि हर्षा यांच्यातील सकाळी 10.00 वाजताची आहे. पूर्वा आज खूप आनंदात आहे. तिला एका 'तराने नये पुराने'मध्ये काम मिळाले आहे. या भंगार कार्यक्रमात काम मिळण्यात आनंद नाही, असे हर्षा तिला समजावून सांगते. त्यांची अशीच चर्चा सुरू असते. त्यानंतर त्या शिरा खायला मागवतात.

चर्चा क्रमांक 18 ही लोकमान्य सेवा ग्रंथालय येथे संध्याकाळी 5.30 वाजता घडते. टक्कलवाले सुरुवातीला राजकारणावर चर्चा करतात. सरकारच्या प्रत्येक कामात मदत करण्याच्या वृत्तीवर ते टीका करतात. नंतर त्यांची चर्चा बाळू कासारकडे वळते. तो अंडरवर्ल्डच्या मदतीने चर्चगेट परिसरात 100 आणि वरळी परिसरात 50 बॉम्ब टाकणार आहे, असे टक्कलवाले सांगतात. नंतर टक्कलवाले एकला विचारतात की, त्याने पूर्वासमोर आपले प्रेम कबूल का केले नाही? त्यावर एक सांगतो की, तिला त्याची जाणीव होईल, असे त्याला वाटले होते. तिने एकचा पूर्ण वापर केला असे टक्कलवाले एकला सांगतात. एकला ती सोडून गेली याचे दु:ख वाटत नाही, तर तिने गायन सोडले याचे त्याला जास्त वाईट वाटल्याचे तो टक्कलवाल्याला सांगतो.

चर्चा क्रमांक 19 ही उल्हासनगर स्टेशनच्या फ्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर दुपारी 2.00 वाजता घडते. थोट्या आणि मामू यांच्यामध्ये गटारात पडून मेलेल्या जगन्नाथ आणि सूर्यवंशीबद्दल चर्चा होते. सफाई कामगारांचे प्रश्न आणि त्याकडे कोणीही लक्ष देत नाही, अशी ते चर्चा करतात.

चर्चा क्रमांक 20 ही लोटलीकराच्या घरी पहिली आणि दुसरी यांच्यामध्ये दुपारी 3.00 वाजता घडते. लोटलीकरांकडे पहिली आणि दुसरी येतात. त्यांना लोटलीकर आपली मुलगी आणि जावई कसा त्रास देतात, याबद्दल सांगतात. पहिली आणि दुसरी त्यांना धीर देतात.

चर्चा क्रमांक 21 ही मनोरमा आणि आत्माराम यांच्यामध्ये सिनियर सिटीझन्य पार्कमध्ये सायंकाळी 6.00 वाजता घडते. मनोरमा दिनवार्ता पाक्षिक बंद करायला सांगते. त्यांनी त्यात बढेबुवांचे मनाचे श्लोकवरील भाष्य येत होते म्हणून त्याची वर्गणी भरली होती. त्यावर आत्माराम ग्राहक मंचाकडे जाऊन तक्रार करायची का, असे विचारतो. वर्गणी परत मिळणार नाही, याची जाणीव मनोरमा करून देते. 22 व्या प्रकरणात लेखकाने राज्याचे वनमंत्र्यांनी रेंज फॉरेस्ट ऑफिसरच्या बदलीसाठी 1 लाख रूपये खाल्याची माहिती त्यात दिलेली असते. मनोरमा सांगते की, ते तर तुळशीची माळ घालतात, त्यांच्या गळ्यात तर माळ आहे. त्यावेही आत्माराम सांगतो की, गळ्यात माळ असल्यावर पैसे खाता येत नाही, असे नाही.

चर्चा क्रमांक 22 ही ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये दुपारी 3.00 वाजता साठ्ये आणि अण्णा यांच्यामध्ये घडते. अण्णांच्या पुतण्याला पोटात गॅसेस झाल्याचे साठ्ये सांगतात. तो बँकेत नोकरीला असून ती बँक बंद पडणार असल्याचे अण्णा सांगतात. तेव्हा बँक बंद पडण्याच्या कारणांवर त्यांची चर्चा चालते. नंतर ते क्रमश: कादंबरीवर चर्चा करतात. बाविसाव्या प्रकरणात वनमंत्र्याने केलेल्या भ्रष्टाचाराची माहिती दिली असल्याचे अण्णा सांगतात. नंतर साठ्ये वनमंत्री बाळू कासारपेक्षा पावरफुल असल्याचे सांगतात.

चर्चा क्रमांक 23 ही हर्षा आणि पूर्वा यांच्यातील बसस्टॉपवरील सकाळी 9.00 वाजताची आहे. पूर्वाला चार फिल्मस्मध्ये गाणे गाण्याची संधी मिळाल्यामुळे ती खुश आहे. परंतु तिच्याबद्दल आणि वनमंत्र्याबद्दल काहीबाही कानावर आल्याचे हर्षा तिला सांगते, तेव्हा हे सगळे अफवा असल्याचे पूर्वा सांगते. वनमंत्री तिला हिंदी फिल्ममध्ये काम देणार आहेत, असे ती हर्षाला कळवते. ती हर्षाला शिरा खाऊ घालू इच्छिते. परंतु हर्षाला जाण्याची घाई असल्याने ती निघून जाते.

चर्चा क्रमांक 24 पहिली आणि दुसरीमध्ये सायंकाळी 7.00 वाजता दुसरीच्या खोलीवर घडते. लोटलीकरांच्या मुलीला ठोकायचे का, असे पहिली दुसरीला विचारते. दुसरी आधी त्यांना समजावनू सांगू, नाही ऐकले तर पोलिसात तक्रार करू आणि तरीही नाही ऐकले तर त्यांचे जगणे हराम करू असे सांगते. त्यावेळी आता माझी पार्टनर शोभतेस, असे पहिली दुसरीला सांगते.

चर्चा क्रमांक 25 ही ज्युपिटर हॉस्पिटलच्या व्हिजिटर्स रूममध्ये अण्णा आणि साठ्ये यांच्यामध्ये सायंकाळी 5.00 वाजता घडते. अण्णांच्या पुतण्याची ऐजिओप्लोस्टी करावी लागणार असे साठ्ये सांगतात. त्यासाठी दीड-दोन लाख खर्च येणार अशी माहिती साठ्ये देतात. तेव्हा पैशांची चिंता नाही, असे अण्णा सांगतात. त्यावेळी साठ्ये सांगतात की, ज्यांना पैशांची चिंता नाही त्यांना बाळू कासारने धमकी दिली आहे. त्यांना पैशांची चिंता नाही त्यांनी आपल्या मिळकतीपैकी 20 टक्के रक्कम आम्ही तुमच्या सोबत या संस्थेला द्यायची आहे. असे नाही केले, तर त्याच्या कामाच्या ठिकाणी बाळू कासार त्याचे घोडे नाचवणार आहे. नंतर आपण या फालतू कादंबरीवर का चर्चा करतोय, असा प्रश्न अण्णा विचारतात. तेव्हा साठ्ये सांगतात की, तुम्ही तुमच्या पुतण्याला पैशाची चिंता नाही, असे म्हणालात म्हणून.

चर्चा क्रमांक 26 ही टॅक्सीमधील दुपारी 12.00 वाजताची पहिली आणि दुसरीमधील आहे. दुसरी सांगते की, लोटलीकरांच्या लेकीला ठोकून आले. तिला बाळू कासारच्या घोड्याची भीती घातली. पहिली विचारते एकटीच गेली होतीस का? तेव्हा दुसरी सांगते की, शिल्पा, रमा, वैनीबाई यांही सोबत होत्या. तेव्हा पहिली सांगते की, मीही लोटलीकरच्या मुलाच्या ऑफिसात जाऊन त्याला सर्वांसमोर झापले. बापाला तो जे त्रास देतोय त्याबद्दल सर्वांसमोर सांगितले. त्याने मला पोलिसांची धमकी दिली, तेव्हा त्याला सांगितले, जे करायचे ते कर. पण बापाला त्रास दिलास तर याद राख! ऐ ऐकून दुसरीही खुश होते. दुसरी लोटीकरकडे जायचे का, असे विचारते. तेव्हा पहिली सांगते की, जावई बाकी आहे अजून.

चर्चा क्रमांक 27 ज्युपिटर हॉस्पिटलसमोरच्या हॉटेलमध्ये साठ्ये आणि अण्णा यांच्यामध्ये सकाळी 11.00 वाजता घडते. साठ्ये अण्णांना केईएम हॉस्पिटलमध्ये असलेल्या खाजगी प्रॅक्टीस न केलेल्या रवी बापट या डॉक्टरांचे उदाहरण देतात. तर डॉ. तात्याराव लहानेंनी हजारो बिनटाक्याच्या मोतीबिंदूच्या हजारो शस्त्रक्रिया केल्याचे साठ्ये सांगतात. तेव्हा अण्सा त्याला मूर्ख म्हणतात. डॉक्टरने व्याधी करी करावी आणि त्याबद्दल चोख पैसा घ्यायला हवा. त्यानंतर साठ्ये अण्णांच्या पुतण्यावर सुरू असलेल्या फास्ट फॉरवर्ड कंपनीला अनड्यू फेवर दिल्याबद्दल केस चालू आहे, त्यामुळे त्याचा हार्ट वर-खाली होत आहे, असे साठ्ये सांगतात. त्यावेळी अण्णा त्यांना शुभ बोलायला सांगतात. तो निकाल पुतण्याच्या बाजूने लागावा म्हणून ऑबेरॉय हॉटेलमध्ये चौकशीवाल्यांना पार्टीला घेऊन गेल्याचे अण्णा सांगतात.

चर्चा क्रमांक 28 मनोरमा आणि आत्माराम यांच्यामध्ये रात्री 10.30 वाजता ढेरे दांपत्याच्या बेडरूममध्ये घडते. ते पॉर्न सिडी बघून त्याबद्दल चर्चा करतात. बायकांनी असे असावे असे आत्माराम आपल्या बायकोला सांगतात. याचे त्यांना डॉलरमध्ये पैसे मिळतात, अशीही ते माहिती देतात. ही सीडी बघायला मलाही छान वाटते, असे मनोरमा नवऱ्याला सांगते.

मध्येच सीडीतील घोड्याला बघून बाळू कासारच्या घोड्याची आठवण काढते, तेव्हा आत्माराम तिला झोपायला सांगतो.

चर्चा क्रमांक 29 ही पूर्वा स्टुडिओमध्ये दुपारी 3.00 वाजता घडते. पूर्वा तिथून हर्षाला फोन करते. ती वनमंत्र्याने आपल्यावर हात टाकण्याचा प्रयत्न केला आणि हर्षा सांगत होती, ते खरे होते असे सांगते. तिला एकटे वाटत असल्यामुळे हर्षाला ती भेटण्याबद्दल सांगते, तेव्हा तिला घरी भेटू पण तू धीर धर असे सांगते.

## २ब.४ कादंबरीतील पात्रचित्रण :

**लेखक :**

या कादंबरीचा लेखक बिननावी लेखक या नावाने कादंबरीमध्ये येतो. त्याची बायको-मुले गावी राहत असतात. शहरामध्ये तो एकटाच राहत असतो. खानावळवाल्या मित्राकडे तो जेवणासाठी जात असतो. चार महिन्याचे बिल थकल्यामुळे तो त्याच्या दिनवार्ता या पाक्षिकासाठी कादंबरी लिहितो. या कादंबरीमधून तो आपल्या भावना, आपल्या आजूबाजूच्या घटना, पात्रे यांची वास्तववादी मांडणी करतो. तो पापभिरू स्वभावाचा आहे. खानावळवाल्या मित्राच्या बायकोकडे एकदा त्याने वाईट नजरेने पाहिलेले आहे, हे मित्राला कळले हे जाणून त्याला वाईट वाटते. त्याची बायको त्याच्याकडे शारीरिक सुखाची मागणी करते, तेव्हा तो मध्येच निघून येतो. तो संवेदनशील स्वभावाचा आहे. तो लेखक म्हणून आणि कादंबरीतील एक पात्र म्हणून अशा दुहेरी भूमिकेतून भेटतो.

**खानावळवाला मित्र :**

हा नपुंसक आहे. त्याच्या घरच्यांनी त्याचे हे नपुंसकत्व लपवून त्याचे लग्न लावलेले असते. त्याला इतरांच्या मनातले जाणून घेण्याची विद्या हस्तगत असते. परंतु त्याला हे वरदान न वाटता अभिशापच वाटतो. त्याने लग्नाच्या पहिल्या रात्रीनंतर बायकोला हातही लावलेला नाही. तो खानावळ चालवतो. हौस म्हणून दिनवार्ता या पाक्षिकाचे संपादक म्हणूनही तो काम पाहतो. खानावळीमध्ये येणारे लोक त्याच्याबद्दल आणि त्याच्या बायकोबद्दल काय विचार करतात, हे त्याला समजते, तरीही तो काहीही बोलू शकत नाही. याचा विचार करत मनातल्या मनात तो खंगत असतो. लेखकमित्राकडे तो त्याच्या बायकोसारखे पात्र कादंबरीमध्ये टाकून तिच्यासोबत अन्य पुरुष चाळे करतानाचा प्रसंग कादंबरीत रेखाटायला सांगतो. यातून त्याची हतबलता आणि मानसिकता लक्षात येते.

**खानावळवाल्याची बायको :**

ही अतिशय गरीब घरातील आहे. सासरचे लोक तिला पती नपुंसक आहे, हे न सांगता तिचे लग्न लावतात. तरीदेखील ती जन्मभर त्याच्यासोबत संसार करते. तिच्या पतीने तिला पहिल्या रात्रीनंतर कधीच हात लावलेला नाही. त्याच्यामध्ये पुरुषबीज कधीच निर्माण होऊ शकणार नाही, याची तिला तेव्हाच जाणीव होते. खानावळीमध्ये जेवण बनवणे, ते सर्वांना वाढणे हे काम ती करत असते. ती बी. ए. पदवीधर आहे.  तरीही ती संसार सोडून कोणासोबत पळून जात नाही. आपल्या पतीशीच ती एकनिष्ठ राहते. पती हाच परमेश्वर ही तिची भावना आहे. आपल्या नवऱ्याला सर्वांच्या मनातले कळते, त्यामुळे त्याला होणाऱ्या

मानसिक वेदना ती जाणून आहे. ती सर्व पुरुषांना मूल समजते. मानसिकदृष्ट्या एकट्या पडलेल्या दोन प्रौढ स्त्रिया एकमेकींना शारीरिक आणि मानसिक प्रेम देतात, हे वाईट आहे, असे तिला वाटते. ती आपल्या लैंगिक वासना दडवून ठेवून आपल्या एकट्या पडलेल्या नपुंसक पतीशी एकनिष्ठ राहते. शेवटी लैंगिक भावनांचे दमन केल्यामुळे ती वेडी होते. त्यामुळे तिचा नवरा तिला घरामध्ये डांबून ठेवतो.

**बाळू कासार :**

बाळू कासार ही व्यक्तिरेखा कादंबरीभर वावरताना दिसते. तो घोडा घेऊन मंत्रालयात जातो, तेव्हा तो वेडा आहे, असे समजून त्याला वेड्याच्या इस्पितळात दाखल केले जाते. तेथून तो पळून जातो. तो नेमका कुठे गेला, याबद्दल किंवा त्याच्या एकंदरित घडामोडींबद्दल कादंबरीमध्ये सलग माहिती मिळत नाही. त्याच्या झोपडपट्टीवर लोकांनी बुलडोझर चालवलेला आहे, त्याच्या 6 वर्षांच्या पहिलीत असलेल्या मुलीने गच्चीवरून उडी मारून आत्महत्या केलेली आहे. त्यामुळे रागाच्या भरात तो मंत्रालयात जातो. तो मंत्रालयात सर्वांना भांडतो, शिव्या देतो. अंडरवर्ल्डची मदत घेऊन चर्चगेट परिसरात 100 आणि वरळी परिसरात 100 ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणण्याची तो धमकी देतो. कादंबरीमध्ये बाळू कासार हा अन्यायाच्या विरोधात लढणारी प्रेरणा, वृत्ती या प्रतिकातून वावरताना दिसतो.

**सलीम :**

सलीम हा मुस्लीम असून तो आपले सलून चालवतो. त्याच्या सलूनमध्ये भाई आणि रामराम गंडभीर, आमदार, मंत्री येत असतात. तो त्यांचे केस कापणे, मालिश करणे ही कामे करतो. सर्व जण त्याला मित्रासारखी वागणूक देत असतात. तो हुशार आणि कर्तबगार आहे. गावातले लोक त्याला मान देतात. त्याचा स्वभावही खूप चांगला आहे. दुकानातील प्रत्येक व्यक्तीसोबत त्याचे नाते सरळ आणि स्पष्ट असते. तो सर्वांशी अदबीने बोलताना दिसतो. एक प्रामाणिक, नम्र, प्रेमळ अशी सलीमची व्यक्तिरेखा या कादंबरीमध्ये आलेली आहे.

**पूर्वा आणि हर्षा :**

पूर्वा आणि हर्षा या दोघी मैत्रिणी आहेत. त्यांचे एकमेकांवर प्रेम आहे. पूर्वा आपल्या अडचणी हर्षाकडे मनमोकळेपणाने मांडते. पूर्वा ही गायनाचे गुण आणि कौशल्य असलेली तरुण मुलगी आहे. हर्षा ही तिची मैत्रिण आहे. तिला गायणाची आवड आहे. ती आनंद स्टुडिओमध्ये जाते, तेव्हा तिला विनाकारण तिथे रात्रीच्या वेळी उशिरापर्यंत थांबवले जाते. यामुळे तिने अशा लोकांपासून सावध राहावे, असा सल्ला तिची मैत्रीण हर्षा तिला देते. पूर्वाला चित्रपत्रांमध्ये गायनाची संधी मिळावी, त्यामध्ये करिअर करावे अशी इच्छा असते. अशी संधी तिला वनमंत्र्याकडून मिळते, तेव्हा ती खूप आनंदात असते. परंतु वनमंत्री चांगला माणूस नसून पूर्वाने त्याच्यापासून सावध राहावे आणि लकवर यशाच्या शिखरावर जाताना चुकीच्या मार्गाचा अवलंब करू नये असा सल्ला हर्षा पूर्वाला देते. परंतु सुरुवातीला पूर्वा हर्षाच्या या सल्ल्याकडे दुर्लक्ष करते. नंतर वनमंत्री तिच्या अंगावर हात टाकण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा हर्षाच्या बोलण्याची जाणीव पूर्वाला होते आणि ती ही गोष्ट हर्षाला फोन करून सांगते. नंतर ती फिल्म इंडस्ट्रीपासून दूर जाण्याचा निर्णय घेते. पूर्वा या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून लेखकाने शहरी जीवनातील सिनेजगताच्या झगमगाटाने भारावून गेलेल्या आणि

त्या क्षेत्रामध्ये यश मिळवण्यासाठी चुकीच्या लोकांच्या संपर्कात येणाऱ्या तरुणीचे जीवनवास्तव रेखाटले आहे. त्याचबरोबर या निमित्ताने सिनेजगतातील भीषण वास्तवही लेखकाने समोर आणले आहे.

**बेजकरसाहेब :**

बेजकरसाहेब हे ग्रंथालयात पुस्तक, मासिके, वृत्तपत्र वाचण्यासाठी येत असतात. टक्कलवाले म्हणून त्यांचा उल्लेख कादंबरीमध्ये आलेला आहे. ते पेशाने वकील असतात. परंतु त्याच्या कोटाच्या न्यायाधियांना लाच घेताना पकडल्यामुळे ते वकिलीचा व्यवसाय सोडून क्लासेस चालवतात. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देणे, त्यांना चांगल्या सवयी लावणे हे काम ते करतात. आपल्या गावाचे ते चांगले वर्णन करतात. ते कोकणातील आहेत. कोकण त्यांना स्वर्ग वाटतो. क्रमश: कादंबरीबद्दल ते चर्चा करताना दिसतात.

**सुधीर गंडभीर :**

सुधीर गंडभीर हा सलीमचा बालपणापासूनचा मित्र आहे. तो आमदार झालेला आहे, तरी आपल्या मित्राला विसरला नाही. तो केस कापण्यासाठी, मालिश करण्यासाठी सलीमकडे येत असतो. त्याने आपल्या वडिलांना आणि बहिणींना सोडले आहे. बार बंद व्हावेत म्हणून तो सरकारवर दबाव टाकतो आणि त्याच्या इच्छा पूर्ण करून घेतो. गोरगरिबांना तो मदत करताना दिसतो.

**गुरुजी :**

या कादंबरीत पूर्वाचे गुरुजी ही एक गौण व्यक्तिरेखा आलेली आहे. ती गुरुजींकडे गायणाचे क्लासेस करायला येते. सूर, ताल, आवाज याबद्दल महत्त्वाचे मार्गदर्शन ते पूर्वाला करतात. पूर्वाची स्टेजवर जाण्याची भीती तेच दूर करतात. रेकॉर्डिंगची भीती तेच नाहीशी करतात. पूर्वा त्यांना तुमची मान मी कधीच खाली जाऊ देणार नाही, असे आश्वासन देते. यावरून तिचा गुरुजींवरील विश्वास दिसून येतो. संगीतात शॉर्टकट्स न ठेवता सरावावर भर द्यायला हवा, असा त्यांचा आग्रह असतो.

**भाई** :

भाई हा सलीमचा मित्र आहे. तो सलीमकडे केस कापायला आणि मालिश करायला येतो. सुधीर गंडभीर याच्यासोबत त्याचे वाद आहेत. त्याच्याबद्दलची माहिती तो सलीमकडून काढतो. आपण राजकारणात जावे, आमदार व्हावे, अशी त्याची इच्छा असते.

**मामू आणि थोट्या :**

मामू आणि थोट्या या व्यक्तिरेखा एकत्रितपणे कादंबरीत वावरताना दिसतात. ते दोघेही सामान्य मजूर आहेत. त्यांना दारू प्यायचे व्यसन आहे. मामूचा मुलगा गटार साफ करण्याच्या कामाला लागतो. गटारामध्ये अडकून मजुरांचा मृत्यू होतो, तेव्हा मामूला चिंता वाटत असते. गटारसफाई करणाऱ्या कामगारांचे प्रश्न यांच्या रूपाने कादंबरीत येतात. त्यांच्या कामाकडे होणारे दुर्लक्ष यातून सूचित होते. कादंबरीच्या शेवटी त्यांच्या

झोपडपट्टीला आग लागते. मामू आणि थोट्या ते विझवण्याचा प्रयत्न करतात, शिव्या-शाप देतात. ते दारू पिऊन असतात.

**लोटलीकर :**

लोटलीकरांना त्यांच्या मुलाने आणि सुनेने घरातून काढून टाकले आहे. त्याच्या फ्लॅटवर कब्जा मिळवण्यासाठी, ते आपल्या नावावर करून घेण्यासाठी त्याचा मूलगा, सून आणि मुली टपलेले असतात. ते त्याला धमकी देत असतात. त्याची संपत्ती आणि फ्लॅट मुलांच्या, मुलींच्या नावावर त्याने करावे आणि प्रत्येकाकडे चार-चार महिने राहावे, असे त्याला सुचवले जाते. तो याला नकार देतो. यातूनच त्याच्या स्वाभिमानी स्वभावाची कल्पना येते. पहिली आणि दुसरी लोटलीकरांच्या मदतीला येतात. त्यांच्या सुनेला, मुलीला आणि जावयाला ते समज देतात, मारून ठीक करतात.

**आत्माराम ढेरे आणि मनोरमा ढेरे :**

आत्माराम ढेरे आणि मनोरमा ढेरे हे पती-पत्नी आहेत. ते प्रौढ आहेत. दिनवार्ता हे पाक्षिक ते दररोज विकत घेत असतात. या पाक्षिकासाठी पैसे खर्च केल्याचे त्यांना वाईट वाटते. पाक्षिकामध्ये येणारे मटक्याचे आकडे, गुप्तरोगांवरील औषधांच्या जाहिराती त्यांना चुकीच्या वाटतात. त्यामुळे कादंबरी आणि पाक्षिक बंद करण्याचे ते पत्रातून कळवतात. क्रमश: कादंबरीतील भाषेवर ते आक्षेप घेताना दिसतात. पाक्षिकामध्ये मनाचे श्लोकवरील बुवाचे विवरण येते म्हणून ते पाक्षिक विकत घेत असतात. परंतु शेवटी ते लपून पॉर्न सीडी पाहताला दिसतात. पॉर्नसाठी काम करणाऱ्या स्त्रियांना डॉलरमध्ये पैसे मिळत असल्याचे ते बायकोला सांगतात. मनोरमा ढेरे यांना ती सीडी पाहून आनंद होतो. वरून लौकिकतेचा आव आणणारे आणि आतून लैंगिक भावनांना मोकळी वाट करून देणारे असे हे दांम्पत्य या कादंबरीत यांच्या रूपाने भेटते.

**पहिली आणि दुसरी :**

हे कंपनीमध्ये एकत्र कामाला आहेत. कंपनीतील पुरुषांबद्दल त्या मोकळेपणाने चर्चा करताना दिसतात. पहिलीने आपल्या नवऱ्याला घटस्फोट दिलेला असून तिची 12 वर्षांची मुलगी 17 वर्षांच्या मुलाच्या प्रेमात पडल्याने तिला चिंता वाटते. तिला दुसरे लग्न करण्याची इच्छा नसून शारीरिक गरज पूर्ण करण्यासाठी एखादा पुरुष हवा असतो. पहिली आणि दुसरी यांच्यामध्ये शारीरिक संबंध असतात. ते लोटलीकरांच्या मुलाला, सुनेला आणि मुलींना धडा शिकवतात.

**छोटू :**

छोटू ही या कादंबरीतील गौण व्यक्तिरेखा आहे. तो सलीमच्या सलूनजवळच्या दुकानावर चहा देण्याचे काम करत असतो. तो सलीमचा जवळचा मित्र बनलेला आहे. सलीम सर्व कामे त्याच्याकडूनच करून घेतो.

## २ब.५ क्रमश: कादंबरीचे आशयसूत्र :

क्रमश: कादंबरीचे आशयसूत्र कादंबरीच्या कथानकासारखेच गुंतागुंतीचे आणि विविधांगी आहे. राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार लेखक अनेक ठिकाणी सूचित करतो. वनमंत्र्याच्या रूपाने हा भ्रष्टाचार प्रत्यक्ष रूपाने साकारतो. या भ्रष्टाचाराच्या विरोधात लढणारा एक सामान्य माणूस या रूपातून बाळू कासाराची व्यक्तिरेखा उभी राहते. ती प्रत्येक सामान्य माणसाच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात उभ्या राहण्याच्या वृत्तीचे, प्रेरणेचे प्रतीक ठरते. बाळू कासाराचा घोडा हे विद्रोहाचे, विरोधाचे, प्रतिकाराचे साधन म्हणून कादंबरीमध्ये फिरताना दिसतो. या भ्रष्टाचाराचा, आयुष्यातील समस्यांचा सामना न करता ते निमूटपणे सहन करणारी अनेक पात्रे या कादंबरीमध्ये आपल्याला भेटतात. परंतु संयमाचा बांध फुटल्यानंतर त्या हळूहळू विद्रोहाचे रूप धारण करताना दिसतात. अशी विद्रोहाची विविध रूपे आणि वेगवेगळी तीव्रता या कादंबरीमधून चित्रित झालेली आहे. खानावळवाल्याची बायको नपुंसक पती असूनही जन्मभर त्याच्यासोबत संसार करते. कोणत्याही पुरुषासोबत ती शारीरिक संबंध प्रस्थापित करत नाही. त्यामुळे शेवटी ती वेडी होते. खानावळीचा मालक आहे ती परिस्थिती रेटून पुढे नेण्याचा प्रयत्न करताना दिसतो. बाळू कासार भ्रष्टाचाराला कंटाळून मंत्रालयावर घोडा घेऊन जातो. सलीम भाऊ आणि आमदार यांच्या संघर्षामध्ये अडकतो. पूर्वा वनमंत्र्याच्या प्रलोभनांना बळी पडते, पण वेळीच सावध होते. सुधीर गंडभीर आमदार बनून प्रस्थापित राजकीय व्यवस्थेकडून आपल्या मागण्या मान्य करून घेतो. लोटलीकरांना न्याय मिळवून देण्यासाठी पहिली आणि दुसरी मदत करतात.

महानगरीय जीवनाचे चित्रण प्रामुख्याने या कादंबरीमध्ये येते. बसस्टॅाप, ग्रंथालय, रेल्वे फ्लॅटफॉर्म, ऑडिशनची जागा, सलून, खानावळ, ऑफिस, बेडरूम अशा अनेक ठिकाणी या कादंबरीचे घटनाप्रसंग घडत जातात. यातून महानगरीय जीवनाचे भौतिक वास्तव समोर येते. त्याचबरोबर यातील पात्रेही अस्सल महानगरीय असल्याची जाणीव होते. अतिवास्तववादाचा प्रभाव यातून कादंबरीवर जाणवतो. शहराचे बकालपण, पात्रांचे निराशाजनक जीवन, स्वाभाविक आणि सहज असे संवाद, मनोविश्लेषणाच्या पातळीवर चालणारे निवेदन, एकाच वेळी भौतिक आणि मानसिक पातळीवर समांतर जाणारा कादंबरीचा आशय, कादंबरीची नावीन्यपूर्ण आणि वास्तववादी भाषा यामुळे ही कादंबरी वेगळी आणि अर्थगर्भ ठरते.

महानगरीय प्रश्न मांडताना ही कादंबरी अतिवास्तववादी रूप धारण करते. भौतिक पातळीवर निर्माण झालेले प्रश्न वास्तवात सोडवता येत नाहीत, तेव्हा मानसिक पातळीवर त्या प्रश्नांचे समाधान लेखक शोधतो, मांडतो. कादंबरीमध्ये मांडलेले प्रश्न सोडवत बसण्यापेक्षा त्यांना एक संदिग्ध रूपात लेखक चित्रित करतो. या समस्यांच्या विविध पातळीवरील उलगड्यांची शक्यता लेखक यातून सूचित करतो.

बाळू कासाराची सहा वर्षांची पहिलीमध्ये शिकत असलेली मुलगी आत्महत्या करते. खानावळवाल्याची बायको स्वत:ची लैंगिक तहान तशीच तडफडत ठेवून शेवटी वेडी होते. दोन लेस्बियन स्त्रिया समाजसेवा करतात. 58 वर्षे वयाची मनोरमा ढेरे नावाची प्रौढ विवाहिता नवऱ्याबरोबर चावट सीड्या बघताना मलापण छान वाटतं असे सांगते. गायिका म्हणून स्ट्रगल करताना पूर्वा नावाच्या तरुणाीला शेवटी आपल्या तडजोडीचा पश्चात्ताप

होतो. हे महानगरीय वास्तव या कादंबरीतून पुढे येते. कादंबरीवर अतिवास्तववादाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. कादंबरीचा रचनाबंध नवा आहे. मनोविश्लेषणाच्या पातळीवर ही कादंबरी वाचकाला घेऊन जाते. बहुमुखी आणि सर्वस्पर्शी वर्णन येऊनही या कादंबरीतील निवेदन तटस्थ राहिलेले आहे. मुंबईतील महानगरीय राजकारणावरही या कादंबरीने प्रकाश टाकलेला आहे. एकिकडे गुन्हागारी पार्श्वभूमीतून राजकारणात येऊन सामाजिक कार्य करणारे राजकारणी आणि दुसरीकडे स्वच्छ प्रतिमा असल्याचे सांगून भ्रष्टाचार करणारे राजकारणी या कादंबरीत येतात. यातून एक गंभीर राजकीय चिंतन लेखकाने सूचित केल्याचे जाणवते. जनआंदोलनावरही लेखक परखड भाष्य करतो. जनआंदोलनाकडून होणारा भ्रमनिरास यातून सूचित झालेला आहे. या जनआंदोलनामुळे वान्हे झी लिंकच्या कामाला 10 वर्षे उशीर झाला आणि खर्च 1000 कोटींनी वाढला. पूल बांधून दोन वर्षे झाली, तरी जनआंदोलनवाल्यांनी दाखवलेले काहीही घडले नाही, तरीही या जनआंदोलनाला कुणी जाब विचारला नाही. हा जाब विचारला जायला हवा, असे लेखक स्पष्टपणे सांगतो. अशा प्रकारे राजकीय, सामाजिक घटनांबद्दलचे आपले मत लेखक गंभीरपणे नोंदवत जातो. महानगरातील एन. जी. ओ.चे वास्तव रूपही लेखक उघडे करतो. जैतापूर अणूऊर्जा प्रकल्पाला, तारापूर औष्णिक विद्युत केंद्राला या एन. जी. ओं.नी विरोध केला. परंतु त्यांनी सांगितले तसे काहीही झाले नाही. त्यामुळे अशा एन. जी. ओ. कडे नव्याने पाहण्याची आवश्यकता आहे, असे लेखक सांगतो.

प्रकरण बत्तीसावे छापून आल्यानंतर माधवी प्रधान-चिटणीस बहुतेक युरोप किंवा अमेरिकेच्या टूरवर गेल्या असाव्यात, असे लेखकाला वाटते. आमदार सुधीर गंडभीरच्या सगळ्या अटी शेवटी सरकार मान्य करते. डान्य बार बंद होतात. भाईची रोजी-रोटी बंद होते. हेमा व लता बेकार होतात. लोटलीकरांनी आपली बचत आणि फ्लॅट आम्ही तुमच्या सोबत या संघटनेला दान देतात. हेमा आणि लता त्या फ्लॅटमध्ये राहून म्हातार्‍याची सेवा करतात. सुधीर गंडभीरच्या माणसाने फोन करून लोटलीकरच्या जावयाला शांत केले. भाईचा सिनेमागृहामध्ये मृत्यू होतो. सुधीर, राजेश, हेमा आणि लता यांची आई हार्टअटॅकने मरण पावते. नंतर छत्तिसावे प्रकरण देऊन झाल्यानंतर कादंबरीच्या शेवटी सर्व पात्रे लेखकाला भेटतात. लेखक खानावळवाल्या मित्राच्या बायकोला भेटण्याचा विचार मनात करतो. हे जाणून खानावळवाला मित्र त्याला त्याच्या खोलीत घेऊन जातो, तेव्हा लेखक पाहतो की, खानावळवाल्या मित्राची बायको वेडी झालेली असते. तेथून लेखक सायकलवर बसून निघतो. माधवी प्रधान-चिटणीस यांच्या बंगल्याजवळ तो येतो. सलीमच्या सलूनकडे लेखक सायकल घेऊन जातो. तेथे सलीम स्वत:च स्वत:चे केस कापतो, स्वत:च स्वत:च्या काखेतले केस काढतो. लेखक सायकल घेऊन स्मशानभूमीकडे जातो. तेथे अॅडव्होकेट बेजकर बसलेले असतात. तेथे आत्महत्या केलेली मुलगी आणि दोन जिवंत मुली खेळत होत्या. बेजकर त्यांचा खेळ बघण्यात मग्न असतात. त्या स्मशानभूमीला आग लागते. ती आग मामू आणि थोट्याच्या झोपडीपर्यंत पसरते. नंतर निवेदनामध्ये लेखक भाषेवर भाष्य करतो. हर्षाच्या खांद्यावर मान टाकून पूर्वा वसंत सावंतांचे गीत गाते. रामराव गंडभीर लेखकाची सायकल अडवून तिथल्या मॉलला लेखकाला चालत प्रदक्षिणा घालायला लावतात. एका झाडाखाली लेखकाने सायकल थांबवली. तेथे प्रा. किंबहुने पारावर पद्मासनात बसले होते. अपूर्णत्वाचा स्वीकार करणे, हेच दु:ख जाणणे आहे, असे ते सांगतात.

लेखक पहिली आणि दुसरीच्या शोधात निघतो. त्या दोघी नदीमध्ये आंघोळ करीत एकमेकींशी शृंगारमग्न झालेल्या असतात. नदीच्या काठावर हेमा आणि लता लोटलीकरांचे पाय चेपत असतात. लेखक मागे वळून पाहतो, तेव्हा सायकल जागेवर नसते. एक घोडा लेखकाकडे डोळे राखून बघत होता. हा बाळू कासारचा घोडा तर नसेल, असा प्रश्न लेखकाला पडतो. लेखक शेवटी मनातल्या मनात घोड्याच्या पाठीवर मांड ठोकतो. यातून पात्रांचे संदिग्ध, मानसिक पातळीवर वावरणारे चित्रण लेखक करतो.

भाषेवरही गंभीर भाष्य लेखकाने केले आहे. भाषेला जात, धर्म नसतो. तिचा वापर कोणत्या उद्देशाने होतो, हे महत्त्वाचे आहे, असे लेखक सांगतो. भाषा हे एक नैतिक गंभीर विधान करण्याचे माध्यम म्हणून लेखक वापरतो. यातून भाषेच्या रूपाकडे तो वाचकांचे लक्ष वेधतो. पुढाऱ्यांची ढोंगाची भाषा म्हणजे मातृभाषेवरचा बलात्कारच आहे, असे परखड भाष्य लेखक करतो. दोन मैत्रिणींमधील भाषा, पिढीची बदलणारी भाषा, सफाई कामगारांची भाषा, गुंडांची भाषा, सलूनवाल्याची भाषा, प्राध्यापकाची भाषा असे अनेक भाषेची रूपे या कादंबरीमध्ये आलेली आहेत. दोन स्त्रिया एकमेकींशी एकांतामध्ये जेव्हा मोकळेपणाने आणि विश्वासाने बोलतात, तेव्हा ती भाषा सभ्य संकेतांपेक्षा, नेहमीपेक्षा वेगळीच राहते.

थोडक्यात, क्रमश: ही वेगळ्या आकृतिबंधातून साकारलेली, महानगरातील वेगवेगळ्या वर्गातील पात्रांचे चित्रण करणारी, महानगराचे एक भयान वास्तवचित्र रेखाटणारी कादंबरी आहे. या कादंबरीवर अतिवास्तववादाचा प्रभाव जाणवतो. या कादंबरीने पात्रचित्रण, आकृतिबंध, निवेदन, वातावरणनिर्मिती, कथानक, घटनाप्रसंग, भाषाशैली, आशयसूत्र या सर्व बाबतीत नावीन्य साधलेले दिसते. ही कादंबरी एकाच वेळी मानसिक आणि लौकिक पातळीवर समांतर पद्धतीने वावरताना दिसते. महानगरातील विसंगती, भ्रष्टाचार, मानवी हतबलता, विवशता, व्यसन, लैंगिक भावना, नातेसंबंध, राजकारण, भाषा या सर्वांवर ही कादंबरी मार्मिक भाष्य करताना दिसते.

## २ब.६ समारोप

क्रमश: ही वेगळ्या आकृतिबंधातून साकारलेली, महानगरातील वेगवेगळ्या वर्गातील पात्रांचे चित्रण करणारी, महानगराचे एक भयान वास्तवचित्र रेखाटणारी कादंबरी आहे. या कादंबरीवर अतिवास्तववादाचा प्रभाव जाणवतो. या कादंबरीने पात्रचित्रण, आकृतिबंध, निवेदन, वातावरणनिर्मिती, कथानक, घटनाप्रसंग, भाषाशैली, आशयसूत्र या सर्व बाबतीत नावीन्य साधलेले दिसते. ही कादंबरी एकाच वेळी मानसिक आणि लौकिक पातळीवर समांतर पद्धतीने वावरताना दिसते. महानगरातील विसंगती, भ्रष्टाचार, मानवी हतबलता, विवशता, व्यसन, लैंगिक भावना, नातेसंबंध, राजकारण, भाषा या सर्वांवर ही कादंबरी मार्मिक भाष्य करताना दिसते.

## २ब.७ सरावासाठी स्वाध्याय

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. क्रमशः ही कादंबरी कोणत्या प्रवाहातील आहे?

२. क्रमशः या कादंबरीतील अनामिक लेखक कोणत्या नावाची कादंबरी लिहितो?

३. लेखक कादंबरी का लिहितो?

४. घोड्यावर बसून मंत्रालयात कोण जातो?

५. लोटलीकर आपली बचत कोणत्या संस्थेला दान करतात?

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१. क्रमशः या कादंबरीचे कथानक तुमच्या शब्दांत सांगा.

२. क्रमशः या कादंबरीचे आशयसूत्र उलगडून दाखवा.

३. महानगरीय जीवनाचे चित्रण क्रमशः या कादंबरीत कसे रेखाटले आहे, यावर सविस्तर चर्चा करा.

४. क्रमशः या कादंबरीत आलेले सामाजिक-सांस्कृतिक वास्तव रेखाटा.

५. क्रमशः या कादंबरीतील व्यक्तिरेखांची माहिती करून द्या.

**टिपा लिहा :**

१. बाळू कासार

२. क्रमशःमधील मुंबई शहर

३. क्रमशःमधील गुन्हेगारीचे चित्रण

४. क्रमशःमधील राजकीय चित्रण

५. खानावळवाल्या मित्राची बायको

## २ब.८ संदर्भ ग्रंथ

१. जाधव रा. ग. व इतर, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', (1950 ते 2000), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती : जाने. 2010

२. डहाके वसंत आबाजी, 'मराठी समीक्षेची सद्य:स्थिती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : 2011

३. शेकडे वसंत सीताराम व इतर, 'मराठीतील ठळक वाङ्मयीन प्रवाह', प्रकाशक : सौ. जयश्री शेकडे, अहमदनगर, प्रथमावृत्ती : 2 ऑक्टो. 2010

४. थोरात हरिश्चंद्र, 'कथनात्म साहित्य आणि समीक्षा', शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती : 11 जुलै 2011

❖❖❖❖

# ३अ

## अ ) ग्रामीण साहित्य- संकल्पना व मराठीतील परंपरा

**घटक रचना**

३अ.0 उद्दिष्ट्ये

३अ.१ प्रास्ताविक

३अ.२ ग्रामीण साहित्य संकल्पना व मराठीतील परंपरा

३अ.३ समारोप

३अ.४ सरावासाठी स्वाध्याय

३अ.५ संदर्भ ग्रंथ

### ३अ.0 उद्दिष्ट्ये

या घटकातून आपणास ग्रामीण साहित्याची ओळख होईल .

- ग्रामीण साहित्याचे सवरूप व वैशिष्टे समजण्यास मदत होईल
- आजच्या धावपळीत विद्यार्थ्यांना ग्रामीण साहित्याचे महत्व समजेल .
- ग्रामीण साहित्यातून विद्यार्थ्यांना ग्रामीण चळवळी चा अभ्यास करण्यास मदत होईल .
- ग्रामीण साहित्याच्या मागे विविध प्रेरणा , आणि शेतकऱ्यांचे दु: ख, वेदना समजतील .

### ३अ.१ प्रास्ताविक

ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती व ग्रामीण बोली यांचा आविष्कार ज्या साहित्यातून होतो ते ग्रामीण साहित्य होय. ग्रामीण साहित्य प्रवाह हा १९६० नंतरचा एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह मानला जातो.आज ग्रामीण साहित्यधारेने मराठी साहित्य क्षेत्रात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.आजचं ग्रामीण साहित्य हे नव्या संवेदनशील, सर्जनशील मनाचा आविष्कार आहे.

### ३अ.२ ग्रामीण साहित्य संकल्पना व मराठीतील परंपरा

साहित्य आणि समाज यांचे नाते जवळचे आहेत. साहित्य हा समाजाचा एक घटक आहे. ते समाजाच्या विविध अंगांनी पैकी एक अंग आहे. समाजजीवनाचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले असते. साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे. साहित्याचा निर्माता आणि आशयही

समाजातच असतो. समाज जीवन वगळून साहित्याचा विचार करता येत नाही. ग्रामीण साहित्याचा अभ्यास करताना ही बाब लक्षात घ्यावी लागते. ग्रामीण साहित्य हे ग्रामीण जीवनाचा आविष्कार करणारे साहित्य आहे. ग्रामीण जीवन या साहित्याची असे सामग्री आहे.

**ग्रामीणतेचे स्वरूप**

ग्रामीणते मधील 'ग्रामीण' हा शब्द 'ग्राम' या संस्कृत शब्दावरून आलेला आहे. 'ग्राम' या सिद्ध शब्दाला 'ईण' प्रत्यय लागून 'ग्रामीण' हा साधित शब्द निर्माण झालेला आहे. 'ग्राम' या मूळ शब्दापासून तयार झालेले 'ग्राम', 'ग्रामीण' हे तत्सम शब्द आहेत. संस्कृत भाषेतील या 'ग्राम' शब्दालाच मराठीत 'गाव' असे म्हणतात.

**ग्रामीण साहित्याची संकल्पना**

या संकल्पनेत 'ग्रामीण' व 'साहित्य' असे दोन शब्द अंतर्भूत आहेत. 'ग्रामीण' हा शब्द एका विशिष्ट समाजजीवनाचा निर्देश करणारा आहे. हे समाजजीवन नागर जीवनापेक्षा वेगळे आहे.

ग्रामीण हे साहित्याचे विशेषण आहे. ते वर्णनात्मक व आशयसूचक आहे. 'ग्रामीण साहित्य' संकल्पनेच्या केंद्रस्थानी ग्रामीण समाज व संस्कृतीचे विविधांगी अनुभव विश्व आहे. या समाज संस्कृतीचे अनुभव या साहित्यातून अविष्कृत होतात. शेती व निसर्गनिष्ठ भावजीवन या साहित्यातून पहायला मिळते. ग्रामजीवनातील सर्व प्रकारच्या जीवन वास्तवाला जाणीवांना हे साहित्य मुखरित करते.

'ग्रामीण साहित्य' या संकल्पनेची नेमकी प्रकृती लक्षात येण्यासाठी आणि ग्रामीण साहित्य म्हणजे काय? हे समजून घेण्यासाठी काही व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे. मराठीत अनेक मीमांसकांनी ग्रामीण साहित्याच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातील निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे:-

१) गो. म.कुलकर्णी-ग्रामीण साहित्याची बाह्य स्वरूपी व्याख्या करावयाची झाल्यास ज्यात आजचे वा कालचे ग्रामजीवन त्याचे मनोव्यापार, सांस्कृतीत संवेदन सखोलपणे आणि सर्वांगीण स्वरूपात व्यक्त होते, असे साहित्य म्हणता येईल.

२) गो.मा.पवार- 'ग्रामीण हे विशेषण विशिष्ट लेखनात कशाचे चित्रण आहे याचा फक्त निर्देश करते. म्हणून ग्रामीण जीवनाचे मनाचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य म्हणता येते.

३) नागनाथ कोतापल्ले- 'ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य'.

४) राजन गवस- शेतीशी संबंधित असणाऱ्या, गावगाड्यात वाढलेल्या पण शोषणाला नकार देणाऱ्या, जातीपातीच्या भिंती पाडण्यास अग्रक्रम देणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, फिरते, आलुते बलुते, आदिवासी या साऱ्यांचे साहित्य म्हणजे 'कृषीजन संस्कृती'चे साहित्य.

**ग्रामीण साहित्याचे प्रयोजन**

कृषिनिष्ठ ग्रामनिष्ठ जीवन साहित्यातून व्यक्त करणे हे ग्रामीण साहित्याचे प्रमुख प्रयोजन आहे. ही संस्कृती ग्रामसंस्कृती आणि निसर्ग यांच्या प्रभावातून घडलेला ग्रामीण माणूस आणि त्यांचे भावजीवन अविष्कृत करणे, बदलत्या खेड्यांचा आणि वास्तवाचा वेध घेणे, शोषणाला नकार देत मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे साहित्य निर्माण करणे तसेच सर्वांगाने ग्रामीण माणूस जीवन आणि संस्कृती समजून घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रयोजने आहेत.

ग्रामीण साहित्य निर्मितीची प्रयोजन सांगताना श्रीराम गुंदेकर लिहितात,"शेतीवर अवलंबून असणाऱ्या, मातीशी अतूट नाळ असणाऱ्या, कष्टकरी स्त्री-पुरुषांच्या जीवन वास्तवाचे कलात्मक दर्शन घडविणे, शोषणमुक्त, भयमुक्त, समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी झटणाऱ्या किंवा अशा प्रकारच्या समाज निर्मितीची स्वप्ने पाहणाऱ्या नायक नायिकांचे चित्रण करणे, हे ग्रामीण साहित्याचे प्रयोजन आहे. या विवेचनातून ग्रामीण साहित्याच्या निर्मितीचा हेतू लक्षात येतो.

**ग्रामीण साहित्याचे महत्त्व**

देशातील बहुसंख्य समाज खेड्यात राहतो. या समाजाने भारतीय संस्कृतीला आकार दिला. ही भारतीय संस्कृती जगात विविधतेत एकता असणारी संस्कृती म्हणून ओळखली गेली. असे असताना या जगण्याचे संस्कृतीचे चित्रवड साहित्यातून म्हणावे तसे होत नव्हते. या साहित्यात मध्यमवर्गीय जाणिवांचे चित्रण मोठ्या प्रमाणात होते. ज्यांना 1920 नंतर छेद दिला गेला. वेगवेगळ्या कारणांनी खेड्यातील सगळ्याचे महत्त्व लक्षात आले आणि लेखकांचे लक्ष या दुर्लक्षित जगण्याकडे वेधले गेले. त्यातून ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला जाणीवपूर्वक सुरुवात झाली.

ग्रामीणता हे एक वाङमयीन मूल्य नसून ती एक वृत्ती आहे. या वृत्तीचा रोमँटिक वृत्तीशी फार जवळचा संबंध आहे मराठी साहित्यात नागरी मन या वृत्तीची नेहमीच पोझ घेत आलेले आहे. तर ग्रामीण मन या वृत्तीशी कलावादी पिंगा घालीत आले आहे. मानवी मनाच्या मूलभूत प्रेरणा जेव्हा ग्रामीण साहित्यातून आपण शोधू पाहातो तेव्हा कलाबाह्य मुल्ये हाताशी येतात ती या ग्रामीण वृत्तीतूनच आपण जेव्हा मधु मंगेश यांची कथा बाचतो तेव्हा या कथेत कर्णिकांचे नागरी मन सातत्याने ग्रामीण वृत्तीची पोझ  घेताना आपणास दिसते. 'कोकणी ग SS वस्ती' या संग्रहात त्यांनी वर्णन केलेली कोकणी माणसे वस्तुतः माडगूळकरांच्या माणसांपेक्षा वेगळी वाटत नाहीत. या माणसांचे समग्र जीवन, त्यांच्या श्रद्धा या पारंपरिक ग्रामीण कथेच्या वळणानेच जाणाऱ्या आहेत. त्यांची 'वाट' ही कथा वाचनीय झालेली आहे. त्यातील वास्तव वस्तुतः किती तरी बोलके आहे.

मराठी ग्रामीण कथेत 'साहित्याचा मानबिंदू' होऊ पहाणारे व्यंकटेश माडगूळकर यांचे ग्रामीण मन आपल्या या वृत्तीशी नेहमीच कलावादी पिंगा घालताना आपण पहातो. माडगूळकरांची कथा खेड्यातील नाट्य टिपून घेण्यात समर्थ आहे. त्याचा ग्रामीण कथेतील प्रवास वळणावळणाने अंतर्मुख होत आला आहे. माडगूळकरांची 'काळी आई' सारखी कथा जेव्हा

आपण तपासून पहातो, तेव्हा हाताशी येते ती भावरंजित वृत्ती. ती आपल्या ग्रामीण वृत्तीशी कलावादी पिंगा घालताना दिसते.

'माणदेशी माणसं' मधील प्रत्येक व्यक्तिचित्रण अंगभूत निवेदनशैलीतून प्रवास करते. 'झेल्या' किंवा 'धर्मा रामोशी' यातील निवेदन पाहिले की लक्षात येते की यांत माणसांच्या चित्रणाला गोष्टीपेक्षा अधिक महत्त्व आहे. हे लक्षात घ्यावे लागते ग्रामीण साहित्य लेखकाचे ग्रामीण स्थळी वास्तव्य, त्याचा व्यवसाय व त्याचे लौकिक चरित्र या कलाबाह्य मूल्याने आपण जेव्हा तपासतो, तेव्हा देखील ग्रामीण वृत्ती हाताशी येते.

कोणतीही कलाकृती नागरी परिसरातून ग्रामीण अनुभव चितारू शकते. रा. रं. बोराडे यांच्या पाचोळा या कादंबरीतील ग्रामीण अनुभव भेजा जिका छानादी तो नागरी परिसरातून आधार घेतलेला वाटतो. गो. नी. दांडेकरांसारखा लेखक जेव्हा पवनाकाठचा घोटी' सारखी कादंवरी लिहितो, तेव्हा ती शैली निवदेन ग्रामीण आहे. त्यातून व्यक्त होऊ पहाणारे मन हे एक पांढरपेशी नागरी असे मन आहे.

याच ग्रामीण वृत्तीने मराठी आधुनिक कविता समृद्ध झालेली आपल्याला पहायला मिळते. केशवसुतांच्या कवितेत येणारा निसर्ग हा जरी ऐंद्रीय पातळीवर जाणारा नसला तरी त्याने केशवसुत या व्यक्तीचा 'मूड' अंतिमतः चित्रित केला आहे. 'भृंग' ही कविता तत्त्वचिंतनपर आहे आणि त्याहीपेक्षा ती अधिक केशवसुतीय वृत्तीतून जन्मलेली आहे. याचाच अर्थ त्यांच्या रोमँटिक संप्रदायाशी ती अधिक प्रामाणिक राहिली आहे. बालकवींच्या कवितेत निसर्ग खऱ्या अर्थाने जिवंत झाला असे जेव्हा आपणम्हणतो, तेव्हा बालकवींच्या अपूर्व संवेदनाक्षम व्यक्तिमत्त्वाचा प्रकाश त्यात पडला हेच सूचित होते. बालकवींच्या अंतर्बाह्य वृत्तीनेच या कवितेला आपलेसे केले कलाबध्द केले. केशवसुतांनंतरचे निसर्ग कवितेतील हे संक्रमण आमूलाग्र असले तरी त्याचा संबंध शेवटी केशवसुत रोमँटिक संप्रदायाशीच आहे. रविकिरण मंडळातील जानपदगीते जी सामान्य पातळीतून सामान्यजनांसाठी पुढे आली त्यांच्या मागे देखील याच वृत्तीचा समावेश आहे. 'मीठभाकर' हे नाव ग्रामीणतेचा बुरखा पांघरून शेवटी रोमँटिक वृत्तीचाच अविष्कार करताना आपण पहातो, तेव्हा या वृत्तीचे आवर्तन सहज ओळखण्याजोगे वाटते.

कादंबरी-युगातील ह. ना. आपटे यांचा काळ, फडके-खांडेकर युग, पेंडसे-दांडेकर काल ते कादंबरीचा वास्तवकाल कल्पनारम्य, सामाजिक आणि राजकीय पातळीवर राहून देखील ग्रामीण वृत्तीला जवळ करणारा राहिला आहे.

कलावंताच्या ग्रामीण अनुभूतीचा विचार जेव्हा आपण त्यांच्या आविष्कारपद्धतीतून करतो, तेव्हा आशय अभिव्यक्तीच्या अद्वैतापेक्षा ग्रामीण वृत्तीचाच प्रादुर्भाव आपल्या मनावर अधिक पडतो. ग्रामीण शैली, निवेदन व ग्रामीण भाषा या बाह्य उपाधीने ग्रामीण कलाकृतीचा तोडवळा ओळखणे कठीण जाणार नाही. पण कलावंताच्या ग्रामीण वृत्तीतून जोपर्यंत ती कलाकृती ढवळून निघत नाही, तोपर्यंत तिची कलात्मक पातळी उंचावू शकत नाही. शंकर पाटलांच्या 'वळीव' आणि 'ऊन' यामधील कथा ग्रामीण वृत्तीतून ढवळून निघून कलासंपन्न ठरतात. ग्रामीण परिसरातून, बोलीतून ग्रामीण कलाकृती घडते याचा अर्थ ग्रामीण वृत्ती या परिसरातून, बोलीतून बळण घेते असा होत नाही. ग्रामीण व्यक्तिमत्त्व जेवढे वैविध्यपूर्ण तेवढीच ग्रामीण वृत्ती संपन्न रहाते.

ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्यात सवतासुभा नसून तो एक मानवी वृत्तीचाच अटळ असा भाग आहे. या साहित्याचा तपशील वेगळा असेल, आकार आगळा असेल, पण त्याचे मूलभूत तत्व ज्या ग्रामीण ने पछाडले आहे की एक मागची सहजप्रेरणा जाहे. ग्रामीण साहियाने जामीन मूल्य फलानादी, जीवनवादी अथवा समाजमंथनाद्वारे सिद्ध करणे जेवढे अगत्याचे, तेवढेच ज्या ग्रामीण वृत्तीतून हे साहित्य अंकुरले आहे त्या वृत्तीचे गुणधर्म तपासणे देखील महत्ताचे आहे. मातीचे गुणधर्म जसे रोपात येतात, तद्वत ग्रामीण वृत्तीच या साहित्याला सत्त्व देईल.

ग्रामीण, नागर आणि शहरी ही साहित्यकृतींना लावली जाणारी विशेषणे परस्परविरोधी नाहीत. मुळात भारतीय संस्कृतीचे, जीवनपध्दतीचे, समाजाचे, धर्माचे काही समान धर्म प्रत्येक भारतीयात आहेतच. त्यामुळे वरील तिन्ही विशेषणांनी दाखविली जाणारा आशयधर्म परस्परांत काही प्रमाणात मिसळणारच आहे..

अनुभवाची घटकसाधने (पात्रे, प्रसंग, घटना, निसर्ग इ.) ग्रामीण जीवनातील असली तरी ते ग्रामीण साहित्यच असू शकेल असे नाही. खानोलकरांचे 'सनई' हे त्याचे उदाहरण आहे. उलट बरीच घटक साधने नागर जीवनातील असूनही ते साहित्य ग्रामीण असू शकते किंवा नागरच असू शकेल असे नाही. यादवांचे 'भाकरीचे झाड', 'जरासंध' ही उदाहरणे म्हणता येतील. भाषा या घटकाच्या बाबतीतही हेच म्हणता येईल.

"ही सर्व घटक-साधने ज्या साध्यासाठी एकत्र येऊन कार्यप्रवण झालेली असतात ती हेतुकल्पना ग्रामीण असणे आवश्यक असते. 'हेतुकल्पना' ग्रामीण नसेल तर 'घटक साधने' ग्रामीण असूनही ते साहित्य ग्रामीणतेस पात्र होऊ शकत नाही", असे आनंद यादव म्हणतात. उदाहरणार्थ, चि. त्र्यं. खानोलकरयांची 'सनई' ही कथा. आनंद यादवांच्या मते निर्मितीच्या अंगाने विचार करता हेतुकल्पना हा साहित्यकृतीचा आत्मा असतो घटकसाधनांनी निर्माण होते ते या आत्म्याला मूर्तरूपात आणणारे शरीर, घटकसाधने ही साहित्याचे बाह्यरूप साधतात. 'हेतुकल्पनेला परिपूर्णता आणण्यासाठी हे रूप कार्यप्रवण झालेले असते. म्हणून 'हेतुकल्पना' ग्रामीण असेल तर घटक साधनांना ग्रामीण रंग चढतो. ती नागर बा शहरी असेल तर घटक साधनांना तसा रंग चढतो. 'हेतुकल्पना' खास ग्रामीण जीवनाच्या केंद्रस्थानाकडे जेवढ्या प्रमाणात खेचणारी असेल तेवढ्या प्रमाणात ग्रामीण साहित्यातील ग्रामीणतेच्या वेगळेपणाचे प्रमाण अधिक असू शकणार.

एखाद्या ग्रामीण कथेतील एखादे घटक-साधन कारण नसताना ग्रामीण नसेल तर तेवढ्या प्रमाणात ग्रामीण कथेच्या शारीर भागाची ग्रामीणता उणावते हे मान्य करावे लागते. पण ही ग्रामीणता शहराची आहे, आत्म्याची नव्हे. उदा. व्यंकटेश माडगूळकरांच्या प्रत्येक ग्रामीण कथेचे निवेदन नागर भाषेत असते आणि भास्कर चंदनशिव यांची प्रत्येक ग्रामीण कथा ग्रामीण भाषेतच निवेदन करत अवतरते. त्यामुळे सकृतदर्शनी तिची ग्रामीणता विशेष जाणवते. तेवढ्या प्रमाणात माडगूळकराच्या कथेची ग्रामीणता सकृतदर्शनी तरी जाणवत नाही.

आजपर्यंतचे मराठी ग्रामीण साहित्य प्रामुख्याने सामाजिक वास्तववादी असले तरी ते आत्मनिष्ठही असू शकते. ना. धो. महानोरांची कविता ग्रामीण रोमँटिक मनाचा आत्मनिष्ठ आविष्कार करणारी आहे. श्रीनिवास कुलकर्णी यांचे 'डोह' आत्मनिष्ठच आहेत. मात्र

आत्मनिष्ठा रोमँटिक वृत्ती ही ग्रामीणतेशी निगडीत असावी लागते, ती नागरवृत्तीकडे झुकून ग्रामीणावर आरोपित होण्याचा धोका नाकारता येत नाही १९४५ पूर्वीच्या ग्रामीण साहित्यात तसे झालेले आपणास पुष्कळ प्रमाणात दिसून येते. मात्र खानोलकरांच्या 'सनई' कथेतील आत्मनिष्ठा नागर आहे आणि ती कथाही नागर आहे. त्यामुळे 'आरोपणाचा' धोका इथे दळलेला आहे. श्रीनिवास कुलकर्णी यांची आत्मनिष्ठा ग्रामीण आहे, पण ती पूर्वपरिचित ग्रामीणतेच्या तुलनेने अनोखी आहे.

एखादे मूलतः नागर अथवा शहरी असलेले व्यक्तिमत्त्वही ग्रामीणतेला सामोरे जाऊन ग्रामीण साहित्य निर्माण करू शकते. अनिल अवचटांची 'माणसं' मधील लेखने तशी मानावी लागतात. तसेच मुलतः ग्रामीण असलेले व्यक्तिमत्त्वही नागर वृत्तीला सामोरे जाऊन 'नागर' साहित्यनिर्मिती करू शकते. उदा. खानोलकरांची 'सनई' ही कथा.

'ग्रामीणता' हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग मानावा लागतो. ग्रामीण जीवन समजून घेऊन त्या जीवनाच्या अंगानेच स्वतः त्याविषयीचे आकलन मांडत जाणे, त्या अंगानेच अनुभवांचे आकार शोधणे, अनुभवांची मांडणी करणे, हेच ध्येय समजून जेव्हा साहित्यनिर्मिती होते, तेव्हाच तिच्यात ग्रामीणतेचे (लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील) रंग उतरू लागतात. दुसऱ्या भाषेत असे म्हणता येईल की लेखकाची ग्रामीणतेची जाणीव इथे महत्त्वाची असते.

## ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये

### १) ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान -

मराठी साहित्याचा वाचक वर्ग आणि त्याची मागणी संस्कारित करणारा लेखक वर्ग प्रामुख्याने पांढरपेशा मध्यमवर्गातील होता म्हणून अपरिहार्यपणे मध्यमवर्गाची सुखदुःखे आशा-आकांक्षा आणि त्यांची स्वप्ने मराठी साहित्यातून प्रतिबिंबित झाली महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर साहित्यनिर्मिती मध्यम वर्ग पोते मर्यादित राहणे शक्य नव्हते बहुजन समाजाच्या हाती सत्ताकेंद्रे आली त्यामुळे ग्रामीण जीवनात का होईना गेले

ग्रामीण साहित्याला जे तत्त्वज्ञान हवे आहे ते महात्मा फुले यांच्या तत्त्वज्ञानापासून शोधता येईल महात्मा फुले यांनी आपल्या विचारातून मूलगामी मानवतावाद मांडला त्यांचे कार्य केवळ सुधारणावादाचा पुरते मर्यादित नव्हते त्यांचा प्रवास बंडखोरी पासून ते संमेक परिवर्तना पर्यंत होता जी प्रचलित समाजव्यवस्था होती तिच्या त्यांना अमुलाग्र परिवर्तन करायचे होते त्यांनी या शोषणाचे व अमानुष ठिकाणाचे वर्णन गुलामगिरी ब्राह्मणांचे कसब शेतकऱ्यांचा आसूड इत्यादी ग्रंथात केले त्यांनी शेतकऱ्यांची बलुतेदारांची व मजुरांची किती मोठ्या प्रमाणात लुबाडणूक केली याचे विदारक चित्र रेखाटले आहे स्वातंत्र्य समता आणि बंधुभाव ही मुले मानणारे त्यांची वैचारिक भूमिका होती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातही मानवमुक्तीचा तत्त्वज्ञान आलेले दिसते.

### २) परिवर्तनवादी विचार

ग्रामीण साहित्य हे खऱ्या अर्थाने माणसाचे साहित्य आहे. माणूस स्वतःला बदलू शकतो तसेच तो आपल्या भोवतीचे वास्तव विचाराने आणि कृतीने बदलू शकतो हे प्रमुख विचार सूत्र आहे. फुले-आंबेडकर गांधीजी इत्यादी विचारवंतांनी शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी

हत्यार आहे असे आग्रहाने सांगितले आहे. साहित्याला केवळ ग्रामीण जीवनाचे दर्शन घडून चालणार नाही तर ग्रामीण जीवनाचे अर्थपूर्ण विश्लेषण करावे लागेल. जाणीव निर्मिती व जागृती च्या उद्देशाने ग्रामीण साहित्य प्रेरित झालेले असते.

**३) बांधीलकी आणि ग्रामीण साहित्य**

ग्रामीण साहित्याची चळवळ ही सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. परिवर्तनाला आवश्यक असणारी ऊर्जा साहित्यिकांकडून मिळत असते. दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्या देशाने झपाट्याने औद्योगिकीकरण झाले त्याने शहर आणि खेडे यातले अंतर जवळजवळ संपुष्टात आले असले तरी आर्थिक विषमता वाढली. खेड यांच्या जीवावर शहरात चंगळवादी संस्कृती फोफावते आहे. चंगळवादी संस्कृतीला परिवर्तनाशी बांधिलकी परवडणार नाही. साखर कारखानदारीत शेतकऱ्यांची व शेतमजुरांची होणारी पिळवणूक ग्रामीण लेखकाला दिसते. साखर कारखानदारी शेतकऱ्यांची व शेतमजुरांची होणारी पिळवणूक ग्रामीण शेतकऱ्यालाच जाणवलेली आहे. शेती आणि शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे श्रम लुटून औद्योगिकीकरण करणारी समाज व्यवस्था बदलली पाहिजे अशी भूमिका ग्रामीण साहित्याने घेतली आहे.

अशाप्रकारे ग्रामीण साहित्य हे ग्रामीण जीवनाच्या परिवर्तनाचे तेथील समस्यांचे चित्रण करणारे साहित्य आहे. शेतमजुरांच्या समस्या, ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांच्या समस्या हे सर्वांचे चित्र आजच्या ग्रामीण साहित्यात येत आहे.

**ग्रामीण साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा**

ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागे आपणास विविध स्वरूपाच्या प्रेरणा दिसून येतात त्या पुढील प्रमाणे आहेत.

**१) ग्रामनिष्ठ जाणीवा व्यक्त करणे**

कोणताही साहित्य प्रवाह समजून घेण्यासाठी त्याच्या साहित्य प्रवाहात व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे स्वरूप पाहणे आवश्यक असते. ग्रामीण साहित्याचा पृथकपणा त्यातील ग्रामीणतेच्या जाणिवे मध्ये आहे.

ग्रामीण भागातील शिकलेल्या पिढीला 1960च्या आगेमागे सांस्कृतिक भान आले. आपण अनुभवलेले, अनुभवीत असलेले खेडे आणि जीवन साहित्याचा विषय होऊ शकतो आपण वाचतो ते प्रस्थापित मराठी साहित्य समग्र मराठी जीवनाचे चित्रण करीत नाही खरे तर खेड्यात राहणारी माणसे आणि शेती निसर्ग पशुधन ऋतुचक्र पिके जमिनीचा प्रकार यांचा अतूट संबंध असतो त्यांचे सण उत्सव जत्रा पूजा रीतीरिवाज आहार वेशभूषा यांचा वरील घटकांची अतूट संबंध असतो. शेतकरी शेतमजूर बलुतेदार आलुतेदार यांचा परस्परावलंबी अतूट संबंध असतो आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय संबंध आणि जातीअंतर्गत संबंध व धर्मांतर्गत संबंध सलोख्याचे असतील किंवा द्वेषाचे असतील असेही नव्हे. व्यक्तिपरत्वे हे संबंध निश्चित होत असतात. ग्रामीण माणसाचे त्यांच्या काळ्या आईवरील ,पिकांवरील झाडांवरील, पशुवरील प्रेम आणि जिव्हाळा लक्षणीय असतो. याचा बारकाव्याने शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

ग्रामीण जीवन काबाड कष्टाचे हालअपेष्टांचे असते हे खरे पण त्या जीवनात ही आनंदाचे क्षण असतात. पावसाळ्याची सुरुवात, पहिल्या सरीचा गंध ,बियांतून बाहेर येणारे कोंब, कोवळ्या पानांची नक्षी व रंगछटा, सुगीचे दिवस जत्रा आणि इतरही प्रासंगिक कार्यक्रमातील लेझीम भजने भारुडे सोंगे लोककलांचे खेळल्यामुळे कष्टमय जीवनात आनंद उत्साह जल्लोष आणि चैतन्य निर्माण होते. ग्रामीण स्त्रिया तर कष्टाची प्रतिमा आहे. घरकाम शेती काम आणि सासुरवास यातून त्या सोशीक सहनशील संयमी आणि अबोल किंवा मितभाषी होतात. या सर्व ठिकाणी ग्रामीणता आहे. या ग्रामीणतेचा शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**२) कृषिनिष्ठ संस्कृतीचा कलात्मक आविष्कार घडवणे**

ग्रामीण ता ही व्यापक संज्ञा आहे. कृषी व्यवसाय ग्रामीण तेत समाविष्ट होतो शेतकरी शेतमजूर बलुते आलते यांचे परस्पर संबंध शेतीमुळे परस्परांशी घटक आहेत यांत्रिकीकरणाच्या रेट्यामुळे जुनी गावगाडा पद्धती मोडकळीस आली आहे पण ती संपूर्ण नष्ट झाली नाही शेती पिके उत्पादन पद्धती अतिवृष्टीने ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम यामुळे रंकाचा राव आणि रावाचं लवकर होतो ग्रामीण जीवनातील हे चढउतार पाहणे अतिशय महत्त्वाचे असते ग्रामीण तेचा ग्रामीण माणसांचा विचार शेती आणि त्याचे पशुधन जनावरे वगळून करता येत नाही शेती आणि जनावरांची कोणत्याही कारणाने परवड होऊ लागली तर शेतकऱ्यांना अन्न गोड लागत नाही. ही शेती निष्ठा बदलत्या काळात बदलत आहे. शहराजवळील खेड्यातील शेतकरी शेतीचे प्लॉटिंग करून विकत आहेत. शेती विकणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनातील ताणतणाव त्यांची आर्थिक स्थिती यांचा शोध घेणे ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे. शेती आणि शेतीवर उदरनिर्वाह करणारा समाज ग्रामीण साहित्याचा विषय आहे. त्यांचे जगणे सुख-दुःख मराठी साहित्यात आली पाहिजे. शेती वर जगणारा वर्ग हा मराठी साहित्यात नायक-नायिका झाले पाहिजेत.यासाठी त्यांच्या जीवन वास्तवाचा शोध घेत घेत त्यांच्या व्यथा वेदनांचा हुंकार साहित्यातून अविष्कृत करणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**३) ग्रामीण माणूस आणि निसर्ग यांच्या संबंधाचा शोध घेणे-**

ग्रामीण माणसांचा आणि निसर्गाचा अतूट संबंध आहे. ग्रामीण माणसे निसर्गाचीच लेकरे आहेत ती निसर्गाच्या अंगाखांद्यावर खेळतात निसर्गही त्यांचे लाड कोड कौतुक करतो. पिकांची समृद्धी आकाशाची निळाई पक्ष्यांचे अज्ञात बोलली ऊन सावल्यांचा खेळ पावसांच्या सरी, जर यांचे संगीत ढगांची चित्रे चंद्र तारकांची शोभा बैलांच्या गळ्यातील घुंगुरमाळा यांचा मधून नात जात्याची घरघर जनावरांचे आवाज ऋतुचक्राचे सौंदर्य या सर्वांच्यात त्या रमलेला माणूस शहरात राहू शकत नाही. अतिवृष्टी गारपीट पिकांवरील कीड यांसारख्या निसर्ग कोपाला ग्रामीण माणसे धैर्याने तोंड देतात निसर्गाशी संघर्ष करताना ग्रामीण माणूस कधी कधी पासून मिळून पडतो. निसर्ग आणि ग्रामीण माणसांच्या या संबंधाचा शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

### ४) बदलत्या खेड्याचा वेध घेणे

खेडी बदलत आहेत याचाही अर्थ नीट समजून घेण्याची गरज आहे. खेड्यात कच्च्या पक्क्या सडका शाळा दवाखाने ग्रामपंचायती सहकारी संस्थांच्या इमारती काही सरकारी कार्यालय यांची आधुनिक पद्धतीची कॉंक्रिट गेल्याचे बांधकामे गावात एसटी बस सेवा ट्रॅक्टर गाड्यांची वाहतूक वृत्तपत्रे दूरदर्शन टेलिफोन विजेवर चालणारी यंत्रे शहरी पोशाख राहणीमान एवढा वरवरचा बदल नाही. शेतीत आधुनिक अवजारे यंत्रे आली बी-बियाणे रासायनिक खते आहारपद्धती करमणूक ऐश्वर्य याविषयीही शहरी जाणिवा खेड्यात पोहोचल्या आहेत स्वाभाविकपणे ग्रामीण भाषेवर ही शहरी मराठी आणि इंग्रजीचे आक्रमण होत आहे. ग्रामीण माणसाची मानसिकता त्या वळणाची बनत आहे. खेड्यात हॉटेल, परमिट रूम, बियर बार ,पान पट्ट्या दिसत आहेत. खेड्यात वीज पोचल्यापासून शेती वरचा खर्च वाढला आहे. सामान्य शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. कारखानदार व्यापारी शेतकऱ्यांची लूट करीत आहेत.

बदलत्या खेड्याची दुसरीही विधायक बाजू आहे. आधुनिक शेती अवजारे व यंत्रे यामुळे कमी कष्टात जास्त आणि दर्जेदार शेती कामे होतात. अनेक ग्रामीण कुटुंबातील शिक्षकांना निरनिराळ्या क्षेत्रात नोकऱ्या मिळाल्या आहेत. त्यामुळे कायम उत्पन्न यांची सोय झाली. त्यांच्यामुळे इतरांना शिक्षणाच्या संधी निर्माण झाल्या. कल्याणकारी धोरणामुळे रोजगार हमी जवाहर योजना इंदिरा आवास योजना आणि अनुदान योजना आहेत. त्यांचा ही काही प्रमाणात ग्रामीण जनतेला लाभ झालेला आहे. या सर्व अनुकूल-प्रतिकूल बदलांचा परिणाम ग्रामीण माणसांवर होत आहे. विफल शेतकरी आत्महत्या करीत आहे तसेच विद्रोह करीत आहे ही बदलती मानसिकता ग्रामीण साहित्यात प्रतिबिंबित करण्याची प्रेरणा ग्रामीण साहित्याची आहे.

### ५) संघर्षाच्या पवित्र्यात असलेल्या ग्रामीण समाजाची मानसिकता समजून घेणे-

धार्मिक पातळीवर बुवाबाजी आणि ठकबाजी राजकीय नेत्यांचे गुन्हे आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे धूम वाढत आहे. यामुळे समाजाच्या पुढे नैतिकता चारित्र्य शील त्याग देशभक्ती राष्ट्रप्रेम समाजहिताची निष्ठा याविषयीचे महान आदर्श नाही. घोटाळे दंगे बलात्कार अत्याचार नेहमीचेच झाले आहेत. स्थानिक पातळीवर वरील घटनांचा सारख्या लहान मोठ्या घटना घडतात. यामुळे ग्रामीण समाजातील असंतोष वाढत आहे या घटनांचा प्रतिकार करण्यासाठी समाजाची धडपड आहे. शेतकरी आंदोलने युवक चळवळी स्त्री संघटना दलित मत मुक्ती लढे शेतमजूर संघटना ही काही उदाहरणे आहेत हे सर्व ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

अशाप्रकारे सद्यकालीन राजकीय-सामाजिक परिस्थिती बदलता निसर्ग आधुनिकीकरण जागतिकीकरण यामुळे ग्रामीण भागावर झालेला सकारात्मक व नकारात्मक परिणाम हे ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला प्रेरणादायी ठरलेले दिसते.

### मराठी ग्रामीण साहित्याची वाटचाल

ललित साहित्य ही एखाद्या व्यक्तीकडून साधली जाणारी निर्मिती आहे. तिचे एक स्वतंत्र विश्व असते, स्वतंत्र तर्कशास्त्र असते. असे असले तरी तिचा वेलविस्तार ही एक

जीवनान्तर्गत अशी वस्तुस्थिती आहे. तिच्यामागील प्रेरणा किंवा हेतू, तिच्यातील उपभोग्यता, तिचे अवघे अस्तित्व या साऱ्याच जीवनसापेक्ष गोष्टी आहेत. व्यक्तीकडून निर्माण होणारी साहित्यकृतीही त्या त्या काळातील प्रबळ सामाजिक जाणिवांशी संवादी असते, विरोधी असते किंवा तटस्थ असते.

मराठी ग्रामीण साहित्याचे मुखस्थान हरिभाऊ आपटे या सामाजिक जाणीब जागती ठेऊन लेखन करणाऱ्या लेखकाच्या काळ तर मोठा कठीण आला या कथेत सापडते. तसे मराठी साहित्यातील ग्रामीणतेचा जन्म वास्तव, सामाजिक साहित्याच्या प्रेरणेतून झालेला आहे असे म्हणता येईल. "खेडेगाव, तेथील जीवनपद्धती, तेथील अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानाविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न व समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्ट्ये या कथेत येतात. ती त्या खास ग्रामीण अनुभूतीतून जन्माला येते." ही डॉ. आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याची केलेली व्याख्या त्याची जीवनसंबध्दताच स्पष्ट करणारी आहे. भारतासारख्या किंवा महाराष्ट्रासारख्या अर्धविकसित प्रदेशाचे स्वरूप लक्षात घेतले तर तिथे नागर व ग्रामीण असे जीवनाचे दोन ठळक भेद सहजपणे दिसून येतात. ग्रामीण भागास यंत्रसंस्कृतीचा स्पर्श झालेला नाही असे नाही, पण त्या भागावर जी पकड आहे ती कृषिसंस्कृतीचीच आणि त्यातूनच ग्रामीण जीवनाला एक स्वतंत्र चेहरामोहरा प्राप्त झालेला आहे. त्यातूनही बव्हंशी ही कृषीसंस्कृती निसर्गशरण आहे. त्यामुळेच तिथे परंपरानिष्ठ वा संकेतशरणता यांचाच जास्त प्रमाणात आढळ आहे.

ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य आणि दलित साहित्य यामध्ये दलित साहित्याची कुळी तिच्यामागील विद्रोही प्रेरणेमुळे वेगळी पडते. ग्रामीण जीवनदर्शनापेक्षा त्या परिसरातील सामाजिक परंपरागत अन्यायाविरुद्धच्या चेतनेची जाणीव त्यात जास्त आहे. किंबहुना ती चेतनाच तिथे महत्वाची आहे. यामुळे दलित साहित्याला शहरी पार्श्वभूमीचेही बावडे नाही.

मराठी ग्रामीण साहित्याबाबत नेहमीच असे सांगितले जाते की १९२० नंतर त्याचा खरा प्रसार सुरू झाला. म. गांधींचे 'भारत हा खेड्यांचा देश आहे हे विधान त्यामागे आहे. त्यांच्या वेळेपर्यंत भारतीय राजकारण व समाजकारण हे प्रामुख्याने शहरांच्या नागरी परिघातच फिरणारे होते. त्यामुळे या क्षेत्रातील जागृतीही तशी नागरसमाजापुरतीच मर्यादित होती. त्याचा परिणाम म्हणून त्या काळातील साहित्याचे कुतूहलविषयही या नागरजीवनाशीच समकक्ष होते. हरिभाऊंची 'काळ तर मोठा कठीण आला' सारखी कथा किंवा धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' सारखी कादंबरी असे ग्रामीण जीवनाला स्पर्शणारे साहित्य अपवादभूत आणि अपघातभूत म्हटले पाहिजे. त्यांचे वेगळेपण आवर्जून नोंदले गेले नाही किंवा त्यांचा एक वेगळी दिशा म्हणून शोध घेण्याचा त्या काळात गंभीर प्रयत्नही झाला नाही

त्याकाळातील जागृत सामाजिक जाणिवांत ग्रामीण परिसराला फार मोठे स्थान नव्हते. दुष्काळासारख्या आपत्तीच्या निमित्ताने पुढारी मंडळींना गरीब, अडाणी शेतकऱ्यांची आठवण येई आणि तो एकदा सरला की संध्याकाळी परटयाकडे परतणाचा पाखराप्रमाणे त्यांचे लक्ष पुन्हा नागर जागृतीकडे झेपावत असे. एकंदरीतच इंग्रजी अमलात नागर व ग्रामीण

भागात झालेल्या नव्या विद्येच्या भिन्न व असमान संस्करणाने वाढलेली या दोहोतील जुनी दरी पुढेही रूंदावतच गेलेली होती.

म. गाधींनी हा उपेक्षित ग्रामीण परिसर सामाजिक जाणिवेच्या कक्षेत प्रथमच तात्त्विक प्रतिष्ठा देऊन आणला. खेडी सुधारल्याखेरीज देश सुधारणार नाही ही त्यांची भूमिका नेमकी व मर्मग्राही होती. 'खेड्यांकडे चला' ही या दृष्टीने पहिली नुसती घोषणा नव्हती, तर तो एक मंत्रच होता. त्यामुळेच जागृत नागरांच्या डोळ्यात साचलेला ग्रामीण परिसराच्या उपेक्षेचा सारा या दोन शब्दांनी कमी करून टाकला.

या जागृतीचा परिणाम म्हणजेच ग्रामीण परिसराबद्दलचे साहित्य मराठीत निर्माण होऊ लागले. इतकेच नव्हे तर त्याला 'ग्रामीण साहित्य' अशी स्वतंत्र दखलबजा संज्ञाही प्राप्त झाली. बि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई इ. सारख्यांच्या 'प्रादेशिक' कथा किंवा रविकिरणमंडळातील कवींच्या 'जानपद' कविता ही या जागृतीचीच अपत्ये श्री. म. माटे आणि ग. ल. ठोकळ ही या परंपरेतील मातब्बर नावे.

म. गांधींच्या चेतवणीचा या सर्वच ग्रामीण लेखकांवर अगदी गाभ्यापासून गंभीरपणे परिणाम झाला होता किंवा 'ग्रामीण' अनुभूतीची कलात्मक जाणीव त्यांना झालेली होती असे नाही. जागृत होत जाणाऱ्या नव्या व्यापक सामाजिक जाणिवेच्या काठाशी फक्त सहानुभूतीपूर्ण बैठक मारणारे बरेच होते. या काळातील 'फडके युगा' च्या उथळ रंजकतेचा संस्कार त्यांच्या मनावर अंमल गाजवीत होता. त्यांना जाणिवेच्या कक्षेत दाखल झालेल्या ग्रामीण जीवनाच्या (विषयदृष्ट्या) नवतेनेच फक मोह पातला. त्यांनी कथा व कवितांच्या द्वारा मोठ्या उत्साहाने हा 'नावीन्याचा' साक्षात्कार खिरापतीसारखा वाटला आणि त्या काळातील 'रंजनप्रेमी' वाचकांनीही तितक्याच उत्साहाने हे कृत्रिम 'नावीन्य' स्वीकारले. या दृष्टीने डॉ. आनंद यादव यांनी ग. ल. ठोकळांना 'ग्रामीण कथंचे फडके म्हटले ते यथार्थ आहे. आशय, अनुभूती यांसारख्या आंतरिक नाते सांगणाऱ्या विशेषांचा यात ओघानेच अभाव आला आणि विषय, रचना, तंत्र आणि त्यांना 'चटकदार' बनविणे इतकाच प्रकार शिल्लक राहिला. त्यामुळे ग्रामीण साहित्य ही एक नावीन्यपूर्ण' अशी फक्त सजावट वा कारागिरी बनून गेली.

सुखटणकर, सरदेसाई किंवा श्री. म. माटे यांचा पंथ थोडा वेगळा दिसतो. त्यांचे लेखन जास्त उघडपणे गांधीप्रणीत नवजागृतीच्या पोटी जन्माला आलेले आहे. त्यांची दृष्टी ग्रामीण जीवनातील 'नावीन्य' वा 'रंजन' पकडू पाहणारी नाही. तीही तशी रोमँटिकच आहे, पण प्रकृतीने जास्त गंभीर आहे. त्यांच्या कथांमागील प्रेरणेत निश्चित असा सामाजिकतेचा अंश आहे. प्रसंगी कणव वा भूतदयेच्या जवळपास जाईल अशी ग्रामीण जीवनाबद्दलची सहानुभूती त्यांच्यात आहे.

ग्रामीण साहित्याबाबत ज्या एका व्यापक सामाजिक जाणिवेची जरूरी आहे त्या जाणिवेचा विचार करताना मराठीत फक्त गांधींच्याच नावाचा उल्लेख केला गेला आहे. १९३५-४० पर्यंतचा काल पाहिला तर ग्रामीण जीवनातली सुखदुःखे, चढउतार, स्थितीगती यांचा आविष्कार करणाऱ्या साहित्याला ग्रामीण साहित्य असे म्हटले जाते. असे साहित्य लिहिणारा लेखक ग्रामीण भागात रहाणाराच असला पाहिजे असा काही दंडक नसतो. अर्थात एखादा लेखक पुण्यामुंबईसारख्या शहरात जन्मला, वाढला, पोसला, आयुष्यभर राहिला तर त्याला ग्रामजीवन अपरिचितच राहणार अनुभूतीचा आविष्कार म्हणजे

कलाकृती. या अनुभूतीशी लेखकाने अत्यंत प्रामाणिक असले पाहिजे असे सांगताना मर्ढेकरांनी लेखनपूर्व आत्मनिष्ठा व लेखनगर्भ आत्मनिष्ठा यासंबंधीचे विवेचन केले आहे. समर्थ प्रतिभा आणि समृध्द अनुभवांचे व्यक्तिमत्त्व या दोन गोष्टी एकत्र आल्या, तर समर्थ कलाकृती निर्माण होऊ शकते. परिसराचा संबंध या समृद्ध व्यक्तिमत्वाशी येतो. लेखक जेथे जन्मला वाढला, पोसला, त्या परिसराचा तिथल्या मातीचा त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाचा वाटा असतो. हे लेखकाचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या लेखनात प्रतिबिंबित होत असते. त्याचा परिसर हा त्याच्या लेखनाचे एक अविभाज्य अंग होऊन बसते. उदा. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधील माणदेश किंवा परिसर, त्यांचे लेखन त्या त्या परिसराशी एकरूप झालेले असते. नागरी जीवनापासून दूर असलेल्या परिसरातील जीवन आविष्कृत करणाऱ्या साहित्याला ग्रामीण साहित्य किंवा प्रादेशिक साहित्य म्हणले जाते. परंतु प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण या संज्ञेपेक्षा जास्त व्यापक आहे, असे मधु कुलकर्णी म्हणतात.

ग्रामीणतेला वेगळे असे मूल्य असते का? माडगूळकरांच्या कथांमधला माणदेश, आनंद यादवांच्या कथांमधला कागल - कोल्हापूरचा परिसर त्या त्या लेखनात अत्यंत महत्त्वाचा आहे. तो उत्कटपणे, अस्सलपणे आणि कलात्मक पातळीवर व्यक्त झालेला आहे. त्यामुळे इथेच काही वेळेला विचारांची गल्लत होण्याची शक्यता असते. परिसर महत्त्वाचा असतो. पण तो कलात्मक पातळीवर व्यक्त झाला तर, परिसराला स्वतंत्र मूल्य नाही. प्रादेशिकतेला स्वतंत्र मूल्य नाही, हे श्री. ना. पेंडसे यांनी 'रथचक्रा'च्या प्रस्तावनेत म्हटले आहे. ग्रामीणता किंवा प्रादेशिकता कलाकृतीच्या श्रेष्ठकनिष्ठतेचे मूल्य किंवा निकष किंवा कसोटी होऊ शकत नाही.

एखादा वाङ्मयप्रकार विशिष्ट काळात जन्मतो, भरभराटीला येतो. काही काळ लोप पावतो, पुन्हा पुनरूज्जीवित होती, कदाचित कायमचा लोप पावती. नाट्यछटेसारखा वाङ्मयप्रकार दिवाकरांनीच जन्माला घातला, लोकप्रिय केला आणि त्यांच्या बरोबरच तो विलयाला गेला.

आतापर्यंत मराठी ग्रामीण साहित्य कविता, कथा, कादंबरी या बाङ्मयप्रकारांतून आविष्कृत झालेले आहे, असे दिसते. त्यातही ग्रामीण कथा बरीच संपन्न अशी वाटते. नाटक, एकांकिका या वाङ्मयप्रकारांकडे ग्रामीण लेखक वळलेले दिसत नाहीत. आत्मचरित्र या साहित्यप्रकाराकडेही ग्रामीण लेखक वळलेला दिसत नाहीत.

निबंध आणि चरित्र हे दोन साहित्यप्रकार मूलतः प्रौढ, गंभीर प्रकृतीचे आहेत. केवळ निवेदनात्मक नव्हे, पण विवेचनात्मक आशयाला जवळ असणाऱ्या या दोन साहित्यप्रकारांतील निर्मिती, ग्रामीण साहित्याच्या संदर्भात, भाषिक अंगाने अडचणीची वाटते. नागरी भाषेतले, पण आशय ग्रामीण असू शकतो. विवेचनात्मक, व्यापक आणि सखोल असा ग्रामीण जीवनातला एखादा आशय अगदी बोली भाषेतूनसुद्धा • कादंबरीसारख्या साहित्यप्रकारातून आविष्कृत होणे अशक्य नाही. पण असा प्रयत्न मराठीत अजून झालेला नाही.

मराठीत ग्रामीण साहित्य कथा या वाङ्मयप्रकारातूनच सकसपणे आणि समर्थपणे व्यक्त झालेले आहे. ना. धों. महानोर आणि आनंद यादव हे दोन सन्माननीय अपवाद वगळता सकस ग्रामीण कविता फारशी कुठे आढळत नाही. ग्रामीण जीवनाच्या आकलनाची जाण वाढविणारी कादंबरीही काही अपवाद सोडले तर लिहिली गेली नाही.

## ३अ.३ समारोप

भारत हा कृषिप्रधान देश आहे . त्यामुळे या देशात बहुसंख्ये जनसमुदाय हा ग्रामीण भागात राहत असल्यामुळे त्याच्या जीवनातील विविध समस्येचा वेध ग्रामीण साहित्यातून घेतला जातो. साधारणपणे आपणास ग्रामीण साहित्याचा अभ्यास करीत असताना विविध चळवळीचा अभ्यास करावा लागतो त्यामध्ये सर्व प्रथम ग्रामीण जीवन हे म. फुले. यांच्या साहित्य लिखानातून समाजापुढे आले आहे. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण जीवनातील विविध समस्येचा उलघडा झाला आहे म. फुले यांच्या प्रेरनेतूनच ग्रामीण साहित्य हे निर्माण झाले आहे. असे आपणास म्हणता येईल .

ग्रामीण साहित्यामुळे खेड्यातील समाजातील लोक जीवन हे संपूर्ण जगाला समजले आहे त्याच्या जीवनातील दु:ख, दारिद्रयाचे, आणि पोटासाठी मरमर उभा आयुष कष्टात घालणारी ही ग्रामीण समाजव्यवस्था जगाला त्यांची ओळख या ग्रामीण साहित्यामुळे झाली आहे. म्हणून या घटकातून एकूणच ग्रामीण जीवन आणि त्यांच्या वाट्याला आलेल्या समस्या याचे वास्तव चित्रण विविध लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडले आहेत.

आपला देश हा खऱ्या अर्थाने खेड्यांचा देश आहे. कृषिकेंद्रित खेड्यातील माणसांची मानसिकता इतरांपेक्षा वेगळी असते. शहरातील काही सुखसुविधा आणि सुधारणा खेड्यात आल्या म्हणजे त्यांचे रूपांतर शहरात होते हे म्हणणे सर्वार्थाने खरे नाही. खेड्यातील शेती करणारा छोटे-मोठे व्यवसाय करणारा ग्रामीण माणूस शहरात जाऊन झोपडपट्टीत राहिला, कामगार मजूर झाला किंवा सुशिक्षित होऊन पांढरपेशा बनला तरी त्याची मानसिकता फारशी बदलत नाही. संख्येने मोठा असलेला, खेड्यातून राहणारा, शहरात येऊन उप-यासारखे जीवन जगणारा सामान्य माणूस शोषितचं ठरतो. म्हणून या ग्रामीण शोषित माणसाचे चित्रण करणारे ग्रामीण साहित्य या सर्व नव प्रवाहात अधिक समर्थ असण्याची गरज आहे. त्यातील सामर्थ्याला अधिक धार येण्याची गरज आहे.

## ३अ.४ सरावासाठी स्वाध्याय

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ग्रामीण साहित्याचे प्रमुख प्रयोजन काय?

२) देशातील बहुसंख्य समाज कुठे राहतो?

३) ग्रामीण साहित्याने कोणती भूमिका घेतली आहे?

४) ग्रामीण साहित्य म्हणजे काय?

**टिपा लिहा.**

१) ग्रामीण साहित्याचे प्रयोजन

२) ग्रामीण साहित्याचे तत्वज्ञान

३) ग्रामीणतेचे स्वरूप

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) ग्रामीण साहित्याचे महत्त्व थोडक्यात सांगा.

२) ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) ग्रामीण साहित्य निर्मितीच्या प्रेरणा स्पष्ट करा.

४) मराठी ग्रामीण साहित्याची वाटचाल थोडक्यात लिहा.

## ३अ.५ संदर्भ ग्रंथ

1) ग्रामीणता :साहित्य आणि वास्तव - - डॉ. आनंद यादव

2) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या -- डॉ. आनंद यादव

3) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि दिशा - डॉ. वासुदेव मुलाटे

4) ग्रामीण साहित्य – रा. र . बोराडे

❖❖❖❖

# ३ब

## ग्रामीण साहित्यप्रवाह
## धग असतेच आसपास कल्पना दुधाळ

**घटक रचना**

३ब.0 उद्दिष्ट्ये

३ब.१ प्रास्ताविक

३ब.२धग असतेच आसपास या कविता संग्रहाला लाभलेले सामाजिक ,राजकीय सांस्कृतिक पर्यावरण

३ब.३ समारोप

३ब.४ सरावासाठी स्वाध्याय

३ब.५ संदर्भ ग्रंथ

## ३ब.0 उद्दिष्ट्ये

- साहित्य समाज परस्परसंबंधाच्या संदर्भाने १९९० नंतरच्या ग्रामीण साहित्याची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेणे
- समकालीन ग्रामीण कवितेच्या प्रेरणा समजून घेणे.
- कल्पना दुधाळ यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा परिचय करून घेणे.
- अभ्यासाला लावलेल्या 'धग असतेच आसपास' या कवितासंग्रहाच्या वाङ्मयीन प्रेरणा आणि काव्यात्मक जाणिवांचे विश्लेषण करणे

## ३ब.१ प्रास्ताविक

'धग असतेच आसपास' हा कल्पना दुधाळ यांचा दुसरा काव्यसंग्रह. यापूर्वी २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या 'सीझर कर म्हणतेय माती' या कवितासंग्रहाने मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले होते.जवळजवळ १८ पुरस्कारांनी हा संग्रह सन्मानित झाला. टेंभुर्णी (ता. माढा, जि. सोलापूर) हे कल्पना दुधाळ यांचे माहेर. टेंभुर्णी गावापासून चार किलोमीटर अंतरावर शेती आणि तिथेच राहते घर होते. घरात चार भावंडं, आजी-आजोबा, आई-वडील, चुलते असा माणसांचा राबता होता. घरापासून चार किलोमीटर अंतरावर जिल्हा परिषदेची शाळा होती. उन्हाळा-हिवाळा-पावसाळा अशा तिन्ही ऋतूमध्ये चालत गावात, शेतात आणि शाळेत जायचे असे साधे ग्रामीण शेतकरी जीवन जगणाऱ्या. घरात कल्पनाताईंचे बालपण गेले.शेतकरी कुटुंबात काळ्या मातीत कामे करावी लागत होतीच पण शिक्षणाची गोडी असणारे कवीमन काळ्या पाटीवरही यशाची मुळाक्षरे उमटवत होते.

लग्नानंतर पदवीची परीक्षा विशेष प्राविण्य मिळवून पास झाल्या.शिक्षण किंवा साहित्यलेखनाची कुठलीच पार्श्वभूमी नसतानाही स्वत:ला शोधत राहण्याच्या,जगण्याला अर्थ देण्याच्या प्रयत्नात त्यांची कविता 'केळीच्या गाभ्यात, दाटली कमळ बाई' सारखी उमलत गेली.पहिली कविता 'कवितारती'सारख्या कवितेला वाहिलेल्या मासिकामध्ये छापून आली आणि त्यांच्या वाङ्मयीन प्रवासाला सुरूवात झाली.

धग असतेच आसपास या त्यांचा दुसरा कवितासंग्रह लोकवाङ्मयगृहाने प्रकाशित केला आहे. या कवितासंग्रहाला महाराष्ट्र फाउंडेशनचा 'ललित ग्रंथ पुरस्कार' मिळाला. त्यानिमित्ताने साधना साप्ताहिकाच्या विशेषांकात प्रकाशित झालेल्या त्यांच्या मुलाखतीत कल्पना दुधाळ यांनी आपला काव्यप्रवास उलगडला आहे.-

"माझ्यासाठी लेखन ही संसाराच्या वटारलेल्या डोळ्यात कवितेच्या ओळींचं काजळ फासण्याची गोष्ट आहे. जगण्याला जीव लावला की ओव्या उसन्या घ्याव्या लागत नाहीत. भोवतीच्या धगीलाच प्रेरणा समजून, ऊर्जा समजून मी कविता लिहिते. मला कवितेत समकालातलं वास्तव आणि वेदना दिसते. हा भोवताल जसा पाहिला, अनुभवला तसं लिहिण्याचा, त्याला शब्द देण्याचा प्रयत्न केला. आयुष्य समजून मुठीत माती घट्ट धरली, वरून पाण्याची धार सोडली, तर रिकाम्या मुठीतही भुईकमळ फुलल्याचा हा आडवळणी प्रवास आहे. कवितेनं माझ्या आयुष्याला समृद्धी दिली. माझं कविता लिहिणं हे एका थोर परंपरेतील लहानशी कृती आहे. गांभीर्य आणि निर्धारानं मी त्यात भर घालीन. ही माझी सामाजिक-सांस्कृतिक जबाबदारी आहे, याची मला जाणीव आहे. कवितेनं मला जगायला शिकवलं, माझ्या आयुष्यात समृद्धी भरली. कवितेनंच सांगितलं 'धग आसपास असते' आपण ती समजून घ्यावी. धगीतून मार्ग काढायचा आणि पुढे जायचं बस्स." कल्पना दुधाळ यांचे हे मनोगत त्यांची कविता जगण्यातून कशी उमलते सांगते.ही नुसतीच कष्ट करणारी,शेती,माती आणि नाती यांच्याविषयी बोलणारी कृषीकन्या नाही. शिक्षणाने आत्मभान आलेल्या एका आधुनिक ग्रामीण स्त्रीचा वर्तमानाकडे ,भोवतालच्या पर्यावरणाकडे बघण्याचा एक दृष्टिकोन कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून प्रकर्षाने जाणवतो.'आपली कविता ही एका थोर परंपरेतील लहानशी कृती आहे.' यांची जाणीव त्या बाळगतात. लेखनवाचन ही ग्रामीण स्त्रीजीवनात स्थान नसलेली गोष्ट त्यांनी प्रयत्नपूर्वक रुजवली "अक्षरांचा श्रम केला| फळाआला तेणे तो||"या तुकारामांच्या ओळी या कवितासंग्रहाच्या प्रेरणास्थानी वाटतात. बदलते ग्रामीणजीवन, स्थलांतरीत ग्रामीण माणसाचे जगणे, जागतिकीकरण, बदलत्या शेतीविषयक धोरणांचा परिणाम असे विश्वाचे वर्तमान समजून घेणारे कल्पनाताईंचे सृजनशील कवीमन या संग्रहातील कवितांमधून व्यक्त होते. ग्रामीण स्त्रीच्या जगण्याला कष्ट, नकार, अभावाची धग असणारच पण दुःखाच्या ओव्या रचण्या ऐवजी सावित्रीचे (सावित्रीबाई फुले) बळ घेऊन स्थित्यंतर घडवण्यासाठी सक्षम होणारी ग्रामीण स्त्री कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून साकार होते. 'सीजर कर म्हणतेय माती' या संग्रहातल्या 'गोष्ट' (पृ.१०५) या कवितेत पाठमोरी सावित्री, काळाच्या पुढं झपाझप चालत गेलेली' असा प्रत्यय व्यक्त झाला आहे. इथे कवी म्हणून आपल्या अभिव्यक्तीचे स्थान आणि दिशा याचे भान कल्पना दुधाळ यांना असलेले दिसते. समकालीन ग्रामीण आणि स्त्री कवींच्या कवितेतही कल्पना दुधाळ आपले एक अभिन्न स्थान निर्माण करतात.

## ३ब.२ धग असतेच आसपास या कविता संग्रहाला लाभलेले सामाजिक, राजकीय सांस्कृतिक पर्यावरण

भारतीय समाजजीवन हे १९८०च्या कालखंडापासूनच एका स्थित्यंतराला सामोरे जाताना दिसते...यात ग्रामीण समाजजीवनात तर मोठीच उलथापालथ घडत होती. कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, पूर, भूकंप, निकृष्ट बी-बियाणे, खते, कीटकनाशकांच्या भडीमारामुळे मातीचा उतरलेला कस,दुबार पेरणीचे संकट अशा समस्यांना वारंवार सामोरे जावे लागत होते. ज्यामुळे शेतकऱ्याचा कणाच मोडला.नवे शेतीविषयक धोरण, औद्योगिक विकासाचे प्रकल्प, शेतीविषयक नवे तंत्रज्ञान यांनी सर्वसामान्य शेतकऱ्याला विकासाची दिशा काही दिसली नाही. भरीस भर गावगाड्याची सामाजिक चौकट, भाऊबंदकी,रीतीभाती यांच्या दडपशाहीचे कडे त्याला घेरून टाकत होते.१९६० नंतर वाढत्या औद्योगिकीकरणामुळे नवी छोटी शहरे निर्माण झाली. या शहराच्या दिशेने झालेल्या स्थलांतरामुळे खेडी ओस पडू लागली होती.त्याचबरोबर MIDC आणि SEZ सारख्या औद्योगिक प्रकल्पांनी खेड्याचे पर्यावरण,नैसर्गिक साधनसंपत्तीचे खूप नुकसान केले.या सगळ्या स्थित्यंतराची जाणीव निर्माण झालेले ग्रामीण कवी आपली कविता क्रांतीसाठीचे,संघर्षाचे विधान म्हणून रचताना दिसतात. या बदलाची जाणीव ग्रामीण स्त्रीकवींच्या कवितेतून क्वचित व्यक्त होते. ग्रामीण जीवन जवळून अनुभवणाऱ्या प्रतिमा इंगोले यांची कविता ही कल्पना दुधाळ यांच्या कवितेचे पूर्वरंग म्हणून पाहता येईल. त्यांनी आपल्या 'कवितासंग्रहातून ग्रामीण बाईचा 'सोसण्याचा', "गुण्या गोविंदाने राहण्याचा" वारसा नव्या पिढीच्या कल्पना दुधाळ यांच्या कवितेला दिला असे म्हणता येईल.कल्पना दुधाळ सोसण्याचे गौरवीकरण करत नाहीत पण ग्रामीण स्त्रीच्या न तुटण्याच्या वज्रतेला मात्र आपल्या शब्दांतून बळ देतात..

"आयुष्याच्या शर्यतीत

शेवटच्या थांब्यापर्यंत न डगमगायचा

विडा उचलून

होरपळणाऱ्या वास्तवात

आत्महत्येचं निमंत्रण देलेल्या विहिरीला

लाथाडून परतले आहे मी" -(धग असतेच आसपास, पृ.१४)

'वाफेलाही पाणी होऊन परतण्याचे वचन मागणारे' या कवितागत मीचे शब्द ग्रामीण स्त्रीच्या निर्धाराला शब्दरूप देतात. शेती, माती, नाती यांच्यामध्ये गुंतलेली ही आधुनिक ग्रामीण स्त्री आपले गणगोत (गणगोत पृ.23) हे मातीचेच आहें हे जाणते. मातीशी जैविक नाते जोडताना अधिक वैश्विक, मानवतावादी होते.माती जशी 'धान आणि तण' यांच्यात निवड न करता उजवते तसेच कष्ट आणि दुय्यम स्थान यांच्यात तरतमभाव न करता स्वीकारशिलतेची शहाणीव या स्त्रीला उपजत मिळते. धग सोसण्यातली समंजसता या कवितागत मीमध्ये उठून दिसते.

**धग असतेच आसपास मधील आशयसूत्रे –**

- **ग्रामीण स्त्रीजीवनाभिव्यक्ती –**

'धग असतेच आसपास' या संग्रहातील कवितांमधून ग्रामीण स्त्रीच्या जगण्यातील कष्ट,तडजोडी आणि संघर्षाचे मुद्दे चित्रित होतात.नव्या संसारात आलेली शेतकरी तरुणी जेव्हा शेती,माती आणि एका भरल्या घरातल्या नात्यांकडून वसा घेत असते 'सौंदड' (पृ.१६) कवितेतील कृषीकन्या 'सौंदड' वृक्षाशी (औषधी गुणधर्म असलेला वृक्ष ज्याच्या तळाशी पाणी सापडते) मातृबंधाचे नाते जोडून 'या मायबाईच्या गर्भातल्या लेकीच्या गर्भाशयापर्यंत' पोहोचत निसर्गाच्या सृजनाचे रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न करते. कृषीजन्यसंस्कृती ,लोकसंस्कृतीची वहिवाट समजून घेणारे कवितागत स्त्रीमन 'शास्त्र' (पृ.२०) या कवितेत दिसते. ग्रामीण बाईने रास भरताना डोक्यावर पदर घ्यावा म्हणजे राशीला बरकत येते,. सवाष्णीच्या ओटीत उगवण घालताना लेकुरवाळ हळकुंड घालावे, तिन्हीसांजेला झोपू नये अशा एका ना अनेक 'शास्त्राची' शिकवण ती घेत असते. बाईने थोट्या हाताने संसार करू नये म्हणून चिरगुट बांधलेले बायांचे हात ती पाहते तेव्हा ते हात सोन्याचे भासतात ज्यांच्यासमोर सूर्यही झाकोळतो अशी समज तिला येते. अशी ही नवविवाहिता नव्यावाटा, नवजीवन अंगवळणी पाडून घेते. चालत आलेली वहिवाट तिचे शास्त्र समजून घेते.ग्रामीण स्त्रीने आजवर जपलेली लोकसंस्कृती समजून-उमजून आत्मसात करणे ही सुद्धा एक वहिवाटच.निर्माण करणे आहे.कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील ही तरुणी शास्त्र समजून घेताघेता जो प्रश्न विचारते तो मूल्यात्मक आहे.

"युगांची जन्मदाती तू

वहिवाटीवर चिवट पाथ तुझी

सांग बाई

हे मूठभर बी

तुझ्या सांगीव शास्त्रावर लावू

की माझ्या शिकाऊ?" (शास्त्र, पृ.20)

धरीत्रीच्या आणि लोकसंस्कृतीच्या वहिवाटीला असा प्रश्न विचारणे म्हणजे वर्तमानाच्या संदर्भाने शास्त्राकडे पाहण्याचे स्वातंत्र्य मागणे आहे.. १९९० नंतरच्या सुशिक्षित ग्रामीण स्त्रीचे व्यक्तिमत्त्व आपल्याला या अभिव्यक्तीत दिसते 'पखालीचं पाणी' (पृ.३१ ) सारखी कविता घरच्या-दारच्या म्हाताऱ्या बायांच्या पिकल्या जीवनानुभवाला न्याहाळणारी आहे.त्यांचे शेतावर, घरात कष्ट करून एकत्र कुटुंबात मिळून मिसळून,एकमेकींना समजून घेत आयुष्य जगणाऱ्या या ग्रामीण स्त्रीला हाती शून्य येणार माहीत असतच. तरी संसाराचा सारीपाट त्या मांडतात,' 'माझा खेळ मांडू दे'अशी संसाराची गाणी गातात.एकमेकींच्या पदराने दुःखाचे अश्रू पुसतात. 'एकमेकींच्या पदरात डोळे मिसळणे'हे गुण्या गोविंदाने राहण्यातून आले असते. 'चॅवमॅव चॅवमॅव पखालीच पाणी बुडूबुडू पॅव म्हणत' बसल्या बसल्या नाचणाऱ्या या बायांना कल्पना असते की, "आधी जाणारीला मिळेल दोघींच्या पखालीतले पाणी पण मागे राहणारीच्या पखालीत बुडबुडाच नसेल." गोतावळा जमवूनही मृत्युसमयी मागे राहणाऱ्या एखाद्या सखीला पखालीतल्या भावनेचा बुडबुडाही कदाचित

मिळणार नाही यांची जाणीव बाळगूनही म्हाताऱ्या खेळात जीव गुंतवतात, हे पाहणारे, सांगणारे निवेदक कविमन ग्रामीण स्त्रीजीवनाचा अदमास घेताना जाणवते.

ग्रामीण स्त्रीचे घरातील आणि एकूण सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेतील दुय्यम स्थान या संग्रहातील कवितांमधून व्यक्त होते. मागच्या पिढीतील आईने पुरुषप्रधान व्यवस्थेकडे आपला हक्क मागितला नाही, उलट ती 'लेकीचे घर परक' म्हणत आपलं असमाधान, अभावग्रस्तता यांच्याशी तडजोड करत राहते. 'अधांतर' (पृ.५१) या कवितेतील कवितागत स्त्रीमन ग्रामीण स्त्रीला मिळणारे दुय्यमपण, नाकारले जाणे याविषयी सहसंवेदन व्यक्त करते. हक्काचे, मानाचे, हौसेचे मिळून मिळून बाईला मिळते ते लुगडेच. पण धडूतं नेसणाऱ्या आईने एखादे लुगडे मागणे यात बाप,भाऊ,आणि नवरा यांची सामाजिक प्रतिष्ठा,ऐपत धोक्यात येते. तर 'बगळ्या बगळ्या कवडी दे, माझ्या आईला लुगडी दे'असं लहान मुलगा आभाळातल्या बगळ्याकडे याचना करतो तर भातुकलीतील हळवी पोर आईला पाहुणी बोलवून खोटी खोटी ढीगभर लुगडी घेते. दोन्ही मुलं आपापल्या परीने आशा लावतात. तरी संसारात "कवड्यासारखी पोकळ होत गेलेली" ही आई 'अधांतरी' आपलं श्रेय हुडकत राहते. तरी लेकीचे 'घर परकचं' ही चौकट मात्र ती ओलांडू शकत नाही.'एका नाळेच्या दोन गाठी' (पृ. ९८) किंवा मायलेकी (पृ.९४) या कविता दोघी बहिणी असो वा मायलेकी, ग्रामीण स्त्री घरंदाजपणाची झूल पांघरत पुरुषप्रधान व्यवस्थेच्या उंबरठ्याआडचे पोरकेपण कसे झेलतात या वास्तवाच्या कहाण्या ठरतात.

'अश्विनी' (पृ.३८) या कवितेतील "संपलेल्या आईची गोष्ट" हेलावून टाकते.हुंडा,सासरचा छळ यांनी ग्रासलेली एखादी गृहिणी कीटकनाशक पिऊन आपला होणारा छळ संपवते. कवितेच्या शेवटी या घटनेवर कवितागत स्त्रीमन जे भाष्य करते ते वाचकाला धक्कादायकपणे जाणीव करून देते की, " कितीजणींनी उचलून खाली ठेवलेली बाटली, अश्विनीने तोंडाला लावली ..." हुंडा,सासरच्या मंडळींची सततची पैश्याची मागणी यांसाठी अश्विनीसारख्या कितीतरी जणी कोंडून घालणाऱ्या सासरच्या छळाचा अनुभव घेत असतात.अश्विनी आत्महत्या करते, कित्येक जणी तडजोड करतात, सहन करतात. पण बंड कोणीच पुकारत नाही. हेच आपल्या नजरेत येते.

'कुणीच का बोलत नाही' (पृष्ट ९२) या कवितेतील निवेदक स्त्री.जी कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रियेला "नापिकता" म्हणते. आजूबाजूच्या बायांचे 'इथे सुया सेपरेट वापरतात ना? नाहीतर हे सरकारीय'असे कुजबुजण्यात ग्रामीण भागातल्या आरोग्यसेवेविषयी स्त्रीच्या मनातील साशंकता व्यक्त होते की 'एड्‌सच्या' धोक्याचे एक कारण फक्त ओठावर येते असा प्रश्न पडतो. जिथे स्त्रीच्या आरोग्याविषयीच अनास्था दिसते तिथे या एड्‌सग्रस्त स्त्रीचे भाष्य अस्वस्थ करते –

"इतक्याजणी झिजून मेल्यात

तिचं तरी कुठं सोनं होणाराय

मेल्यावर का कुणी वाळवून ठेवणाराय

पण कुणीच का बोलत नाही?" (पृ.९२)

परिस्थितीला शरण जाताजाता सर्वस्व हरवत गेलेल्या शोषित स्त्रीच्या भावनेलाही कवितेत वाट मिळते. 'संपवत कसं नाहीस' (पृ.९६) सारख्या कवितेतून एका डोंबारणीच्या जगण्यातले साच्याबाहेरचे दरिद्री भटकेपण समजून घेण्याची प्रेरणा कल्पना दुधाळ व्यक्त करतात.

कल्पना दुधाळ यांची कविता केवळ सहनशील ग्रामीण स्त्रीचे गौरवीकरण किंवा त्यांच्या व्यथेला वाचा फोडणारी असती तर एकप्रकारे सीमित ठरली असती.. त्यांच्या कवितांमधून व्यक्त होणारे स्त्रीमन आपली स्त्रीविषयक जाणीव,समकालीन भूमिका ठरवण्याचा प्रयत्न करताना दिसते.हे करताना भूतकाळाचे किंवा भोवतालाचेही विश्लेषण, निष्कर्षाचा खळखळाट नाही. कवितागत स्त्रीमन निरीक्षणे नोंदवत, आठवणी टिपत लोकगीतातल्या सहज संवादात्मक शैलीत आपले भाष्य करून जाते. 'रक्टं नेसण्याची गोष्ट'सारखी कविता म्हणजे कवितागत स्त्रीमन आपल्या आजीकडून कोणता बाईपणाचा वसा घेते याची अभिव्यक्ती होय. हा वसा म्हणजे अकाली आलेले थोरलेपण स्वीकारून भावंडांची आई होण्याचा,कष्टावर भरवसा ठेऊन कष्टाच्या सत्वावर लेकरांना वाढवण्याचा, करारीपणाचा, पट्ट्या वाघिणीच्या हुरुपाचा संस्कार होय.आजीच्या या संस्काराविषयी कवितागत मी म्हणते-

"खोटं बोलल्यावर

जीभ झडेल म्हणणारा ठामपणा

रेक्ट नेसावं पण कुणाचं नक्टं नसावं

असा करारीपणा

काळ्या दगडावरच्या रेघांसारखा

कोरलास माझ्यात" (पृ.८९)

'दिल्या घरी (पृ.११९) या कवितेत कवितागत स्त्रीमन आपली ओळख "सोनं मोडून सोयरं जोडणाऱ्या आईची मी पोरं" अशी करून देते.रोजच्या संसारातील संघर्ष करतानाही आजी-आईच्या वारसा आपण कसा राखला हा जीवनानुभव व्यक्त करताना कष्ट,प्रश्न,व्यथा या संघर्षातूनच जगण्याची सकारात्मक वाट कशी शोधली हे अतिशय समर्पक शब्दात कवितागत स्त्रीमन व्यक्त करते.-

"जगण्याला जीव लावला

की ओव्या उसन्या घ्याव्या लागत नाहीत

म्हणून गाडून घेतलं

तणानं माना मुरगाळलेल्या धानात

पाचवीलाच पुजलेल्या

न संपणाऱ्या राड्यारपाट्यात" (पृ.११९)

नव्या युगातील ही ग्रामीण स्त्री पारंपारिक स्त्री जीवन, कुटुंबव्यवस्थेतील तिचे स्थान समजून घेत, कृषीजन्य जीवनवास्तव स्वीकारताना म्हणते.- 'मातीचंच गणगोत' कसं उपटून

फेकणार ? (पृ.२३गणगोत) तिचे गणगोत मातीचे म्हणते तेव्हा ती एका 'भूमिकन्येच्या' रुपात साकार होते. या कवितासंग्रहाची शीर्षककविता "धग असतेच आसपास" कवितेत 'धग असतेच रक्तात जी शोषली जात नाही,खडुने शाई शोषल्यागत'. (पृ.१४) या ओळींमधून ग्रामीण स्त्रीची स्वीकारशीलता दिसते. तसेच पाचुंदा (पृ.६७ ) कवितेतील "पाच पेंड्यांचा पाचुंदा इस्कटू नये म्हणूनं स्वत:च आळाशा(ज्वारीची पेंढी)होणाऱ्या ग्रामीण शेतकरी बाईचे वर्णन महाराष्ट्रातल्या मातीतल्या कृषिकन्येच्या समंजस व्यक्तिमत्त्वाला उठाव देते..ग्रामीण स्त्री जीवनातील संघर्षाला तडजोडीचे उत्तर कायमच देत आली पण भूमिकन्या म्हणून न डगमगता सत्त्वपरीक्षेला सामोरे जाण्याचे बळ दाखवणारी ग्रामीण स्त्री या कवितासंग्रहातून जागोजागी दिसते.

**बदलते नातेसंबंध आणि कुटुंब जीवन –**

कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून व्यक्त होणारे स्त्रीमन शिक्षणाने आत्मभान आलेले स्वविकासाच्या नव्या वाटा शोधणारे आहे. लग्न होऊन एका शेतकरी कुटुंबात संसार करावा लागणे ही गोष्ट त्यांनी आपल्या जगण्याला कुंपण घालणारी न ठरवता जीवनाची अपरिहार्यता म्हणून स्वीकारलेली आहे..याची साक्ष काव्यगत व्यक्तिमत्त्वाच्या जीवनदृष्टीतून प्रतिबिंबित होते. प्राप्त वास्तवाच्या संदर्भात आपण जगण्याला अर्थपूर्णता देऊ लागतो कल्पना दुधाळ यांची कविता 'हृदयी पान्हा नयनी पाणी, स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी'या आजवरच्या ग्रामीण स्त्रीच्या प्रतिमेला आत्मशोधाचे परिमाण देते. ती शेती,मातीत राबते घराचे घरपण राखते आणि तरी स्वत:च्या अस्तित्वाचा एक कोपरा कवितेच्या रूपाने जपते.आपल्या कवी या व्यक्तिमत्त्वाची ओळख जपण्याची जाणीव या स्त्री मनाला आहे. स्वत:ला शेती-भाती आणि राबत्यात हरवून न देता निसर्गाशी एकरूप होणारी ही कृषीकन्या स्वत:तील मुक्तता 'रानभर मी '(पृ.७७)सारख्या कवितेतून अभिव्यक्त करते.

"डोक्यावर भारा घेऊन

जड पावलं टाकताना

रानभर माझेच आवाज

माझ्याशी बोलताना

..................

उभ्या-आडव्या काकऱ्यांमधे

मीच माझा जीव पेरून

उगवेल पहा कशी आता

मी हिरवी लिपी होऊन"(रानभर मी ,पृ.७७)

स्वत:ची ओळख जपणारी ही आधुनिक कृषीकन्या आपल्या मुलीच्या आयुष्याला घडवताना अधिक सजग आणि समाजमान्यतेच्या चौकटीतून दोघींनाही मुक्त करणारी दिसते. 'आधीच ऐकू येतं (पृ.५४) या कवितेत आपली आई आणि आपली मुलगी यांच्या दरम्यानचा आपण अनुभवलेला 'आई-मुलीच्या नात्याचा अनुबंध'व्यक्त होतो. त्याचप्रमाणे निवेदक स्त्रीमन आपल्या मुलीला अधिक मुक्त अवकाश देण्याची जबाबदारी व्यक्त करते.

"घट्ट धरलेली बाळमूठ सोडवून

तळहातावरच्या रेषा निरखल्या नाहीत मी

की हक्काने ठरवलं नाही तुझं आयुष्य

सगळ्या कपबश्या फोडल्यास घरातल्या

ग्लासवाट्या चेंबवल्या

ओरखड्यांनी भिंती कोरल्या

तरी उतू जाऊ दिलं

तुझं बिनधास्त खुदुखुदु हसणं

पारंपारिक ओव्यांची पैंजणं

अडकवली नाहीत तुझ्या पायांत –(आधीचं ऐकू येतं,पृ.५४)

या कवितेत आई-मुलीच्या नातेसंबंधाविषयी जाणीव व्यक्त होते तशीच खस्ता(पृ .८२) या कवितेत गावात हाताबाहेर जाणाऱ्या आपल्या मुलाच्या भविष्याची उभारणी करता यावी म्हणून त्याला आपल्यापासून दूर वसतीगृहात पाठवणारी आई दिसते.तिच्या खस्ता या मुलांच्या प्रगतीचे स्वप्न विणणाऱ्या आहेत ग्रामीण गृहिणीचे सजग पालकत्व समकालानुसार बदलण्याची तयारी हे जगण्याचे शहाणपण ती आपल्या आजी, आई यांच्याकडून उर्जा स्वरूपात मिळवत असते याची जाणीव व्यक्त करणाऱ्या कविता या कवितासंग्रहात दिसतात 'रक्टं नेसण्याची गोष्ट '(पृ.८७ ) आणि 'दिल्या घरी (पृ.११९) या कवितेत कवितागत स्त्रीमन असा मातृबंध व्यक्त करते. कुटुंब दुभंगू न देणाऱ्या गृहिणीच्या त्याग ,कष्ट आणि 'कारभारीण'असण्यातले कौशल्य व्यक्त करते 'दिल्या घरी (पृ.११९) कवितेतील ग्रामीण बाई आपल्या जगण्याचे वर्णन निसर्गाशी संवादी अशाच प्रतिमेतून करते.

"नाडीचं रिंगण करकचून आवळल्यावर

पोटात खळखळणाऱ्या

पाण्याचा तालावर उरकला रस्ता

आयुष्य समजून

मुठीत माती घट्ट धरली

वरून पाण्याची धार सोडली

तर रिकाम्या मुठीतही

भुईकमळं फुलली" 'दिल्या घरी (पृ.११९)

हे 'रिकाम्या मुठीत भुईकमळ फुलवण्याचे' कौशल्य ग्रामीण गृहिणीचा सकारात्मक दृष्टिकोन व्यक्त करतो.

'धग असतेच आसपास' या संग्रहातून व्यक्त होणारे स्त्रीमन मी,माझे कुटुंब या अवकाशाबाहेरील समाजवास्तवाचे डोळसपणे विश्लेषण करण्याची उर्मी आणि कुवत बाळगते. या कवितेतून व्यक्त होणारे स्त्रीमन भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक बदलाचे

निरीक्षण करते. समकालीन सामाजिक-आर्थिक आणि राजकीय स्थित्यंतराचा ग्रामीण कुटुंबव्यवस्थेवर कोणता प्रभाव पडला याविषयीचे विश्लेषण हे स्त्रीमन करते.

गाव ही मुळात एका बृहद कुटुंबाची संरचना होती.एका वंशाचे, भावकीचे नातेसंबंध गावात एकोपा निर्माण करीत होते.पण उतरोत्तर जसजशी व्यक्तिकेंद्री विकासाची प्रक्रिया गतिमान झाली तसतशी कुटुंबातील जमीन-जुमल्याच्या विभाजनाला सुरुवात झाली. त्यामुळे वाड्यातील कौटुंबिक संबंधही प्रभावित झाले. जमीन, संपत्तीविषयक वाद हे गावकी-भावकीत आधीही होते. तरीही गावकरी, जमीन, भावकी यांच्याविषयी जिव्हाळा टिकून होता.गावच्या आजी, मामा, काका अशा नात्यांमध्ये 'लेकरांचे मटामटा पापे घेण्यातला सहजपणा जिव्हाळा'तरी होताच .पण जेव्हा 'कुटुंबातील वाद -प्रतिवादाच्या फेऱ्या जीवघेण्या वारापर्यंत येऊन ठेपलेल्या दिसतात'. तेव्हा निवेदक स्त्री मन अस्वस्थ होते. 'अफवाही नाहीत या'(पृ.६०) या कवितेतील शेवटच्या ओळी नाती तुटण्याच्या अवस्थेला,भावनेला प्रत्ययकारक करतात.

"अफवाही नाहीत या

ऐकून सोडून द्यायला

कुजबुजींनी गुदमरलेलं वैर

जीवांवर बेतल्यापासून

एकमेकांकडे पाठ केलेल्यांना

जेवायला वाढताना

भाकरी मोडताना

प्रचंड भीती वाटते शब्दांना

ताटातुटीचे साक्षीदार होताना (अफवाही नाहीत या',पृ.६०)

गावात राहिलेले आणि विकासाच्या शोधात शहरात गेलेले अशा गावकी-भावकीतल्या कुटुंबांच्या स्थित्यंतराची नोंद या संग्रहातील कवितांमधून घेतलेली दिसते. गावगाड्यात स्वत:ची किमान ओळख,अस्तित्व असलेला माणूस रोजगाराच्या शोधात शहरात जातो तेव्हा रोजगार मिळत असेलही पण गमावतो ती सामाजिक प्रतिष्ठा. सांगा मायबाप (पृ.३०) ही कविता बंद दाराआडचे मध्यमवर्गीयपण दर्शवते. शहरातल्या आपल्या मुलाकडे गेल्यावर त्याचे झोपडपट्टीतील बकाल जीवन बघून भ्रमनिरास झालेल्या आईला मुलाने आईला समजवणे की, "तु मात्र आधीसारखंच सांगत रहा की तुझं पोर शहरात साहेब असल्याचं, म्हणजे तुला त्रास होणार नाही". (पृ.२८) शहरात स्वत:ला जगवणे कठीण तिथे आईवडिलांना कुठे आणणार?तर गावी राहणारे म्हातारे पालक म्हणजे पोसावी लागणारी दोन माणसे, ज्यांचं वास्तव भाकड गाईचं उरते. असे कोसळत जाणाऱ्या कौटुंबिक नातेसंबंधाची दखल कवितागत मी घेते. म्हातारा (पृ.७४) कवितेतील म्हातारा आंघोळीचा साबण, रात्रीची वीज अशा सामान्य गोष्टींचा लाभार्थी तर उरत नाही उलट चोरीचा आळ कधीही येऊ शकतो. घरातील वृद्ध माणसे आणि तरुण माणसे यांच्यातील नाते अभावग्रस्ततेने कसे प्रभावित होत आहे याविषयीची हतबलता कवितेतून जाणवते त्यामुळेच निवेदक स्त्री मन हा वर्तन-वृत्तीबदल निर्विकारपणे सांगते.

“पिकलं तरी शेंदाड कडूच

म्हणतात सगळे

पोर सुना नातवंडं

म्हातारा बिघडला म्हणतात

त्यालाही सगळ्यांविषयी तसचं वाटतं” (म्हातारा ,पृ.७४)

लपवण्याजोगं राहिलं नाही(११२) शेवट बदलले असते (पृ.५६)या कवितेत गावातील बदललेले सांस्कृतिक जीवन व्यक्तीसमाज नातेसंबंध यावर भाष्य केले आहे. गावगाडा, गावगाड्यातील माणसे यांचे परस्परांशी बलुतेदारीचे संबंधही जिव्हाळ्याचे, एकोप्याचे होते.पण इस्टेटीचे दावे, औद्योगिकीकरण, विकासाचे वारे आणि वेगवेगळ्या सत्तेच्या छावण्या यांच्यामुळे गावातील माणसांचे समुहजीवन पालटून गेले. गावच्या माणसांच्या मनात मातीविषयी तिरस्कार निर्माण होतो.जेष्ठांचा अनुभवाला किंमत उरत नाही हे वास्तव दोन वाघ (पृ.७०), विझो दिवा (पृ.७५) , इच्छा (पृ.८३) या कवितांमधून व्यक्त होते.सख्खे भाऊ वैरी होणे किंवा गणगोत कस्पटासमान मानणे,रक्ताच्या नात्यातला दुरावा असे गावातील माणसांच्या भावनिकतेचे विरत जाणारे अस्तर कवितागत स्त्रीमन नोंदवते. घराघरात पैसा, सत्ता, स्वार्थ अशा विषारी वादळाने हैदोस घातलेला दिसतो. पायरीवर डोकं टेकल्या- टेकल्या (पृ.८४) या कवितेतील स्त्री मन पंढरीच्या विठोबाकडे गावशिवाच्या समुह जाणिवेचे बदललेले अस्तर भडभडा बोलून टाकते. ग्रामीण माणसाच्या जगण्यातील संपलेली संवेदना, नात्यात आलेला कोरडेपणा, राजकीय आणि भांडवलदारी सत्ताधाऱ्यांनी गोठवलेले गावाचे गावपण अशी उलथापालथ ‘धग असतेच आसपासच्या’ केंद्रस्थानी दिसते. कल्पना दुधाळ यांच्या कवितेत एक संवादात्मकता आहे भोवतालच्या निसर्गाशी, वास्तवातल्या जीवनानुभवाशी, सोसणाऱ्या बाईपणाशी निवेदक स्त्रीमन सतत संवाद साधते. यातून ग्रामीण कुटुंबजीवनातील स्थित्यंतराची धग या कविता व्यक्त करतात.

**बदलते कृषीजीवन –** ‘धग असतेच आसपास’ या संग्रहातील कवितेला १९९० च्या आसपासच्या शेतकरी समाज वास्तवाची पार्श्वभूमी आहे. कल्पना दुधाळ यांच्या सर्वच कवितांमधून रानशिवाराच्या व्यथा, शेतकऱ्याच्या जीवनातील अस्थिरता, नव्या तंत्रज्ञानाची फसवी गत, आणि बाजारपेठ, खत, बी-बियाणांबाबत बदललेल्या कृषीधोरणाचा शेतकरी जीवनावर झालेला परिणाम यांविषयीचे चिंतन, भाष्य दिसते. गाभाच पोखरलाय फक्त (पृ.२४), कार्यशाळेत (पृ.२६), टीपरू(पृ.३२), रोपापासून मापापर्यंत (पृ.३५), सत्त्व (पृ.४२), वाढीचे वेड (पृ.४३), नखनख जीव (पृ.४४), सरवा (पृ.४६,), चलाखीचं धडं (पृ.५०), पेरले नाहीत नकार आपण (पृ.५२), एकाच दिवसात तीन ऋतू (पृ.५८), उकीर (पृ.५९), माहीर निसर्ग (पृ६६) या कवितांमधून कल्पना दुधाळ यांनी शेती आणि शेतकऱ्याच्या जगण्यातील धग व्यक्त केली आहे. समकालीन ग्रामीण कवितेतून सततचा दुष्काळ -अतिवृष्टी, जमिनीची नापिकी, नवे कृषी धोरण, मुक्त अर्थव्यवस्था आणि आधुनिक जैव तंत्रज्ञानावर आधारित शेती यांच्यामुळे “सगळ्या आयुष्याचाच सरवा” (पृ.४६) झाल्याची निराशा व्यक्त केली आहे. रोपापासून मापापर्यंत (पृ.३५) कवितेत कांदा उत्पादक शेतकरी आपली व्यथा मांडतो. निसर्ग आणि बाजारभाव दोन्हीही बेभरवश्याचे असताना रोपापासून ते मापापर्यंतचा प्रवास हा डोळ्यातनं पाणी काढणारा असतो.बरकतीचा एखादा

हंगाम सुद्धा तग धरून जगायला पुरेसा ठरेल अशी आशा बाळगत कांदा उत्पादक 'रोपापासून मापापर्यंत'चा प्रवास करतो.त्याची कांदा उत्पादक म्हणून हतबलता या कवितेत शब्दबद्ध होते .–

"कांदे उपटलेल्या खोलग्यात

धोरण गाडायची इच्छा होऊनही

विसरता आली नाही

मातीची बांधिलकी"( रोपापासून मापापर्यंत ,पृ.३५)

कांद्याला चकचकीत भाव मिळतच नाही. दरवर्षी त्याच्या हाती येतात नव्याने पेरायला नवीकोरी आश्वासने. या संग्रहातील कवितांना मागील काही दशकांची पार्श्वभूमी आहे.जिथे दुष्काळ, अवकाळी पाऊस अशी संकटे पाचवीलाच पूजलेली दिसतात. तर त्यापाठोपाठ नफेखोर भांडवलदार आणि कृषीबाजारपेठेचे धोरण अशा सुलतानी संकटाच्या पेचात शेतकरी अडकलेला दिसतो. नव्या जैवतंत्रज्ञानाने विकसित बियाणांची पेरणी, शेतीसाठी ही बियाणी वापरायची म्हणजे सोबत रासायनिक खते, पिकाचे कीड व्यवस्थापन करण्यासाठी औषधांचा फवारा अशी शेतकऱ्याची भांडवली गुंतवणूक त्याला कर्जबाजारी करू लागली. या चक्रात शेतकरी पार बेजार झाला आहे. हाती शून्य हीच अवस्था 'टीपरू' (पृ.३३) कवितेतील ऊस उत्पादक शेतकरी मांडतो..तो आपली व्यथा "गुळमाट होण्यासाठी किती जणांनी कर्जाच्या आगीत घेतली उडी" (पृ.३३) अशा शब्दात व्यक्त करतो. आधीच शेतीसाठी कर्जबाजारीपण ओढवते.त्यात भाऊबंदकीने झालेले जमिनीचे तुकडे त्यामुळे माथी आलेंले अल्पभूधारकपण अशी सगळीकडून होणारी कोंडी 'वाढीचं वेड, (पृ.४३) या कवितेत व्यक्त होते. ही कोंडी केवळ शेतकऱ्याच्या मनाची नाही तर जित्राबाच्या वावराची आणि वाढीचे वेड असणाऱ्या भोपळ्याच्या वेलीच्या विस्ताराची असते भौतिक आणि मानसिक संघर्षाला सामोरा जाणारा शेतकरी द्विधा मन:स्थिती अनुभवतो. कोणासाठी आणि कशासाठी ?असा प्रश्न त्याचं समोर उभा राहतो.

"-भाजीपाल्याचं गाठोडं बांधल्यागत

आवळू लागलंय

माझ्या वाटणीतल्या वावराचे चारी पदर

लाडे लाडे पायांत घुटमळलेलं

वाढीच वेडं

उचलून कुरवाळावं

लाथाडावं

की तुडवून जावं

कळेना झालयं ..."( वाढीच वेड ,पृ,४३ )

तरीही हा शेतकरी मातीशी शेत-शिवाराशी आपले नाते तोडू शकत नाही. पुन्हा नव्याने स्वप्नाची पेरणी करण्याचे बळ हा शेतकरी कुठून आणतो? त्याच्या जीवनातला सकारात्मक

दृष्टिकोनच  त्याला तारून नेत असतो,हा शेतकरी असण्याचा जीवनानुभव कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून प्रकट होतो.

“अवकाळी पावसाला

नासाड्या म्हणून स्वीकारलं

उरल्यासुरल्या मालाची पट्टी

जुगारावर उधळली

तरी पोटचा गोळा म्हणून

लेकरू पदराखाली घेतलं

कोलमडलेल्या केळीच्या खुंटांना

कळकाचा टेकू दिल्यागत

उभारलं स्वत:ला ((पृ.५२ पेरले नाहीत नकार आपण )

निसर्ग आणि माणूस विशेषत: शेतकरी यांच्यात एक देवाणघेवाणीचे नाते आहे. शेतकरी कष्ट करणार आणि निसर्ग आश्वासक राहून त्याच्या कष्टाचे फळ त्याला देणार हा विश्वास या नात्यात होता.निसर्गाच्या अनिश्चित रूपाशी शेतकऱ्याचा पूर्वपरिचय असल्यानेच भुई नांगरताना, बी पेरताना हा शेतकरी आपले सर्व सत्त्वच जणू पणाला लावीत असतो. बी पेरलं तर पाऊस पडेल का? पाऊस दुबार पेरणीचे संकट तर आणणार नाही ना? अशी धाकधूक असणारी  ही कृषीकन्या कष्टाचे सत्त्व पणाला लावून नव्याने  पेरणी करते तेव्हा जणू. मातीचे सटवाईशी नाते जोडते.तिच्याकडे कष्टाचे फळ मिळावे म्हणून  प्रार्थना करते

“धण्याची मूठ मातीला देऊन

बजावत आले विश्वासानं

मायमाऊले ओटी भरते

पाव ग कष्टाला

रास म्हणून काणी पिकवलीस

तरी काणीतला बुक्का कपाळाला लावून

जपेन माझं सत्त्व.” (सत्त्व, पृ.४२)

काणीतला बुक्का लावूनही आपले सत्त्व राखण्याची सकारात्मकता,आश्वासकता  कल्पना दुधाळ यांची नायिका दाखवू शकते.

या सकारात्मक दृष्टिकोनासोबतच माणूस आणि निसर्ग या नात्यात विकासाच्या, प्रगतीच्या लाटेने निर्माण केलेल्या अंतर्विरोधाची जाणीव ‘धग असतेच आसपास’या कवितासंग्रहातून व्यक्त होते. निसर्गाचे व्यवस्थापन करीत जाणाऱ्या माणसांने  आपण केलेल्या पर्यावरण ह्रासाचे परिणाम जाणले नाहीत किंवा त्याविषयी तो बेसावध राहिला.तेव्हा निसर्गाचे विपरीत रूप प्रकट झाले. ‘माहीर निसर्ग’ (पृ.६६) या कवितेतील  ‘निसर्गरम्य डोंगराने कुशितलं गाव गिळताना पाहिलेला माणूस’ निसर्गाचे वर्णन “भक्कमपणे पाठीशी राहून विचारपूर्वक पाठीत

खंजीर खुपसण्यात माहीर” असे करतो. ’या अभिव्यक्तीत ग्रामीण माणूस आणि निसर्ग यांच्या नात्याचे आकलनच बदलते. ‘एकाच दिवसात तिन्ही ऋतू ‘(पृ.५८), ‘धरणातलं पाणी आटल्यावर’ (पृ.६२) या कवितांमधूनही पर्यावरणाची हानी कशी गावच्याच मुळाशी आली यावर भाष्य घडते. कवितागत ग्रामीण स्त्रीमन बदलत्या भौतिक वास्तवाचे निरीक्षण करताना कृषक समाजासमोरील नव्या आव्हानांचा वेध घेऊ लागते.

**खेड्यावर जागतिकीकरणाचा प्रभाव**

कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून १९९० च्या काळातील ग्रामीण समाज, शेती आणि पर्यावरण याबाबत होणारी उलथापालथ व्यक्त झाली आहे. पूरग्रस्त, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, भूकंपग्रस्त अशी ग्रामीण माणसांची वर्गवारी होऊन त्यांच्या विस्थापनाचे आणि न झालेल्या पुनर्वसनाचे प्रश्न या काळातल्या ग्रामीण समाजाला भेडसावत होते.प्रत्येक विकासाची योजना गावकऱ्यांच्या संधी,स्वप्नांना हुलकावणी देत यशस्वी होतात. ‘पाणलोट क्षेत्राखाली अख्खी जमीन जाणे, म्हणजे एक पिढ्यान् पिढ्यांची वस्ती हरवणे. ’एका समुहाची ओळख हरवणे.ही दुखरी जाणीव ‘धरणातले पाणी आटल्यावर’ (पृ.६२) या कवितेत शब्दरूप होते.या कवितेतील “देशोदेशीच्या निर्वासितांबद्दल सहानुभूती” वाटू लागते.” हे विधान विकास आणि विस्थापित ,निर्वासित यांच्या प्रश्नाची व्यापकता स्पष्ट करते. ‘परिवर्तनाच्या नावानं (पृ.७२) या कवितेत नव्या आर्थिक धोरणाने आणलेली ‘कमिशन व्यवस्था’, नेटवर्कचे पसरत जाणारे जाळे ‘कृषीसेवाकेंद्राच्या’ आडची भांडवलदारी ,रासायनिक खते आणि संकरित बियाणे यांनी अधोरेखित केलेली प्रयोगशील शेती, जोडधंद्याच्या बाता अशा एका मागोमाग वाट चुकलेल्या परिवर्तनाची दखल कवितागत मी घेते. बदललेल्या ‘गावशिवा’ (पृ.८०) अशाच अस्वस्थ करतात.

“कुठूनही आरोळी ठोकली

तरी हमखास मिळणारा प्रतिसाद

सांभाळून होत्या गावशिवा कालपरवापर्यंत

आज या साउंडप्रुफ भिंती उगवल्यात

बांधा बांधावर (पृ.८०)

जागतिकीकरणाने संपर्काची माध्यमे आणली त्यामुळे विश्व एक खेडं व्हायला हवं होतं प्रत्यक्षात माणसे जनसंपर्कच हरवून बसली. ‘बांधा बांधावर उगवलेल्या साउंडप्रुफ भिंती’ ही प्रतिमा अस्वस्थ करते. जागतिकीकरणाच्या प्रभावात ‘पोरांच्या पुस्तकातल्या नकाशावरील देश-विदेशांच्या पायवाटा’घरातील गृहिणीसुद्धा जाणून घेऊ लागली. अशावेळी जगाच्या पायवाटा जागतिक बातम्यांमधून समजून घेणाऱ्या कवितागत स्त्री मनाला मूल्यात्मक प्रश्न पडतो. की जागतिकीकरणाने मानवतेची वैश्विक भावना रुजली का? या विश्वात्मकाच्या भावनेची जुळवाजुळव करणाऱ्या स्त्रीमनाचे पुढील उद्गार मानव्यतेच्या वैश्विक भावनेचा संवेदनानुभव जुळवू पाहते.

“मी इथं फुंकलं

तर ब्राझील मधल्या बाईच्या चुलीला जाळ लागला पाहिजे

नाईल नदीच्या काठावरचं पाणगवत

ओळखीच असलं पाहिजे

अफगाणमध्ये पोरीला मारलं

तर वळ माझ्या पाठीवर उमटला पाहिजे

कुठल्याही आदिवासींच्या जखमांवर

मी पदराची चिंधी बांधली पाहिजे

पण इथ

शेजारचा कोंबडा आला फडफडत

तर आरवण्याआधीच कापतोय आम्ही (जगाच्या पायवाटा,पृ.१०५)

भोवतालच्या वास्तवाचे निरीक्षण करताना 'धग असते आसपास 'या काव्यसंग्रहातील कविताभोवतालच्या सामाजिक- राजकीय स्थित्यंतरावर भाष्य करू लागतात. सत्तालक्षी आणि विचारप्रणालींशी फारकत घेतलेले पक्षीय राजकारण यांची चिन्हे ग्रामीण भागातही दिसू लागली. लोकशाही व्यवस्था कोलमडून पडत असल्याची राजकीय आणि सांस्कृतिक दहशतवादाचे सावट गावाच्या परीघावर घोंगाऊ लागले .'धग असतेच आसपास' मधल्या कविता हे पडसाद टिपतात.

1."----

पण झेंड्यांनी विभागलेली घरं

आणि बोलण्या -वावरण्याला

लक्ष्मणरेषा आखल्याचं ऐकिवात नव्हतं कधी

दारामागं दणकट काठ्या ठेवायला

विरोध नव्हता कुणाचाच

पण पिस्तुलाच्या धाकानं

भरली नव्हती धडकी ( गावशिवा , पृ.८०)

2."रद्दी बांधताना

ग्रामसेवकाच्या आत्महत्यांच्या बातम्यांनी

पहिल्यांदा हादरलो

दुसऱ्यांदा भेदरलो

तिसऱ्यांदा डोळे फाडून वाचलं

जे तंतोतंत जुळत होतं आपल्याला

चौथी बातमी छापण्याआधी

दावं तोडून मोकळं झालो" ('दाव तोडून ,पृ.१०८)

भोवरे, (पृ.११०) या कवितेतही जागतिकीकरण नामक भोवऱ्यात भिंगताना "महासत्ता गेली खड्डयात ,कशाची आक्रीत चाहूल आहे ते शोधत राहतो. असा अनुभव कवितागत मी अभिव्यक्त करते .

कवितेची बांधिलकी -

कल्पना दुधाळ यांच्या कवितांमधून व्यक्त होणारे संवेदनशील कवीमन हे ग्रामीणतेशी केवळ भावनिक अनुबंध जोडत नाही. गावशिवाराच्या गतवैभवाविषयी केवळ व्याकुळता दर्शवत नाही.तर ग्रामीण समाज वास्तवाचे भोवतालच्या स्थित्यंतराचे विश्लेषण करणाऱ्या एका सजग नागरिकाची अस्वस्थता, उद्विग्नता या कवितांमधून व्यक्त होते. कोणत्याही समाज परिवर्तनवादी विचारसरणीशी बांधिलकी या कवितांमधून व्यक्त होत नाही. पण कवी आणि भोवतालचे सामाजिक वास्तव यांच्यातील परस्पर देवाणघेवाणीचे नाते कवितागत सर्जनशील कविमन जाणते. यांची साक्ष या संग्रहातील कवितांचे शेवट पाहिल्यावर मिळते. ग्रामीण माणसाच्या समंजस आणि आशावादी जीवनदृष्टीला हे शेवट आवाहन करतात. "आतोल्या तर शाबूत आहेत ,उगवतील आज ना उद्या" (पृ.२५) , "गणगोत होऊनिया, पुन्हा गवतं उगावी" (पृ.२३), "ती वेळ टळली असती तर अजूनही शेवट बदलले असते." (पृ.५७) जगण्यासाठी ,संघर्षासाठी एक सकारात्मक जीवनदृष्टी घडवणे ही कलात्मक नैतिक जबाबदारी कवीमन स्वीकारते. कवितेविषयी कवीची भूमिका व्यक्त करताना "उगवेल पहा कशी आता, मी हिरवी लिपी होऊन" "रानभर मी '(पृ.७७)असे म्हंटले आहे. ज्यातून निसर्गाशी जोडलेले नाते आणि सकारात्मक जीवनदृष्टी ही दोन केंद्रे व्यक्त होतात. कवितेला माहीत झालयं (पृ.१००) या कवितेतून परिवर्तनाला संवाही असा कवितेचा स्वभावधर्म सांगितला जातो. समकालीन जीवनातील उलथापालथ कवितेचा आशय कसा होते यांची जाणीव व्यक्त होते.

"विचारांशी विचारांनी लढायचं धाडस नाही

म्हणून उगमालाच गोळ्या घालायला

सोकावतोय काळ

ही कालातीत उलाघालही

जाणवलीय कवितेला" कवितेला माहीत झालयं (पृ.१००)या ओळी कवितेचे सामर्थ्य दर्शवणाऱ्या आहेत. आपल्या काव्यलेखनाच्या जबाबदारीचे भान कवितागत मी व्यक्त करते.आत्मनिष्ठ कवितेपासून ते सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेपर्यंत उत्क्रांत होणारा प्रवास "धग असतेच आसपास'या कवितेतून व्यक्त होतो.१९९० नंतरच्या काळातील समाजवास्तवाला ग्रामीण कवींनी जो प्रतिसाद दिला आहे. तो क्रांतिकारक,बदलासाठी कवितेचे शस्त्र उपसण्याचे धाडस बाळगणारा आहे. कल्पना दुधाळ यांची कविता याच बांधावरून प्रवास करताना दिसतात.ग्रामीणता आणि सामाजिक स्थित्यंतर या दोन्ही पाती त्यांच्या कवितेच्या आशयात सामील दिसतात. कल्पना दुधाळ अभिव्यक्त करीत असलेली वैचारिकता आणि अनुभवविश्वामुळे त्यांची कविता समकालीन स्त्री कवींमध्ये वेगळी ठरते.

## **३ब**.३ समारोप

ग्रामीण भागातील स्त्री जीवनाचा एकूणच जिवनलेख ' धग असतेच आसपास ' या कविता संग्राहात कल्पना दुधाळ यांनी ग्रामीण जीवन वास्तवतेने आपल्या कवितेतून उभ केल आहे. छोट्या छोट्या संसाराच्या कचाट्यात सापडलेल्या कष्टकरी महिलांच्या जीवणानुभवाची कहाणी आहे. तसेच सामान्य कष्टकरी मासाविषयीच्या कळवळ्यातून कल्पना दुधाळ यांनी ही कविता आकारास आली आहे. निसर्गाचे आणि शेतीचे माणसाचे नाते या कवितेतून शोधताना दिसते. आसपासच्या धगितून आपल जीवन फुलवण्याचा पर्यंत्न या कवितेत महिला करताना दिसून येते. तसेच नात्यातल्या दु:खाची अर्थपूर्ण मांडणी करताना दिसून येते .

## **३ब.४ सरावासाठी प्रश्न**

1. 'धग असतेच आसपास' या काव्यसंग्रहातून १९९० नंतरच्या ग्रामीणतेचा बदलता चेहरा कसा साकार होतो? स्पष्ट करा.
2. कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवा कालसंगत अशा आहेत यांची चर्चा करा.
3. १९९० नंतरच्या ग्रामीण स्त्रीचे चित्रण 'धग असतेच आसपास' या काव्यसंग्रहातून कसे घडते?

## **३ब.५ संदर्भ ग्रंथ**


- धग असतेच आसपास -कल्पना दुधाळ ,लोकवाङ्मय प्रकाशन ,मुंबई ,तिसरी आवृत्ती मार्च १९२१

- युगांतराची कविता-डॉ. किशोर सानप ,ग्रंथाली प्रकाशन ,प्रथम आवृत्ती २० ऑगस्ट २०१९


❖❖❖❖

**टी. वाय. बी. ए.  सत्र V**

**अभ्यास पत्रिका –VI**

**साहित्य आणि समाज**

१. अंतर्गत चाचणी – २० गुण
२. सत्रांत परीक्षा – ८० गुण

नमूना प्रश्नपत्रिका - गुण – ८०

सूचना :१) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न 1.खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या. (कोणताही एक प्रश्न )

साहित्य , समाज आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा. २०

**किंवा**

मानवतावादाचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा.

प्रश्न २. रा .खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.

महानगरीय साहित्याच्या स्वरूप वैशिट्याची चर्चा करा.

**किंवा** २०

महानगरीय कादंबऱ्याचा आढावा घ्या.

प्रश्न ३ रा. खालील पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा २०

१. 'क्रमशः' या कादंबरीचे आशयसूत्र उलगडून दाखवा.
२. 'क्रमशः' या कादंबरीत आलेले सामाजिक वास्तव तुमच्या शब्दांतरेखाटा.
३. 'कल्पना दुधाळ' यांच्या 'धग आसपास असतेच' या कविता संग्राहाचा आढावा घ्या
४. बाळू कासार या व्यक्तीचे स्वभाव वैशिष्टे तुमच्या शब्दांत सांगा.

प्रश्न ४ . टिपा द्या. (कोणतेही दोन ) २०

१. ग्रामीण साहित्याचे तत्वज्ञान
२. क्रमशः मधील मुंबई शहर
३. मार्क्सचा 'पाया व इमला' सिद्धांत.
४. पाश्यात्य स्त्रीवादी चळवळ

❖❖❖❖